म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा.वा
दा. क्र. : १९९७

IRBK-0101990
IRBK-0101990

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

14 MAR 1976

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प २१ वें

# गांधीजींचें विविध दर्शन

संकलनकार

**डॉ. एस्. राधाकृष्णन्**

अनुवादक

नारायण गणेश गोरे

अनुक्रम २८९१९
विभाग का. वा.
क्रमांक ७०५९
नों. दि. ३-९-३७
वाचनालय शाखा
क्र. ९१६७ नों. दि.
IRBK-0101990
IRBK-0101990

द्वितीयावृत्ति १९४४ ]

[ मूल्य २। रुपये

प्रकाशक

**रघुनाथ गणेश जोशी**
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेच्या
विश्वस्त मंडळाकरितां.
१२ टिळक रोड, पुणें २

संपादक

आचार्य **शं. द. जावडेकर**
आचार्य **स. ज. भागवत**

मुद्रक

**जनार्दन गणेश जोशी**
जनार्दन सदाशिव लि. चा प्रेस,
३९४ सदाशिव पेठ, पुणें २

# प्रस्तावना

म. गांधी हे एक जगद्विख्यात अद्वितीय राजकीय कर्मयोगी आहेत. त्यांचें असामान्य विभूतिमत्त्व मान्य करण्यास त्यांचीं सर्व मतें मान्य असण्याची आवश्यकता नाहीं. त्यांच्या सतराव्या जयंतीच्या दिवशीं भारतीय तत्त्वज्ञानाचे सुप्रसिद्ध आचार्य सर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनीं जगांतील निरनिराळ्या थोर पुरुषांना गांधीजींच्या जीवनसंदेशासंबंधीं आपले विचार प्रदर्शित करण्याची विनंति केली आणि अमेरिकेपासून चीन–जपानपर्यंतच्या सर्व राष्ट्रांतील अनेक थोर पुरुषांनीं आपले विचार मोठ्या उत्सुकतेनें आणि अभिमानपूर्वक आदरानें प्रकट केले. या सर्व निबंधांचा एक ग्रंथ गेल्या गांधीजयंतीस इंग्रजींत प्रसिद्ध झाला असून त्याचा संक्षिप्त अनुवाद मराठींत प्रसिद्ध करण्यांत येत आहे. हा अनुवाद शक्य तितका यथातथ्य करण्याचें बिकट कार्य श्री. गोरे यांनीं केलें आहे. मूळ ग्रंथांतील सर्वच निबंधांचा अनुवाद करावयाचा तर या पुस्तकाचा आकार निदान दुप्पट तरी झाला असता व त्याची किंमत वाढून तितका प्रचार झाला नसता. म्हणून मूळ ग्रंथांतील कांहींची निवड करून त्यांचाच अनुवाद करण्यांत आला आहे. ही निवड करतांना जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांतील भिन्न भिन्न विचारांचे व अनेक क्षेत्रांतील कार्यकर्ते म. गांधींच्या जीवनाकडे व अर्थात् त्यांच्या कार्याकडे, कोणत्या दृष्टीनें पाहतात आणि या असामान्य भारतपुत्रापासून कोणता महत्त्वाचा बोध जगानें घ्यावा अशी त्यांची अपेक्षा आहे, तें मराठी वाचकांस समजावें अशी दृष्टि ठेविलेली आहे. असें करतांना मूळ ग्रंथांतील लेखकांचें स्थूल वर्गीकरण करून प्रत्येक वर्गांतील कांहींची निवड करण्यांत आली आहे. ज्यांची निवड केली, त्यांतील बहुतेकांचे अनुवाद समग्र करण्यांत आलेले आहेत व दोन तीन ठिकाणींच फक्त कांहीं भागाचा संक्षेप केला आहे. या पद्धतीमुळें जवळजवळ निम्मे निबंध मराठी पुस्तकांत आलेले नाहींत; तरी जे आले आहेत ते समग्र व यथातथ्य आहेत.

गांधीजी हे एक अद्वितीय राजकीय कर्मयोगी आहेत असें प्रथम म्हटलें त्याचा अर्थ अधिक विस्तारानें विशद झाला म्हणजे त्यांच्या जीवनाच्या विविध अंगांचा बोध होऊं शकेल. कर्मयोग म्हटला कीं त्यांत आध्यात्मिकता आलीच आणि राजकीय कर्मयोग म्हटला कीं त्यांत राजकारणाचा व व्यवहाराचा संबंध आला. या दोन प्रवृत्ती फारच क्वचित् एकत्र आढळतात. पण म. गांधींच्या चरित्रांत त्यांचा सुंदर संगम झालेला दृष्टीस पडतो आणि या दोन्ही क्षेत्रांतील ते एक द्रष्टे पुरुष आहेत. ते साक्षात्कारी संत आणि द्रष्टे राजकारणी पुरुष आहेत अथवा त्यांच्या जीवनाचे हे दोन प्रमुख पैलू आहेत. कांहीं लोक त्यांच्या साक्षात्कारी संतवृत्तीमुळें त्यांच्याकडे आकर्षित होतात, तर इतर कांहीं त्यांच्या राजकारणांतील द्रष्टृत्वामुळें त्यांच्याकडे ओढिले जातात; पण त्यांच्या जीवनाचे हे दोन पैलू पृथक् करतां येणार नाहींत आणि त्यांच्या इतर पैलूंकडेहि दुर्लक्ष करतां येणार नाहीं. त्यांच्या जीवनांतून एका अभिनव संस्कृतीचा उद्भव होत असून मानवसंस्कृतीला जितकीं विविध अंगें आहेत तितक्या सर्व अंगांवर त्यांच्या संदेशाचा प्रभाव पडत राहणार आहे. जगाला एक नवी दृष्टि ते देत आहेत आणि या नव्या दृष्टीमुळें प्रत्येक क्षेत्रांतील मानवांना नवी सृष्टि अथवा सृष्टीचें एक नवें स्वरूप प्रतीत होत आहे. त्यांचें जीवनकार्य घडून जाण्यापूर्वीचें जग आणि त्यानंतरचें जग यांत फरक पडणार आहे आणि आपल्या परिश्रमांच्या तपश्चर्येनें जगाचा उद्धार करून त्यांचा अवतार समाप्त होणार आहे. इतकें करूनहि ते स्वतः आपण जगाला कांहीं नवा संदेश देत आहों असें मानीत नाहींत. पूर्वींच्याच सनातन तत्त्वांचें आचरण करण्याचा प्रयत्न आपण करीत आहों असें ते मानतात व तें एका अर्थी खरेंहि आहे. ते क्रांतिकारक आहेत, पण ते सनातनी क्रांतिकारक आहेत. मानव-संस्कृतीचें नैतिक व आध्यात्मिक अधिष्ठान नष्ट झालें म्हणजे तिचा ऱ्हास होतो. हा ऱ्हास थांबवून मानव-संस्कृतीचा उद्धार करण्याचा एकच सनातन मार्ग आहे व तो म्हणजे तिचें नष्ट झालेलें आध्यात्मिक अधिष्ठान तिला पुनः प्राप्त करून देणें हा होय. या मार्गाचाच ते आश्रय करीत आहेत आणि त्यांच्या या कार्यासच आज क्रांतिकारक स्वरूप प्राप्त झालेलें आहे. कारण, आजच्या मानवसमाजाला मुळींच आध्यात्मिक

अधिष्ठान उरलेलें नाहीं. श्रीकृष्ण, गौतमबुद्ध, महंमद पैगंबर, येशू ख्रिस्त या सर्वांनीं आपापल्या काळांत अशींच कार्यें केलीं आणि त्यांच्याच कार्याचें सूत्र आजच्या परिस्थितीला अनुरूप अशा स्वरूपांत गांधीजी पुढें चालवीत आहेत. या सर्व धर्मसंस्थापकांच्या संदेशांत त्यांना विरोधी संदेश दिसत नाहींत; तर त्या सर्वांत एकच सूत्र गोविलेलें त्यांना दिसतें. बुद्धानें अहिंसा उपदेशिली आणि श्रीकृष्णानें हिंसा पुरस्कारिली, अथवा महंमदानें हिंसेचा उपदेश केला आणि ख्रिस्तानें अहिंसेचा प्रचार केला, असें त्यांना वाटत नाहीं. सत्य आणि अहिंसा हाच सर्व धर्मांचा संदेश आहे असें ते मानितात.

जगांत सत्य व असत्य, अहिंसा आणि हिंसा हीं दोन्ही तत्त्वें आढळतात, म्हणून हीं विरोधी द्वंद्वें त्याला सारखींच तारक आहेत असा निष्कर्ष ते काढीत नाहींत. स्थूल दृष्टीला सत्याहून असत्याचा आणि अहिंसेहून हिंसेचा पसारा अधिक दिसतो, किंबहुना सर्वत्र असत्य व हिंसाच भरलेलीं आहेत असा भास होतो; पण असत्यावर सत्याचा व हिंसेवर अहिंसेचा विजय होतो व व्हावा अशीच जगाची घटना आहे, असा गांधीजींचा साक्षात्कार आहे; म्हणजे तसा त्यांना सर्व जीवनांत अनुभव येत आहे व तो एकसारखा वाढत आहे. आम्ही सामान्य जन ज्या जगांत वावरतों, त्याच जगांत ते वावरतात; सामान्य लोक व्यवहार करतात ते सर्व तेहि करतात; पण सामान्य जनांना जगाचें जें सर्व दिसतें त्याहून त्यांना तें भिन्न दिसतें आणि ते जे व्यवहार करतात त्या व्यवहारांमागील त्यांची प्रेरणाहि भिन्न आहे. जगावें कसें हा प्रश्न त्यांच्यापुढें नसून सत्यनिष्ठ कसें बनावें हा त्यांच्यापुढें प्रश्न आहे. सत्य हें जगाचें अधिष्ठान आहे आणि जो सत्यनिष्ठ बनतो तोच खरा जगतो; चिरंजीव, अमर बनतो अशी त्यांची श्रद्धा आहे. जगांतील सर्व आपत्तींचें मूळ असत्यांत असून त्यामुळेंच तें मृत्यूच्या दाढेंत सांपडलें आहे. या सत्याचें ज्ञान आणि प्राप्ति अहिंसेनें होते. हिंसेनें सत्याची प्राप्ति होत नाहीं. पण अहिंसा म्हणजे भीरुता नव्हे. भीरुता ही हिंसेपेक्षांहि त्याज्य आहे. एक वेळ हिंसा पुरवेल, पण भीरुता पुरवणार नाहीं असा त्यांचा दंडक आहे. अहिंसेचें आचरण करण्यास संपूर्ण अभयवृत्ति अंगीं बाणावी लागते आणि फलांविषयीं पूर्ण

अनासक्ति उत्पन्न व्हावी लागते. ही अभयवृत्ति आणि अनासक्ति अंगीं बाणली असतां मनुष्याच्या हातून हिंसेचें आचरण होणार नाहीं आणि सत्यनिष्ठेपासून तो ढळणार नाहीं. संपूर्ण सत्यमय होणें हाच मनुष्याचा मोक्ष आहे आणि सत्य हाच परमेश्वर आहे. देहधारी मानव संपूर्ण सत्यमय होऊं शकला नाहीं, संपूर्ण अहिंसा त्याला आचरितां आली नाहीं, तरी तसें होण्याचा सतत यत्न करीत राहणें हाच त्याचा धर्म आहे व त्यांतच त्याचा मोक्ष आहे. मानव-संस्कृतीचें आध्यात्मिक अधिष्ठान तें हेंच होय आणि तें तिला प्राप्त झाल्यानेंच जगाला शांतीचा आणि शाश्वत सुखाचा लाभ होईल.

यांत नवें असें काय? सर्व साधुसंतांनीं आणि धर्मपुरुषांनीं हेंच सांगितलें नाहीं काय? होय; यांत नवें कांहींच नाहीं आणि सर्व साधुसंतांनीं व धर्म पुरुषांनीं हेंच सांगितलें. पण जिला आधुनिक संस्कृति म्हणतात ती या तत्त्वांवर अधिष्ठित झालेली नाहीं आणि तिच्यांत वावरणाऱ्यांना या तत्त्वांचें आचरण करतां येत नाहीं अथवा ते करीत नाहींत. यासाठीं ही संस्कृति आमूलाग्र उखडून टाकिली पाहिजे आणि आध्यात्मिक अधिष्ठानावर मानव-संस्कृतीचें नवें मंदिर उभारलें पाहिजे. हें जाणणारे आणि बोलणारेहि पुष्कळ आहेत. पण तेंच आपलें जीवित-कार्य करून तसा प्रचंड प्रयत्न करणारे पुरुष विरळे आहेत. त्यांतून असा प्रयत्न करणारांत राजकारणी पुरुष विशेष नाहींत आणि तसेहि जे कोणी आहेत त्यांत अहिंसानिष्ठ कोणी नाहींत. राजकीय हिंसेनें जगाची सुधारणा करण्याचा काळ निघून गेला, तो प्रयोग अयशस्वी ठरला, आतां अहिंसेचें राजकारण सुरू केलें पाहिजे असें सांगणारे आणि अहिंसेचें नवें राजकारण निर्माण करणारे म. गांधी हे एकच थोर पुरुष जगांत आहेत. हेंच त्यांचें राजकारणी द्रष्टृत्व होय. आणि अहिंसेनें हिंसेवर व सत्यानें असत्यावर विजय संपादन करतां येतो हा जो अनुभव त्यांनीं आपल्या तपश्चर्येनें घेतला हेंच त्यांचें साक्षात्कारी संतपण होय.

या त्यांच्या अलौकिक गुणांमुळें मुत्सद्दी आणि राज्यशास्त्रज्ञ, धर्मनिष्ठ आणि तत्त्वज्ञानी, समाजसेवक आणि समाजशास्त्रज्ञ अशा बहुविध पंडितांचें लक्ष त्यांनीं वेधून घेतलें आहे. या मराठी पुस्तकांत अशा एकंदर सत्तावीस

थोर व्यक्तींच्या निबंधांचा अनुवाद करण्यांत आला आहे. त्यांतील सर्वांना म. गांधींचीं सर्व मतें मान्य आहेत असें नाहीं. त्यांच्यापैकीं अनेकांनीं आपला मतभेद व्यक्तहि केलेला आहे; पण त्या सर्वांनीं गांधीजींच्या विभूतीचें असामान्य माहात्म्य वर्णिलेलें आहे. या त्यांच्या विचारसागरांतील कांहीं रत्नांकडे वाचकांचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न येथें केला, तर तें फारसें अनुचित वाटणार नाहीं अशी आशा आहे.

प्रथमतः मुत्सद्दी आणि राज्यशास्त्रज्ञ यांच्या विचारांकडे थोडें लक्ष देऊं. अशा लेखकांत लॉर्ड सॅम्युएल, लॉर्ड सँकी, जनरल स्मट्स्, मिर्झा इस्माईल, आणि बाबू राजेंद्रप्रसाद इत्यादींची मुत्सद्यांत गणना होते; आणि प्रो. जोड, बार्कर, कीथ यांची राज्यशास्त्रज्ञांत गणना होते. मिर्झा इस्माईल आणि बाबू राजेंद्रप्रसाद हे हिंदी मुत्सद्दी असून राजेंद्रबाबू हे तर म. गांधींचे शिष्य आणि राजकारणांतील उजवे हात आहेत. मिर्झा इस्माईल हे हिंदु संस्थानांतील मुसलमान मुत्सद्दी असून त्या दृष्टीनें त्यांचे विचार प्रत्येकास महत्त्वाचे वाटतील. लॉर्ड सॅम्युएल व सँकी हे सुप्रसिद्ध ब्रिटिश मुत्सद्दी असून एका दृष्टीनें ते गांधीजींचे प्रतिस्पर्धीहि म्हणतां येतील. जनरल स्मट्स् यांच्या निबंधाला विशेष महत्त्व असें आहे कीं दक्षिण आफ्रिकेंतील लढ्यांत गांधीजींनीं त्यांच्याशीं उघड सामना केला होता. जनरल स्मट्स् हे एक मुत्सद्दी असले तरी तत्त्वजिज्ञासु असल्यामुळें त्यांनीं गांधीजींच्या अहिंसात्मक राजकारणाचें फार मार्मिक आकलन केलेलें दिसून येतें. प्रस्तुत लेखकाच्या मतें जनरल स्मट्स् यांनीं म. गांधींच्या राजकारणाचें अथवा त्यांच्या सत्याग्रही साधनाचें जें विवेचन केलें आहे, तें फारच बोधप्रद झालेलें आहे व त्यामुळें या निबंधास अग्रस्थान देतां येईल. प्रत्यक्ष प्रतिपक्षानें व्यक्त केलेले विचार आणि प्रकट केलेल्या भावना या दृष्टीनेंहि त्यांना महत्त्व असून सत्याग्रह हा एक संग्रामप्रकार असला तरी त्याचें पर्यवसान प्रतिपक्षीयांच्या स्नेहांत कसें होत असतें, याचें एक उत्कृष्ट उदाहरण हा निबंध वाचून आपल्या मनश्चक्षूंपुढें उभें राहतें. तात्त्विक दृष्ट्या या निबंधांतील एक दोन मुद्यांकडे आपणांस पुनः लक्ष द्यावें लागेल.

लॉर्ड सॅम्युएल यांनीं म. गांधींचीं तीन महत्कृत्यें म्हणून वर्णिलीं आहेत. एका प्रचंड खंडतुल्य राष्ट्राला जागृत करून त्याला स्वातंत्र्ययुयुत्सु बनविलें, स्वातंत्र्ययुद्ध आणि अहिंसा यांचा समन्वय साधला आणि अस्पृश्य गणलेल्या कोट्यवधि हरिजनांना उद्धाराचा मार्ग दाखविला. या सर्व महान् कृत्यांचा एकत्र उल्लेख करून ते विचारतात "अशीं महान् कृत्यें केल्याचा आदावा आपल्या सत्तर वर्षांच्या कारकीर्दीचें सिंहावलोकन करतांना जिला घेतां येईल अशी कोणती दुसरी व्यक्ति आज विद्यमान आहे?" लॉर्ड सँकी यांनीं म. गांधी हे साक्षात्कारी राजकीय नेते (political mystic) आहेत असें त्यांचें वर्णन केलें आहे आणि सॉक्रेटीस किंवा सेंट पॉल यांच्याप्रमाणें "कोणता तरी अंतर्नाद त्यांचें मार्गदर्शन करीत होता असा भास होई" असा आपला अनुभव सांगितला आहे. सामान्य राजकारणी आणि असे द्रष्टे यांची तुलना करून अखेरीस ते म्हणतात "अखेरीस द्रष्टे बहुतकरून राजकारण्यांवर मातच करतात असें दिसून येतें" असा इतिहासाचा दाखला दिला आहे. त्यांच्या राजकारणावर टीका करणाऱ्या पाश्चात्य मुत्सद्यांना उद्देशून लॉर्ड सँकी धूर्तपणानें म्हणतात "स्वत: कांचेच्या घरांत राहणारांनीं दगडफेक करण्याच्या भरीस पडूं नये, ही गोष्ट त्यांनीं लक्षांत ठेविल्यास फार बरें होईल." अखेरीस गांधीजींच्या कर्तबगारीसंबंधीं ते लिहितात "गांधींच्या पश्चात् एक गोष्ट सर्वच मान्य करतील, कीं ते जन्माला आले त्या वेळच्या जगाला अधिक सुधारून त्यांनीं त्याचा निरोप घेतला."

आतां आपण प्रो. कीथ, जोड आणि बार्कर या राज्यशास्त्रज्ञांच्या उद्गारांचा थोडासा विचार करूं. प्रो. कीथ यांनीं ब्रिटिश राष्ट्रकुटुंबावर म. गांधींनीं कोणतें ऋण केलेलें आहे त्याचें विवेचन केलें आहे. वंशाभिमानरहित बनून सर्व मानवांना समान दर्जानें वागविलें पाहिजे हा धडा गांधींनीं ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना शिकविला आणि तोच धडा ते अस्पृश्यतानिवारणाची चळवळ करून आपल्या हिंदू जातभाईंनाहि शिकवीत आहेत, इकडे कीथ यांनीं लक्ष वेधिलें आहे. "अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम्। उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम्॥" ही वृत्ति राज्यघटनांमध्यें व राष्ट्रघटनांमध्यें प्रविष्ट झाली पाहिजे हाच गांधींचा ब्रिटिश

राष्ट्रसमूहाला उपदेश आहे असें ते समजतात. म. गांधींनीं असहकाराचा व सत्याग्रहाचा मार्ग अवलंबून राज्यसंस्थेची अडवणूक केली या ब्रिटिश मुत्सद्यांच्या आक्षेपाला उत्तर देतांना ते म्हणतात, "तार्किक भूमिकेवरून मांडलेल्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणारें ब्रिटिश सरकार त्याच मागण्या राज्यकारभाराला अडथळा उत्पन्न करणाऱ्या विरोधी पक्षाकडून मांडण्यांत आल्यास मान्य करतें, असा इतिहासाचा दाखला आहे." अशा प्रकारें गांधींना अडवणुकीच्या मार्गाचें अवलंबन करावें लागतें याचा दोष ब्रिटिशांच्या हेकटपणाच्या धोरणाकडेच आहे हें दाखवून देऊन हिंदुस्थानांत प्रांतिक स्वराज्य स्थापन होऊन लोकशाहीचा जो प्रयोग सुरू झाला त्याचें बहुतेक श्रेय म. गांधींच्या यशस्वी नेतृत्वालाच द्यावें लागेल, असेंहि कीथ यांनीं आपलें मत दिलें आहे.

या नंतर प्रो. अर्नेस्ट बार्कर आणि प्रो. जोड या राज्यशास्त्राचा तात्त्विक दृष्टीनें विचार करणारांच्या मतांकडे वळूं. प्रो. बार्कर यांनीं असें दाखवून दिलें कीं, पौरस्त्य व पाश्चात्य विचारपरंपरांच्या तटांवरील म. गांधी हे एक सेतु आहेत आणि त्यांनीं भारतीयांची भक्तिज्ञानयुक्त धर्मपरंपरा आणि पाश्चात्यांची नागरिक व राजकीय स्वातंत्र्यासाठीं झगडण्याची परंपरा यांचा समन्वय साधिला आहे. आत्मैषणा आणि अर्थैषणा—मोक्षप्रवृत्ति आणि व्यवहारप्रवृत्ति—यांचें मीलन त्यांच्या जीवनांत झालें आहे व त्यामुळें त्यांनीं सर्वत्र पाश्चात्य जनतेचें लक्ष वेधून घेतलें आहे. म.गांधींच्या ग्रामोद्योगांच्या व खादीच्या अर्थशास्त्रीय महत्त्वाचाहि त्यांनीं गौरवानें उल्लेख केलेला आहे आणि उद्योगधंदे खेड्यांत गेले तरच हिंदुस्थानचा उद्धार होईल या म. गांधींच्या सिद्धांताला मान्यता दिली आहे. म. गांधींच्याशीं त्यांनीं दोन मुद्यांची तात्त्विक चर्चा केली; ती म्हणजे अधिकारी वर्गानें अल्प वेतनावर राहून जनसेवा करावी आणि संरक्षणासाठींहि हिंसा करूं नये. हीं दोनहि तत्त्वें प्रो. बार्कर यांना व्यवहार्य वाटलीं नाहींत. तरीहि ही चर्चा करीत असतां आपण एका द्रष्ट्यासमोर उभे आहों आणि प्रेममय सेवावृत्ति व अहिंसावृत्ति ही जगाला पटण्यावरच त्याचा उद्धार अवलंबून आहे याची जाणीव आपणांस झाली असें त्यांनीं म्हटलें आहे. प्रेममय निष्काम सेवा, संपूर्ण अहिंसा

आणि शरीरश्रम, या तीन बहुमोल गोष्टी म. गांधी जगाला शिकवीत आहेत असें बार्कर यांना वाटतें. गांधींच्या जीवनांत संत फ्रान्सिस यांची भूतमात्रावर प्रेम करणारी श्रेष्ठ भागवतवृत्ति, थॉमस ॲक्विनास याची बुद्धिवादी सूक्ष्म तत्त्वज्ञ वृत्ति आणि कायदेपंडिताची व्यवहारचतुरता या सर्वांचें योग्य संमिश्रण असल्याचें त्यांना दिसलें व या संमिश्रणांतच त्यांचें वैशिष्ट्य व श्रेष्ठत्व आहे असें ते म्हणतात. "आत्मैषणा व अर्थैषणा यांचें मीलन, त्या उभयांपैकीं कोणालाहि बाध न आणितां, जो घडवून आणितो तो या काळांत श्रेष्ठ व सर्वंकष पुरुष ठरणारच" अशी म. गांधींच्या श्रेष्ठत्वाची मीमांसा प्रो. बार्कर यांनीं केली आहे.

गांधींच्या श्रेष्ठत्वाची ही मीमांसा फार महत्त्वाची आणि मूलगामी आहे. तसेंच आधुनिक युरोपीय संस्कृतीच्या दृष्टीनेंहि या मीमांसेला महत्त्व आहे. आत्मैषणा आणि अर्थैषणा, मोक्ष आणि व्यवहार या दोहोंचा समन्वय साधून परमार्थ दृष्टीनें व्यवहार करण्याचा संदेश गांधीजींना भगवद्गीतेंत आढळतो व तेंच तिचें इतर धर्मग्रंथाहून वैशिष्ट्य आहे असें ते मानतात. अनासक्तियोगाच्या प्रस्तावनेंत ते म्हणतात, "सामान्य समजूत अशी आहे कीं, धर्म आणि अर्थ ह्या परस्परविरुद्ध गोष्टी आहेत. माझ्या मताप्रमाणें गीताकारानें ही भ्रामक समजूत दूर केली आहे. त्यानें मोक्ष आणि व्यवहार यांच्यामध्यें असला भेद राखलेला नाहीं. पण व्यवहारांत धर्माला उतरविलें आहे." भगवद्गीतेच्या अभ्यासूंस हें तत्त्व नवें नाहीं; पण प्रो. बार्करसारख्या केंब्रिज विद्यापीठांतील राज्यशास्त्रज्ञास त्याची महती पटावी हें विशेष आहे. अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र यांना आध्यात्मिक स्वरूप देण्याचें तत्त्व युरोपांतील या शास्त्रांच्या तज्ज्ञांस पटत आहे व हें दुर्घट कार्य कसें करावें हें म. गांधी करून दाखवीत आहेत, यामुळें पाश्चात्य विद्वानांना त्यांचें माहात्म्य प्रतीत होऊं लागलें आहे. पण भगवद्गीतेच्या आध्यात्मिक राजकारणाचें अहिंसात्मक स्वरूप अधिक विशद आणि सुस्पष्ट केल्यानें ख्रिस्ती संस्कृतींत वाढलेल्यांना भगवद्गीतेचा हा संदेश अधिक मोहक वाटत आहे. महंमद-श्रीकृष्णांचा कर्मयोग आणि ख्रिस्त-बुद्धांचा अहिंसाधर्म याचा समन्वय म्हणजेच म. गांधींचा अनासक्तियोग होय. आजच्या भौतिक आणि हिंसाप्रधान

आधुनिक युरोपाला हा संदेशच तारक होणार आहे असें [illegible]पैकीं तत्त्ववेत्त्यांस बौद्धिक दृष्ट्या पटलेलें आहें; पण त्याचें आचरण करण्याइतकी आध्यात्मिक वृत्ति त्या देशांत उरलेली आहे किंवा नाहीं यासंबंधीं मात्र ते साशंक आहेत. एका अर्थी या त्यांच्या साशंक वृत्तीमुळेंच म. गांधींचें असामान्यत्व त्यांना दिसतें; कारण गांधीजींनीं हें आध्यात्मिक राजकारण मूर्त स्वरूपाला आणिलें आहे.

प्रो. जोड यांनीं म. गांधींच्या चरित्राचा व शिकवणीचा विचार करतांना 'आत्मबलाचा प्रभाव' या विषयाचें महत्त्व विवेचिलें आहे. 'मनुष्य हा बुद्धिविशिष्ट प्राणी आहे' या ॲरिस्टॉटलच्या सिद्धान्ताचा अपुरेपणा दाखवून दिला आहे आणि मानवाचें खरें वैशिष्ट्य किंवा श्रेष्ठत्व त्याच्या नैतिक बलात किंवा आत्मिक बलांत आहे असें सांगून 'आत्मबलाचा प्रभाव' प्रतिपक्षावर कां व कसा पडतो याचें मुद्देसूद विवेचन केलें आहे. "मनुष्याचें श्रेष्ठत्व त्याच्या तर्कबुद्धींत आहे" (Man is a rational being) हा ॲरिस्टॉटलचा सिद्धान्त. "धर्मो हि तेषामधिको विशेषः। धर्मेण हीनाः पशुभिः समानाः ॥" हा संस्कृत सुभाषितांतील सिद्धान्त. यांपैकीं दुसरा सिद्धान्त अधिक महत्त्वाचा आहे हें आधुनिक युरोपला समजलें नाहीं. आधुनिक युरोपनें धर्मांतील दुराग्रह आणि दुर्मतें यांच्याबरोबर धर्माचा व अध्यात्माचाहि त्याग केला आणि तर्कबुद्धि हीच आराध्य देवता बनवून बुद्धिवादाला धर्माचें स्थान दिलें. यांतील अपूर्णता आणि हेत्वाभास अद्यापि युरोपाला समजत नाहीं अथवा समजला तरी उमजत नाहीं हेंच त्याच्या आपत्तींचें कारण आहे. त्याच्या आपत्तींचें निवारण होण्यास आज त्याला आत्मबलाचा संदेश हवा आहे व तोच संदेश म. गांधी देत आहेत. म. गांधींच्या आत्मबलाच्या मार्गासंबंधीं ते म्हणतात "गांधी नीतिद्रष्टे आहेत ते याच अर्थी होय. तंटे मिटविण्याचा जो एक मार्ग त्यांनी घोषित केला आहे तो हिंसामार्गाची जागा कदाचित् पटकावील एवढेंच म्हणून भागणार नाहीं; **तर माणसांच्या हातची संहारशक्ति जसजशी वाढत जाईल तसतशी अशी वेळ येईल, कीं संस्कृति टिकावयाची असल्यास हिंसामार्गाच्या ऐवजीं गांधींचा मार्ग स्वीकारणें भागच पडेल.**"

" ख्रिस्त व बुद्ध सांगत होते तेंच योग्य आहे असें त्यांनीं प्रत्यक्ष दाखविलें. " ख्रिस्ताचा व बुद्धाचा सिद्धांत त्यांनीं राजकारणाला लागू करून दाखविला म्हणूनच ते राजकारणांतील द्रष्टे आहेत, राजकारणांतील नवमतवादी आहेत असें जोड यांचें म्हणणें आहे.

प्रो. जोड यांच्या याच निर्णयाचा उल्लेख दुसऱ्या एका दृष्टीनें जनरल स्मट्स् यांनीं आपल्या लेखांत केला आहे. म. गांधींच्या आत्मबलाच्या राजकारणांतील प्रायोपवेशनाचें विवेचन करतांना ते लिहितात: ' ख्रिश्चन धर्मामध्यें आत्मक्लेशांच्या भावनेला मध्यवर्ती स्थान मिळालें आहे. सबंध मानवी इतिहासामध्यें अत्यंत अर्थपूर्ण अशी जी शोक-पर्यवसायी घटना घडून आली तिचें हें द्योतक म्हणून क्रुसाचें चिह्न अद्यापि अस्तित्वांत आहे. आपल्या बांधवांसाठीं आपलें अंतःकरण खोलणाऱ्या क्रुसावरील क्लेशमग्न येशूकडे पाहून ज्या भावना निर्माण होतात त्यांचा आवेग बुद्धिवादानें व तात्त्विक परिवर्तनानें निर्माण होणाऱ्या भावनांपेक्षां अनंतपटीनें अधिक असतो. दुःखाचे बोल हे अत्यंत परिणामकारक ठरलेले आहेत. रोमन साम्राज्याच्या प्रारंभकालीं भिन्न भिन्न धर्मांचा जो गलबला चालू होता त्यांतून धर्मप्रचारकांच्या बुद्धि-चापल्यानें नव्हे, तर आत्मक्लेशाच्या व बलिदानाच्या बळावर ख्रिश्चन धर्मानें वाट काढिली आहे. त्याचप्रमाणें सांप्रतकालीं देखील युरोपांतील पशुवृत्ति, क्रूर पंथ आपणांहून भिन्न वंशांच्या, भिन्न धर्मांच्या वा भिन्न मतांच्या लोकांना फार मोठ्या प्रमाणावर ज्या यातना देत आहेत, त्या यातनांनाच कदाचित् स्फोटक स्वरूप प्राप्त होऊन त्यामुळें युरोपांत मोठ्या अभिमानानें निर्माण करण्यांत येत असलेल्या शासनपद्धतींच्या ठिकऱ्या उडतील. बुद्धिवादाचे व मतपरिवर्तनाचे नेहमींचे राजकीय मार्ग जेथें अयशस्वी ठरतात त्या ठिकाणीं हिंदुस्थानांत व पौरस्त्य देशांत प्राचीन काळापासून चालत आलेल्या पद्धतीवर आधारलेलें हें नवें तंत्र गांधी हातांत घेतात. मीं वर म्हटल्याप्रमाणें राजकारणाच्या अभ्यासकांनीं लक्ष देण्यासारखा हा मार्ग आहे. राजकारणपद्धतीमध्यें गांधीजींनीं ही ठळक अशी भर टाकिलेली आहे.' पाश्चात्य देशांतील लोकशाहीला किंबहुना आधुनिक युरोपीय संस्कृतीला अपरिचित अशी ही पद्धति आहे असें जनरल स्मट्स यांनीं म्हटलें

आहे. बुद्धिबल हेंच युरोपीय लोकशाहीचें अधिष्ठान आहे; जेथें बुद्धिबल अपुरें पडतें तेथें ती शस्त्रबलाचा अथवा बाहुबलाचा आश्रय करते; कारण केवळ बुद्धिबलानें सामाजिक प्रश्न सुटत नाहींत असा अनुभव येत आहे. लोकशाहीला शस्त्रबल हें मारक आहे; पण त्याचा आश्रय करण्यावांचून केवळ बुद्धिबलानें कार्य भागत नाहीं असा प्रत्यक्ष अनुभव येत आहे. पेंचांत सांपडल्यामुळें पाश्चात्य लोकशाही आज नष्ट होत आहे. बुद्धिबलाहून श्रेष्ठ अशा प्रभावी आत्मबलाचें अधिष्ठान देऊन लोकशाहीला नवसंजीवन देण्याचा प्रयत्न म. गांधी करीत आहेत आणि युरोपीय संस्कृति बुद्धिबलाचा त्याग करून त्याहून कनिष्ठ प्रतीच्या बाहुबलाचा व शस्त्रबलाचा आश्रय केल्यामुळें विलीन होत आहे. लोकशाहीच्या थडग्यावर भांडवलशाही व साम्राज्यशाही आसुरी राज्यपद्धति आधुनिक युरोपांत मोठ्या अभिमानानें उभारण्यांत येत आहे. पण ज्याप्रमाणें रोमन साम्राज्याचा विनाश ख्रिस्ताच्या आत्मबलानें केला, त्याचप्रमाणें आधुनिक युरोपांतील या शाह्यांच्या ठिकऱ्या करण्याचें सामर्थ्य म. गांधींच्या या आत्मबलाच्या राजकारणांत आहे, असें जनरल स्मट्स् यांनीं स्पष्ट सूचित केलें आहे. विशेषतः म. गांधींची क्रांति ख्रिस्ताप्रमाणें केवळ आध्यात्मिक स्वरूपाची नसून भगवद्गीतेच्या आधारानें त्यांनीं या आध्यात्मिक क्रांतीला भौतिक व राजकीय क्रांतीचीहि जोड दिली असल्यानें तिचें प्रभावीपण अधिकच वाढलेलें आहे, असें आम्हांस वाटतें.

येथपर्यंत केवळ मुत्सद्दी व राज्यशास्त्रज्ञ यांना गांधीजींच्या राजकारणासंबंधीं काय वाटतें याचा विचार केला. आतां तत्त्वज्ञानी, धर्मदीक्षित आणि संस्कृतिशास्त्रज्ञ यांच्या मतांची दिशा थोडी समजून घेऊं. हार्वर्ड विद्यापीठांतील तत्त्वज्ञानाचे आचार्य हाकिंग यांनीं एका छोट्याच पण उद्बोधक निबंधांत म. गांधींच्या कर्मयोगांतील मोक्ष आणि व्यवहार यांची महती वर्णिली आहे. व्यावहारिक उपाधींचा त्याग न करितां, त्यांत राहूनच आत्मज्ञानाचा शोध करणें हें गांधीजींचें वैशिष्ट्य होय असें त्यांनीं दिग्दर्शित केलें आहे. उपाधींचा त्याग करणारे आत्मज्ञानी कर्मपराङ्मुख बनतात व व्यवहारांत निरुपयोगी ठरतात. पण गांधीजींचा ज्ञानमार्ग तसा नाहीं. ते उपाधींत राहून, कर्माचा वा कार्याचा परिग्रह

ठेवूनहि मोक्षाचा मार्ग चोखाळीत आहेत. अशा कर्मयोग्यांचें नेतृत्व आपल्या लोकशाही राज्यांना लाभलेलें नाहीं म्हणूनच तिची प्रगति होत नाहीं असें ते समजतात. “लोकसत्ताक राज्यपद्धति ठेंचा खात आहे याचें कारण असें आहे कीं, जे तिचा भार उत्कृष्ट रीतीनें सहन करूं शकतील असे नेते निवृत्तिपर ज्ञानमार्गांत गढल्यामुळें त्यांच्या सेवेला ती पारखी झाली आहे. अपूर्ण जगाची थोरवी आम्हांला अजून समजलेली नाहीं. आपल्या कार्यक्षेत्रांत आचरिलेल्या विश्वधर्मापलीकडे विश्वधर्म नाहीं, स्वतःच्या उपाधींत राहून मिळविलेल्या मुक्तीवांचून अन्य मुक्ति नाहीं अशी आपणांस गांधीजींची शिकवण आहे.” कौंट कायसरलिंग यांनींहि आपल्या उत्कृष्ट लेखांत मानवसंस्कृतीच्या भावी युगाची पूर्ण सूचना या दृष्टीनें गांधींचा गौरव केला आहे. सामान्य जनतेचें राजकारण सुरू झाल्यामुळें आज अनेक प्रकारचे लोकनायक निर्माण होत आहेत; पण त्यांच्या अंगीं संतांची, स्थितप्रज्ञांची अनासक्ति व शुचिता दिसून येत नाहीं. पण गांधीजी हे लोकनायक असून संत आहेत, ते अध्यात्मपर असूनहि भौतिक व्यवहारांचें नेतृत्व करीत असतात. “एका दृष्टीनें हिंदुस्थानांतील साधुपणाचा जो परंपरागत आदर्श, त्याची गांधी हे मूर्ति होत; तर दुसऱ्या दृष्टीनें ते अत्यंत आधुनिक असे जननेते होत. क्रूस व गरुड यांचा अभिनव समन्वय ही या भविष्यकालीन युगाची वैशिष्ट्यनिदर्शक निशाणी असेल. मानवांचे जे नवीन नमुने निर्माण होतील ते पूर्ण मानवांचे, म्हणजे ज्यांच्या ठायीं आध्यात्मिक व भौतिक शक्ती परस्परांशीं तुल्यबल झाल्या आहेत अशा मानवांचे असतील. एवंगुणविशिष्ट अशा या मानवाच्या उदयाची पूर्वतयारी इतर कोणत्याहि हयात व्यक्तीपेक्षा उभयकालखंडांच्या सीमारेषेवर असलेल्या एका महान् व्यक्तीनें केली असल्याचें पुढें दृष्टोत्पत्तीस येईल; त्या व्यक्तीचें नांव गांधी.” मानवसंस्कृतीच्या विकासांतील म. गांधींचें महत्त्वाचें स्थान विशद करतांना कौंट कायसरलिंग यांनीं हिंसा व अहिंसा या दोन ध्रुवरूप तत्त्वांचें आणि साधनशुचितेच्या सिद्धान्ताचें जें विवेचन केलें आहे तेंहि बोधप्रद झालें आहे. हिंसेचा अतिरेक होत असतांनाच अहिंसेचा प्रणेता पुढें यावा आणि वाटेल त्या साधनांनीं आपलें उद्दिष्ट गांठण्याचीं तत्त्वें सर्वत्र बोकाळलीं असतांना साधनांच्या शुद्धतेलाच

अग्रस्थान देणारा द्रष्टा निर्माण व्हावा, हें या जगाच्या विचित्र घटनेचें एक शाश्वत लक्षणच आहे असें कायसरलिंग यांना वाटतें व म्हणूनच ते गांधीजींना नवयुगप्रवर्तक मानतात. जगद्विख्यात भौतिक शास्त्रज्ञ आल्बर्ट आइन्स्टीन यांनीं फार थोड्या शब्दांत गांधीजींसंबंधीचा आपला नितांत पूज्यभाव व्यक्त केला आहे. "भावी पिढ्यांना मार्गदीपक बनेल इतका तेजोमय पुरुष आपला समकालीन असल्याचें भाग्य लाभलें याबद्दल आपण दैवाचें कृतज्ञ असलें पाहिजे." "आपल्या देशबांधवांच्या नैतिक भावना जागृत व संघटित करण्याच्या कामीं ज्या प्रमाणांत राजकारणी पुरुषांना यश येईल,त्याच प्रमाणांत त्यांच्या कार्याला चिरंतनत्व येत असतें." या प्रकारच्या उद्गारांवरून आजच्या जगाला नैतिक वृत्तीच्या जननेत्यांची किती तहान लागली आहे तें स्पष्ट होतें. या पुस्तकांतील प्रत्येक लेखांत ही तळमळ व्यक्त झालेली आहे.

या लेखसंग्रहात खिस्ती धर्मदीक्षितांचे व समाजसेवकांचे बरेच लेख आहेत. त्यांपैकीं स्टीफन हॉबहौस आणि जॉन एस्. हॉयलंड यांनीं गांधीजींच्या तत्त्वज्ञानाची सविस्तर चर्चा करून खिस्ताच्या शिकवणुकीशीं त्याचें सादृश्य दाखवून दिलें आहे. खिस्ती धर्मांतील प्राणभूत सिद्धान्ताची म. गांधी हे एक मूर्त प्रतिमाच आहेत, किंबहुना ते एक खिस्ताचा आधुनिक अवतारच आहेत इतकें म्हणण्यापर्यंत या वृत्तीच्या लेखकांची गांधीजींसंबंधींची पूज्य भावना प्रकट झालेली आहे. या प्रकारच्या लेखकांपैकीं रेव्हरंड विन्स्लो यांचा "म. गांधी व युयुत्सु शांततावाद" हा लेख फारच मर्मग्राही आहे. युरोपांतील निष्क्रिय शांततावादाहून गांधीजींचा 'युयुत्सु शांततावाद' कसा भिन्न व श्रेष्ठ आहे तें त्यांनीं विशद केलें आहे.याचमुळें युरोपीय जनतेचें नेतृत्व स्वीकारून गांधीजी आपल्या हिंदुस्थानांतील कार्याची पूर्तता तर करणार नसतील ना, अशीहि आशा आपणांस अलीकडे वाटत आहे असें ते म्हणतात.

या शेवटच्या मुद्यासंबंधीं सुप्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ रोमा रोलाँ यांनीं मात्र निराशावाद प्रकट केला आहे. म. गांधींचें तत्त्वज्ञान व विभूतिमत्त्व अत्यंत श्रेष्ठ आहे पण त्यांच्या मार्गानें जाऊन आपला उद्धार करून घेण्याइतकी आध्यात्मिक संपत्ति आजच्या युरोपीयन जनतेंत अथवा तिच्या नेत्यांत त्यांना दिसत नाहीं, हें त्यांच्या नैराश्याचें कारण आहे. रोमा रोलाँप्रमाणें इतर अनेक लेखकांनीं म. गांधींच्या सत्याग्रही तत्त्वज्ञानाचें अंतिम श्रेष्ठत्व मान्य करूनहि तात्कालिक अव्यवहार्यता दिग्दर्शित केली आहे.

या विचारसरणीसंबंधीं हिंदुस्थानांतील अनुभव मात्र असा आहे कीं म. गांधींनीं आत्मबलाचें राजकारण सुरू करून व्यावहारिक राजकारणाच्या क्षेत्रावर आपला एवढा प्रभाव पाडिला आहे कीं, त्यांना अथवा त्यांच्या तत्त्वज्ञानास अव्यवहार्य म्हणणारांना आपलें व्यवहारकौशल्य व्यक्त करण्यास कोठें अवसरच उरलेला नाहीं. ! शिवाय गांधीजींच्या अव्यवहार्य वाटणाऱ्या अहिंसेच्या मार्गाहून हिंसेचा मार्ग अधिक व्यवहार्य भासला, तरी आजच्या जगाच्या परिस्थितींत सामान्य जनतेला तो अधिकच अव्यवहार्य बनला असल्याचा अनुभव हिंदी जनतेप्रमाणें युरोपीय जनतेलाहि अलीकडे आलेला आहे. तथापि रोमा रोलॉं यांच्या साशंक वृत्तीला युरोपीय परिस्थितींत बरींच कारणें आहेत असें दिसतें. त्यांच्यांतील आध्यात्मिक तेज व निष्ठा आज बहुतेक लोप पावल्यासारखीं दिसतात. त्याचीं कारणें व परिणाम सांगण्याचें हें स्थल नव्हे.

अखेरीस जॉन होल्म्स् या अमेरिकेंतील धर्मदीक्षिताच्या महत्त्वाच्या लेखाचा उल्लेख करून ही लांबलेली प्रस्तावना पुरी करावयाची आहे. सुमारें वीस वर्षांपूर्वी म. गांधी हे आजच्या जगांतील सर्वश्रेष्ठ पुरुष आहेत असें रे. होल्म्स यांनीं पाश्चात्य जगाला सांगितलें. त्यांची गांधीजींवरील निष्ठा या वीस वर्षांत अधिकच वृद्धिंगत झाली आहे आणि गांधीजी हे केवळ आजच्या जगांतील सर्वश्रेष्ठ व्यक्ति आहेत एवढेंच नाहीं, तर आजपर्यंत जे जे थोर पुरुष होऊन गेले त्या सर्वांत ते अग्रेसर आहेत, अशा शब्दांनीं त्यांनीं आपली गांधीजींवरील निष्ठा व भक्ति व्यक्त केली आहे. या लेखानंतर इतर लेखकांच्या लेखांतील विचारांचा अधिक उल्लेख करून मूळ पुस्तकाच्या वाचनाची वाचकांची उत्कंठा तृप्त करण्याच्या आड येणें उचित होणार नाहीं. सर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा प्रारंभींचा लेख आणि मिस् सोफिया वाडिया यांचा लेख हे भारतीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें गांधीजींचें जीवनरहस्य समजून घेण्यास फारच उपयुक्त आहेत. हें पुस्तक अनुवादरूप आहे व त्यांत जगांतील प्रख्यात विचारवंतांचे महत्त्वाचे तात्त्विक सिद्धान्त अत्यंत संक्षेपानें व्यक्त झालेले आहेत. ते कित्येकांस कांहीं ठिकाणीं दुर्बोधहि वाटतील; पण ते अभ्यसनीय आहेत व अभ्यास करणारांस नवी दृष्टि प्राप्त करून देतील अशी माझी खात्री आहे.

वर्षप्रतिपदा, शके १८६२
इस्लामपूर, जि. सातारा.

— शं. द. जावडेकर

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ गांधींचा धर्म आणि त्यांचें राजकारण ... ... <br> —सर सर्वपल्ली राधाकृष्णन् | १ |
| २ महात्मा गांधी : मूल्यमापन ... ... ... <br> —होरेस जी. अलेक्झांडर | २५ |
| ३ समन्वयी व सेतुवृत्ति गांधी ... ... ... <br> —अर्नेस्ट बार्कर | ३१ |
| ४ अनासक्ति व नैतिक शक्ति यांचें सामर्थ्य ... <br> —सी. इ. एम्. जोड | ३५ |
| ५ ब्रिटिश राष्ट्रकुटुंबाची गांधींनीं बजावलेली कामगिरी <br> —ए. बारीडेल कीथ | ४२ |
| ६ सत्याधिष्ठित नेतृत्वाला लागलेलीं फळें ... ... <br> —दी राइट ऑनरेबल व्हायकाऊंट सॅम्युअल | ४५ |
| ७ मंडलाकार परिषदेच्या वेळच्या स्मृती ... ... <br> —दी राइट ऑनरेबल व्हायकाऊंट सँकी | ४८ |
| ८ गांधींची राजकारणपद्धति ... ... ... <br> —दी राइट ऑनरेबल जे. सी. स्मट्स् | ५२ |
| ९ गांधींचें तत्त्वज्ञान ... ... ... ... <br> —एच्. वाय्. एस्. एल्. पोलाक | ५९ |
| १० गांधींकडून हिंदुस्थाननें घेतलेलें ऋण ... ... <br> —बाबू राजेंद्रप्रसाद | ६५ |
| ११ कविवर्यांचा निर्णय ... ... ... ... <br> —रवीन्द्रनाथ टागोर | ६८ |
| १२ मुक्ति व परिग्रह ... ... ... ... <br> —विल्यम अर्नेस्ट हॉकिंग | ६९ |
| १३ गांधींच्या थोरपणाचें स्वरूप ... ... ... <br> —जॉन हेनेस होम्स् | ७१ |

१४ गांधी व शांततावादाचें भवितव्य ... ... ७४
—लॉरेन्स हाऊसमन
१५ एका हिंदी राजकारणी पुरुषाची प्रशंसांजलि ... ७५
—सर मिर्झा इस्माइल
१६ गांधींचें राजकारणपटुत्व ... ... ... ७९
—आल्बर्ट आइन्स्टाइन
१७ गांधींचा आध्यात्मिक प्रभाव ... ... ... ८०
—गिल्बर्ट मरे
१८ अतिपूर्व देशातर्फे भेट ... ... ... ८३
—योने नागूची
१९ महात्मा गांधी व युयुत्सु शांततावाद ... ... ८७
—दी रेव्हरंड जॅक सी. विन्स्लो
२० एका मित्राची प्रशंसांजलि ... ... ... ९१
—सी. एफ्. अँड्रयूज
२१ समाजशास्त्रज्ञ व समाजसंशोधक म्हणून गांधींचें स्थान ९३
—रिचर्ड बी. ग्रेग
२२ एका पाश्चात्यश्रेष्ठाचा गांधीजींना प्रणाम... ... ९८
—रोमा रोलाँ
२३ सत्याग्रहाचा मार्ग ... ... ... ... १०१
—सोफिया वाडिया
२४ गांधी : एक स्वभावचित्र ... ... ... ११०
—एडवर्ड थॉम्सन
२५ जगाच्या इतिहासांत गांधींचें स्थान ... ... १२४
—कौंट हरमान कायसरलिंग
२६ ख्रिश्चन शांततावाद्यांच्या दृष्टीनें गांधींचें महत्त्व ... १२८
—स्टीफन हॉबहाऊस
२७ गांधींचा सत्याग्रह व क्रूसाचा मार्ग ... ... १४६
—जॉन एस्. हॉयलंड

क्रमांक ..... ५०८६९
नों. दि. ३७।३।

# गांधींचा धर्म आणि त्यांचें राजकारण

लेखक : सर सर्वपल्ली राधाकृष्णन्

( बनारस )

मानवानें संपादिलेलें ऐहिक वस्तुजात, त्यानें उठविलेलीं आणि बुडवलेलीं साम्राज्यें या मानवांच्या पृथ्वीवरील इतिहासांतल्या फार महत्त्वाच्या गोष्टी नव्हेत, तर सत्य आणि सौजन्य यांच्या शोधांत युगायुगाच्या ठायीं त्याच्या आत्म्याचा जो विकास होत गेला तो महत्त्वाचा आहे. आत्म्याच्या या साहस-भ्रमणांत ( Adventure ) जे अंशभागी होतात त्यांना मानवी संस्कृतीच्या इतिहासांत अढळपद प्राप्त होतें. ज्या सुलभतेनें काळ मनुष्यमात्राला विसरून जातो, तितक्याच सुलभतेनें तो वीरांना गौरवशून्य करून सोडतो; पण संत अढळ राहतात. गांधींची थोरवी त्यांनीं केलेल्या वीरोचित लढ्यापेक्षां त्यांच्या पवित्र जीवनांत आहे. संहारक शक्ती प्रबळ झाल्यासारख्या दिसत असतां आत्म्याच्या चैतन्यदायी व सर्जनशील शक्तीवर भर देण्यांत त्यांचें मोठेपण आहे.

## १ राजकारणाचें धार्मिक अधिष्ठान

ज्या हिंदी राष्ट्रानें आपल्या शृंखला खिळखिळया केल्या आहेत त्या राष्ट्रांतल्या प्रचंड खळबळीला इतर कोणत्याहि व्यक्तीपेक्षां मुख्यतः कारणी-भूत झालेली व्यक्ति म्हणून गांधी जगाला ठाऊक आहेत. राजकारणी पुरुषांची

धर्माकडे विशेष आस्थेनें पाहणारे म्हणून सामान्यतः ख्याति नसते. कारण एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर राजकीय अधिकार गाजविणें, दुर्बलांची आणि निर्धनांची आर्थिक पिळवणूक करणें इत्यादि ज्या व्यवहारतत्त्वांशीं ते निगडीत होतात तीं धर्मतत्त्वांशीं इतकीं विसंगत आहेत कीं, धर्मतत्त्वांविषयीं खोल आस्था बाळगणें अथवा त्यांचें काटेतोलपणें प्रतिपालन करणें त्यांना अशक्यच होतें. पण गांधींच्या दृष्टीनें सर्व जीवन एकसंध आहे. "विश्वव्यापी सत्याचें दर्शन व्हावयास हवें असेल, तर क्षुद्रांतल्या क्षुद्र जीवांवर प्रेम करावयास लागलें पाहिजे. आणि सत्यदर्शनाची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्याला जीवनाच्या कोणत्याहि अंगापासून अलग राहतां येणार नाहीं. म्हणूनच सत्यभक्तीनें मला राजकारणांत खेचून आणलें; आणि अगदीं निःसंकोचपणानें पण अत्यंत नम्रभावानें मी हें सांगतों कीं, धर्माला राजकारणविषयक कांहींहि कर्तव्य नाहीं असें म्हणणारांना धर्म म्हणजे काय हेंच कळलेलें नाहीं!" त्याचप्रमाणें ते म्हणतात, "नाशवंत अशा इहलोकींच्या राज्याची मला इच्छा नाहीं; स्वर्गराज्यासाठीं म्हणजेच मुक्तीसाठीं मी धडपडत आहें. माझ्या देशाची आणि मानवसमाजाची सेवा करतां करतां अखंड झिजणें हाच माझ्या मोक्षाचा मार्ग. चैतन्यमय अशा हरएक वस्तूंशीं मला एकरूप व्हावेंसें वाटतें. गीतेंत म्हटल्याप्रमाणें शत्रुमित्रांशीं निर्वैर बुद्धीनें राहण्याची माझी इच्छा आहे. म्हणून माझा देशाभिमान म्हणजे अक्षय्य स्वातंत्र्याच्या व शांतीच्या भूमीकडे नेणाऱ्या प्रवासांतील एक टप्पा आहे. यावरून धर्मानें अलिप्त असें राजकारण मला मान्य नाहीं, हें दिसून येईल. राजकारण हें धर्माचें सेवासाधन आहे. धर्मापासून अलिप्त असें राजकारण म्हणजे मृत्यूचा सांपळाच होय. कारण त्यामुळें सद्बुद्धीचा अंत होतो."* मानवी व्यवहारापासून अलिप्त असा धर्म गांधींना मान्य नाहीं. हिंदुस्थानाच्या सध्यांच्या परिस्थितींत गांधी हे दमनाला रुकार अथवा दास्याला मान्यता न देणारे राजकीय क्रान्तिकारक असले, तरी जनतेला अस्वाभाविक व अमानुष विकृतीप्रत खेंचून नेणारीं तत्त्वें प्रतिपादणाऱ्या कर्मठ क्रान्तिकारकांहून ते फार निराळे आहेत. अनुभवाच्या तेजाबांत पारखल्यास ते

---

* सी. एफ्. अँड्रूज यांचें 'महात्मा गांधी--आत्मकथा,' पृ. ३५३–५४, ३५७.

केवळ राजकारणीपुरुष अथवा समाजसुधारक, केवळ तत्त्वज्ञानी किंवा नीतिज्ञ नसून, या सर्वांच्या अंशानें बनलेले आहेत. स्वभावतः धार्मिक असून अत्युच्च व अत्यंत सात्त्विक गुणांनीं मंडित झालेले आणि स्वसामर्थ्याच्या मर्यादांच्या जाणीवेमुळें व सदैव उपस्थित असणाऱ्या आनंदीवृत्तीमुळें ते अधिकच प्रियदर्शन बनलेले आहेत असें दिसून येईल.

## २ धर्म म्हणजे ईश्वरसमर्पित जीवन

ईश्वरासंबंधीं आपलें कांहींहि मत असो; गांधींच्या दृष्टीनें ईश्वराला परम महत्त्व आणि निःसंदेह अस्तित्व आहे ही गोष्ट अमान्य करणें शक्यच नाहीं. ईश्वरावरील श्रद्धेच्या योगानेंच त्यांच्याठायीं नवमानवता निर्माण झाली आहे. तिच्या सामर्थ्याची, तिच्या उत्कटतेची आणि तिच्या प्रेमाची प्रतीति आपणास येत आहे. कांहींतरी आपणांसन्निध आहे, खळबळून, गोंधळून, ग्रासून टाकणारें, चिरसत्याची खात्री पटवून देणारें चैतन्य सोबतीला आहे, असें त्यांना वाटतें. संशयानें पछाडलें म्हणजे ते अनेकवार ईश्वरावर विसंबतात. ईश्वराकडून प्रत्युत्तर मिळतें का? मिळतें आणि नाहींहि मिळत. प्रत्युत्तर मिळत नाहीं असें म्हणण्याचें कारण गांधींना अत्यंत गूढ अथवा अत्यंत दूरस्थित असा कोठल्याहि प्रकारचा आवाज ऐकू येत नाहीं. मिळतें म्हणावयाचें अशाकरतां कीं, उत्तर मिळालेल्या माणसाप्रमाणें समाधानाची, तुष्टतेची भावना त्यांच्या ठिकाणीं उदित होते. उत्तर मिळाल्याचा त्यांना भास होतो. उत्तरांतील निर्दोष तर्कशुद्धतेवरूनच त्यांना कळतें कीं, आपल्याच कल्पनांच्या व भ्रमाच्या आहारीं आपण गेलेलों नाहीं. "सर्व वस्तुजाताला व्यापून टाकणारी अव्याख्येय व गूढ अशी एक शक्ति आहे. मला ती दिसत नसली तरी मला तिची जाणीव होते ही अदृश्य शक्तीच मला भासमान् होत असली, तरीसुद्धां माझ्या इंद्रियद्वारा मी जें जें ओळखतों त्या सर्वांपेक्षां भिन्न अशी ती असल्यामुळें तिच्याविषयीं कांहींच पुरावा देतां येत नाहीं. बाहेरच्या पुराव्यानें तिचें अस्तित्व सिद्ध करतां येत नाहीं. पण ईश्वराचा साक्षात्कार ज्यांच्या अंतःकरणांत झाला आहे, त्यांच्या बदलेल्या व्यवहारावरून व चारित्र्यावरून तिच्याविषयीं पुरावा मिळतो. अशा प्रकारचा पुरावा सर्व देशांतून होऊन गेलेल्या द्रष्ट्यांच्या

आणि संताच्या अखंड परंपरेला प्राप्त झालेल्या अनुभवांतून उपलब्ध होत आहे. हा पुरावा त्याज्य समजणें म्हणजे स्वतःचें अस्तित्वच अमान्य करणें होय." * "हा विवाद्य विषय नव्हेच. विवाद करून इतरांची खात्री मीं पटवावी असें तुमचें म्हणणें असेल तर मी फजीत पावलों म्हणावयाचा! पण एवढें मात्र मी तुम्हांला सांगतों कीं, या खोलीमध्यें तुम्ही आणि मी बसलों आहोंत यावर माझा जितका विश्वास आहे, त्याहून जास्त ईश्वराच्या अस्तित्वावर आहे. मी हवा किंवा पाणी यांच्यावांचून जगूं शकेन; परंतु ईश्वरावांचून मला जगणें शक्य होणार नाहीं हें निश्चित. तुम्हीं माझे डोळे काढलेत तरी त्यामुळें मला मरण येणार नाहीं. माझें नाक तुम्हीं छाटलेत तरी त्यामुळेंहि मला मरण येणार नाहीं; पण तुम्हीं माझी ईश्वरावरील श्रद्धा उध्वस्त करून टाकलीत तर मी गतप्राण होईन." ×

हिंदु तत्त्वज्ञानाची जी थोर आध्यात्मिक परंपरा आहे, तिला अनुसरून गांधी असें विधान करतात कीं, ज्याकडे शरीराचा ओढा असतो त्या कर्दमांतून एकदां बाहेर पडून आध्यात्मिक स्वातंत्र्यांत आपण प्रवेश केला, कीं त्या शिखरावरून सर्वांनाच सारखें दृश्य दिसतें. आपणांला आपण जेथें असूं तेथून भिन्नभिन्न मार्गांनीं पर्वत चढावा लागतो, तथापि ज्याच्या शोधांत आपण असतों तें एकच असतें. "इस्लामचा अल्ला, ख्रिश्चनांचा देव व हिंदूंचा ईश्वर हे एकच आहेत. हिंदूंमध्यें ईश्वराचीं जशीं अनेकविध नांवें आहेत तशींच इस्लाममध्येंहि ईश्वराचीं अनेक नांवें आहेत. हीं नांवें व्यक्तिमत्व दर्शवीत नाहींत; तर गुण दर्शवितात. आणि महान् अशा ईश्वराचें वर्णन जरी तो गुणातीत, अनिर्वचनीय आणि अपरिमेय असा आहे, तरी अल्पबुद्धि माणसांनीं आपल्या शक्त्यनुरूप त्याच्यावर गुणांचा आरोप करून केलेलें आहे. अशा ईश्वरावर जीवती जागती श्रद्धा असणें म्हणजे सर्व धर्मांविषयीं सारखाच आदरभाव ठेवणें होय. आपला धर्म इतर धर्मांहून श्रेष्ठ आहे आणि इतरांनीं आपल्याच धर्माचा अंगीकार करावा अशी अपेक्षा ठेवणें न्याय्य आहे, अशी श्रद्धा असणें हा कडव्या असहिष्णुतेचाच प्रकार

* यंग इंडिया, ११ ऑक्टोबर १९२८

× हरिजन, १६ मे १९३८

होय—आणि असहिष्णुता हा हिंसेचाच एक प्रकार आहे."* इतर धर्मांविषयींची त्यांची वर्तणूक अक्रिय सहिष्णुतेची नसून सक्रिय जिज्ञासेची आहे. अहिंसेचें उदात्त उदाहरण म्हणून ते येशूच्या जीवनाकडे आणि कार्याकडे पाहतात. " माझ्या जीवनावर बऱ्याचशा प्रमाणांत परिणाम घडवून आणणाऱ्या महान् गुरूंपैकीं एक गुरु म्हणून येशूला माझ्या अंतःकरणांत स्थान मिळालेलें आहे." पैगंबर-महंमदाच्या चारित्र्याविषयीं, त्याच्या ज्वलंत श्रद्धेविषयीं व कार्यक्षमतेविषयीं, त्याच्या कोमल कारुण्याविषयीं आणि विपदांविषयीं त्यांना आदर आहे. ईश्वराच्या सर्वश्रेष्ठ सत्तेच्याठायीं विश्वास, जीवनांत नितांत साधेपणा, विश्वबंधुत्वाची कडवी भावना आणि गरिबांविषयीं उदारता हीं जीं महत्तत्त्वें इस्लामी धर्मानें आग्रहानें प्रतिपादिलीं आहेत, त्यांचा सर्व धर्मांतील मूलतत्वें म्हणून त्यांनीं स्वीकार केला आहे. तथापि त्यांच्या जीवनांतील प्रभावी शक्ति म्हणजे, सत्यविषयक कल्पना, अध्यात्म व उदारता यांनीं युक्त असा हिंदुधर्मच होय. तथापि सर्व ( प्रचलित ) धर्म हे धर्माचीं साधनें आहेत. " धर्म याचा माझा अर्थ मला स्पष्ट करूं द्या. हिंदुधर्म इतर सर्व धर्मांहून मला मूल्यवान् वाटत असला, तरी धर्म म्हणजे हिंदुधर्म नव्हे. तर हिंदुधर्मांहून श्रेष्ठ, आपला स्वभाव पालटणारा, अंतरात्म्याशीं आपणांला एकरूप करून टाकणारा, सर्वदा पावक असा धर्म. संपूर्ण आत्मव्यक्तीसाठीं कोणतीहि किंमत द्यावी लागली तरी पर्वा न करणारें, आत्म्याला स्वरूपाचें ज्ञान झाल्याशिवाय, जगत्कर्त्याची ओळख पटल्याशिवाय, आणि जगत्कर्ता व आत्मा यांच्यांतील संबंध जाणल्याशिवाय यत्किंचितहि स्वस्थता लाभूं न देणारें मानवाच्या ठिकाणचें जें चिरतत्त्व तें म्हणजे धर्म."

सत्यापरता परमेश्वर नाहीं आणि प्रेम अथवा अहिंसा हींच सत्यप्राप्तीचीं साधनें आहेत. सत्यज्ञान आणि प्रेमाचरण हीं आत्मशुद्धीशिवाय अशक्य आहेत. शुद्धान्तःकरणी व्यक्तीलाच ईश्वरदर्शन होईल. अन्तःकरणशुद्धीसाठीं, आसक्तिघृणेपासून मुक्त होण्यासाठीं, विचार, उच्चार व आचार हीं विषयावलिप्त नसावींत यासाठीं, भय व अहंकार नष्ट होण्यासाठीं, देहाच्या अनियंत्रित व्यवहारांचें आणि मनाच्या चंचलवृत्तींचें दमन केलें

---

* हरिजन, १४ मे १९३८

पाहिजे. नियमपालन, शुचिर्भूत जीवन व तप हेच त्याचे मार्ग आहेत. विपदांमुळें आत्मा स्वच्छ धुवून निघतो. स्तुतिनिंदेविषयीं निष्काळजी राहून योग्य तेंच बोलावयाचें व करावयाचें, सर्वांटायीं प्रेम आणि क्षमा आचरावयाचें स्वातंत्र्य हवें असेल, तर विरक्ति अवश्य आहे. जे बंधमुक्त होत्साते तृणाच्या एका काडीवरसुद्धां स्वामित्व न ठेवतां अखिल जगाचा आनंद लुटतात, केवळ त्यांनाच स्वातंत्र्य लाभतें. या बाबतींत गांधी संन्याशाच्या महान् ध्येयाला अनुसरून वागत असतात. त्याला निश्चित निवासस्थान नसतें, निश्चित राहणीला तो बांधलेला नसतो. तथापि जेव्हां विरक्त जीवनाचीं सर्व तत्त्वें केवळ संन्याशालाच नव्हे, तर सर्व मानवांना पूर्णांशानें लागू करण्यांत येतात तेव्हां थोडी अतिशयोक्ति होते. उदाहरणार्थ, संभोगावर नियंत्रण ठेवणें सर्वांनाच आवश्यक आहे; पण ब्रह्मचर्य हें फारच थोड्या लोकांसाठीं असलें पाहिजे. संभोग हा कांहीं केवळ देहाच्या आनंदासाठीं नव्हे, तें कांहीं केवळ चर्मघर्षण नाहीं; प्रेम व्यक्त करण्याचें आणि जीवन अव्याहत ठेवण्याचें तें एक साधन आहे. इतरांना उपसर्ग पोंचत असेल अथवा व्यक्तीच्या आत्मविकासांत त्यामुळें व्यत्यय येत असेल तर तें पाप ठरतें; पण तसें तें पापच ठरेल असा अंगभूत दोष त्या क्रियेंत नाहीं. ज्या क्रियेमुळें आपलें अस्तित्व आहे, ज्यामुळें प्रेमाचें आविष्करण होतें आणि वंशसातत्य राहतें ती क्रिया लज्जास्पद अथवा पापास्पद नाहीं; परंतु जेव्हां अध्यात्मवादी ब्रह्मचर्याचा अनुरोध करतात, त्या वेळीं कामवासनेपासून मनाच्या एकाग्रतेचें रक्षण व्हावें अशी त्यांची इच्छा असते.

स्वतःला शक्य तेवढी शिस्त लावून घेण्याच्या कामीं गांधींनीं कष्टांची तमा धरली नाहीं, आणि जे त्यांना ओळखतात ते त्यांचें म्हणणें मान्य करतील कीं, त्यांना "आप्त आणि परका, देशबांधव आणि अन्यदेशीय, गोरा आणि काळा, हिंदु आणि अन्यधर्मीय, हा मुसलमान, हा पारशी, हा ख्रिश्चन, हा ज्यू असा भेद माहीत नाहीं." पुढें ते म्हणतात, "माझा हा विशेष गुण आहे असें माझें म्हणणें नाहीं. कारण तो मला प्रयत्नांनीं साध्य झालेला नसून माझ्या स्वभावांतच तो आहे. परंतु अहिंसा, ब्रह्मचर्य इत्यादि इतर मुख्य गुण अंगीं बाणवण्यासाठीं केलेल्या सतत परिश्रमांची मला पूर्ण जाणीव आहे."*

* महात्मा गांधी—आत्मकथा, पृष्ठ २०९

शुद्धान्तःकरणाच्या माणसालाच ईश्वरावर आणि मानवांवर प्रेम करतां येईल. यातनामय प्रेम हा आध्यात्मिक दिव्याचा असा एक प्रकार आहे कीं ज्याच्यापासून इतरांच्या प्रमादांची जबाबदारी स्वतःच्या माथ्यावर वाहत असतांहि केवळ स्वार्थी उपभोगांनीं प्राप्त होणाऱ्या सुखांपेक्षां गूढतर आणि अधिक सघन असें सुख अनुभवास येत असतें. एक क्षणभर आपण दुसऱ्याला आनंदी केलें या जाणीवेपेक्षां मधुरतर आणि दुसऱ्याच्या दुःखांत आपण अंश-भागी झालों या भावनेपेक्षां अधिक मूल्यवान् असें या जगांत दुसरें कांहींहि नाहीं हें अशा वेळीं आपणास समजून येतें. उपकारभावनेचा जिला स्पर्शहि झालेला नाहीं अशी करुणा, गर्वाचा मद, मग तो गर्व सत्कर्मजन्य का असेना, जिच्यांतून धुऊन गेलेला आहे अशी करुणा, ही धर्माची परमोच्च वृत्ति होय.

# ३ सर्वभूतरति

भौतिक जगांतून निर्वासित होणें हें आध्यात्मिकतेचें लक्षण नसून सर्वांभूतीं प्रेम ठेवून त्यांतच कार्यरत असणें हें तिचें लक्षण आहे, हें ओघानेंच सिद्ध होतें. **यस्मिन्सर्वाणि भूतानि आत्मैवाभूत् विजानतः।** स्वतःप्रमाणेंच, आत्मैव, शेजाऱ्यावर प्रेम कर. हा आदेश संदेहातीत आहे. समान प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य असणें अवश्य आहे.अशा प्रकारचा आदेश स्वातंत्र्ययुक्त मानवांचा जागतिक संघ प्रस्थापित करण्यास कारणीभूत होतो आणि जे हा आदेश मान्य करतात त्यांस वंश व पंथ, धन व सत्ता, वर्ग व राष्ट्र यांच्यायोगें तयार झालेले कृत्रिम बांध उल्लंघणें भाग होतें. एका संघाला अथवा राष्ट्राला खर्ची टाकून दुसरा एकादा संघ अथवा राष्ट्र सुप्रतिष्ठित बनत असेल, झेक राष्ट्र खर्ची पडून जर्मनराष्ट्र सुप्रतिष्ठित होत असेल, कुळें खर्ची पडून जमीनदार, मजुरांच्या जीवावर भांडवलदार सुप्रतिष्ठित होत असतील, तर हें लोकशाही तत्त्वाविरुद्ध आहे. ह्या अन्यायाचें समर्थन केवळ शस्त्रबळानेंच करणें शक्य होईल. सत्ताधारी गटाला सत्तानाशाचें भय वाटतें; आणि दलित ( वर्ग ) आपल्या न्याय्य असंतोषाचा संचय करीत राहतो. सर्व मनुष्यमात्राला समान हक्क आहेत याची जाणीव असणारी न्यायबुद्धीच ही अनैसर्गिक परिस्थिति संपुष्टांत आणूं शकेल. गेलीं शतकानुशतकें मानवी समाजाची चाल मानवी बंधुत्वाच्या दिशेनें चालली आहे. जगाच्या

निरनिराळ्या भागांत ज्या विविध प्रगतिमान प्रवृत्ती प्रकट झाल्या; न्याय, समानता व पिळवणुकीपासून स्वातंत्र्य इत्यादि ज्या ध्येयांची मानवांना वाढती जाणीव होत आहे; ज्या हक्काविषयीं ते जागृत होत आहेत; ते सर्व, मानवाला बद्ध करण्यासाठीं व मागें खेंचण्यासाठीं जी विपरीतता व जबरदस्ती सतत विस्तार पावत चालली तिच्या विरुद्ध त्यानें केलेले उठाव होत. स्वातंत्र्याच्या भावनेचा विकास हा मानवी इतिहासाचा गाभा होय. भूदास स्वातंत्र्य बनत आहेत, पाखंडयांची जाळपोळ बंद झाली आहे, सरदार अधिकारत्याग करीत आहेत, लज्जास्पद जिण्यांतून गुलाम मुक्त होत आहेत, धनवान् आपल्या धनसंचयाबद्दल प्रायश्चित घेत आहेत, युद्धोपासक साम्राज्यें शांतीची आवश्यकता घोषित करीत आहेत आणि इतकेंच काय, मानवजातीच्या एकीकरणाची स्वप्नेंहि जोपासलीं जात आहेत. होय, आजहि सत्ताधिशांची पिपासा, दुराचाऱ्यांचा मत्सर, ढोंग्यांचें असत्य आणि मग्रूर अशा वंशवादाची व राष्ट्रवादाची चढाई विद्यमान आहे हें खरें; पण सर्व जगाला व्यापीत चाललेली लोकसत्तेची थोर परंपरा ज्याच्या दृष्टीला दिसत नाहीं तो आंधळाच ठरणार. गरीबांतल्या गरीबाला पुरेसें अन्न व उजेड, हवा व सूर्यप्रकाश यांनीं युक्त अशीं घरें, आणि आशा, मान व सौन्दर्य यांनीं युक्त असें जीवन मिळण्याचा हक्क जिच्यांत असेल अशी सृष्टि निर्माण करण्याचे अखंड प्रयत्न चाललेले आहेत. मानवाच्या सेवकांमध्यें गांधींचें स्थान अग्रभागीं आहे. नजिकचीं संकटें धाक दाखवीत असतां दूर काळांतील मनसुब्यांनीं त्यांचें समाधान होत नाहीं. संकटांना रोखून धरण्यासाठीं व आपत्तींचें निराकरण करण्यासाठीं जे बिनचूक उपाय असतील, ते सगळे सांगातीं घेऊन काम करण्याकरतां ते निश्चयी माणसांच्या गोटांत सामील होतात. लोकसत्ता ही केवळ बोलण्याची गोष्ट आहे असें त्यांना वाटत नाहीं; सामाजिक वस्तुस्थितीशीं तिचा संबंध असतो. सामान्य मनुष्याबद्दलचें त्यांचें प्रेम आपण जाणीत असूं, तरच त्यांच्या दक्षिण आफ्रिकेंतील व हिंदुस्थानांतील सर्व सार्वजनिक प्रवृत्ती आपणांस कळूं शकतील.

ज्यू लोकांच्या बरोबर नाझींनीं जी वर्तणूक ठेवली, त्यामुळें सर्व सुधारलेल्या लोकांत भयंकर खळबळ उडाली, आणि वांशिक वैमनस्याचा पुनरुद्भव

झालेला पाहून उदार मतवादी मुत्सद्द्यांनीं गंभीरपणानें आपली नापसंती व दु:ख व्यक्त केलें. परंतु आश्चर्याची व विचित्र गोष्ट अशी आहे कीं, लोकसत्ताशासित अशा ब्रिटिश साम्राज्यांत व अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतहि अनेक जमातींना वांशिक कारणास्तव राजकीय आणि सामाजिक बंधनें सहन करावीं लागतातच. दक्षिण आफ्रिकेंत असतांना गांधींना आढळून आलें कीं, हिंदी लोक नामधारी स्वातंत्र्यानें युक्त असे ब्रिटिश साम्राज्यांतील नागरिक असूनहि त्यांच्यावर भयंकर निर्बंध लादण्यांत आले आहेत. युरोपियनेतर जातींना हक्कासंबंधीं समानता देण्याचें चर्च व सरकार या दोघांनींहि नाकारलें,आणि गांधींनीं या जाचक नियमांचा निषेध म्हणून सविनय प्रतिकाराची चळवळ सामुदायिक प्रमाणावर सुरू केली. मानव हा ( सर्वत्र ) समान आहे आणि वंश व रंग यांच्यावर आधारलेले कृत्रिम भेद, तर्कविरुद्ध तसेच नीतिविरुद्ध आहेत,'ह्या सारभूत तत्त्वासाठीं लढण्यास गांधी उभे राहिले. हिंदी जनतेला तिच्या वास्तविक अध:पाताची जाणीव करून देऊन त्यांनीं स्वमान व प्रतिष्ठा यांची भावना तिच्या ठायीं स्फुरविली. हिंदी लोकांच्या कल्याणापुरतेच त्यांचे प्रयत्न मर्यादित नव्हते. आफ्रिकेंतल्या तद्देशीय लोकांची पिळवणूक करावी अथवा हिंदी लोकांना त्यांच्या इतिहासप्रसिद्ध संस्कृतीकडे पाहून अधिक चांगलें वागवावें याचें ते समर्थन करीत नसत. हिंदी लोकांच्या विरुद्ध करण्यांत आलेल्या कायद्यांपैकीं अत्यंत अनिष्ट असे कायदे रद्द करण्यांत आले असले, तरी आजसुद्धां त्यांच्यावर असे कांहीं मानहानिकारक निर्बंध लादण्यांत येत आहेत कीं, जे त्यांच्यापुढें मान तुकवणाऱ्यांना भलाई किंवा ते लादणाऱ्या सरकारला प्रतिष्ठा प्राप्त करून देणार नाहींत.

भेद व कलह यांच्यांतून देशाला मुक्त करावें, जनतेला स्वावलंबनाची शिस्त लावावी, स्त्रियांना पुरुषांच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक समानतेच्या समपातळीपर्यंत चढवावें, राष्ट्राच्या चिरफळ्या पाडणाऱ्या धार्मिक वैमनस्यांना मूठमाती द्यावी आणि अस्पृश्यतेचा हिंदुधर्मावरील कलंक धुऊन टाकावा अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती. हिंदु धर्मावरील हा कलंक दूर करण्यांत त्यांना जें यश आलें आहे तें मानवी प्रगतीला त्यांनीं दिलेली

सर्वश्रेष्ठ देणगी म्हणून विराजत राहील. जोंपर्यंत अस्पृश्यांचा एकादाहि वर्ग अस्तित्वांत असेल, तोंपर्यंत ते त्या वर्गाचे ( कैवारी ) म्हणून राहतील.

“ मला पुनर्जन्म यावयाचा असेल तर मी अस्पृश्य म्हणून जन्माला यावें अशी मी इच्छा करीन; म्हणजे मला त्यांच्या दुःखांत, विपदांत आणि मानखंडनेंत अंशभागी होतां येईल, आणि माझी आणि त्यांची त्या दुःखद परिस्थितींतून सुटका करून घेण्याचा प्रयत्न करतां येईल. ” अदृश्य अशा परमेश्वरावर आपलें प्रेम आहे असें म्हणत असतां त्याच्याच चिच्छक्तीनें अथवा त्याच्याजवळून घेतलेल्या चिदंशानें व्यवहार करणाऱ्या मानवाशीं निर्दयतेनें वागणें हा वदतोव्याघात होय. सनातनी हिंदु असल्याचा गांधींना अभिमान वाटत असला, तरी जातिव्यवस्थेची कठोरता आणि तिचीं बंधनें, अस्पृश्यतेचा शाप, मंदिरांतील अनीति, जनावरांशीं व इतर प्राण्यांशीं निर्दयतेची वागणूक या बाबतींत त्यांच्यापेक्षां कट्टर विरोधक कोणी झाला नसेल. “ मी अगदीं अंतर्बाह्य सुधारणावादी आहे; तथापि हिंदु धर्मांतील प्राणभूत तत्त्वांचा त्याग करण्यास माझा उत्साह मला कधीं प्रवृत्त करीत नाहीं. ”

हिंदी संस्थानिकांच्या अरेरावीला असणारा त्यांचा आजचा विरोध, त्यांना संस्थानिकांच्या लक्षावधि प्रजेविषयीं वाटणाऱ्या प्रेमावर आधारलेला आहे. अत्यंत उदारमतवादी टीकाकारालासुद्धां संस्थानांचा कारभार व्यवस्थित चालला आहे असें म्हणतां येणार नाहीं. ब्रिटिश हितसंबंधांची कड घेणाऱ्या कलकत्त्याच्या ‘ स्टेट्समन् ’ पत्रांतील कांहीं वाक्यें उद्धृत करणें कदाचित् क्षम्य ठरेल. “ अनेक संस्थानांतून भयंकर परिस्थिति विद्यमान आहे, हें म्हणण्यांत कोणाहि व्यक्तीवर दोषारोप करावयाचा नसून आरोप मनुष्यस्वभावावर करावयाचा आहे. जमीनदार सद्वृत्त असो अथवा दुर्वृत्त असो, तो कोठल्याहि कायद्यांनीं बांधलेला नाहीं. तारण्या-मारण्याचा अधिकार त्याच्या हातीं आहे. तो लोभी, विषयी अथवा क्रूर असेल तर त्याच्या लोभाला विषयवासनेला वा क्रौर्याला कोठेंहि अटकाव नाहीं. या छोट्या सुलतानांना संरक्षण देणाऱ्या तहनाम्यांचा फेरविचार कधीं होणारच नसेल, ज्या गोष्टींचें समर्थन करणें अशक्य आहे त्याचें समर्थन करीत बसणें हें सार्वभौमसत्तेचें कर्तव्य झालेलें असेल, तर एक दिवस असा येईल कीं, एका

विभाग ... गा.घा.
क्रमांक ... ९०
नों. दि. ३१३

दुर्दम्य अशा शक्तीची एका अचेतन वस्तूशीं टक्कर होऊन त्याचा प्रसंपरा-सिद्ध परिणाम म्हणजे त्यांपैकीं कशाचे तरी एकाचे तुकडे उडतील. उत्क्रांतीची मंद गति ही क्रांतीची जननी आहे. संस्थानिकांविषयीं आत्यंतिक मित्रभाव धारण करणारे गांधी "तुम्ही उठा आणि आपलीं घरें साफसूफ करा" असें त्यांना सांगत आहेत. खुद्द सार्वभौमसत्तेला हातीं इतकी शक्ति असूनहि प्रांतांना जी जबाबदार राज्यपद्धति द्यावी लागली ती विनाविलंब प्रस्थापित करण्यानेंच स्वतःचें रक्षण व सातत्य साधणार आहे ही गोष्ट वेळ टळून जाण्याच्या आंत संस्थानिकांना उमगेल अशी मला उमेद आहे.

गांधींचा हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकाराविरुद्ध मुख्य आक्षेप असा आहे कीं, त्याच्यामुळें गरिबांचा छळ सुरू झाला. इतिहासारंभापासून हिंदुस्थान धनसंपत्तीच्या बाबतींत प्रसिद्ध आहे. आमच्यापाशीं अत्यंत सुपीक अशा विस्तीर्ण जमिनी आहेत, अक्षय्य समृद्धीचीं द्रव्यसाधनें आहेत, आणि योग्य ती दक्षता घेतली व लक्ष दिलें तर प्रत्येक पुरुषाला, स्त्रीला आणि मुलाला पोटभर घालतां येईल व अंगभर नेसवतां येईल इतका पुरवठा आहे. इतकें असूनहि दारिद्र्याचा घास बनलेले, अर्धपोटी व आश्रयहीन असे लक्षावधि लोक आहेत कीं, अखेरीस मृत्यु त्यांच्या साह्यास येऊन हृदयव्यथा संपवीपर्यंत ज्यांचें जीवन तारुण्यापासून वृद्धापकाळापर्यंतच्या अव्याहत काबाडकष्टांनीं भरलेलें असतें. निसर्गाच्या निर्दयतेमुळें ही परिस्थिति प्राप्त झालेली नसून हिंदुस्थानच्याच नव्हे, तर अखिल मानवजातीच्या हितासाठीं जी अमानुष पद्धति नष्ट करणें अवश्य झालें आहे, तिच्यापासून ती निर्माण झालेली आहे.

१९३१ सालीं गांधींनीं लंडन येथून नभोवाणीवरून अमेरिकेला जो संदेश दिला, त्यांत त्यांनीं "एकोणीसशें मैल लांब व पंधराशें मैल रुंद एवढ्या प्रदेशावर पसरलेल्या सात लक्ष खेड्यांत राहाणाऱ्या अर्धपोटी अशा लक्षावधि जनतेचा" उल्लेख केला होता. ते म्हणाले कीं, "स्वतःचा कांहीं दोष नसतांना साध्या भोळ्या खेडुतांना वर्षाकांठीं सहा महिने हात जोडून स्वस्थ बसावें लागतें हें दृश्य मोठें दुःखकारक आहे. फार जुनी गोष्ट नव्हे, प्रत्येक खेडें मानवाला प्रथमावश्यक अशा ज्या दोन गोष्टी,

सर्वश्रेष्ठ देणगी म्हणून विराजत राहील. जोंपर्यंत अस्पृश्यांचा एकादाहि वर्ग अस्तित्वांत असेल, तोंपर्यंत ते त्या वर्गाचे ( कैवारी ) म्हणून राहतील.

" मला पुनर्जन्म यावयाचा असेल तर मी अस्पृश्य म्हणून जन्माला यावें अशी मी इच्छा करीन; म्हणजे मला त्यांच्या दुःखांत, विपदांत आणि मानखंडनेंत अंशभागी होतां येईल, आणि माझी आणि त्यांची त्या दुःखद परिस्थितींतून सुटका करून घेण्याचा प्रयत्न करतां येईल." अदृश्य अशा परमेश्वरावर आपलें प्रेम आहे असें म्हणत असतां त्याच्याच चिच्छक्तीनें अथवा त्याच्याजवळून घेतलेल्या चिदंशानें व्यवहार करणाऱ्या मानवाशीं निर्दयतेनें वागणें हा वदतोव्याघात होय. सनातनी हिंदु असल्याचा गांधींना अभिमान वाटत असला, तरी जातिव्यवस्थेची कठोरता आणि तिचीं बंधनें, अस्पृश्यतेचा शाप, मंदिरांतील अनीति, जनावरांशीं व इतर प्राण्यांशीं निर्दयतेची वागणूक या बाबतींत त्यांच्यापेक्षां कट्टर विरोधक कोणी झाला नसेल. " मी अगदीं अंतर्बाह्य सुधारणावादी आहे; तथापि हिंदु धर्मांतील प्राणभूत तत्त्वांचा त्याग करण्यास माझा उत्साह मला कधीं प्रवृत्त करीत नाहीं."

हिंदी संस्थानिकांच्या अरेरावीला असणारा त्यांचा आजचा विरोध, त्यांना संस्थानिकांच्या लक्षावधि प्रजेविषयीं वाटणाऱ्या प्रेमावर आधारलेला आहे. अत्यंत उदारमतवादी टीकाकारालासुद्धां संस्थानांचा कारभार व्यवस्थित चालला आहे असें म्हणतां येणार नाहीं. ब्रिटिश हितसंबंधांची कड घेणाऱ्या कलकत्त्याच्या 'स्टेट्समन्' पत्रांतील कांहीं वाक्यें उद्धृत करणें कदाचित् क्षम्य ठरेल. " अनेक संस्थानांतून भयंकर परिस्थिति विद्यमान आहे, हें म्हणण्यांत कोणाहि व्यक्तीवर दोषारोप करावयाचा नसून आरोप मनुष्यस्वभावावर करावयाचा आहे. जमीनदार सद्वृत्त असो अथवा दुर्वृत्त असो, तो कोठल्याहि कायद्यांनीं बांधलेला नाहीं. तारण्या-मारण्याचा अधिकार त्याच्या हातीं आहे. तो लोभी, विषयी अथवा क्रूर असेल तर त्याच्या लोभाला विषयवासनेला वा क्रौर्याला कोठेंहि अटकाव नाहीं. या छोट्या सुलतानांना संरक्षण देणाऱ्या तहनाम्यांचा फेरविचार कधीं होणारच नसेल, ज्या गोष्टींचें समर्थन करणें अशक्य आहे त्याचें समर्थन करीत बसणें हें सार्वभौमसत्तेचें कर्तव्य झालेलें असेल, तर एक दिवस असा येईल कीं, एका

विभाग ग्रां. वा.
क्रमांक ९०८
नों. दि. ३९१३

दुर्दम्य अशा शक्तीची एका अचेतन वस्तूशीं टक्कर होऊन त्याचा परंपरा-सिद्ध परिणाम म्हणजे त्यांपैकीं कशाचे तरी एकाचे तुकडे उडतील. उत्क्रांतीची मंद गति ही क्रांतीची जननी आहे. संस्थानिकांविषयीं आत्यंतिक मित्रभाव धारण करणारे गांधी "तुम्ही उठा आणि आपलीं घरें साफसूफ करा" असें त्यांना सांगत आहेत. खुद्द सार्वभौमसत्तेला हातीं इतकी शक्ति असूनहि प्रांतांना जी जबाबदार राज्यपद्धति द्यावी लागली ती विनाविलंब प्रस्थापित करण्यानेंच स्वतःचें रक्षण व सातत्य साधणार आहे ही गोष्ट वेळ टळून जाण्याच्या आंत संस्थानिकांना उमगेल अशी मला उमेद आहे.

गांधींचा हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारविरुद्ध मुख्य आक्षेप असा आहे कीं, त्याच्यामुळें गरिबांचा छळ सुरू झाला. इतिहासारंभापासून हिंदुस्थान धनसंपत्तीच्या बाबतींत प्रसिद्ध आहे. आमच्यापाशीं अत्यंत सुपीक अशा विस्तीर्ण जमिनी आहेत, अक्षय्य समृद्धीचीं द्रव्यसाधनें आहेत, आणि योग्य ती दक्षता घेतली व लक्ष दिलें तर प्रत्येक पुरुषाला, स्त्रीला आणि मुलाला पोटभर घालतां येईल व अंगभर नेसवतां येईल इतका पुरवठा आहे. इतकें असूनहि दारिद्र्याचा घास बनलेले, अर्धपोटी व आश्रयहीन असे लक्षावधि लोक आहेत कीं, अखेरीस मृत्यु त्यांच्या साह्यास येऊन हृदयव्यथा संपवीपर्यंत ज्यांचें जीवन तारुण्यापासून वृद्धापकाळापर्यंतच्या अव्याहत काबाडकष्टांनीं भरलेलें असतें. निसर्गाच्या निर्दयतेमुळें ही परिस्थिति प्राप्त झालेली नसून हिंदुस्थानच्याच नव्हे, तर अखिल मानवजातीच्या हितासाठीं जी अमानुष पद्धति नष्ट करणें अवश्य झालें आहे, तिच्यापासून ती निर्माण झालेली आहे.

१९३१ सालीं गांधींनीं लंडन येथून नभोवाणीवरून अमेरिकेला जो संदेश दिला, त्यांत त्यांनीं "एकोणीसशें मैल लांब व पंधराशें मैल रुंद एवढ्या प्रदेशावर पसरलेल्या सात लक्ष खेड्यांत राहाणाऱ्या अर्धपोटी अशा लक्षावधि जनतेचा" उल्लेख केला होता. ते म्हणाले कीं, "स्वतःचा कांहीं दोष नसतांना साध्या भोळ्या खेडुतांना वर्षाकांठीं सहा महिने हात जोडून स्वस्थ बसावें लागतें हें दृश्य मोठें दुःखकारक आहे. फार जुनी गोष्ट नव्हे, प्रत्येक खेडें मानवाला प्रथमावश्यक अशा ज्या दोन गोष्टी,

अन्न व वस्त्र, त्यांच्या बाबतींत स्वयंपूर्ण होतें. आमच्या दुर्दैवानें ईस्ट इंडिया कंपनीनें--कोणत्या साधनानें तें मीं न सांगणेंच बरें--हा खेड्यांतील दुय्यम धंदा नष्ट केला आणि लाखों कांतणारे कीं ज्यांचीं कुशल बोटें आतांपर्यंत कोणत्याहि यंत्रानें काढलें नाहीं इतकें तलम सूत काढीत अशी ख्याति होती, त्यांना एक दिवस आपला अभिमानास्पद धंदा नाहींसा झाल्याचें आढळून आलें! कोणी कांहींहि म्हणो त्या दिवसापासून हिंदुस्थान अधिकाधिक दरिद्री होत चालला हें निर्विवाद."

हिंदुस्थानचें जीवन खेड्यांत आहे, त्याची संस्कृति कृषीवल संस्कृति असून ती उत्तरोत्तर यांत्रिक होत चालली आहे. जगाच्या अन्नसामग्रीचा निर्माता आणि समाजांतील आधारभूत घटक जो शेतकरी त्याचे गांधी हे प्रतिनिधि असून, हिंदी संस्कृतीची ही जी मूलभूत प्रकृति ती रक्षिण्याची व दृढ करण्याची चिंता ते वाहतात. ब्रिटिश राजवटींत जुनी वळणें लोक सोडून देत आहेत. आणि जरी यांत्रिक कसब, शोधक बुद्धि, धैर्य व साहसी वृत्ति इत्यादींसारखे अनेक प्रशंसनीय गुण लोकांनीं उचलले असले तरी सुद्धां ते भौतिक यशाचे उपासक व इंद्रियगोचर अशा ऐहिक सुखांचे लोभी बनले असून युक्तायुक्ततेच्या ऐहिक विचारांनीं नियंत्रित झालेले आहेत. ज्या भूमीवर आमचीं औद्योगिक नगरें वाढलीं त्या भूमीशीं नगरांचें कांहींच प्रमाण राहिलेलें नाहीं, त्यांची भरमसाट वाढ झालेली आहे, आणि यंत्र व पैसा यांच्या जाळ्यांत गुरफटून तेथील रहिवाशी हिंसक, अस्वस्थ, अविचारी, स्वैर, नीतिशून्य बनले आहेत. चार दमड्या मजुरीसाठीं ज्यांना आपलें रुक्ष जीवन काबाडकष्टांत घालवावें लागतें अशा स्त्रिया, कामकरी आयांना रडून त्रास देऊं नये म्हणून अफू चारून गुंगवलेलीं तान्हीं बाळें, ज्यांच्यापासून बाल्यदशा हिरावून घेण्यांत आली आहे, ज्यांना कोंवळ्या वयांतच यांत्रिक कामावर जुंपण्यांत आलें आहे अशीं बालकें, आणि लुले-पांगळे व रुग्ण बनलेले लाखों बेकार, हाच यंत्रयुक्त मानवसमाजाचा अर्थ असें गांधींना वाटूं लागलें आहे. ज्यांना वाटतें कीं आपण फशीं पडत आहों, गुलाम बनत आहों आणि नितकोर तुकड्यासाठीं आपला आत्मा विकीत आहों. औपनिषदिक ऋषी, बुद्ध भिक्षू, हिंदु संन्यासी, आणि

मुसलमान फकीर यांच्या द्वारा जें चैतन्य व जी संस्कृति स्फुरली तिचें मोटार-गाड्यांनीं, नभोवाणीनें, आणि धनसत्तेनें समाधान होणें नाहीं. आमची दृष्टि मंद झाली असून आम्ही वाट चुकलों आहोंत. आम्ही अशा आड-मार्गांचा स्वीकार केला आहे कीं ज्यामुळें आमचा शेतकरी वंचित, दरिद्री व कृपण झाला आहे. आमच्या कामगारांना त्यानें नीतिहीन, सौजन्यहीन व विवेकहीन बनविलें आहे. आणि आशाहीन चेहऱ्यांच्या, निस्तेज डोळ्यांच्या व बेंगरूळ तोंडांच्या लाखों पोरांची वीण झाली आहे. जुन्या जमान्यांतील खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याची व स्वाभिमानाची, आणि जेथें कोणी धनवान् नाहीं व दरिद्रीहि नाहीं, जेथें उपभोग व विश्रांति यांचा अतिरेक नष्ट झालेला आहे, आणि जेथें उद्योग व व्यापार हें साध्या स्वरूपांत चालत आहेत अशा जीवनाची बहुसंख्य जनतेला लागलेली भूक, आमच्या सांप्रतच्या संमोहाच्या आणि संत्रस्ततेच्या आड दडलेली आहे.

यंत्रापासून होणाऱ्या फायद्यांचा सर्वस्वीं त्याग करील असा कृषीवलसमाज स्थापणें हा गांधींचा उद्देश नाहीं. मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या उत्पादन-पद्धतीच्या विरुद्ध ते नाहींत. ग्रामोद्योग व मोठ्या प्रमाणावरील उत्पादनपद्धति यांच्यांत संगति निर्माण करतां येईल काय, असें विचारलें असतां ते म्हणाले, “ हो, जर खेड्यांना साहाय्य होईल अशा प्रकारें त्यांची योजना झालेली असेल तर ( संगति घालतां येईल ). राष्ट्राला आवश्यक असणारे महत्त्वाचे उद्योगधंदे केंद्रित करण्यांत आले तरी चालेल. माझ्या योजनेप्रमाणें जें खेडेगांवांत तितक्याच सुबक तऱ्हेनें तयार करतां येईल तें शहरांत तयार करण्याची परवानगी मिळणार नाहीं. शहराचें खरें काम म्हणजे खेड्यांत तयार झालेल्या मालाचा उठाव करणें होय.”* त्यांचा खादीविषयींचा आग्रह व हस्तव्यवसायाभोंवतीं योजिलेली लोकशिक्षणाची योजना हीं खेड्यांचा उद्धार करण्यासाठींच आहेत. या देशांतील मूठभर शहरांतून नव्हे, तर असंख्य खेड्यांतूनच हिंदुस्थान आढळेल, असें ते वारंवार बजावीत असतात. हिंदुस्थानांतील जनतेपैकीं बहुसंख्य लोकांनीं काळीकडेच परत गेलें पाहिजे, तेथेंच राहिलें पाहिजे व तिच्यांतील उत्पादनावरच

---

* हरिजन, २८ जानेवारी १९३९

बहुंशीं गुजराण केली पाहिजे; म्हणजे त्यांचीं कुटुंबें स्वावलंबी होतील, ( शेतीच्या ) उपयोगाचीं अवजारें, लागवडीची जमीन व राहतें घर हीं त्यांच्या मालकीचीं होतील. उपऱ्या व भटक्या अशा कामगारांच्या वर्गाची नव्हे, बेताल व लोभी अशा सावकार वर्गाची नव्हे, तर जबाबदार असा शेतकरी समाज आणि छोट्या कृषीवल नगरांतला स्थायिक व विचारी नागरिक यांची, देशाच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनावर सत्ता चालून त्यांनींच त्यांत नीति, रस आणि ध्येयवादित्व हीं निर्माण केलीं पाहिजेत. असें होणें म्हणजे रानटी बनणें नव्हे; तर हिंदुस्थानाच्या सहजप्रवृत्तीशीं जुळत्या व ज्यानें एका काळीं ध्येय, श्रद्धा व सार्थकता यांचा लाभ करून दिला, अशा जीवनक्रमाचा स्वीकार करणें होय. आपलें बीज सुसंस्कृत राखण्याचा हा एकमेव मार्ग आहे. खेडवळ जीवनानें, गांवगाड्याच्या व्यवस्थेनें, वनांतरींच्या आश्रमांनीं व चिंतन-स्थानांनीं युक्त अशा हिंदुस्थानानें जगाला फार उच्च संदेश दिलेले आहेत. पण त्यानें कोणाचेंहि अकल्याण केलें नाहीं, कोणत्याहि राष्ट्राचा नाश केला नाहीं आणि इतरांवर सत्ता गाजवण्याचा प्रयत्न केला नाहीं. आज जीवनाच्या खऱ्या हेतूचा विपर्यास झाला आहे. या नैराश्यकर्दमांतून हिंदुस्थान कसा बाहेर पडणार? शेंकडों वर्षांच्या या नैराश्यदास्यामुळें आपला उद्धार करण्याचा निश्चय अथवा इच्छा लोक गमावून बसल्यासारखे दिसतात. विरोधी शक्ती फार प्रबळ झाल्यासारख्या भासतात. श्रद्धा, उच्चतर आत्मगौरव व अधिक स्वाभिमानी राहणी यांची प्राप्ति त्यांना करून देणें ही सोपी गोष्ट नव्हे. तरीहि निश्चेष्ट बनलेल्या पिढीस आपल्या हृदयांत धगधगणाऱ्या अग्नीनें व स्वातंत्र्यज्वालेनें प्रज्वलित करण्याचा गांधींनीं प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्यांत स्त्रीपुरुषांचे उच्चतम गुण प्रकट होतात. पारतंत्र्यांत त्यांचा अधःपात होतो. स्वभाव विकृत करणाऱ्या मानसिक व बाह्य बंधनांपासून सामान्य माणसाला मुक्त करणें हा स्वातंत्र्याचा उद्देश आहे. मानवी स्वातंत्र्याचा एक थोर रक्षणकर्ता म्हणून ते देशाला पारतंत्र्यांतून सोडविण्याची खटपट करीत आहेत. अशा तऱ्हेचा शुद्ध देशाभिमान हा गुन्हा नव्हे, अथवा अशिष्टाचारहि नव्हे. सध्यांच्या अनैसर्गिक परिस्थितीविरुद्ध झगडणें हें मनुष्यमात्राचें पवित्र कर्तव्य आहे.

ते आध्यात्मिक शस्त्रें वापरीत असून तरवार उपसण्याचें नाकारीत आहेत आणि या ( झगड्याच्या ) प्रक्रियेमध्यें जनतेला स्वातंत्र्याचें शिक्षण देऊन तें मिळविण्यासाठीं व रक्षण्यासाठीं तिला तयार करीत आहेत. गांधींच्या लढ्यासंबंधीं त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज लॉईड ( आतां लॉर्ड लॉईड ) म्हणाले होते कीं, " जगाच्या इतिहासांत फार प्रचंड असा हा गांधींचा प्रयोग होता आणि तो यशस्वी होण्याच्या अगदीं बेतांत आला होता. "

गांधींच्या दृष्टिकोनांत गटाचा वा प्रांताचा ( अभिमान ) नाहीं. हिंदुस्थानची परंपरागत संस्कृति जगाच्या संस्करणाच्या कामीं मदत करील असा त्यांचा विश्वास आहे. दलित हिंदुस्थानाला मानवजातीस आशादायक असें कांहींच देतां येणार नाहीं. जागृत व स्वतंत्र हिंदुस्थानच गांजलेल्या जगाला मदत करूं शकेल. न्याय, शांति व व्यवस्था ह्यांविषयींच्या ध्येयांबद्दल ब्रिटिश लोकांच्या मनांत खरी कळकळ असेल, तर चढाई करणाऱ्या राष्ट्रांचा पाडाव करणें व विद्यमान परिस्थिति कायम राखणें एवढेंच पुरेसें नाहीं असें गांधी प्रतिपादन करतात. घोषित केलेल्या ध्येयांविरुद्ध वागून परिस्थितींत सुधारणा करण्याचें नाकारल्यामुळें होणारी अक्रियात्मक हिंसा आपल्या स्वातंत्र्यप्रेमानें व न्यायप्रेमानें त्याज्य मानली पाहिजे. लोभ, क्रौर्य व मानवांबद्दल तुच्छता यामुळेंच जर साम्राज्यें प्रस्थापित झालीं आहेत, तर स्वातंत्र्य व न्याय यासाठीं ( लढणाऱ्या ) शक्तींना येऊन मिळा अशी हांक जगाला मारण्यापूर्वीं ( त्या साम्राज्यांत ) आपण बदल केला पाहिजे. हिंसा ही सक्रिय अथवा अक्रिय असते. चढाई करणारीं राष्ट्रें सध्यां सक्रिय हिंसक आहेत. भूतकालीन हिंसेनें मिळविलेल्या अन्याय्य सवलतींच्या उपभोगांना चिकटून राहणारीं साम्राज्यवादी राष्ट्रें हीं हिंसेच्या बाबतींत तितकींच गुन्हेगार असून स्वातंत्र्य व लोकसत्ता यांचीं तीं वैरी होत. या बाबतींत आपण प्रामाणिकपणें वागत नाहीं तोंपर्यंत आपल्याला अधिक चांगली जागतिक व्यवस्था प्राप्त होणें अशक्य होईल व जग युद्धें व युद्धांची धास्ती यांनीं भरलेल्या अनिश्चिततेच्या वातावरणांत नित्य राहील. हिंदुस्थानाला स्वायत्तता देणें ही ब्रिटिशांच्या प्रामाणिकपणाची कसोटी

आहे. आत्मसंयमन साध्य झालेलें आहे हें जिज्ञासूंना दर्शविण्यासाठीं गांधीं अद्यापिहि दर सोमवारीं आपला चोवीस तासांचा उपवास करीत असतात. तरीहि अधीर झालेल्या, आणि जनतेच्या साहजिक आकांक्षा व ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचा हटवादीपणा यांच्यामुळें हृदयाची ओढाताण होत असलेल्या हिंदुस्थानाला ते आवरून धरीत आहेत. गांधी म्हणजे हिंदुस्थानांतील शांतिप्रीत्यर्थ कार्य करणारी सर्वांत महान् शक्ति होय.

ब्रिटिशांच्याबरोबर मित्रत्वाच्या व समानतेच्या भूमिकेवरून ते कार्य करण्यास तयार असले तरी जोंपावेतों श्रेष्ठत्वाची व पालनकर्त्यांची अनैसर्गिक भूमिका ब्रिटिश लोक धारण करीत राहतील तोंपर्यंत हिंदुस्थानच्या परिस्थितींत कसलीहि सुधारणा होणें शक्य नाहीं, असें त्यांस निश्चितपणें वाटतें. अत्यंत भावनोत्तेजक अशा प्रसंगींसुद्धां ब्रिटिश लोकांच्याबद्दल त्यांनीं मनांत किल्मिष ठेवलें नाहीं ही गोष्ट आपण ध्यानांत घेतली पाहिजे. " हिंदुस्थानची सेवा घडावी म्हणून मी इंग्लंडला वा जर्मनीला अपाय करणार नाहीं. "

अमृतसरच्या कत्तलीसारखें किंवा सायमन कमिशनच्या नेमणुकीसारखें एखादें मूर्खपणाचें अथवा दुर्बुद्धीचें कृत्य घडल्यामुळें हिंदुस्थानाचा धीर व तोल सुटून तो रागानें जळूं लागला म्हणजे त्या असंतोषाला व द्वेषाला प्रेमाच्या व तडजोडीच्या सुरक्षित मार्गाकडे नेण्यासाठीं गांधी उभे राहत. वर्तुळाकार परिषदेच्या वेळीं ब्रिटिशांविषयींचें आपलें गाढ प्रेम, बळावर नव्हे, तर बुद्धीवर आधारलेल्या राष्ट्रकुटुंबावरील विश्वास व मानवजातीच्या सार्वत्रिक सुखाची वाढ करण्याची इच्छा, त्यांनीं व्यक्त केली. वर्तुळाकार परिषदेची फलश्रुति म्हणून अर्धवट अशी प्रांतिक स्वायत्तता मिळाली आणि ज्यावेळीं ती राज्यघटना स्वीकारण्याविरुद्ध व चालविण्याविरुद्ध बहुमत दिसूं लागलें, तेव्हां दिलेल्या सुधारणा वापरून जें कांहीं त्यांतून मिळेल तें घेण्यासाठीं इतर कोणाहिपेक्षां गांधींनींच कॉंग्रेसचें मन वळविलें. ब्रिटनशीं सलोखा ठेवणें हाच एक ध्यास त्यांना आहे, मात्र तो सलोखा स्वातंत्र्य व मित्रत्व यांवर आधारलेला असावा. आज असा पुढारी हिंदुस्थानाचें प्रतिनिधित्व करतो आहे, कीं ज्याच्या ठायीं वांशिक वैमनस्य अथवा

वैयक्तिक द्वेष यांचा लवलेशहि नाहीं. हिंसेवर त्यांची श्रद्धा नसून जनतेला हिंसेपासून ते परावृत्त करीत आहेत. ब्रिटिश राष्ट्रकुटुंबांतून हिंदुस्थानाला विभक्त करावें असा त्यांचा मानस नाहीं; मात्र स्वतंत्र राष्ट्रांचें मित्रमंडळ असा त्या राष्ट्रकुटुंबाचा अर्थ असला पाहिजे. कॅनडांतील पार्लमेंटला उद्देशून १९ मे रोजीं केलेल्या भाषणांत बादशहा म्हणाले होते कीं, ब्रिटिश साम्राज्याची एकजूट ही "आजच्या घटकेला राज्यशासनाचीं समान तत्त्वें उपभोगीत असणाऱ्या शांति व स्वातंत्र्य या ध्येयांविषयीं समान भक्ति बाळगिणाऱ्या व बादशहांशीं समान निष्ठेनें निगडित झालेल्या राष्ट्रांच्या स्वखुशीनें बनवलेल्या मंडळाच्या द्वारा व्यक्त होत आहे." हींच "राज्यशासनाचीं समान तत्त्वें" हिंदुस्थानाला लागू करावींत असें गांधींचें म्हणणें आहे. "हिंदी लोक आपल्या देशाचे स्वामी व्हावेत" असें ते म्हणतात; आणि त्यांचें हें म्हणणें तर्कविरुद्ध वा नीतिविरुद्ध नाहीं. सदिच्छाप्रेरित व्यक्तींच्या सहकार्यानें या दोन गटांमध्यें अधिक चांगले संबंध घडून यावेत अशी त्यांची तीव्र इच्छा आहे.

त्यांच्या आळवणीचा वाऱ्याच्या भणभणीपेक्षां अधिक उपयोग होऊं नये ही खेदाची गोष्ट आहे! वर्षानुवर्षांच्या या दुर्दम्य प्रयत्नानंतर आणि वीरोचित संगरानंतरसुद्धां जरी त्यांची श्रध्दा व ध्येय जिवंत असलीं तरी त्यांचें कार्य अपूर्णच राहिलें आहे. मला अशी आशा आहे कीं, ब्रिटिश लोकमत आपला प्रभाव दाखवून आपल्या सरकारला सौदा वा घासाघीस करूं न देतां, संकोच वा विलंब लावूं न देतां, थोडासा धोका असला तरीहि खुल्या, उदात्त विश्वासाची खूण म्हणून स्वतंत्र व स्वायत्त असा हिंदुस्थान प्रस्थापित करण्यास भाग पाडील. कारण, न्याय मिळावा यासाठीं गांधींनीं केलेल्या विनंतीला उत्तर म्हणून असें जर करण्यांत आलें नाहीं, तर आपल्या ह्या दोन देशांचे संबंध बिघडत जातील, त्यांच्यांतील अंतर वाढेल आणि कडवटपणा वाढीस लागून दोनहि देशांना त्यापासून अडथळा व धोका उत्पन्न होईल असें मला वाटूं लागलें आहे.

## ४ सत्याग्रह

"अहिंसा परमो धर्मः" हें महाभारतांतील सुप्रसिध्द वचन आहे. त्याचें

व्यवहारांतील आचरण म्हणजे सत्याग्रह वा आत्मबल. तें अशा गृहीत-कृत्यांवर आधारलेलें आहे कीं, " सत्याच्या पायावर जग आधारित आहे. असत्य याचा अर्थ 'अविद्यमान' असाहि असून सत्याचा अर्थ 'विद्यमान' असा आहे. जर असत्य हें विद्यमानच नसेल तर त्याचा विजय होण्याचा संभवच नाहीं. आणि सत्य हें ' विद्यमान 'च असल्यामुळें तें नष्ट करणें शक्य नाहीं."* ईश्वर हेंच सत्य आहे. स्वातंत्र्येच्छा व प्रेम हीं सत्याला अनुसरून आहेत. ह्या आत्महितेच्छेचा मानव जेव्हां त्याग करतो तेव्हां तो आत्मत्यागच करतो.

सत्याच्या ठायीं असणाऱ्या सामर्थ्यावर व आत्मबलावर सत्याग्रह आधारलेला आहे. हिंसेपासून केवळ निवृत्त होण्याचा अक्रियात्मक गुण म्हणजे सत्याग्रह नव्हे. सत्याग्रह म्हणजे सुकृति आचरण्याचा सक्रियात्मक गुण होय. " माझ्या शत्रूवर मीं प्रहार केला तर ती निःसंशय हिंसा झाली. पण खऱ्या अर्थानें अहिंसामय व्हावयाचें असेल, तर मीं त्याच्यावर प्रेम केलें पाहिजे व तो माझ्यावर प्रहार करीत असला तरीहि मीं त्याचें अभिष्ट चिंतलें पाहिजे. प्रेम म्हणजे ऐक्य, (असें असल्यामुळें) अनैक्य, लोभ, तिरस्कार, द्वेष, घात व वध यासारख्या पापांशीं त्याचा विरोध असतो. पापाला, दुष्कृत्याला, अन्यायाला, पिळणुकीला प्रेम मान्यता देऊं शकत नाहीं. तें तोंड न चुकवतां दुराचाऱ्याच्या सन्मुख उभें ठाकतें आणि दुर्दम्य अशा प्रेमाच्या व यातनांच्या शक्तींनीं त्याच्या दुष्कृतीचा प्रतिकार करतें. कारण हिंसाबळाशीं ( हिंसेनें ) लढणें हें मनुष्यधर्माविरुद्ध आहे. बुद्धि व सदिच्छा, प्रेम व सेवा ह्या मानवी साधनांनीं झगडे मिटवले पाहिजेत. आपण मानव आहोंत हें अत्यंत रोमहर्षण सत्य हीच काय ती या व्यामोहपूर्ण जगांतील समाधानाची गोष्ट आहे. मृत्यूच्या दरबारांतसुद्धां सर्जनशील जीवन आपला पगडा बसवतें. भीतीचें व निराशेचें वातावरण असतांहि शेतकरी आणि कोष्टी, कलाविद् आणि तत्त्वज्ञानी, आश्रमनिवासी भिक्षु आणि रसायन-शालेंतील शास्त्रज्ञ, सर्व आबालवृद्ध, हे प्रेम आणि यातना सहन करतांना मानवतेचें आचरण करीत असतात. जीवन हें असीम आहे 'प्राणो विराट्.'

---

* महात्मा गांधी—आत्मकथा, पृ० २२५

हिंसेची तरफदारी करणारे, डार्विनच्या जीवनकलहाच्या सिद्धांताचा गांवढळ असा अर्थ लावीत असतात. मानव व पशु यांच्यांतील मूलभूत भिन्नतेकडे दुर्लक्ष करून जीवशास्त्रांतील सिद्धांताला ते मानवी भवितव्याच्या सिद्धांताची पदवी प्राप्त करून देतात. जेथें त्याला स्थान नाहीं अशा ठिकाणीं हिंसक प्रतिकाराचा उपयोग केला, तर मानवी जीवन पशुजीवनाच्या पातळीपर्यंत घसरण्याची भीति उत्पन्न होईल. महाभारतामध्यें युयुत्सु जगाची श्वानमंडळाशीं तुलना केलेली आढळते. "प्रथम शेपट्या हालवण्यास सुरवात होते. नंतर भुंकण्यास, तदनंतर उत्तरादाखल भुंकण्यास, मग दुसऱ्याच्या भोंवतीं मंडलें काढण्यास, पुढें दांत विचकण्यास व त्यापुढें गुरगुरण्यास सुरवात होऊन नंतर लढाईला प्रारंभ होतो. माणसांतहि असेंच असतें, कोणताहि फरक नसतो." * "माकडें व कुत्रीं यांच्यावर लढणें सोंपवून मनुष्याप्रमाणें वागा आणि यातना मुकाट्यानें सहन करून सत्यसेवा करा" असें गांधी आपणांस म्हणत आहेत. शत्रूचा नाश करून नव्हे, तर आपल्याप्रमाणेंच वासना असलेला तो मानव असल्याकारणानें त्याच्यांत पालट करून, प्रेम व आत्मक्लेश शत्रूला पराभूत करतील. गांधींच्या प्रायश्चित्ताच्या व आत्मक्लेशाच्या क्रिया नीतिधैर्यानें व प्रायश्चित्तक्षम त्यागानें पूर्ण अशा असतात.

कांहीं थोड्याशा व्यक्तींनीं हा प्रेमाचा मार्ग आपल्या जीवनांत आचरण्याचा प्रयत्न केलेला असला, तरी सामाजिक व राजकीय विमोचनाची योजना म्हणून तो गांधींनीं वापरला ही त्यांची सर्वश्रेष्ठ साधना आहे. त्यांच्या नेतृत्वाखालीं दक्षिण आफ्रिकेंत व हिंदुस्थानांत संघटित समुदायांनीं दुःखनिवारणासाठीं फार मोठ्या प्रमाणावर त्या मार्गाचा उपयोग केलेला आहे. राजकीय ध्येयसाधनासाठीं सर्व तऱ्हेची शारीरिक हिंसा सर्वस्वीं त्याज्य समजून राजकीय क्रांतिपरंपरेंतील आपल्या या नवीन तंत्राचा त्यांनीं विकास केला आहे. हें तंत्र हिंदुस्थानच्या आध्यात्मिक परंपरेला बाधक नसून त्या परंपरेंतूनच तें उदय पावलें आहे.

युद्धनाशासाठीं सुरू झालेल्या युद्धानंतर वीस वर्षांनीं लक्षावधि माणसें

---

* एवमेव मनुष्येषु विशेषो नास्ति कश्चन। ५, ७२, ७२, ३.

शस्त्रधारी झालीं आहेत. शांततेच्या काळांत सैन्याची जमवाजमव होत असून आरमारें समुद्रावर संचरत आहेत व आकाशांत विमानें गोळा होऊं लागलीं आहेत. युद्धानें कोणताहि प्रश्न सुटत नाहीं, तर प्रश्न सोडवणेंच अधिक अवघड होतें याची आपणांस जाणीव आहे. युद्धाविषयींच्या अनुकूल–प्रतिकूल वादामुळें अनेक ख्रिश्चनधर्मी स्त्रीपुरुषांचीं अंतःकरणें व्यथित होत आहेत. युद्ध हा मानवतेला कालिमा लावणारा अपराध असून संस्कृतीचें रक्षण रानटी साधनांनीं करणें समर्थनीय नाहीं असें शांतिवादी घोषित करीत आहेत. ज्यांच्याबरोबर आपलें वैर नाहीं अशा स्त्रीपुरुषांना यातना सहन करण्यास लावण्याचा आपणांस अधिकार नाहीं. युद्धांत पडलेलें राष्ट्र, शत्रूचा पराभव व संहार करण्याच्या बिकट निश्चयानें उत्स्फूर्त झालेलें असतें, भीति व द्वेष यांच्या भावनांनीं तें भारावलेलें असतें. गजबजलेल्या शहरांवर मृत्यु आणि सर्वनाश यांचा वर्षाव प्रेमाच्या व क्षमेच्या भावनेनें करणें अशक्य आहे. सैतानाचा प्रतिकार करण्यासाठीं सैतानाचीच योजना करण्यासारखी सध्यां युद्धपद्धति आहे, ती येशूच्या मनोगताविरुद्ध आणि त्याच्या नैतिक आदेशाविरुद्ध व उदाहरणाविरुद्ध आहे. संहार आणि ख्रिश्चनधर्म यांचें संवादित्व साधणें आपणांस अशक्य होय.

युद्धाची तरफदारी करणारे असा मुद्दा मांडतात कीं, जरी युद्ध हें महासंकट असलें, तरी क्वचित् प्रसंगीं तें तुलनेनें अल्पसंकट ठरतें; आणि तारतम्याविषयीं योग्य जाणीव ठेवणें यांतच व्यवहारचातुर्य असतें. समाज व त्याचें मुख बनलेलें जें सरकार त्याविषयीं आपलीं कांहीं कर्तव्यें असतात. जीवनांत सार्थकता व गोडी उत्पन्न करणारें देहाचें व वित्ताचें रक्षण आणि शिक्षणादि इतर सवलती आपणांला समाजाचे घटक म्हणून प्राप्त होतात; म्हणून सरकारवर हल्ला होईल त्यावेळीं त्याचा बचाव करणें आणि धोका उत्पन्न होईल त्या वेळीं त्याच्या सातत्याचें रक्षण करणें हा आपला सहजधर्म ठरतो.

ज्या लोकांशीं आपलें वैर नाहीं त्यांना जखमी करण्यासाठीं, ठार मारण्यासाठीं, घाव घालण्यासाठीं जेव्हां आपणांस बोलवण्यांत येतें तेव्हां अशाच प्रकारचे मुद्दे आपणांपुढें मांडण्यांत येतात.

लॉर्डांच्या सभेंत २० मार्च रोजीं झालेल्या वादविवादाच्या वेळीं

केलेल्या भाषणांत कँटर्बरीच्या आर्चबिशपांनीं "सत्पक्षाच्या बाजूला बल जमवा" अशी विनंति केली. ते म्हणाले, "शांतीपेक्षां अधिक पवित्र अशा कांहीं वस्तू असतात व त्यांचें संरक्षण अवश्यमेव केलें पाहिजे अशी खात्री पटल्यामुळेंच आम्ही या युद्धाच्या विचाराकडे खेचलों गेलों."

"संस्कृति व मानवी कल्याण यांच्या दृष्टीनें अत्यंत मूल्यवान् अशा गोष्टींचें रक्षण राष्ट्रांनीं करावें हें ईश्वरेच्छेविरुद्ध आहे असें मला वाटत नाहीं." गांधी हीच अशी एक दुर्मीळ धार्मिक व्यक्ति आहे कीं, जी वेडावलेल्या देशाभिमानी अशा जनसमुदायासमोर उभी राहून प्रसंग पडला तर मी सत्यासाठीं हिंदुस्थानाचाहि त्याग करीन असें सांगेल. गांधी म्हणतात कीं, "मला भेटलेले बहुतेक धर्मशील लोक बुरखा पांघरलेले मुत्सद्दी होते. पण मीं जरी मुत्सद्याची भूमिका घेतली असली, तरी अंतःकरणानें मी धर्मशील आहें."

व्यवहारांतील मागणीच्या अनुरोधानें ध्येयाला खालीं खेचणें हा धर्मशील माणसाचा उद्देश नव्हे; तर व्यवहाराला ध्येयानुसंधानानें उन्नत करणें हा धर्मशील माणसाचा उद्देश आहे. आमच्या देशाभिमानामुळें मानव कुटुंबांतील आध्यात्मिक एकता भंग पावते. युद्धामध्यें भाग घेण्याचें नाकारून आम्ही बृहत्समाजाविषयींची निष्ठा कायम राखतों व शासनसंस्थेचें धार्मिक व सौजन्यमय मार्गानें रक्षण करून आमची तद्विषयक निष्ठाहि कायम ठेवतों. निदान धर्मशील व्यक्तींनीं तरी द्रष्ट्याप्रमाणें "माणसापेक्षां ईश्वराचीच इच्छा" मानली पाहिजे. आपत्ति अशी आहे कीं जे लोक युद्धाला राजकारणांतलें साधन असें मानतात व मुलूख जिंकणें हीच प्रगति असें समजतात, अशा लोकांच्या हातीं सर्व देशांतील समाज गवसले आहेत.

मनुष्य विकृत मनाचा नसेल, तर त्याला सौजन्ययुक्त व कारुण्यमय जीवनापासून आनंद मिळतो. सृजनांत आनंद व संहारांत दुःख असतें. सामान्य सैनिकाच्या मनांत शत्रूविषयीं द्वेष नसतो. पण भीति, स्वार्थ व अभिमान या त्याच्या भावनांना आळवून सत्ताधारी वर्ग मानवतेपासून त्याला भ्रष्ट करतो. ज्यांच्यांत त्वेषाच्या व द्वेषाच्या भावना कृत्रिमरणें निर्माण करण्यांत आल्या आहेत ते लोक शिस्तीची शिकवणूक मिळालेलीं

साधीं भोळीं माणसें असल्यामुळें एकमेकांशीं लढतात. तरीसुद्धां हत्या करतांना ते समत्सर हत्या करूं शकत नाहींत. शिस्तीमुळें अप्रिय गोष्ट करणें त्यांना भाग पडतें. दुराराध्य व निष्करुण अशा शासनसंस्थेवरच याची अंतिम जबाबदारी आहे. साध्याभोळ्या लोकांना त्यांनीं बंधनांत टाकून त्यांची मानवता खच्ची केली आहे. सृजनांत आनंद मानणाऱ्या मनुष्यांना संहाराकरितां असलेलीं सैन्यें, आरमारें व विमानदलें तयार करण्यासाठीं कवायत शिकवण्यांत येत आहे. हत्येची आम्ही वाहवा करतों व क्षमेला लज्जास्पद ठरवतों. सत्याचें शिक्षण आम्ही मना करतों व असत्याचा प्रसार करण्याचा हुकूम देतों. स्वकीयांच्या व परकीयांच्यापासून शिष्टाचार, आनंद आणि जीवन हीं लुबाडून घेऊन सामुदायिक हत्या व आध्यात्मिक मृत्यु यांस आम्ही जबाबदार होत असतों.

सर्व राष्ट्रें परस्परांशीं स्वातंत्र्याच्या व स्नेहाच्या भावनेनें व्यवहार करूं लागेपर्यंत व अविभाज्य सामाजिक जीवनाविषयीं नवीन कल्पनांचा आपण विकास करीपर्यंत आपणांला शांतीचा लाभ होणें अशक्य आहे. आत्मा, स्वातंत्र्य, न्याय व प्रेम हीं गांधींच्या जीवनांतील प्राणभूत अशीं जीं शाश्वत सत्यें आहेत त्यांच्यांशीं संबद्ध झालेली जी दृढमूल अशी सहजभावना तिच्याशीं मानवसमाजाचें आणि संस्कृतीचें भवितव्य निगडित झालेलें आहे. या हिंसामय जगांत गांधींचें अहिंसेचें स्वप्न इतकें मोहक दिसतें कीं, त्याच्या सत्यतेविषयीं शंका वाटूं लागते. गांधींना वाटतें कीं, ईश्वर सत्यरूपी व प्रेमरूपी आहे आणि परिणामांची कदर न बाळगतां आपण सत्य व प्रेम आचरावें अशी त्यांची इच्छा आहे. कोणती गोष्ट किफायतशीर होईल हें हुडकण्याची धूर्त मनुष्य जितकी काळजी घेतो, तितकीच काळजी धर्मशील मनुष्य न्याय्य काय तें शोधण्याची घेतो; आणि अत्यंत प्रिय अशा वैयक्तिक, वांशिक अथवा राष्ट्रीय हितसंबंधांचा त्याग करावा लागत असला तरीहि न्याय्य तीच गोष्ट तो करतो. वैयक्तिक वा सामुदायिक अशा सर्व स्वार्थी वासना ज्यांनीं आपणांतून धुऊन काढल्या असतील त्यांनाच असें म्हणण्याचें धैर्य प्राप्त होतें कीं, “ईश्वरा, तुझी इच्छा पुरी होण्यासाठीं हवा तर सर्वनाश होवो.” ईश्वर अथवा सत्य अथवा न्याय यांच्याविषयींच्या प्रेमामुळें कोणाला इजा पोंचेल हें गांधींना मान्यच नाहीं.

त्यांना निश्चितपणें असें वाटतें कीं, नीतिनियमांच्या मेरूवर जगांतील विजेते व पीडक ज्या धडक्या घेत आहेत त्या अंतीं आत्मनाशाच्याच ठरणार. अनैतिक होण्यांत बिनधोकपणाहि नाहीं; कारण सत्ताभिलाष हा आत्मघातकीच ठरतो. आपण " राष्ट्रहिताची " भाषा बोलतों तेव्हां कांहीं प्रदेश अंकित म्हणून ठेवण्याचा नित्य व अविवाद्य हक्क आपणांस आहे असें आपण गृहीत धरीत असतों. " संस्कृति " विषयीं बोलावयाचें तर जगानें अनेक अशा संस्कृती पाहिल्या आहेत कीं, ज्यांच्यावर आतां युगांतरींची धूळ बसलेली आढळेल. तेव्हांचीं नगरें अरण्यांनीं स्वाहा केलीं असून चांदण्या रात्रीं तेथें कोल्हे रुदन करीत आहेत!

श्रद्धाशील माणसाला " संस्कृति " व " राष्ट्रहित " या विषयांचे विचार गैरलागू वाटतात. प्रेम ही धोरणाची अथवा हिशेबाची बाब नव्हे. निराशेमुळें ज्यांची अशी समजूत झाली आहे कीं पलायन अथवा संहार याशिवाय आधुनिक जगाच्या हिंसेंतून सुटण्याचा दुसरा मार्ग नाहीं, त्यांना गांधींचें असें सांगणें आहे कीं, आपल्या आवाक्यांत असलेला आणखी असा एक प्रेमाचा मार्ग आहे कीं, ज्यानें अनेक विपदांतून मानवाला तारलें व जो अद्यापिहि त्याला तारील. पाशवी सामर्थ्याच्या राक्षसी देखाव्यांना गांधींचा सत्याग्रह हें निष्परिणामी उत्तर आहे असें कोणाला वाटेल; परंतु बळाहून प्रबळ अशी एक वस्तु आहे; ती म्हणजे आरडाओरड व संख्याबल यांनीं दडपला न जाणारा मानवाचा अविनाशी आत्मा. त्याच्या पायांत अरेराव ज्या बेड्या ठोकूं पाहतील त्या सर्व तो तोडील. ' न्यू यॉर्क टाइम्स् ' च्या बातमीदारानें मार्च महिन्यांतील अरिष्टाच्या वेळीं जगासाठीं संदेश मागितला असतां झालेल्या मुलाखतींत गांधींनीं तोडगा म्हणून सर्व लोकसत्ताक राष्ट्रांनीं एकसमयावच्छेदेंकरून शस्त्रसंन्यास करावा अशी शिफारस केली. ते म्हणाले, " मी या ठिकाणीं बसलों आहे याविषयीं जितकी माझी खात्री आहे, तितकीच मला अशी खात्री आहे कीं, यामुळें हिटलरचे डोळे उघडतील व तो शस्त्र खालीं ठेवील. " बातमीदारानें विचारलें, " ती मग एक आश्चर्याचीच गोष्ट होईल नाहीं ? " गांधींनीं उत्तर दिलें, " कदाचित् होईलहि; पण त्यामुळें जें हत्याकांड जगावर येऊं पहात आहे त्यापासून जगाचें रक्षण होईल. "

" कठिणांत कठिण धातूसुद्धां पुरेशा आंचीमुळें नरमते. अहिंसेच्या पुरेशा आंचीमुळें निष्ठुरांतील निष्ठुर हृदयसुद्धां तसेंच विरघळलें पाहिजे. आंच उत्पन्न करण्याच्या अहिंसेच्या शक्तीला मर्यादा नाहीं. मी अशरण झालों आणि अहिंसेच्या दृष्टीनें माझ्यापाशीं उपाय शिल्लक नाहीं असें म्हणण्याचा प्रसंग अर्ध्या शतकाच्या माझ्या अनुभवांत आतांपर्यंत माझ्यावर कधींहि बेतलेला नाहीं. " प्रेम हा मनुष्यजीवनाचा धर्म आहे.

निरनिराळ्या देशांत प्रवास करतांना मोठ्यांतल्या मोठ्या मुत्सद्यांपेक्षां व राष्ट्रीय पुढाऱ्यांपेक्षां गांधींची कीर्ति अधिक व्यापक आहे आणि त्यांच्यांपैकीं कोणाहिपेक्षां अथवा त्या सर्वांच्याहिपेक्षां गांधींविषयीं अधिक प्रेम व अधिक आदर तेथें वसत आहे असें मला आढळून आलें. त्यांचें नांव इतकें परिचयाचें झालेलें आहे कीं, त्यांना मानवजातीचा मित्र म्हणून न ओळखणारा शेतकरी अथवा कामगार क्वचितच सांपडेल. ते सुवर्णयुगाची पुनः प्रस्थापना करतील असें त्यांना वाटत असावें; परंतु रस्त्यावरून जाणारी गाडी आपण बोलावून घेतों तसें आपल्याला सुवर्णयुग बोलावून आणतां येणार नाहीं. कारण, कोठल्याहि राष्ट्रापेक्षां अधिक बलवान् व कोठल्याहि पराजयापेक्षां अधिक उपमर्दकारक अशा एका गोष्टीचा आपणांवर पगडा बसलेला आहे. ती गोष्ट म्हणजे अविद्या. आपल्या सर्व शक्ती जीवनासाठीं निर्मित झाल्या असूनसुद्धां आपण त्यांना विकृति आणून मृत्यूच्या कारणीं लावण्याची परवानगी दिलेली आहे. मानवजातीच्या निर्मितीमध्यें सुखाचा अधिकार स्पष्टपणें अभिप्रेत झालेला असला, तरी तो अधिकार डावलण्यास व थोड्या लोकांच्या शंकास्पद समाधानाप्रीत्यर्थ अनेकांचें सुख नष्ट करण्यासाठीं आपलें सामर्थ्य सत्ताधनाच्या संपादनाकरितां वापरण्यास आपण मुभा दिलेली आहे. आपण ज्या प्रमादाचे चाकर बनलों आहोंत, त्याचेंच हें जगहि गुलाम बनलें आहे. आपण धनसत्तेसाठीं नव्हे, तर प्रेम आणि मानवता यांच्या प्रस्थापनेसाठीं झिजलें पाहिजे. प्रमादापासून मुक्ति हेंच खरें स्वातंत्र्य.

आपल्या असाधारण पावित्र्यानें व धीरोदात्ततेनें लक्षावधि मानवांवर पगडा बसविणारे गांधी हे मुक्त जीवनाचे प्रणेते आहेत. अशा प्रकारच्या पावित्र्याच्या दुर्मीळ आदर्शाच्या ठायीं, सर्वमान्य सदिच्छा, रूढ नीति व

संदिग्ध सौंदर्याभिरुचि यांनीं युक्त अशा जीवनामध्यें—आणि अशा जीवनाचा आदेश एवढीच काय ती अन्याच आधुनिक गुरूंच्याजवळ देतां येण्यासारखी गोष्ट असते—न आढळणारी कठोर वास्तवता व सामर्थ्याची झळक ज्यांना आढळून येते असे कांहीं लोक नेहमीं असावयाचेच. सत्यनिष्ठ असावें, साधें असावें, अंतःकरण शुचिर्भूत व सौजन्ययुक्त असावें, दुःखाच्या व भयाच्या काळीं आनंदी व समाधानी असावें, जीवनावर प्रेम करावें, मृत्यूला भिऊं नये, पंचमहाभूतेश्वराची सेवा करावी पण मृतांच्या भूतसृष्टीनें पछाडलें जाऊं नये, यापरता उदात्त उपदेश व उदाहरण जगाच्या प्रारंभापासून आतांपर्यंत उपलब्ध झालेलें नाहीं.*

---

# महात्मा गांधी : मूल्यमापन

## लेखक : **होरेस जी. अलेक्झांडर**, एम्. ए.

(सेली ओक, बर्मिंगहॅम)

महापुरुषाच्या कार्याचें रास्त माप तो वयांत असतांनाच करणें हें सोपें काम नाहीं; आणि त्याचा तुमचा परिचय असेल तर तें अधिकच कठिण होतें. व्यक्तीचें यथातथ्य दर्शन आपणांस व्हावयास हवें असेल, तर किंचित् लांबच उभें राहिलें पाहिजे. पण महात्मा गांधींच्यापासून एक हातसुद्धां दूर रहाण्याची माझी इच्छा नाहीं. ते आहेत तोंपर्यंत त्यांच्या '**हरिजन**' पत्रांतील विचारांचें साप्ताहिक अनुशीलन करून त्यांच्यापाशीं शक्य तितक्या निकट राहण्याचा प्रयत्न करणें हेंच मला उत्तम वाटतें.

तथापि त्यांच्यासंबंधीं जग जे प्रश्न विचारतें ते प्रश्न दृष्टीसमोर ठेवून

---

* सर राधाकृष्णन् यांच्या विस्तृत लेखांतील निवडक असा भाग त्यांची विचारसरणी अबाधित ठेवून दिला आहे.

त्यांना उत्तर देण्याचा वेळोवेळीं प्रयत्न करणें भागच पडतें. आपल्या समकालीनांवर कोणत्या प्रकारचे ठसे त्यांनीं उमटवले आहेत त्यांचें दिग्दर्शन करणें हें या ग्रंथाचें मुख्य उद्दिष्ट होय असें मला वाटतें.

तेव्हां एवढी अल्पशी प्रस्तावना करून आधुनिक जगाच्या प्रभावळींत माझ्या दृष्टीला ते कसे दिसतात तें सांगण्याचा मी प्रयत्न करतों.

वृत्तिछिन्न जनतेनें अनेक देशांत केलेलीं अनेक प्रकारचीं बंडें वर्तमान युगानें पाहिलीं आहेत. कामगार–संघांनीं व समाजवादाच्या विविध पंथांनीं सर्व पाश्चात्य देशांतून कामकरी वर्गाचे हक्क घोषित केले आहेत. सर्वराष्ट्रीय कामगार-संघटना (इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन) ही या लढ्याचा पहिला सर्वोच्च बिंदु होय असें कदाचित् म्हणतां येईल. परंतु या लढ्यानें रशियामध्यें फारच मोठी मजल मारली आहे. मानवी हक्क असलेली व फार जुलमानें वागवलें असतां उलटून चावा घेणारी व्यक्ति, एवढेंच स्वरूप कामगाराला तेथें राहिलें नसून, त्याला विशेष उच्च पद देण्यांत आलें आहे. काबाडकष्ट करणारे गुमास्ते, दरिद्री शेतकरी, मच्छीमारे इत्यादिकांच्याकडेहि सर्वराष्ट्रीय कामगार संघानें किंवा सोव्हिएटनें दुर्लक्ष केलेलें नाहीं. तथापि या लोकांविषयीं त्यांनीं जें कांहीं थोडेंफार कार्य केलें आहे तें पश्चात्बुद्धीनेंच होय.

जर्मनीमध्यें जी प्रचंड क्रान्ति झाली ती कर्मठ समाजवाद्यांनीं अथवा कामकऱ्यांनीं पार पाडली नाहीं. दुसऱ्या एका अधिक चाणाक्ष वा कमी तत्त्वनिष्ठ अशा पक्षानें जनतेपैकीं आणखी एका फार मोठ्या घटकाचें म्हणजे कनिष्ठ मध्यमवर्गाचें पाठबळ कसें संपादतां येईल तें शोधून काढलें. हा वर्गहि निराशाग्रस्त झाला होता. चलनाच्या फुगवट्यामुळें (inflation) त्यांची पुंजी उडून गेल्या कारणानें डोक्यावरच्या व पायातळच्या वर्गशक्तीच्या पेचांत सांपडून तो भरडून निघाला होता. हिटलरला जर कोणत्या एका वर्गानें विजय मिळवून दिला असेल, तर तो ह्या कनिष्ठ मध्यम वर्गानें. पण कार्ल मार्क्सच्या अनुयायांस या वर्गाचा बहुशः विसर पडलेला आहे किंवा त्यास त्यांनीं प्रायः तिरस्कारलें आहे.

पण हिंदुस्थानांतून गांधी या सर्व पाश्चात्य क्रांतिनीतींना आव्हान देत आहेत. कामगार, कनिष्ठ मध्यम वर्ग, बुद्धिजीवी, धनिक, हे जे निरनिराळे वर्ग सत्तेसाठीं स्पर्धा करितांना पाश्चात्य देशांत दिसून येतात त्यांना या

मूलभूत सत्याचा विसर पडलेला दिसतो, कीं मानवाला खाण्यासाठीं अन्न लागतें. त्याला यंत्रें खातां येणार नाहींत; व्यापार खातां येणार नाहीं; पुस्तकें खातां येणार नाहींत; नफा खातां येणार नाहीं. या सर्व गोष्टींवांचून माणसाला जगतां येईल. रोजच्या चतकोरावांचून अथवा गोळाभर भातावांचून मात्र त्याचें चालणार नाहीं. आणि हें जें रोजचें अन्न सुसंस्कृत शहरवासी माणूस जणुं कांहीं गृहीत धरून चाललेला असतो, त्यासाठीं तो वास्तविक हिंदुस्थानांतल्या, चीनमधल्या, पूर्वयुरोपांतल्या, कॅनडांतल्या, अर्जेंटाइनमधल्या किंवा आफ्रिकाखंडाच्या उष्ण कटिबंधांतील प्रदेशांतल्या, लाखों, कोडो मुक्या व पुष्कळदां अर्धपोटीं असणाऱ्या शेतकऱ्यांवर अवलंबून असतो. या देशांतील शेतकरी वर्षानुवर्ष ऊन, वारा आणि पाऊस यांचा उपयोग करून घेऊन मनुष्यमात्र ज्यामुळें जगतो, तें अन्न उत्पन्न करण्यासाठीं कष्ट करीत असतो. आज सहस्रावधि वर्षें, पिढ्यान्‌पिढ्या, युद्धें आणि क्रांत्या यांचा प्रवाह डोक्यांवरून जातां जातां अवर्षण अथवा पूर यांच्याप्रमाणेंच त्याच्या कष्टफलाचा तात्पुरता उच्छेद करीत असतांहि, शेतकरी हें कार्य आचरीत राहिला आहे आणि अखेरीस आतां त्यांना महात्मा गांधींच्या रूपानें वाचा प्राप्त झाली आहे.

हिंदुस्थानच्या कोट्यवधि जनतेमध्यें गांधींचें नांव माहीत नाहीं असा एकसुद्धां माणूस सांपडणें कठिण. डोंगरी अथवा रानटी जमातींतूनसुद्धां या गरिबांच्या साहाय्यकाचें आणि कैवाऱ्याचें नांव ज्ञात आणि प्रिय होऊन बसलें आहे.

वकिलीचें शिक्षण घेऊनहि ते पुन्हां शेतकरी बनले. शेतकऱ्याचा साधा वेष पेहरून आणि महात्म्याचे हातूनसुद्धां स्वच्छ व आधुनिक होण्यास नाकबूल असणाऱ्या एका कोंपऱ्यांतल्या, मागासलेल्या व बुरसटलेल्या सनातनी खेडेगांवामध्यें राहून, केवळ बाह्य जीवनांतच नव्हे, तर अंतःकरणानेंहि ते शेतकरी बनले आहेत. हे शेतकऱ्याच्या डोळ्यानेंच जगाकडे पाहतात. धूर्त, स्पष्टवचनी, प्रामाणिक, क्वचित् प्रसंगीं थोडे फटकळ, थट्टेखोर, सहृदय, सोशिक, अत्यंत धर्मशील व जीवनाकडे सामग्र्यानें पहाणारे असे ते आहेत. आपणाला अज्ञात अशा मार्गानें अदृष्ट शक्तीचें कार्य चालू असतें हें ओळखून, निवांतपणें जिज्ञासु वृत्ति

ठेवल्यास त्या शक्ती पुष्कळदां भासमान् होऊं शकतात व जाणतांहि येतात अशी त्यांची श्रद्धा आहे.

सहा महिने हिंदुस्थानांत प्रवास केल्यानंतर १९२८ च्या वसंतऋतूंत साबरमतीला मीं त्यांची भेट घेतली. त्या वेळचे त्यांचे शब्द मी कधींहि विसरणार नाहीं. घरीं इंग्लंडला गेल्यावर लोकांना मी काय सांगू असें मीं त्यांना विचारलें. ते म्हणाले, "आमच्या खांद्यावरून खालीं उतरण्यास तुम्हीं इंग्रजांना सांगितलें पाहिजे." केवळ संपादन करावयाच्या ध्येयाच्या दृष्टीनेंच नव्हे, तर ध्येयसंपादनच्या मार्गाच्या दृष्टीनेंहि यांत केवढा अर्थ आहे हें ध्यानांत घ्या.

त्यांच्या दृष्टीपुढें असणाऱ्या ध्येयामुळेंच केवळ गांधीजींचे आपल्या या युगांतील क्रान्तिकारक पुढाऱ्यांतलें वैशिष्ठ्य प्रस्थापित होतें असें नाहीं. त्याच्या प्राप्तीसाठीं ते जीं साधनें वापरतात तींच कदाचित् अधिक महत्त्वाचीं ठरतील. हिंदुस्थानच्या राजकारणांत कोणत्याहि प्रकारचा सक्रिय भाग घेण्यापूर्वी १९०८ सालीं लिहिलेल्या 'हिंद-स्वराज्य' नांवाच्या आपल्या छोट्या पुस्तकांत ते लिहितात "राजे हे आपलीं राजेशाही हत्यारें नेहमींच वापरीत रहाणार. शरीरबलाचा उपयोग करण्याची त्यांना शिकवणच मिळालेली असते......शेतकऱ्याला तलवारीनें कधीं नमवलें नाहीं व तिच्यापुढें तो कधीं नमणारहि नाहीं. त्याला तलवारीचा उपयोग माहिती नाहीं आणि इतरांनीं तिचा उपयोग केला तर तो डरत नाहीं." म्हणून, जें शेतकऱ्यांचें स्वराज्य, जी शेतकऱ्यांची सत्ता किंवा जें शेतकऱ्यांचें स्वातंत्र्य गांधींचें उद्दिष्ट आहे, तें त्याशीं सुसंगत अशा साधनांनींच मिळविलें पाहिजे. ज्यांना मानवांवर सत्ता गाजवावीशी वाटते, ते तरवार हातीं धरतात. प्रत्येक राज्यकर्त्या वर्गाचें तें शस्त्र आहे. आणि जेव्हां समाजवादी अथवा कम्युनिस्ट किंवा नाझी वा फासिस्ट हे 'राज्यकर्त्या वर्गांना' त्यांच्याच शस्त्रांनीं नष्ट करण्यास उद्युक्त होतात तेव्हां त्यांना जय मिळाल्यास एका राज्यकर्त्याऐवजीं दुसरे तेथें येतात एवढेंच. जमीनमालकांच्या, पेढीमालकांच्या अथवा गिरणीमालकांच्या हातामध्यें तलवार रहाण्याऐवजीं, कम्युनिस्ट पक्षाच्या, नाझी पक्षाच्या अथवा फासिस्ट पक्षाच्या हातीं तलवार येते! साध्यासुध्या नागरिकाची

पायबंदी चालूच रहाते. जनतेच्या पाठीवर एक नवीन शास्तावर्ग आरूढ होतो, इतकेंच.

पण शास्त्यांच्या जातीचें अथवा वर्गाचें जोखड शेतकऱ्यांच्या मानेवरून कायमचें दूर करावें अशी गांधींची इच्छा आहे. विद्यमान शास्त्यांना खालीं ढकलून आपल्या मित्रांनीं तेथें चढून बसावें हें त्यांना नको आहे. म्हणून शरीरानें दुर्बल तसेंच सबळ असणाऱ्यांना म्हणजे सर्वांनाच वापरतां येईल असें शस्त्र घडवण्यांत त्यांनीं आपलें आयुष्य वेंचलें आहे. गांधींच्यापासून धडा घेऊन ते स्वतःच्या पायावर उभे रहाण्यास शिकतात, जड ओझ्या-खालीं दुमडून राहत नाहींत.

जनतेच्या पाठीवर आरूढ झालेल्या दुसऱ्या इसमांस खालीं ढकलण्या-साठीं स्वतः तेथें आरूढ होण्याऐवजीं जो तेथें आहे त्याला कोणत्याहि प्रकारें साहाय्य करूं नका असें गांधी म्हणतात. म्हणजे अखेरीस त्याला खालीं उतरावेंच लागेल. त्याचे टेकू आणि आधार नाहींसे होतील. तुम्ही त्यास साहाय्य देत गेलां नाहीं, तर हरतऱ्हेच्या दंडाची धमकी तो तुम्हांस देईल. तो ती धमकी पारहि पाडील. पण तुरुंगवास व मृत्यु यांना पाहून हंसावें कसें तें तुम्ही शिकलां असाल, तर त्याच्या धमक्यांनीं अथवा तलवारीनेंहि तुम्ही विचलित होणार नाहीं. तुमच्या सदसद्विवेक बुद्धीला जें कृत्य अयोग्य वाटतें, तें करण्यास तुम्हांस बळेंच भाग पाडणें त्याला शक्य व्हावयाचें नाहीं.

या अहिंसात्मक कार्यपद्धतीचा उपयोग परिणामकारक रीतीनें करतां येण्यापूर्वी महान् आपत्तींतून पार व्हावें लागतें हें खचित. प्रत्युत्तरादाखल गोळीबार करण्याची मुभा असूनदेखील मशिनगनच्या माऱ्याला तोंड देण्याचें शिक्षण सैनिकांना देणें हें अवघडच असतें. पण हरप्रकारचे अत्याचार प्रतिकार न करतां सहन करण्याचें शिक्षण देणें हें तर अधिकच दुर्घट काम आहे. सविनय कायदेभंग करणारांनीं ( म्हणजे त्यांच्या हल्लींच्या भाषेंत सत्याग्रहींनीं, जे पशुबलाऐवजीं आत्मबलाचा उपयोग करतात त्यांनीं ) पूर्ण ब्रह्मचर्याचें पालन केलें पाहिजे, दारिद्र्य अंगीकारलें पाहिजे, सत्याला अनुसरलें पाहिजे, निर्भयता कमावली पाहिजे, असें त्यांनीं तीस वर्षांपूर्वी घोषित केलें आहे. या अजिंक्य अशा अहिंसात्मक जीवनाचें रहस्य ज्यांनीं जाणलें असे

स्त्रीपुरुष युगायुगांच्या ठायीं होऊन गेले आहेत. तुरुंगांतील व बंदिवानांच्या कोंडवाड्यांतील जर्मन भिक्षूंच्या ( Evangelical pastors ) पत्रांवरून असें सिद्ध झालें आहे कीं, पौर्वात्य देशांप्रमाणेंच पाश्चात्य देशांतहि अशा शीलाची जोपासना होऊं शकते. जर हें शील समुदायरूपानें दृष्टोत्पत्तीस येईल किंवा जेव्हां तें तसें दृष्टोत्पत्तीस येईल, तेव्हां मानवाचें खरें स्वरूप व खरें विश्वकुटुंब दृग्गोचर होऊं लागेल.

आपल्या स्वातंत्र्याच्या व शांतीच्या सैनिकांच्या अंगीं असणाऱ्या आत्यंतिक संयमावर अवलंबून असणारे गांधी, सामान्य लोकांविषयीं बोलतांना जनता हा शब्द योजीत नाहींत हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. साम्राज्यसंपादन अथवा क्रान्ति यांना उपयुक्त अशा युद्धबलाबद्दल विचार सुरू झाला म्हणजे आपण मनुष्यमात्रांचा एक ठराव तयार करून त्याला जनता अशी संज्ञा देतों. परंतु गांधींना या कोटयवधि जनतेपैकीं प्रत्येक स्त्रीपुरुषांमध्यें आपल्याइतकेंच पवित्र व्यक्तिमत्व आहे असें वाटतें आणि समान शिक्षणाच्या माणसांशीं ते जितक्या आस्थेनें मैत्री जोडूं शकतात तितक्याच आस्थेनें अगदीं अडाणी अशा शेतकऱ्यांबरोबर त्यांना मैत्री जोडतां येते. कोणत्याहि स्त्रीला अगर पुरुषाला ते सामान्य अथवा मलिन समजत नाहींत. आणि हें एक सुंदर तत्त्व म्हणून प्रतिपादून ते थांबत नाहींत, तर प्रतिदिनीं तसें आचरण करतात.

आजच्या युगांत हिंसेला संजीवन मिळालेलें आहे. अत्यंत कडव्या अशा शत्रूला तयार करतां येतील, त्याहूनहि वरचढ अशा शस्त्रसंभारामुळें प्राप्त होणारी सामुदायिक सुरक्षितता हीच आज पाश्चात्य देशांतील मनुष्याचें आशास्थान बनली आहे. अंतिम शांततेच्या मार्गावरील पहिलें पाऊल म्हणून 'पाशवी शक्ति न्यायाच्या पाठीशीं उभी केली पाहिजे' एवढाच काय तो सल्ला आर्चबिशपाच्या पदावरील माणसाला आज देतां येत आहे. अशा वेळीं आपल्या डोळ्यांपुढें—जर ते उघडण्याची तसदी आपण घेतली तर—दुबळ्या शरीराची झुरमुरु प्रकृतीची, अचाट कर्तबगारी नसलेली, अशी एक व्यक्ति उभी आहे व ती आपल्या चारित्र्यानें आणि हिंदी देशबांधवांवरील आपल्या अजब मोहिनीनें असें प्रस्थापित

करीत आहे कीं, दिव्य तेजानें प्रज्वलित झालेला जीवात्मा प्रचंड शस्त्रसंभारा-पेक्षांहि बलवत्तर होय.

विनयसंपन्न मानवाचे हातीं भूतलाचा वारसा अजूनहि येईल. मात्र त्याची विनयशीलतेवर श्रद्धा असली पाहिजे, आणि हिटलरची अथवा स्टॅलिनची भीति दूर सारून आपल्या युगांतील या सर्वश्रेष्ठ गुरूला त्यांनीं आपलें आशास्थान मानिलें पाहिजे.

---

# समन्वयी व सेतुवृत्ति गांधी

## लेखक : **अर्नेस्ट बार्कर**, एम्. ए., डी. लिट्.

### ( राजकारणाचे प्रोफेसर, केंब्रिज विश्वविद्यालय )

गांधींच्यासंबंधीं माझ्या दोन आठवणी आहेत. माझी पहिली आठवण १९३१ च्या नोव्हेंबरांतील एका रात्रीची. तेव्हां ते इंग्लंडांत मंडलाकार परिषदेच्या वेळीं माझ्या घरीं उतरले होते. दुसरी आठवण म्हणजे १९३७ डिसेंबरच्या मध्याच्या सुमाराची एक उज्ज्वल प्रभात. त्यावेळीं माझ्या एका हिंदी मित्रानें मोटारींतून मुंबईच्या उत्तरेच्या बाजूस समुद्रकिनाऱ्यावरील एका बंगल्यावर त्यांच्या भेटीस नेलें होतें. सळसळत्या उंच माडांच्या सावलींत ते प्रकृति सुधारण्यासाठीं राहत होते.

त्यांनीं केंब्रिजला दिलेल्या भेटीची मला स्पष्ट स्मृति आहे. त्यांच्या खोलींत त्यांच्या व कुमारी स्लेड यांच्यासह मी प्रार्थनेस बसलों. नंतर संध्याकाळचें जेवण करून ते खालच्या मजल्यावरील आमच्या बैठकीच्या खोलींत आले व चरखा फिरवतां फिरवतां आमच्याशीं बोलत बसले. आमच्या बोलण्यांतला थोडासा भाग सामान्य गोष्टीविषयींच होता. ( इंग्रजी जीवनांत फुटबॉलचें स्थान आणि रग्बी व असोसिएशन या दोन खेळांत दिसणारा कुतूहलजनक सामाजिक भेद यांविषयीं मी जें कांहीं म्हणालों, त्यांत

त्यांना गोडी वाटत होती हें मला आठवतें ) पण मुख्यतः आम्ही खोल पाण्यांत शिरलों होतों. आमच्या बोलण्यांत प्लेटोचा विषय निघाला होता. शास्त्यांनीं व कार्याधिकाऱ्यानीं अत्यल्प वेतनावर रहावें, फार मोठ्या बक्षिसाची अपेक्षा न धरतां सेवेची संधि प्राप्त झाली म्हणून समाधान मानावें, असे प्लेटोप्रमाणेंच त्यांचे विचार असावेत असें मला वाटलें. सरकारला प्रतिष्ठा असावी लागते व तिच्यासाठीं थोडाफार थाटमाट आणि लवाजमा ठेवावाच लागतो, असा बुद्धिवाद मी लढवीत होतों. कोणत्याहि समान निर्णयाप्रत पोंचल्याचें मला आठवत नाहीं. पण मी कनिष्ठ पातळीवरून बुद्धिवाद करीत असल्याची जाणीव मला त्यावेळीं होती. दुसरा विशेष लक्षांत राहिलेला विषय म्हटला म्हणजे हिंदुस्थानच्या संरक्षणाचा. माझा मुद्दा असा होता कीं, शांतता तर ठेवावीच लागणार; परचक्र अथवा लुटारू यांच्यापासूनच्या धोक्याची तजवीज करावी लागणार; तेव्हां संरक्षक सैन्य क्रमप्राप्तच होईल; म्हणून या संरक्षक सैन्याच्या आवश्यक खर्चाची हमी देण्यांत यावी, हिंदी विधिमंडळाच्या वार्षिक मतावर तो सोंपवण्यांत येऊं नये; कारण, तें विरोधी असण्याचा संभव आहे. उत्तरादाखल श्री. गांधींनीं एक दृष्टांत सांगितला. ते म्हणाले "समजा, कीं रानटी जनावरांच्या हल्ल्यांचा उपद्रव होत असलेलें एक खेडें आहे. ग्रामस्थांच्या जीविताचें व मालमत्तेचें रक्षण व्हावें म्हणून खेड्याभोंवतीं तटबंदी उभारण्याची योजना एका प्रजादक्ष अधिकाऱ्यानें मांडली. पण त्या तटबंदीच्या पायीं इतका जबरदस्त आकार भरावा लागेल कीं नको जीव होईल असें गांवकऱ्यांना दिसून आलें, तर ते असें म्हणणार नाहींत कां, कीं 'जनावरांचा धोका काय तो तुम्ही आम्ही ओळखून आहों; तो पुरवला, पण जगणें असह्य करून सोडणारें हें संरक्षण नको.' "

ज्या ह्या दोन विषयांवर आम्ही बोललों त्यांच्या योगानें श्री. गांधींच्या शिकवणुकीपैकीं दोन तत्त्वें माझ्या मनावर बिंबलीं. प्रेम व प्रेममय सेवेचें तत्त्व; आणि अहिंसेचें तत्त्व. एका द्रष्ट्यासमोर मी उभा आहें याची जाणीव मला होती. पण इंग्लंडच्या उत्तरेकडील प्रदेशांतल्या रहिवाशाच्या अंगीं असणाऱ्या उपजत भावना ( कदाचित् प्रत्येक इंग्रज माणसाच्या भावना तशाच असतील )मला टाकून देतां येईनात. चांगल्या कामगिरीला

अनुक्रम
विभाग
क्रमांक

भरपूर पैसा मिळणें योग्य आहे व भरपूर पैसा असलों कीं त्यांचें काम बजावण्यास हुरूप वाटतो; शांतता आणि सुव्यवस्था राखावयाची तर युद्ध व अव्यवस्था यांच्याशीं दोन हात केलेच पाहिजेत व त्यांच्या जोपासनेसाठीं संरक्षणाचे प्रयत्न करावयास हवेत; या ज्या माझ्या भावना त्या सोडून देणें जरी मला अशक्य झालें, तरी त्यांहून श्रेष्ठ अशा कांहीं एका तत्त्वाचें अस्तित्व मला मान्य करावें लागलें. मात्र त्या तत्त्वाचा स्वीकार करण्यास लोक तयार व्हावयास हवे. ( लोक तयार आहेत अशी एकाद्याची श्रद्धा असली आणि त्या श्रद्धेशीं इतरांस सहमत करून घेणें शक्य झालें, तर लोक तें तत्त्व स्वीकारण्यास तयारहि खरोखरी होतील, ही गोष्ट मीं मान्य केली. पण माझी श्रद्धा इतक्या कसाला लागणें कठिण आहे असें मला आढळून आलें. ) श्री. गांधी उठून गेल्यानंतर त्यांच्या ठायीं समन्वित झालेल्या भिन्न वृत्तींसंबंधीं मी विचार करूं लागलों. अपरिग्रहाच्या साध्या राहणीचा प्रतिज्ञापूर्वक अंगीकार केलेला, सृष्टीशीं संवादी व सर्वभूतमात्राशीं प्रेमळ असा संत फ्रान्सिस्, मला त्यांच्या ठिकाणीं दिसला. उच्च बुद्धिवादाची खेती करण्याचें आणि विचाराच्या सूक्ष्म वळणावांकणांचा माग काढण्याचें कर्तृत्व अंगीं असणारा विचारी व तत्त्वज्ञानी, संत थॉमस ॲक्विनासहि मला त्यांच्या ठिकाणीं आढळला. कायद्याच्या ज्ञानामुळें ज्याचें जगरहाटीविषयींचें ज्ञान खंबीर आणि सबळ झालें आहे, जो गिरीशिखरावरून उतरून खालच्या खोऱ्यांतील उलाढालींच्या बाबतींत चतुराईचा सल्ला देऊं शकेल अशा व्यवहारी व संसारी माणसाचे गुणहि त्यांच्यांत सांपडले. आपणां सर्वांचेंच मन मिश्र असतें, आणि मला तुम्हांआम्हांपेक्षां श्री. गांधींचें मन अधिकच मिश्र भासलें. अत्यंत संपन्न आणि संमिश्र असें त्यांचें व्यक्तित्त्व आहे. ते केवळ संत-फ्रान्सिससारखे असते, तर त्यांच्याविषयींचें ज्ञान होणें सुलभ झालें असतें. पण मग त्यांच्या देशबांधवांच्या अथवा जगाच्या दृष्टीनें ती गोष्ट इतकी चांगली किंवा उपयुक्त अथवा फलदायी ठरली असती काय ? या प्रश्नाचा मी विचार करूं लागलों तेव्हां " नाहीं " असें उत्तर देण्याकडेच मन कललें. संमिश्रता हीच त्यांच्या व्यक्तिमत्वाचें सार आहे. जगांतील त्यांचें महत्त्व व कर्तृत्व त्यांच्या अनेकत्वावरच अवलंबून आहे.

या विवेचनाच्या ओघांतच मला जें अंतिम व मूलभूत विधान

करावेसें वाटतें तें करतों. संत फ्रान्सिस व संत थॉमस यांच्याचबरोबर व्यवहारचतुर व कायदेपंडित व्यक्तीचें त्यांच्या ठायीं मिश्रण झाल्याचें मीं सांगितलेंच. अधिक बिनचूकपणानें व यथार्थतेनें असें म्हणतां आलें असतें कीं, त्यांच्या ठिकाणीं भक्तिज्ञानयुक्त धर्मांची थोर हिंदी परंपरा आणि समाजव्यवस्थेंतील नागरिक व राजकीय स्वातंत्र्याची पाश्चात्य परंपरा यांचें मीलन झालेलें आहे. हें मीलन झालेलें असल्याकारणानें श्री. गांधी थोर असे समन्वयी झाले आहेत. त्यांनीं आपल्या देशबांधवांना आधिभौतिक स्वरूप नसलेलें व त्यांच्या धर्मपरंपरेशीं विसंगत नसलेलें राजकारण पटविलें आणि आपली स्वतःची भूमिका राजकीय चळवळयापेक्षां अतिशय उच्च आहे व आपल्या देशाचें कार्य राजकीय चळवळीहून फार श्रेष्ठ आहे, ही गोष्ट त्यांनीं ब्रिटिश जनतेला पटविली; आणि आपली समन्वयी वृत्ति, आपली सेतुवृत्ति श्री. गांधींनीं केवळ आपल्या देशबांधवांना अथवा ब्रिटिश लोकांनाच पटविली असेंहि नाहीं. सर्वच पाश्चात्य जनतेचें लक्ष त्यांनीं वेधून टाकलें आहे व जिज्ञासा केंद्रित केली आहे. आत्मैषणा व अर्थैषणा यांचें मीलन त्या उभयांपैकीं कोणालाहि बाध न आणतां जो घडवून आणतो तो या काळांत श्रेष्ठ आणि सर्वंकष पुरुष ठरणारच.

उभय एषणांना संमीलित करून दोहोंचेहि बाबतींत दक्ष असणारा पुरुष म्हणून श्री. गांधींना मी धन्य मानतों. त्याचप्रमाणें पूर्व आणि पश्चिम यांना सांधणारा सेतु बनून आंतरराष्ट्रीय सलोखा निर्माण करण्याचे कामीं शक्य तें महत्तम कार्य साधणारी व्यक्ति म्हणूनहि मी त्यांना धन्य मानतों. आपल्या राष्ट्रजीवनांतील घरगुती व अत्यावश्यक गोष्टी कोणत्या तें जाणून त्या जाहीरपणें सांगणाऱ्या पुरुषाची मला विस्मृति पडणें शक्य नाहीं. त्यांचा चरखा हें त्या जाणीवेचें–ज्ञानाचेंच प्रतीक आहे. हिंदुस्थानां-तील खेड्यांत गेलें ( आणि हिंदुस्थान म्हणजे खेड्यांनीं भरलेलें एक खंड आहे ) कीं, अधिक भरघोस जीवनाची व आंगच्या कर्तृत्वशक्तींच्या योजनेस अधिक विस्तृत अशा क्षेत्राची तेथें किती आत्यंतिक आवश्यकता आहे तें कळतें. मुंबईभोंवतालच्या कापडगिरण्यात वा कलकत्याच्या तागाच्या गिर-ण्यांत नव्हे, तर खेड्यापाड्यांत उद्योगधंदे स्थापन करतां आले, तरच खेड्यांचा पुनरुद्धार होईल आणि–हिंदुस्थानांत खेड्यांचेंच बहुसंख्यत्व

असल्याकारणानें—देशाचाहि आधिभौतिक आर्थिक दृष्टीनें पुनरुध्दार साधेल. अशा पुनरुद्धारासाठीं कष्ट केले हीच श्री. गांधींची एक फार मोठी सेवा होय असें सदैव मानण्यांत येईल.

जें कांहीं मीं पाहिलें, वाचिलें, वा ऐकिलें त्यावरून अशा प्रकारचे विचार माझ्या मनांत येत आहेत. मला अधिक माहिती असती तर किती बरें झालें असतें! पण मला जें कांहीं ज्ञान आहे त्यावरून मला असें म्हणावेंसें वाटतें कीं, श्री. गांधींनीं आपल्या देशबांधवांना व सर्व जगाला पुढील तीन गोष्टी शिकवण्याचा प्रयत्न केला आहे—साहाय्य केलें आहे:— प्रेमपूर्वक आणि प्रेमाखातर कार्य करावें; हें कार्य अहिंसापूर्वक करावें; आणि कार्यशक्तींचा पूर्ण विकास करणारें पूर्ण जीवन निर्माण करण्याकरितां केवळ डोक्याचेंच नव्हे, तर शरीरश्रमाचें काम करीत असावें.

---

# अनासक्ति व नैतिक शक्ति यांचें सामर्थ्य

लेखक : सी. इ. एम्. जोड, एम्. ए., डी. लिट्.

( बर्कबेक कॉलेज, लंडन विश्वविद्यालय )

मानव जातीचें मोठ्यांत मोठें वैशिष्ट्य कशांत सांठवलेलें आहे? कोणी म्हणतील कीं नीतिगुणांत; कोणी म्हणतील दैवी संपत्तींत; कोणी म्हणतील धैर्यांत; कोणी म्हणतील त्यागांत. ॲरिस्टॉटलनें शोध लाविला कीं तें तर्कबुद्धींत आहे. तर्कशक्तीच्या योगानेंच पशूपासून आपलें भिन्नत्व मुख्यत्वें-करून सिद्ध होतें असें तो प्रतिपादी. मी म्हणतों कीं ॲरिस्टॉटलच्या या उत्तरानें अर्धें सत्य समजतें, पण पूर्ण सत्य समजत नाहीं. वस्तुनिष्ठता ( objectivity ) व अनासक्ति हें तर्कबुद्धीचें सार होय. धर्मशीलतेनें सत्याच्या कुरूपांगांवर जीं श्रद्धेचीं आच्छादनें घातलेलीं असतील तीं दूर

केल्यानंतर त्या सत्याचें यथार्थ दर्शन घेण्यास तयार असणें, यांत तर्कबुद्धीला गौरव वाटतो. तात्पर्य, बुद्धिवादी मनुष्य भयहीन बनतो. आपल्या पक्षाकडे कांटा झुकूं न देतां, आपल्या वासनांचा परिणाम अनुमानांवर होऊं न देतां, अथवा आपल्या लालसेला निर्णयाचें सोंग घेऊं न देतां, परिस्थिति आहे तशी पहाण्याची निर्णयता त्याच्या ठायीं येते.

यामुळें बुद्धिवादी मनुष्य अनासक्त, म्हणजे ज्या विषयाचें संशोधन त्याची बुद्धि करीत असते त्या विषयाविषयीं अनासक्त बनतो.

पण तो अहंकाराच्या दृष्टीनें अलिप्त, अनासक्त किंवा आत्मनिरपेक्ष झालेला असतो काय? मला वाटतें नसतो. महाज्ञानी असूनसुद्धां बूट चढवतांना बंद तुटल्यामुळें गांवढळाप्रमाणें शिव्यागाळी करणारीं आणि गाडी चुकली म्हणून माथें फिरवून घेणारीं माणसें मला ठाऊक आहेत. महान् शास्त्रज्ञांत व गणितज्ञांतहि शांतवृत्ति सांपडत नाहीं, आणि जे तत्त्वज्ञ प्रतिष्ठितप्रज्ञ असावे, तेहि तामसी असतात. खरें म्हणजे चिडखोरपणाबद्दलच तत्त्वज्ञान्यांची ख्याति असते. म्हणून ॲरिस्टॉटलचें विधान सत्यवाचक नसून सत्यसूचक आहे असें मला वाटतें. ज्ञानविषय झालेल्या वस्तूसंबंधीं बुद्धिवादी मनुष्य ज्या प्रकारची वस्तुनिष्ठ ( objective ) अनासक्ति उपयोगांत आणतो, तीच स्वतःचे काम, मोह, लोभ, लालसा यांच्या बाबतींतहि धारण करणें हा मानवतेचा विशेष गुण आहे, हें पूर्ण सत्य होय. स्वार्थनिरभिलाषाची आणि तीव्र सत्यासक्ति व निःस्वार्थी तत्त्वनिष्ठा यांची सांगड घालणें म्हणजेच मानवतेचें वैशिष्ट्य, जें नैतिक बल तें प्रकट करणें होय असें मला वाटतें.

गांधींच्या अधिकाराचा उगम या विरक्तीच्या गुणांतच आहे, असें मला सुचवावयाचें आहे. या गुणांचें एक स्थूल गमक म्हणजे त्यांचा स्वतःच्या देहावरील ताबा. विरक्त माणसाला शरीरावर अधिकार चालवतां येतो. कारण आत्म्यापासून शरीर पृथक् ठेवल्याकारणानें आत्म्याचें वाहन या अर्थी त्याला शरीराचा उपयोग करतां येतो. म्हणून वाटेल त्या क्षणीं गांधींना हवी तेवढीच झोंप घेतां येते, आहारांत फरक न करतां वजन वाढवितां किंवा घटवितां येतें, यांत नवल वाटण्याचें कांहींच कारण नाहीं.

साध्या ध्येयासंबंधींच्या अविचल निश्चयाबरोबरच साधनाविषयीं अधिकांत अधिक अनाग्रह राखणें हेंसुद्धां त्याच गुणाचें दुसरें एक स्वरूप आहे. विरक्त पुरुष कधींच कट्टर नसतात. आपला मार्ग सोडून त्याच्या ऐवजीं दुसरा न पत्करण्याइतकी अंगीकृत मार्गाविषयींची आसक्ति त्यांच्याठायीं नसते. ध्येय स्पष्टपणें दृष्टिसमोर राहिलें म्हणजे प्रसंगानुसार व परिस्थितिनुसार सुचणाऱ्या कोणत्याहि मार्गानें ते जातील. गांधींच्या ठिकाणीं विरोधकांना चकित करून सोडणारें संतपण आणि राजकारण यांचें जें साहचर्य दिसतें, तें यामुळेंच. वाटाघाटींतील तल्लखपणा, नंतर आदावा घेऊं लागले म्हणजे अत्यंत चतुराईचें राजकारण म्हणून ओळखूं येणारी बालसुलभ निर्व्याजता, तडजोडीची तयारी व ती घडवून आणण्याची हातोटी, हीं सगळीं साध्याविषयीं खबीर असल्याकारणानेंच साधनाविषयीं अनासक्त असणाऱ्या मनुष्याचीं गुणवैशिष्ट्यें आहेत. राजकीय शस्त्र म्हणून कायदेभंगाची उठावणी करणारे गांधी ज्याक्षणीं तो यशस्वी होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत, त्याक्षणीं तो मागें घ्यावयास बिचकत नाहींत, तें यामुळेंच.

म्हणूनच आत्मिक कल्याणासाठीं उपवास करणारे गांधी वाटाघाटींतलें साधन म्हणूनहि त्याचा उपयोग करण्यास एका पायावर तयार असतात; आणि राजकारणांतलें त्याचें कार्य संपलें कीं पुन्हां अन्न घेऊं लागतात. म्हणूनच राज्यघटनेचे कट्टर प्रतिपक्षी असणारे गांधी, जिला एका वेळीं कसून विरोध केला त्याच राज्यघटनेशीं सहकार्य करण्यास आतां तयार झाले आहेत; मात्र सध्यांच्या राज्यघटनेंत संस्थानिकांनीं प्रतिनिधी नेमावयाचे आहेत तसें न होतां ते जनतेनें निवडावे असें त्यांचें मागणें आहे; आणि याच कारणामुळें हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यकर्त्यांचे यावजीव शत्रु असे जे गांधी ते आज त्यांचे उत्कृष्ट मित्र गणले जात आहेत. यांच्या प्रभावामुळेंच आज कायदेभंग सुरू होत नाहीं. इतकेंच नव्हे, तर क्रान्तिगामी चळवळींतले अन्य परिचित असे प्रकार घडावयाचें बंद झालें आहे. वेळ टळून गेली नाहीं तोंच ज्या थोड्या सवलती मागण्यांत येत आहेत त्या ब्रिटिश लोक आपखुषीनें व दिलदारीनें देऊन टाकणार, कीं ब्रिटिशांच्या

नकारामुळें सध्यां समाधानकारक वाटणाऱ्या सवलतीसुद्धां झिडकारून लावण्या-इतका हटेलपणा हिंदुस्थानाला पत्करावा लागून हिंदुस्थानांत आयर्लंडची पुनरावृत्ति होणार, असा प्रश्न पडला आहे.

अनासक्तीच्या विषयाकडे पुन्हां वळूं या. मी असें सांगत होतों कीं सचेतन प्राण्यांपैकीं मनुष्यप्राण्याच्या ठिकाणींच काय ती नैतिक शक्ति म्हणून संबोधण्यांत येणारी शक्ति असून, ओळखण्यास अत्यंत सोपी पण व्याख्या करण्यास अत्यंत कठिण अशा या शक्तीच्या अतिशय प्रभावी घटकांपैकीं अनासक्ति हा एक घटक आहे.

भौतिक सामर्थ्यांच्या बाबतींत वादविषय उद्भवतच नाहीं. एकादा माणूस शरीरबळानें तुमच्यापेक्षां सशक्त असला, कीं तो तुमच्याकडून हवें तें करून घेतो. मग तें शरीरबळाचा प्रत्यक्ष उपयोग करून सक्तीनें असो, वा त्याची इच्छा मोडली तर तो आपल्याला ज्या यातना अथवा देहदंड सोसावयास लावील त्याच्या भीतीमुळें असो. शरीरबळाचा प्रत्यक्ष प्रयोग झाला म्हणजे एकादा मनुष्य कड्यावरून खालीं फेकला जातो; तर शरीर बळाच्या अप्रत्यक्ष प्रयोगाच्या भीतीनें दुसऱ्या एकाद्याला परलोकींच्या यातनांतून मुक्त करणाऱ्या ईश्वरोपासनेपासून इहलोकीं पराङ्मुख व्हावें लागतें. परिणामांच्या भीतीमुळें इतरांना आपल्या इच्छेनुरूप चालावयास लावण्याचें सामर्थ्य, अशी भौतिक बळाची व्याख्या करतां येईल.

पण नैतिक सामर्थ्याचे हातीं असली कोणतीहि दंडशक्ति नसते. नैतिक सामर्थ्याचा मीं प्रतिकार केला तर माझें नुकसान होत नाहीं. तर मग मी त्याच्यापुढें नमतों, तो कां ? उत्तर देणें अवघड आहे. त्याच्या सामर्थ्याची खूण मला पटते आणि त्याचा मी प्रतिकार केला तरीसुद्धां त्याची बाजू न्यायाची असून, माझी बाजू अन्यायाची आहे हेंहि मला समजतें. मला हें सगळें ज्ञान होतें याचें कारण असें कीं, माझ्या ठायीं आत्म्याचा वास असल्याकारणानें त्याला दुसऱ्याच्या आत्म्याच्या श्रेष्ठतर भूमिकेची महती पटते. नैतिक शक्ति शरीरबळाचा उपयोग करीत नाहीं, तर मनावर प्रभाव चालवते. एक मनुष्य दुसऱ्याच्या विचारांवर अथवा आचारांवर देहदंडाच्या भीतीनें वा फळाच्या आशेनें नव्हे, तर त्याला

मनोमन पटलेल्या श्रेष्ठपणामुळें जो परिणाम घडवितो, तो म्हणजेच हा प्रभाव अशी व्याख्या करतां येण्यासारखी आहे.

गांधींनीं या नैतिक शक्तीच्या साहाय्यानेंच हजारों लोकांना तुरुंग भरून टाकण्यास प्रोत्साहित केलें, व आम्हांस पकडा अशी मागणी लोक करूं लागले; स्वरक्षणासाठीं हात न उचलतां स्वतःच्या देहाचा चेंदामेंदा उडवूं देण्यास हजारों लोकांना त्यांनीं सिद्ध केलें, तें नैतिकशक्तीच्याच साहाय्यानें.

नैतिक शक्तीनें प्रेरित झालेला सविनय कायदेभंगाचा प्रयोग आधुनिक पाश्चात्य देशांच्या दृष्टीनें अतिशय अर्थपूर्ण आहे. आपली सर्व शिल्लक संहारक शस्त्रांच्या संपादनांत खर्च केली आणि जेव्हां जेव्हां दुसऱ्या सरकारच्या रयतेला कंठस्नान घालणें आपल्या सरकारास इष्ट वाटेल, तेव्हां तेव्हां तीं शस्त्रें वापरण्याची नागरिकांची तयारी ठेवली कीं आपलें अस्तित्व टिकवतां येईल, अशी आशा आधुनिक समाजांना बाळगतां येईल काय? लढ्यास सिद्ध झालेल्या राष्ट्राला आपल्या पक्षाची श्रेष्ठतर सत्यता पटवून द्यावयाची असेल, तर प्रतिपक्षी राष्ट्राचे मारतां येतील तितके नागरिक ठार मारण्याव्यतिरिक्त दुसरा कोणताच मार्ग त्यास नाहीं कीं काय? पाश्चात्य जगांत हे प्रश्न सतत उपस्थित होत असून आतांपर्यंत परंपरागत असें जें उत्तर देण्यांत येत असे, त्याहून निराळें उत्तर आपल्या पिढीनें जर शोधून काढिलें नाहीं, तर आपल्या ह्या संस्कृतीच्या भाळीं नाश लिहिलेलाच आहे.

याहून अन्य मार्ग सुचविण्याची चतुराई दाखविण्याचें व तदनुरूप आचरण ठेवण्याचें महनीय श्रेय गांधींनाच दिलें पाहिजे. ख्रिस्त व बुद्ध सांगत होते तेंच योग्य आहे, असें त्यांनीं प्रत्यक्ष दाखविलें. भांडणासाठीं दोन पक्ष असावे लागतात; आपण त्यांपैकीं एक पक्ष होण्याचें नाकारलें, तर आपणांबरोबर कोणीहि भांडूं शकणार नाहीं. हिंसेनें प्रतिकार करण्याचें नाकारलें तर आपण आपलें ध्येय हिंसामय प्रतिकारापेक्षांहि अधिक सफलतेनें हस्तगत करूं; इतकेंच नव्हे, तर हिंसेची निष्फलता सिद्ध करून आपण हिंसेलाच पराभूत केल्याप्रमाणें होईल. हा मार्ग सिद्धांत म्हणून मानवी विचारांच्या उगमाबरोबरच मांडण्यांत आलेला असला, तरी गांधींनीं मानवांच्या व्यवहारांत तो लागू करण्याचा यत्न केला आणि म्हणूनच आपण

त्यांचें ऋणी असावयास पाहिजे. उच्चतम सिद्धांत खरे आहेत असें मानून चालण्यांत जो धोका असेल तो पत्करण्यास आपण सदैव सिद्ध आहों असें त्यांनीं दाखवून दिलें आहे. ते जी पद्धति मांडीत आहेत ती कालमानाच्या दृष्टीनें आगाऊ आहे यांत शंका नाहीं. रूढिप्रिय अशा बहुत लोकांना त्यांचे विचार भयंकर व क्रांतिकारक वाटतात हेंहि निःसंशय. साहजिकच वर्तमानकाळाच्या विचारक्षेत्रांतील वतनदारांना त्यांच्या योगानें धास्ती उत्पन्न होते, मानवी विचारांत आंदोलनें उत्पन्न होऊं लागतात, नीतिकल्पनांना धाक पडतो, आणि प्रबळांची व सुस्थिर झालेल्यांचीं आसनें खचूं लागतात. म्हणून सर्व द्रष्ट्या पुरुषांप्रमाणें त्यांनाहि अनाचारप्रवर्तक म्हणून व पुष्कळदां धर्मलंड ढोंगी म्हणून शिव्यागाळी होत असते.

कलेच्या क्षेत्रांतील नवमतवादाची फार तर तऱ्हेवाईकपणांत अथवा मूर्खपणांत गणना करतात, पण राजकारणांतल्या वा नीतिकारणांतल्या नवमतवादाचा धिःकार प्रचारकी कौटिल्य म्हणून करण्यांत येतो व त्याची गय केली तर समाजाचा पायाच उखडून निघेल असें म्हटलें जातें. रूढ नीतिनियमांमध्यें प्रगति साधणें हें सामान्यतः नवमतवादाचें उद्दिष्ट असतें व ही प्रगति वैचारिक व नैतिक क्षेत्रांतील ज्या लब्धप्रतिष्ठांना दूर करण्यासाठीं असते, त्यांच्या विरोधांतूनच तिला मार्ग काढावा लागतो. म्हणून आपल्या कोठडींत उपाशीपोटीं तडफडण्याची परवानगी कलाक्षेत्रांतील द्रष्ट्याला बहुधा मिळत असली, तरी आचारक्षेत्रांतील द्रष्ट्याला मात्र कायद्याच्या अनुज्ञेनें छळ करून ठार मारण्यांत येत असतें. इतिहासांत गाजलेल्या खटल्यांची या दृष्टीनें तपासणी करणें मोठें मनोरंजक ठरेल. त्या त्या कालीं अधिकारावर असणाऱ्या व्यक्तींना अप्रिय वाटणारीं मतें ग्राह्य धरलीं म्हणून सॉक्रेटिस, गिओर्डानो ब्रुनो व सर्व्हिटस या सर्वांवर खटले चालून ते दोषी ठरले आणि त्याच मतासाठीं आज सर्व जग त्यांचा सन्मान करीत आहे. द्रष्ट्या पुरुषाची उत्कृष्ट व्याख्या शेलीच्या शब्दांत अशी सांगतां येईल कीं, "जो वर्तमानांत भविष्य पाहतो व ज्याचे विचार अगदीं ताज्यांतील ताज्या विचाररूप फलाफुलांतील बीजाप्रमाणें असतात," तो.

प्राणिशास्त्रदृष्ट्या हाच सिद्धान्त मांडावयाचा तर असें म्हणतां येईल कीं, द्रष्टा हा बौद्धिक आणि आत्मिक क्षेत्रांतील सृष्टिविकासाचा एक " विलास " ( Sport, प्लुति ) आहे, आणि जीवनांतील स्वाभाविक पण अव्यक्त ध्येयें व्यक्त करणें यासाठीं त्याची निर्मिति आहे.

म्हणून द्रष्टा हा जीवनाच्या एका नूतन उद्रेकाचा निदर्शक बनून प्रचलित विचारांची व नीतिनियमांची घडी निःसंदेहपणें विस्कटून टाकीत असतो. तितक्याच निश्चितपणें तो नवीन विचारांची व नीतीची सिद्धताहि करीत असतो. ज्या पातळीवरून द्रष्ट्यानें आपला प्रलयकारी संदेश प्रतिपादिला, तेथवर अवघा समाजच्या समाज थोड्याच अवधींत जाऊन पोंचतो, आणि मग पूर्वयुगाचीं नवमतें पुढच्या युगांत रूढमतें झाल्याचें इतिहासपरिचित दृश्य आपणांस दिसूं लागतें.

गांधी नीतिद्रष्टे आहेत ते याच अर्थीं. वाद मिटवण्याचा जो एक मार्ग त्यांनीं घोषित केला आहे, तो हिंसा मार्गाची जागा कदाचित् पटकावील एवढेंच म्हणून भागणार नाहीं; तर माणसांच्या हातची संहारशक्ति जसजशी वाढत जाईल तसतशी अशी वेळ येईल कीं, संस्कृति टिकवावयाची असल्यास हिंसामार्गाच्या ऐवजीं गांधींचा मार्ग स्वीकारणें भागच पडेल. त्यांच्या मार्गास क्षणिक अपयश आलें आहे हें निःसंशय. त्यांना जेवढें साधतां आलें आहे, त्याहून अधिक साधण्याचा निर्वाळा त्यांनीं दिला होता हेंहि खरें. पण स्वतःला पार पाडतां येईल त्याहून अधिक करण्याचा निर्वाळा कोणी न देते, तर जग आहे त्याहून अधिक दरिद्री झालें असतें. कारण जीं ध्येयें साध्य झालेलीं नसतात त्यांच्याच पोटीं सिद्ध सुधारणा जन्मत असतात. गांधी स्वतः सश्रद्ध आहेत, म्हणूनच लोक त्यांच्यावर श्रद्धा ठेवीत आहेत आणि म्हणूनच कोणत्याहि हिंसाशक्तीचें पाठबळ नसतां त्यांचा अधिकार जगांतील कोणत्याहि व्यक्तीच्या अधिकारापेक्षां अधिक आहे.

# ब्रिटिश राष्ट्रकुटुंबाची गांधींनीं बजावलेली कामगिरी*

लेखक : ए. बारीडेल कीथ, एम्. ए., डी. लिट्., एल्एल्. डी., एफ्. बी. ए.

( एडिंबरो विश्वविद्यालय )

आमच्यापैकीं कांहीं जणांना महात्मा गांधींच्या आयुष्याची सार्थकता विशेषेंकरून यांत आहे असें वाटतें कीं, प्रत्यक्ष व्यवहारांत ध्येयवाद अन्तर्भूत करण्याच्याविरुद्ध असणाऱ्या जगामध्यें तत्प्रीत्यर्थ होणाऱ्या कार्यांत हटकून उत्पन्न होणाऱ्या असंख्य अडचणींस न जुमानतां बुद्धिपुरःसर चाललेल्या ध्येयोपासनेचें तें निदर्शक आहे. मनुष्यमात्राच्या प्रतिष्ठेला मान्यता मिळवून देण्याच्या कार्यांत दक्षिण आफ्रिकेमध्यें त्यांनीं जी कामगिरी केली, ती ब्रिटिश राष्ट्रकुटुंबाच्या इतिहासांत महत्त्वाची समजली पाहिजे. ज्या देशांत युरोपियनवंशीय गट शासन-संस्थेंत व धर्मसंस्थेंत इतर वंशांच्या लोकांस समान हक्क नाकारीत असत, त्या देशांत मनुष्यमात्र हा येथून तेथून समान आहे आणि वंश व वर्ण यांवर आधारलेले कृत्रिम भेद तर्कविरुद्ध आहेत, हें तत्त्व प्रस्थापित करण्यासाठीं ते उभे ठाकले. विरोधी पक्षांचें प्रचंड सामर्थ्य ध्यानांत घेतलें, तर त्यांनीं आपल्या देशबांधवांची प्रतिष्ठा वाढवली व दक्षिण आफ्रिकेमधील त्यांच्या सामाजिक स्थानाचा प्रश्न अभिनव पद्धतीनें मांडला हें त्यांच्या अत्यंत महनीय कार्यांपैकीं एक कार्य समजलें पाहिजे. त्यांनीं आफ्रिका सोडल्यानंतर पुनः एकवार तेथें संकुचित दृष्टीच्या वंशवादानें उचल खाल्ली आहे ही मोठ्या खेदाची गोष्ट होय. परंतु महात्माजींनीं स्वाभिमानाची ज्योत पेटवल्यापासून

---

* British Commonwealth ब्रिटिश राष्ट्रकुटुंब.

आणि एका व्यक्तीनें अथवा गटानें स्वार्थासाठीं कोणत्याहि दुसऱ्या व्यक्ती अथवा गटाला पिळणें न्याय्य आहे ही कल्पना त्यांनीं खोडून काढल्यापासून हिंदी जमातीची प्रतिकारशक्ति कल्पनातीत वाढली आहे. कांहीं काळ तें ध्येय लुप्त झाल्याप्रमाणें दिसत असलें, तरी तें पूर्णपणें नष्ट होईल असें मानतां येणार नाहीं. इंग्लंडमधील आपल्या वजनाचा फायदा घेऊन जे ब्रिटिश लोक हिंदी हक्कांचा योग्य विचार न करतांच केनिया व झांझिबारमध्यें राज्यव्यवस्था हस्तगत करूं पहात होते, त्यांच्या खटाटोपाला गांधींच्या शिकवणुकींतील तत्त्वांमुळें आळा पडला. गांधींचे प्रयत्न केवळ हिंदी लोकांच्या कल्याणापुरतेच आहेत असेंहि नव्हे. त्यांनीं जे धडे दिले आहेत ते आफ्रिकेच्या तद्देशीय रहिवाशांच्या भवितव्याच्या दृष्टीनेंहि तितकेच उपयुक्त ठरतील. स्वतःची ऐतिहासिक संस्कृति पुढें करून हिंदी लोकांनीं युरोपियनांच्या बरोबरीचे हक्क मिळवून समाधान मानावें आणि आफ्रिकेच्या मूळ रहिवाशांना निकृष्ट व क्षुद्र लेखण्यांत युरोपियनांना साथ द्यावी असल्या तत्त्वज्ञानाच्या वाढीला त्यांनीं जागा ठेवलेली नाहीं.

हिंदुस्थानांत महात्माजींनीं असें तत्त्व प्रतिपादिलें आहे कीं, युरोपियनांनींच नव्हे, तर हिंदी लोकांनींहि समानतेच्या हक्काला मान्यता दिली पाहिजे. त्यामुळें हिंदी लोकांनाहि बरीच अडचण पडली आहे. कारण इतर देशांतील धर्मग्रंथांप्रमाणें हिंदूंचेहि धर्मग्रंथ मानवांतील विषमता ही ईश्वरकृत आहे असें प्रतिपादितात. तथापि, आपल्या ह्या कृतीनें गांधींनीं हिंदी लोकांच्या स्वयंशासनाच्या हक्काच्या मार्गांतील एक मोठ्यांतील मोठी अडचण दूर केली आहे; ती अशी कीं, ज्या लोकांना ऐतरेयब्राह्मणानें केवळ सेवा करण्यासच लायक असें ठरवलें व ज्यांना हवें तेव्हां घराबाहेर काढून लावावें अथवा जिवें मारावें असें सांगितलें, त्यांचें हितरक्षण वरिष्ठ वर्गाच्या हवालीं करणें इष्ट नाहीं असा जो युक्तिवाद पुढें करण्यांत येई, तो खोडून निघाला आहे. हरिजनांच्या बाबतींत महात्माजींनीं घेतलेली भूमिका व तिच्यामुळें हिंदुधर्मांतील प्रकट झालेले उत्तम गुण हीं पुढील काळांत त्यांच्या जीवनांतील प्रमुख कार्यें ठरण्याचा संभव आहे. ऐतिहासिक

विकासांत उद्भवणाऱ्या महत्त्वाच्या घटनांचा अभ्यास करणाऱ्या सर्वांस निर्मळ समाधान वाटावें असेच हे प्रसंग आहेत.

शासनसंस्थेशीं अहिंसामय असहकार करणाऱ्या त्यांच्या तत्त्वाचा इतिहास अधिक वादग्रस्त आहे. सामान्य माणसाच्या स्वभावधर्माला न झेपण्यासारखें हें तत्त्व आहे. कारण मनुष्यप्राणी हा जात्या युयुत्सु असल्याकारणानें जे प्रथम अहिंसेची कड घेऊन उठले, ते पुष्कळदां अधिक तामस अशा भावनांच्या आहारीं गेल्याचीं उदाहरणें आढळतात. पण केवळ तार्किक भूमिकेवरून मांडलेल्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणारें ब्रिटिश सरकार, त्याच मागण्या राज्यकारभाराला अडथळा उत्पन्न करणाऱ्या विरोधी पक्षाकडून मांडण्यांत आल्यास मान्य करतें, असा इतिहासाचा दाखला आहे, ही गोष्ट अमान्य करण्यांतहि कांहीं अर्थ नाहीं; मग त्याचीं मानसशास्त्रीय कारणें कांहींहि असोत. अशा परिस्थितींत महात्माजींनीं ज्यांत हिंसेचा धोका आहे किंवा जो आचरतांना अत्याचार घडणें अपरिहार्य आहे असा एकादा मार्ग स्वीकारला, तर फक्त त्याच मार्गानें हिंदुस्थानला जिव्हाळ्याच्या वाटणाऱ्या गोष्टी साधणें शक्य होतें असें आपलें समर्थन त्यांना करतां येईल हें मान्य केलें पाहिजे. हिंदुस्थानांतील प्रांतांत जबाबदार राज्यपद्धतीची परिणामकारक बजावणी ही ब्रिटिश राष्ट्रकुटुंबाच्या इतिहासांतील एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे. त्या बाबतचें श्रेय विद्यमान व गत अशा अनेक व्यक्तींकडे जात असलें, तरी ती घडवून आणण्याचें श्रेय महात्माजींइतकें दुसऱ्या कोणासहि देतां येणार नाहीं. त्यांचें हें एक खरोखरच यावच्चंद्र-दिवाकरौ टिकणारें स्मारक होय. खालीं दिलेलें वचन गांधींच्या बाल-मनावर कोरलें गेलें असावें, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं; कारण त्या ध्येयासाठीं त्यांचें जीवित समर्पित झालेलें आहे.

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम् ॥

---

# सत्याधिष्ठित नेतृत्वाला लागलेलीं फळें

## लेखक : दी राइट ऑनरेबल व्हायकाऊंट सॅम्युअल

### जी. सी. बी., जी. बी. ई., डी. सी. एल्. ( लंडन )

वेळोवेळीं गांधीजी अशा गोष्टी करतात व अशा गोष्टी बोलतात कीं मी चिडून जातों. मला त्या तर्कदुष्ट व विपरीत वाटतात. त्यांचा पक्ष घेण्याच्याऐवजीं त्यांचा विपक्षी व्हावें, असें थोड्या थोडक्या वेळां वाटतें असें नव्हे. पण सदासर्वदा एक खात्री असते कीं, शंभर टक्के प्रामाणिकपणानें व निखालस त्यागानें, अन्तःकरणापासून, या नाहीं तर त्या मार्गानें, सत्यध्येयाप्रत पोंचण्याची धडपड करीत रहाणारा हा एक पुरुष आहे.

आपल्यांतील थोर पुरुषांची ओळख जगाला व्हावयास हवी. आपल्या थोर सेवकांविषयीं जगानें कृतज्ञ रहावयास हवें. "मेल्यावर गुलाब, पण जीवंतपणीं कांटे," हें उपहासाचें बोलणें आहे. सत्पात्र अशा व्यक्तींना, त्या हयात असल्या तरीहि, कांहीं प्रसंगीं आपण गुलाबपुष्पें अर्पण करावींत.

आपल्या दीर्घ आयुष्यांत गांधीजींनीं हिंदुस्थानची व हिंदुस्थानच्या-द्वारें जगाची अनेक प्रकारें सेवा केली आहे. त्याचीं तीन ठळक उदाहरणें आहेत.

"मान तुकवण्याची पौर्वात्य वृत्ति" ज्यांच्यांत स्वभावतुल्य बनली होती असे लोक त्यांना आढळले. दुसऱ्यांनीं आपणांस जिंकावें, आपणांवर सत्ता गाजवावी, आपण मागसलेले, अज्ञानी, लोकभ्रमानें परिपूर्ण, दरिद्री असावें ही गोष्ट हिंदुस्थानांतील असंख्य जनतेच्या बाबतींत, इतिहासानें व अनिवार्य अशा वर्तमान परिस्थितीनें भाळीं लिहिलेल्या सटीच्या लेखाप्रमाणें मानिली जाई. हें सर्व बदलून टाकण्यासाठीं गांधी पुढें सरसावले. ज्या चळवळीचे ते नेते होते, तिचें त्यावेळचें स्वरूप अल्प व भंगुर असें होतें.

अंगच्या गुणांमुळें त्यांना लवकरच प्रमुख स्थान मिळालें. आध्यात्मिक स्फूर्ति व चतुर व्यवहारदक्षता यांचा दुर्मीळ मिलाफ त्यांच्या ठायीं होता. आपल्या कधीं काळीं होणाऱ्या आगमनासरशीं जनतेला हालवून जो दिगंत कीर्ति संपादन करतो, असा आध्यात्मिक स्फूर्तीचा व चतुर व्यवहारदक्षतेचा दुर्मीळ मिलाफ त्यांच्या ठायीं झालेला होता.

हिंदी माणसाला मान ताठ करून, डोळे वर उचलून, परिस्थितीकडे न बिचकतां न्याहाळून पाहण्यास त्यांनीं शिकविलें. म्हण आहे कीं " जीवन काय तें समजावून घ्यावयाचें असेल, तर मागें वळून पहावें लागतें आणि जीवन जगावयाचें तर पाऊल पुढें टाकावें लागतें." गांधींनीं आपल्या देशबांधवांना स्वतःचा इतिहास अभ्यासण्यास सांगितलें; पण त्यांनीं त्यांत डुंबून राहावें म्हणून नव्हे, तर त्याचें रहस्य ग्रहण करावें म्हणून; भविष्यकाळाला कर्तबगारीच्या जोरावर वळण लावतां यावें म्हणून. वर्तमान परिस्थितीला दृढ हातांनीं काबूंत ठेवण्याची स्फूर्ति गांधींनीं आपल्या देशबांधवांस दिली. त्यांनीं त्यांस पाऊल पुढें टाकीत जगावें, हा मंत्र दिला आणि ह्या अधिक गौरवपूर्ण व कणखर जीवनांत हिंदी स्त्रियांनीं आपला वांटा उचलणें कसें जिव्हाळ्याचें आहे तेंहि त्यांनीं दाखवून दिलें.

ब्रिटिश हे स्वाभिमानी लोक आहेत. त्यामुळेंच आम्ही इतरांच्या स्वाभिमानाची प्रतिष्ठा राखतों. गेल्या कांहीं वर्षांत कितीहि वाद आणि कलह माजलेले असोत, हिंदी लोकांविषयीं, गेल्या कित्येक शतकांच्या सहवासांत आढळला नसेल इतका आदर ब्रिटिशांच्या मनांत आज वसत आहे, असें म्हणण्यास मला प्रत्यवाय वाटत नाहीं.

हिंदुस्थानच्या प्रदेशांत जगांतली एकषष्ठांश वस्ती आहे. मानवजातीच्या या प्रचंड विभागाची प्रतिष्ठा व हिंमत वाढविण्याच्या बाबतींत गांधींनीं दुसऱ्या कोणाहि व्यक्तीपेक्षां अधिक कार्य केलें आहे. म्हणून हिंदुस्थाननें त्यांच्याविषयीं कृतज्ञ असलें पाहिजे. ब्रिटननेंहि कृतज्ञ असावें, आणि अंतीं अप्रत्यक्षरीत्या सर्व जगाचें कल्याण त्यामुळें साधतें म्हणून सर्व जगानेंहि गांधींविषयीं कृतज्ञता ठेवावी.

कांहीं थोड्या घोर अपराधांनीं व अत्याचारांनीं त्यांच्या चळवळीला

काळिमा लागला. पण त्यांना गांधींनीं कधींहि फूस दिली नव्हती. त्यांच्या कळकळीच्या विनंतीचा उघड अव्हेर करून तीं कृत्यें आचरण्यांत आलीं.

स्वातंत्र्याच्या ध्येयाची अहिंसेच्या मार्गाशीं सांगड घालण्यांत यश मिळवण्याचें जें कार्य त्यांनीं साधलें, त्यामुळें त्यांचें नांव उज्ज्वल झालें आहे. हें त्यांनीं केलेलें दुसरें महत्कृत्य. अवश्यच असेल तर निषेध, मनधरणी, आज्ञाभंग यांचा उपयोग करावा; पण हिंसा, शत्रूवध, अत्याचार, बंड हीं करूं नयेत असा त्यांचा संदेश होता व आहे.

हिंदुस्थानांतील जनतेच्या स्वभावाशीं जुळतें असें हें धोरण आहे. त्यासाठीं जो बराचसा त्याग करावा लागतो त्याला ती सदैव तयार असते. शिवाय, लोकांच्या योग्यायोग्यतेच्या कल्पनांशींहि या धोरणाचा मेळ बसतो. धर्म या दुरुपयुक्त शब्दाचा जो उदात्त अर्थ आहे, त्या अर्थानें अहिंसा धार्मिक आचार आहे; तो आचार परिणामकारक ठरला आहे. उत्साहपूर्ण जनतेच्या सामुदायिक प्रचंड प्रयत्नाची जोड अहिंसेला मिळाल्याबरोबर तिनें अदूरदर्शी परंतु अस्वाभाविक नसलेल्या विरोधावर, इतर कोणत्याहि उपायानें केव्हांहि मिळवतां आला नसता असा पूर्ण विजय मिळवला आहे.

धडाडीनें व अधिकारानें दलित वर्गाच्या लढ्याचा कैवार घेतला, हिंदी राजकारणांत त्याला आघाडीला आणून बसवलें व त्याला यशाच्या मार्गाला लाविलें, हें गांधींचें तिसरें महत्कार्य.

अस्पृश्यांबरोबरचें वर्तन हा हिंदुस्थानाच्या सामाजिक व धार्मिक इतिहासावरील कलंक आहे, ही गोष्ट त्या देशाच्या सच्चया मित्रांनीं प्रांजलपणें मान्य केलीच पाहिजे. कसलाहि अंगभूत दोष नसतां लाखों लोकांना बहिष्कृत करणारा आणि प्रथम पतित बनवून नंतर पतित म्हणूनच त्यांचें दलन करणारा हा असला कसला धर्म? सत्यधर्मानें मानवी अंतःकरणाला मुक्त य उन्नत करण्याचा नित्य प्रयत्न केला पाहिजे; त्याला पीडतां कामा नये.

गांधींनीं या सर्व गोष्टी आपल्या प्रखर उजू दृष्टीनें ओळखल्या आहेत. त्यांच्या मनावर त्यांचा खोल परिणाम झाला आहे. हटवादी व प्रगतिविरोधी प्रतिकाराची क्षिति न बाळगतां या रंजल्या गांजलेल्या जीवांच्या उद्धारासाठीं आणि हिंदुस्थानला या अप्रतिष्ठेपासून मुक्त करून देशाला

संस्कृतीच्या अग्रभागीं नेऊन बसविण्यासाठीं ते अखंड व अविश्रांत प्रयत्न करीत आले आहेत. ती चळवळ आतां वाढत चालल्याचें त्यांना दिसत असून ती अंतीं यशाला पोंचणार असा विश्वास त्यांस वाटूं लागला आहे.

एका विशाल राष्ट्राची ईर्षा जागृत करून त्याची प्रतिष्ठा वाढविण्यांत अग्रेसर बनणें, पाशवी हिंसेचा आश्रय न करतां मानवाच्या केवळ आत्मशक्तीच्या आधारें सार्वजनिक जीवनांतील थोर साध्यें हस्तगत करतां येतात, हें आजच्या व उद्यांच्या जगाला दाखवून देण्यांत अग्रस्थान मिळविणें, आणि अन्यायाचें भक्ष्य बनलेल्या लक्षावधि जीवांना शतकानुशतकें टिकून राहिलेल्या अधोगतींतून उद्धरण्याच्या कार्यांत नेतृत्व संपादणें— अशीं महान् कृत्यें केल्याचा आढावा आपल्या सत्तर वर्षांच्या कारकीर्दीचें सिंहावलोकन करतांना जिला घेतां येईल, अशी कोणती दुसरी व्यक्ति आज विद्यमान आहे ?

या सिंहावलोकनाच्या प्रसंगीं गांधींना समाधान वाटलें तर तें साहजिक आहे. आपापले नजराणे घेऊन इतरांनींहि यावें. अनेक वेळां कटु कंटकांनीं त्यांना दंश केला आहे, ओरखडलें आहे. आतां आपल्या कृतज्ञतेचीं गुलाबपुष्पें आपण त्यांना अर्पण करूं या.

---

# मंडलाकार परिषदेच्या वेळच्या स्मृती

## लेखक : दी राइट ऑनरेबल व्हायकाऊंट सँकी

एम्. ए., डी. सी. एल्. ( लंडन )

या लेखांत गांधींच्या जीवनावर भाष्य करण्याचा अथवा त्यांच्या सामाजिक वा राजकीय मतांवर टीका करण्याचा माझा उद्देश नाहीं. त्यांचे अनुयायी त्यांच्याविषयीं बोलतांना निर्भेळ स्तुतीचे उद्गार काढतात, तर

विरोधक तीव्र निषेधाची भाषा वापरतात. यावरून त्यांच्या तेजस्वी शीलाची पुरेशी खूण पटते. प्रस्तुत लेख त्यांचीं सगळींच्या सगळीं मतें मान्य नसणाऱ्या एका चाहत्यानें लिहिलेला आहे.

१३ सप्टेंबर १९३१ रोजीं गांधींना मी प्रथमच भेटलों. पुढील कांहीं महिन्यांपर्यंत मंडलाकार परिषदेच्या फेडरल स्ट्रक्चर कमिटीच्या वेळीं आम्ही दररोज तासन् तास शेजारीं शेजारीं बसत असूं. नंतर ते हिंदुस्थानाला परतले. त्यावर माझी त्यांची भेट झालीच नाहीं. एकाद्या माणसाजवळ अनेक किचकट अशा वादविवादांच्या वेळीं व अनेक आणिबाणीच्या प्रसंगीं बसल्यावर त्याच्याविषयीं आपल्या मनांत आवड किंवा नावड यांपैकीं कांहींतरी निर्माण होणारच. गांधींच्या मित्रपरिवारांत माझी गणना करण्यास हरकत नाहीं असें मला वाटतें.

फेडरल स्ट्रक्चर कमिटीच्या बैठकींना हजर राहण्यासाठीं ते इंग्लंडांत आले तेव्हां लंडनमधल्या डॉर्चेस्टर हॉटेलांत झालेल्या भेटीच्या वेळीं माझा त्यांना परिचय करून देण्यांत आला. ते येणार असल्याची वदंता पसरलेली असल्यामुळें बाहेर प्रचंड जनसंमर्द उभा होता. त्यांची शरीरयष्टि किरकोळ दिसली. त्यांनीं शुभ्र वस्त्रें परिधान केलेलीं होतीं. पण स्वतःच्या प्रतिष्ठेची व कीर्तीची जाणीव असल्याप्रमाणें त्यांच्या वागणुकीची ढब होती. त्यांची चर्या छाप बसण्याजोगी होती. पण माझ्या मनावर त्यांच्या मोठ्या आणि तेजस्वी डोळ्यांमुळें विशेष परिणाम झाला. केव्हां केव्हां त्यांचे विचार व निश्चित मतें त्यांच्या डोळ्यांवरून ओळखतां येत.

कमिटीच्या अध्यक्षाच्या जागीं माझी योजना झालेली असल्याकारणानें गांधींशीं परिस्थितीबाबत चर्चा करण्यासाठीं खोलीच्या एका दुसऱ्या कोपऱ्यांत मीं त्यांच्याबरोबर बसावें अशी विनंति मला करण्यांत आली. हिंदुस्थानाला कमी लेखण्यांत येतें याबद्दल त्यांनीं तक्रार केलीच; परंतु गरीबांवर डोईजड कर लादण्यास कारणीभूत होणाऱ्या सरकारच्या भरमसाट खर्चाविषयीं त्यांना विशेष खंत वाटत असल्याचें दिसलें. त्यांना वाटणारी गरीबांविषयींची कळकळ हें सर्व संभाषणांतील मुख्य सूत्र होतें. हिंदुस्थानांतल्या खेड्यापाड्यांतून राहणाऱ्यांच्या भवितव्याची त्यांना विशेषेंकरून चिंता वाटत होती. उद्योगधंद्यांची भरमसाट वृद्धि होणें

अहितकारक आहे हें त्यांनीं मान्य केलें. आपल्या सत्याग्रहावरील श्रद्धेचें त्यांनीं मजजवळ विवरण केलें व संरक्षणाचा प्रश्न निघाल्यावर हिंदुधर्मांतील अहिंसेच्या तत्त्वावर त्यांनीं प्रामुख्यानें भर दिला.

एवढ्या प्रदीर्घ भेटीनंतर त्यांच्याविषयीं कांहींतरी ठाम ग्रह बनल्याशिवाय तेथून निघणें शक्यच नव्हतें. अथपासून इतिपर्यंत त्यांची धार्मिक तळमळ स्पष्टपणें दिसून येत होती.

टॉल्स्टॉयच्या लेखनाचा त्यांच्यावर परिणाम झालेला असून सामाजिक दुःस्थितीवर तोडगा म्हणून पुन्हां साध्या जीवनाचा अंगीकार करावा असें त्यांचें मत दिसलें. दुसरी गोष्ट अशी कीं, स्वदेशाविषयीं उज्ज्वल प्रेमानें त्याची प्रतिष्ठा व कीर्ति वाढविण्याच्या इच्छेनें आणि गरीब व दलित लोकांचें कल्याण साधावें या तळमळीनें युक्त असा त्यांचा स्वभाव ठळकपणें दिसून आला. ते एक महान् राजकारणी नेते आहेत, हीहि गोष्ट स्पष्ट झाली. कारण इष्ट ध्येयावर त्यांची नैष्ठिक व अविचल श्रद्धा आहे. एवढेंच नव्हे, तर त्या ध्येयाप्रत पोंचण्यासाठीं योजावयाच्या साधनावरहि त्यांची तितकीच दृढ श्रद्धा असल्याचें स्पष्टपणें दिसून आलें.

सेंट जेम्सच्या राजवाड्यांत १४ सप्टेंबर रोजीं कमिटीची पहिली बैठक झाली. तो गांधींचा मौनवार होता. त्यामुळें त्या दिवशीं एकसुद्धां शब्द त्यांनीं उच्चारला नाहीं. मंगळवारीं १५ तारखेला त्यांचें पहिलें भाषण झालें. त्या वेळीं केलेलें पुढील टांचण कदाचित् मनोरंजक वाटेल. "गांधी अगदीं खालच्या आवाजांत विचारपूर्वक बोलले. मिनिटाला ५७ शब्द पडत होते. कोणतेंहि टिप्पण आधाराला न घेतां त्यांनीं सुमारें एक तास भाषण केलें. भाषणाला प्रारंभ करण्यापूर्वीं हात जोडून त्यांनीं प्रार्थना केलीसें वाटलें. ते माझ्या शेजारींच बसले होते. त्यांच्या पायांत चपला, नेसावयास पंचा, व अंगावर मोठी पांढरी शाल होती." हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची आणि सैन्य व तिजोरी यांच्यावरील अधिकाराची त्यांनीं मागणी केली. परिषदेमुळें पडलेले शारीरिक व मानसिक कष्ट त्यांनीं कसे सहन केले याचा मला सदैव अचंबा वाटत असतो. कधींहि न चुकतां ते सुरवातीच्या वेळीं हजर होत व त्या दिवसाचें काम संपेपर्यंत बसून

राहात. त्या वेळच्या टांचणावरून असें दिसतें कीं कांहीं कांहीं दिवशीं ८०००० पर्यंत शब्द बैठकींत उच्चारण्यांत येत.

पण गांधींच्या कामाला खरा आरंभ होई, तो परिषद तहकूब झाल्यानंतर. तासन् तास बरीच रात्र होईतों, आणि भल्या पहाटेसुद्धां, निरनिराळ्या हितसंबंधांच्या लोकांबरोबर चर्चा करण्यांत आणि भेटी घेण्यांत ते गुंतलेले असावयाचे. त्यांच्यांत एकसूत्रीपणा आणण्याकरतां व त्यांना आपल्या मताचे करून घेण्याकरतां यावच्छक्य प्रयत्न करीत राहावयाचे. आपलीं मतें लोकांच्या गळीं उतरवण्याची संधि व साधनें प्रधानांच्या व सत्ताधीशांच्या हाताशीं असतात. पण केवळ स्वतःच्या परिश्रमांनीं व उदाहरणानें आपल्या हयातींत लक्षावधि लोकांना आपलेसे करून सोडणारी गांधींच्या व्यतिरिक्त दुसरी कोणी व्यक्ति कधीं काळीं झाली असेल कीं नाहीं, याची शंकाच आहे.

कोणता तरी अन्तर्नाद त्यांचें मार्गदर्शन करीत होता असा वारंवार भास होई. जगाच्या इतिहासांत निरनिराळ्या समयीं, अन्य थोर पुरुषांना असेच अनुभव आलेले आहेत. सॉक्रेटिस व सेंट पॉलचें उदाहरण घ्या. असलीं माणसें भ्रमजालांत सांपडलेलीं असोत, अथवा इहलोकीं न सांपडणाऱ्या ज्ञानानें युक्त अशीं असोत, ज्या कोणाला त्यांचा सहवास घडतो, त्यांच्यावर त्यांचा पगडा बसत जातोसें दिसतें एवढें खरें. गांधी हे साक्षात्कारी राजकीय नेते ( Political mystic ) आहेत. क्वचित् प्रसंगीं ते दुराराध्य वाटतात; पण त्यांची धार्मिकता सदैव जागृत असते. हिंदुस्थानासाठीं व गरिबांसाठीं शक्य तें करण्याची चिंता त्यांना सदैव लागलेली असते. त्यांच्या राजकीय जीवनाविषयीं मीं बोलावें असें नाहीं. ‘सीसॅम अँड लिलीज्’ या पुस्तकांतील एका विख्यात परिच्छेदांत जॉन रस्किननें म्हटलें आहे, “बोलत राहून एकाद्या पंतप्रधानाचा दहा मिनिटांचा वेळ आपणांस घेतां येईल, आणि मग बहुधा फसवें उत्तर मिळाल्यामुळें तो गप्प बसला असता तर वाटलें नसतें इतकें वाईट वाटेल.” रस्किनला राजकीय नेतृत्व करावें लागलें असतें, तर तो यापेक्षां अधिक चांगला वागता कीं काय याबद्दल संशयच आहे. गांधींच्या राजकीय जीवनावर जेव्हां कांहीं पाश्चात्य राजकारणी लोक चिडून टीका करतात तेव्हां स्वतः कांचेच्या घरांत

राहणारांनीं दगडफेक करण्याच्या भरीस पडूं नये, ही गोष्ट त्यांनीं लक्षांत ठेवल्यास फार बरें होईल.

गांधींनीं स्वतःपुढें उच्च ध्येयें ठेवलीं आहेत हें निःसंशय. पण केवळ स्वबांधवांवरच नव्हे, तर हिंदुस्थानांतील अनेकविध पंथांच्या व वंशांच्या लोकांवर अधिकार गाजवण्याची व त्यांची जोखीम वाहण्याची पाळी गांधींच्यावर आली असती तर कसें झालें असतें, अशी शंका माझ्या मनांत कधीं कधीं येते. अशा परिस्थितींत राजकारणी पुरुषाला मार्ग व साधनें यांचा विचार करणें भाग पडतें; पण मार्ग व साधनांची चिंता द्रष्टे करीत नसतात; आणि अखेरीस द्रष्टे बहुतकरून राजकारण्यांवर मातच करतात असें दिसून येतें.

माझें स्वतःचें मत सांगावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, गांधींच्या पश्चात् एक गोष्ट सर्वच मान्य करतील, कीं ते जन्माला आले त्या वेळच्या जगाला अधिक सुधारून त्यांनीं त्याचा निरोप घेतला.

---

# गांधींची राजकारणपद्धति

## लेखक : दी राइट ऑनरेबल जे. सी. स्मट्स्

एम्. ए., एल्एल्. डी., डी. सी. एल्.

( विधिमंडळ, केपटाऊन )

बायबलांत सांगितलेली सत्तरीची मर्यादा ओलांडण्याच्या बेतांत आलेल्या वयोवृद्ध गांधींना एका पिढीपूर्वीं त्यांच्या शत्रुस्थानीं असलेल्या मीं अभिवादन करावें यांत औचित्य आहे. पूर्वसूरींनीं मोठ्या नाखुषीनें या उपरच्या आयुष्याचा जो हप्ता मानवाला देऊं केला आहे तो त्यांना लाभो आणि त्यांचा पुढील काळहि जगदुद्धाराच्या सफल सेवेनें व मनःशांतीनें

परिपूर्ण असा होवो! त्यांनीं केलेल्या थोर जनसेवेला मान्यता देण्याच्या व त्यांच्या महान् गुणांची चहा करण्याच्या या प्रसंगीं मोठ्या आनंदानें मी इतरांच्याशीं सहकार्य करीत आहें. आपणां सर्वांच्या ठिकाणीं आलेली गुणदारिद्र्याची व कर्मवैफल्याची भावना अशा व्यक्तींच्या योगानें दूर होते व अशा व्यक्तींमुळेंच सत्कर्माचा कंटाळा करूं नये अशी स्फूर्ति आपणांस मिळते.

दक्षिण आफ्रिकेच्या युनियनच्या प्रारंभकाळीं आमच्या ज्या कटकटी झाल्या त्यांचा इतिहास गांधींनीं स्वतःच लिहिला असून तो सुविख्यात आहे. ज्या पुरुषाविषयीं त्या काळींसुद्धां माझ्या मनांत अत्यंत आदरभाव होता, त्याचा विरोधक होण्याचें माझ्या नशिबीं आलें! दक्षिण आफ्रिकेच्या छोट्याशा रणांगणावर उडालेल्या खटक्यांत गांधींच्या स्वभावांतील जे कांहीं गुणविशेष प्रकट झाले, तेच नंतरच्या काळांत हिंदुस्थानमध्यें त्यांनीं फार मोठ्या प्रमाणांत केलेल्या हालचालींतहि प्रामुख्यानें दिसून आले. त्याच्यावरून हें दिसून येतें कीं, ज्या कार्याची कड घेऊन ते उठतात, त्याच्यासाठीं ते सर्वस्व पणाला लावण्यास तयार होत असले, तरी परिस्थितीच्या मानवी अंगाचें त्यांना कधींहि विस्मरण होत नाहीं; ते बेताल होत नाहींत, कीं आपलें मन मत्सरग्रस्त होऊं देत नाहींत; आणि अत्यंत बिकट प्रसंगींसुद्धां आपला नर्म विनोद अबाधित ठेवतात. आजच्या जमान्यांत प्रचलित असलेली पाशवी हिंसावृत्ति व गांधींची कार्यपद्धति व मनोवृत्ति यांच्यांतील विरोध आतांप्रमाणेंच त्या काळींहि स्पष्ट दिसत असे.

त्यांच्या त्या वेळच्या हालचाली मला अगदीं सतावून सोडीत, ही गोष्ट मी प्रांजलपणें कबूल करतों. दक्षिण आफ्रिकेंतील दुसऱ्या कांहीं मित्रांच्या साहाय्यानें जुन्या वसातींना एकसंध करून त्यांना संयुक्त राज्य-संघाचें स्वरूप आणून देण्याच्या, व नवीन राष्ट्राच्या व्यवहाराला एक-सूत्रीपणा आणून बोअर-युद्धानंतर जें कांहीं अवशिष्ट राहिलें होतें, त्यांतून एक अभिनव राष्ट्र निर्माण करण्याच्या प्रयत्नांत मी गढून गेलों होतों. कार्य प्रचंड होतें व त्यापायीं माझा क्षणन् क्षण खर्चत होता. या एकाग्रतेनें

चाललेल्या कार्यांत गांधींनीं एकाएकीं अत्यंत त्रासदायक असा एक प्रश्न उपस्थित केला.

दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांचा प्रश्न हें आमच्यांतील एक दोषस्थळ होतें. हिंदी लोकांच्या प्रवेशावर निर्बंध घालण्याचा प्रयत्न ट्रान्सव्हालमध्यें झाला होता. उंसांच्या मळ्यांतील नौकरीची मुदत संपली कीं हिंदुस्थानकडे परत फिरण्यास हिंदी लोकांनीं प्रवृत्त व्हावें, म्हणून नाताळमध्यें त्यांच्यावर कर बसविण्यांत आला होता. गांधींनीं हे प्रश्न सोडवले आणि ते सोडवतांना एका नवीन तंत्राचा आविष्कार केला. हेंच तंत्र हिंदुस्थानांतील राजकीय हालचालींच्या द्वारें त्यांनीं जगप्रसिद्ध करून टाकलें. कायदा बुद्धिपुरःसर मोडावयाचा व आक्षेपार्ह कायद्याचा भंग करण्याकरतां आपल्या अनुयायांची अहिंसात्मक प्रतिकारासाठीं सामुदायिक संघटना करावयाची, ही त्यांची पद्धति होती. दोन्ही प्रांतांत अनावर आणि जिकीरीची चळवळ उत्पन्न झाली, कायदेभंगामुळें कित्येक हिंदी लोकांना अटकेंत ठेवावें लागलें, आणि खुद्द गांधींनाहि तुरुंगांतला थोडकासा शांततेचा व विश्रांतीचा काळ भोगावयास मिळाला. तो मिळावा अशी इच्छा त्यांनाहि होती हें निःसंशय. सगळ्या गोष्टी त्यांच्या योजनेबरहुकूम पार पडत होत्या. कायदा व सुव्यवस्था यांचा रक्षक असा जो मी, त्या माझ्यावर मात्र कठिण परिस्थिति ओढवली ! लोकमताचा विशेषसा पाठिंबा नसलेल्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचें पाप आणि अखेरीस कायदा रद्द करावा लागला त्या वेळची फजिती माझ्या पदरीं आली. गांधींची मात्र फत्ते झाली. त्यांतहि त्यांचें व्यक्तिगत वैशिष्ट्यच दिसून आल्यावांचून राहिलें नाहीं. कारण स्वतःच्या व्यक्तिगत वैशिष्ट्याचा ठसा उमटलेला नाहीं, अशी एकहि बाब त्यांच्या व्यवहारांत दिसणारच नाहीं. तुरुंगांत असतांना त्यांनीं माझ्यासाठीं मोठा सोयीकर असा वहाणांचा जोड बनविला होता, तो तुरुंगांतून सुटल्यावर त्यांनीं मला भेट म्हणून पाठविला ! इतक्या थोर पुरुषानें दिलेले जोडे स्वीकारण्याची पात्रता माझ्या ठिकाणीं नाहीं असें मनांत येई. तरीसुद्धां त्यानंतर कित्येक वर्षें मी त्या वहाणा उन्हाळ्यांत वापरीत असें ! असो. दक्षिण आफ्रिकेंत आम्ही झगडलों ते या वृत्तीनें. त्यांत द्वेष अथवा व्यक्तिगत दुजाभाव नव्हता, मानवधर्माची

अनुक्रम
विभाग
क्रमांक

भावना कधींहि लुप्त झालेली नव्हती; आणि युद्ध संपल्यावर. असें एक वातावरण निर्माण झालें होतें, कीं ज्यामुळें सन्माननीय संधि घडवून आणणें शक्य व्हावें. गांधींनीं व मीं तडजोड केली, तिच्यावर पार्लमेंटाचें शिक्कामोर्तब झालें, व तिच्यामुळें कित्येक वर्षें दोन्ही जातींत शांतता नांदली. हिंदुस्थानांतील आपले भगीरथ प्रयत्न सुरू करण्यासाठीं त्यांनीं दक्षिण आफ्रिका सोडली व जिला हिंदुस्थानच्या अलिकडच्या इतिहासांत तोड सांपडणार नाहीं अशी स्वतःच्या भावनेची व व्यक्तिमत्वाची छाप त्या विशाल देशांतील जनतेवर त्यांनीं बसविली. दक्षिण आफ्रिकेंतील आमच्या झगड्यांत जी पद्धति त्यांनीं अंगीकारली तिचाच उपयोग बाहुल्येंकरून या काळांत ते करीत गेले. विस्मयपूर्ण, विलोभनीय व उत्तेजक अशा आमच्या या भूमिखंडांतल्या जीवनांत अंशभागी झालेल्या इतर थोर गृहस्थांच्या बाबतींत दक्षिण आफ्रिका ही ज्याप्रमाणें महान् अशी पाठशाला ठरली आहे, तसेंच गांधींच्या बाबतींतहि खरोखर घडून आलें.

'बाहुल्येंकरून' ती पद्धतीच ते चालवीत आहेत असें मीं म्हटलें. पण तंतोतंत तीच असें मी म्हणत नाहीं. अहिंसात्मक प्रतिकाराच्या पूर्वपद्धतीला आतां 'असहकार' हें नवें नांव मिळालें असून तिच्या जोडीला मोठें त्रासदायक पण परिणामकारक असें एक नवीन तंत्र त्यांनीं हिंदुस्थानांत बनवलें आहे. हें सुधारणेचें तंत्र म्हणजे अन्नत्याग. दक्षिण आफ्रिकेंतल्या लोकांना वृथा मनुष्यहानीची फार धास्ती वाटते. तेथें अन्नत्यागापर्यंत पाळी आली नाहीं, हें सुदैवच. हिंदुस्थानांत त्याच्या योगानें चमत्कार घडून आले असून, इतर साधनांनीं कदाचित् अप्राप्य अशा यशाची व कार्यसाधनेची पायरी गांधींना त्यामुळें गाठतां आली आहे.

या नवीन—निदानपक्षीं राजकीय युध्दांत तरी नवीन असणाऱ्या तंत्राकडे—अधिक बारकाईनें लक्ष देणें हिताचें ठरण्याचा संभव आहे. ग्रेटब्रिटनमध्यें विरोधीपक्षाचा नेता तत्कालीन सरकारनें अवलंबिलेला मार्ग चुकीचा आहे हें पटवून देण्यासाठीं आमरण अन्नत्याग करीत आहे अशी कल्पनासुद्धां माझ्याच्यानें करवत नाहीं. या ठिकाणीं अगदीं अनोळखीच्या अशा क्षेत्रांत आपण प्रवेश करीत आहों; लोकशाहीपासून, इतकेंच काय, तर पाश्चात्य संस्कृतीपासून फार भिन्न असें हें क्षेत्र आहे.

काळजीपूर्वक अभ्यास करण्यासारखी ही घटना आहे, असें मला वाटतें. या लेखांत तिच्याकडे धांवती नजर टाकणेंच काय तें मला शक्य होईल.

हिंदुस्थानांतील विचारांना व आचारांना सर्वस्वीं अभिनव वाटेल असें हें तंत्र नव्हे. चालढकल करणाऱ्या ऋणकोवर दडपण आणण्यासाठीं ऋणकोला नव्हे, तर स्वत:लाच क्लेश देण्याचा मार्ग हिंदुस्थानांत मान्य गणलेला आहे असें दिसून येतें. नाठाळ ऋणकोला कर्ज देण्यास भाग पाडावें म्हणून दिवाणी कोर्टांत बसविण्याची पद्धत, ही आपली पाश्चात्यांची आहे. हिंदुस्थानांत असें नव्हतें; हिंदुस्थानांत धनको स्वत:च तुरुंगांत जाऊन बसेल किंवा ऋणकोच्या उंबऱ्यावर उपास करीत राहील. हेतु असा कीं, त्यामुळें त्याच्या हृदयाला पाझर फुटावा व त्यानें आपल्या किंवा आपल्या मित्राच्या थैलीचें तोंड खोलावें. गांधींनीं ह्याच हिंदी तंत्राचा अवलंब केला असून त्याची योजना व त्याचा विस्तार यांत ते बदल करीत आहेत. सरकारच्या अथवा जमातींतील एकाद्या हट्टी गटाच्या दाराशीं बसून त्यांचें मन वळविण्याकरतां किंवा खरें बोलावयाचें, तर अधिक चांगला मार्ग स्वीकारण्याची सक्ति करण्याकरतां अवश्यच झालें तर ते आमरण उपवास करतील. आणि धनकोप्रमाणेंच गांधीसुद्धां जे यशस्वी होतात ते बुद्धिवादामुळें किंवा मतपरिवर्तनामुळें नव्हे, तर फार खोल वसत असलेल्या भीतीच्या, लज्जेच्या, अनुतापाच्या, सहानुभूतीच्या, मानवप्रेमाच्या, व जागृत विचारांच्या आसनाखालीं राहिलेल्या आणखी इतर सुप्त भावनांना जागृत करून ते यशस्वी होतात. या भावनांचा समुच्चयस्वरूपांतील परिणाम बुद्धिवादापेक्षां अथवा मतपरिवर्तनापेक्षां फार प्रभावी असतो. ऋणकोचें–विरोधी सरकारचें अथवा जमातीचें–अधिष्ठान नैतिक दृष्ट्या ढांसळून पडतें आणि ह्या भावनासमुच्चयाचा परिणाम होऊन तो अशरण होऊन जातो.

कांहीं दृष्टींनीं आपल्या युगांत मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या प्रचारांतील पद्धतींहून फारशी भिन्न अशी ही पद्धति नाहीं. बुद्धिवादानें नव्हे, तर भावनांना खेळवून–आणि त्यांपैकीं पुष्कळशा भावना तर्कविरुद्धहि असतात—जनतेला विवश करणें हाच परिणाम त्या प्रचारामुळेंहि घडून येतो. ज्याप्रमाणें आजकाल पाश्चात्य जगांत जनतेचें मन भ्रष्ट व कलुषित करण्याकरतां प्रचाराच्या साधनांचा दुरुपयोग करण्यांत येत आहे,

त्याचप्रमाणें हें तंत्रदेखील धोक्याचें असून त्याचा दुरुपयोगहि होण्याचा संभव आहे, असा तार्किक निष्कर्ष एकाद्याला काढतां येईल. दृष्टीसमोर असणारीं उद्दिष्टें उच्च असोत वा हीन असोत, ह्या पध्दतीनें तर्कशक्ति व व्यक्तिगत जबाबदारी नष्ट होते व मानवी स्वभावाचा बालेकिल्ला असा जो व्यक्तिमत्वाचा गाभारा तो भ्रष्ट होतो; म्हणून ही पध्दति धोक्याची होय.

तथापि, गांधींचें उपवासाचें तंत्र हें एका महत्त्वाच्या बाबतींत पाश्चात्य प्रचारपद्धतीहून भिन्न आहे. अन्नत्यागी व्यक्ति आपल्या स्वतःच्या क्लेशांचें दृश्य व तत्संबंधींचे विचार जनतेच्या समोर उभे करुन तिला जागृत करण्याचा प्रयत्न करीत असते. आत्मक्लेशांमुळें व इतरांच्या अपराधांबद्दल स्वतः क्लेश भोगण्यामुळें त्यांच्या भावनांचें शुद्धीकरण होतें, या तत्त्वावर गांधींचें हें तंत्र आधारलेलें आहे. ॲरिस्टॉटलच्या व्याख्येप्रमाणें शुध्दीकरणाच्या व उदात्तीकरणाच्या बाबतींत अभिजात दुःखान्तिकेचा जो परिणाम घडून येतो तोच या तंत्रामुळेंहि साध्य होतो.

दुःखान्तिकेसंबंधींच्या ग्रीक लोकांच्या कल्पनेशींच येथें आपला संबंध येत नसून अंतःकरणामध्यें खोलवर रुजलेल्या ज्या भावनांपासून धर्मांचा उगम झालेला आहे, त्यांच्याशीं येथें आपला संबंध येत आहे. ख्रिश्चन धर्मामध्यें आत्मक्लेशांच्या भावनेला मध्यवर्ती स्थान मिळालेलें आहे. सबंध मानवी इतिहासामध्यें अत्यंत अर्थपूर्ण अशी जी शोकपर्यवसायी घटना घडून आली, तिचें द्योतक म्हणून क्रूसाचें चिन्ह अद्यापि अस्तित्वांत आहे. आपल्या बांधवांसाठीं आपलें अंतःकरण खोलणाऱ्या क्रूसावरील क्लेशमग्न येशूकडे पाहून, ज्या भावना निर्माण होतात त्यांचा आवेग बुद्धिवादानें व तर्काधिष्ठित परिवर्तनानें निर्माण होणाऱ्या भावनावेगापेक्षां अनंतपटीनें अधिक असतो. दुःखाचे बोल हे अत्यंत परिणामकारक ठरलेले आहेत. रोमन साम्राज्याच्या प्रारंभकालीं भिन्न भिन्न धर्मांचा जो गलबला चालू होता त्यांतून धर्मप्रचारकांच्या कौशल्यानें नव्हे, तर आत्मक्लेशाच्या व बलिदानाच्या बळावर ख्रिश्चन धर्मानें वाट काढली. त्या संस्कृतिसंपन्न काळांत प्रचलित असलेल्या विविध दर्शनांनींदेखील ख्रिश्चन धर्माच्या प्रगतींत अडथळा निर्माण झाला नाहीं. त्याचप्रमाणें सांप्रत काळींसुद्धां

युरोपांतील क्रूर व पशुवृत्ती पंथ, भिन्न वंशांच्या, भिन्न धर्मांच्या वा भिन्न मतांच्या लोकांना ज्या यातना फार मोठ्या प्रमाणावर देत आहेत त्या यातनानांच कदाचित् स्फोटक स्वरूप प्राप्त होऊन त्यामुळें युरोपांत मोठ्या अभिमानानें निर्माण करण्यांत येत असलेल्या शासनपद्धतींच्या ठिकऱ्या उडतील. आत्मक्लेशाच्या या सामर्थ्यवान् तत्त्वावरच गांधीजींनीं आपलें सुधारणेचें नवीन तंत्र बसविलें आहे. त्यांना जें कार्य अंतःकरणापासून व्हावेसें वाटतें, त्यासाठीं इतरांची सहानुभूति व साहाय्य मिळावें म्हणून ते स्वतःच यातना भोगतात. बुद्धिवादाचे व मतपरिवर्तनाचे नेहमींचे राजकीय मार्ग जेथें अयशस्वी ठरतात त्या ठिकाणीं हिंदुस्थानांत व पौर्वात्य देशांत प्राचीन काळापासून चालत आलेल्या पद्धतीवर आधारलेलें हें नवीन तंत्र गांधी हातीं घेतात. मीं वर म्हटल्याप्रमाणें राजकारणाच्या अभ्यासकांनीं लक्ष देण्यासारखा हा मार्ग आहे. राजकारणपद्धतींमध्यें गांधीजींनीं ही ठळक अशी भर टाकलेली आहे.

आणखी एक विचार सांगून मी पुरें करतों. पुष्कळ माणसें अशीं आहेत कीं, जीं त्यांचीं मनापासून चाहातीं असूनसुद्धां त्यांच्या कांहीं कल्पनांच्या व कार्यपद्धतींच्या बाबतींत त्यांच्याशीं सहमत होणार नाहींत. त्यांची कार्यपद्धति व्यक्तिविशिष्ट आहे, खास त्यांची अशी आहे, व इतर थोर लोकांच्या बाबतींतल्याप्रमाणेंच नित्याच्या परिमाणाशीं न जुळणारी आहे. तथापि, त्यांच्याशीं आमचे कितीहि मतभेद झाले, तरी त्यांच्या प्रामाणिकपणाची, त्यांच्या निःस्वार्थ बुद्धीची व विशेषतः त्यांच्या मूलगामी व जगद्व्यापी मानवप्रेमाची जाणीव आम्हांला आहे. सर्व वर्गांच्या, सर्व वंशांच्या व विशेषतः दलितांच्याबद्दल गाढ सहानुभूति ठेवून ते नेहमीं एकाद्या महापुरुषाप्रमाणें वागतात. त्यांच्या दृष्टिकोणांत संकुचितपणा असा नाहीं; अंतःकरणाच्या खऱ्या थोरपणाची साक्ष पटविणारें जें सर्वव्यापी व चिरंतन असें मनुष्यप्रेम तें त्यांत ठळकपणें दिसून येतें.

युरोपमध्यें संमोहाचा व अधोगतीचा काल प्राप्त झाला असतां, आशिया खंड धीरेधीरे आघाडीवर येत आहे ही कुतूहलाची गोष्ट होय. जगाच्या आजच्या सार्वजनिक रंगभूमीवर जीं सर्वश्रेष्ठ माणसें आहेत, त्यांतील दोन आशियाखंडांतील आहेत. एक गांधी व दुसरे चियांग कै शेक. दोघेहि

असंख्य अशा जनसमुदायाला उच्च मार्गानें अशा एका भवितव्याकडे नेत आहेत, कीं जें पाश्चात्य राष्ट्रांना तत्त्वतः प्राप्त झालेल्या–परंतु त्यांच्याकडून आजकाल मनःपूर्वक व्यवहारांत न उतरविल्या जाणाऱ्या–उदात्त अशा ख्रिश्चन ध्येयाशीं एकरूप आहे.

---

# गांधींचें तत्त्वज्ञान

## लेखक : **एच्. वाय्. एस्. एल्. पोलाक** ( लंडन )

कांहीं वर्षांपूर्वीं डॉक्टर मॉडरॉयडन्च्या अमदानींत गिल्डहौसमध्यें " आधुनिक विचारांचे प्रणेते " या विषयावर जी व्याख्यानमाला झाली तींत गांधीजींना स्थान देण्यांत आलें, ही गोष्ट सहजगत्या झालेली नाहीं. आजकालच्या थोर पुरुषांचें मोल जोखण्याची आणि विचारांत व आचारांत त्यांनीं टाकलेल्या भरीचें विवेचन करण्याची वेळ येईल, तेव्हां हिंदुस्थानच्या या सर्वश्रेष्ठ पुढाऱ्याच्या नांवाहून विधायक कार्याच्या व महत्त्वाच्या दृष्टीनें अधिक श्रेष्ठ असें नांव बहुधा आढळून येणार नाहीं.

ज्यांचीं नांवें लोकांच्या तोंडीं अधिक वेळां येतात, असे दुसरे पुढारी जगांत आहेत. ते जीवनाकडे नव्हे, तर मृत्यूकडे नेणारे पुढारी आहेत. ते उच्च भूमीवर नेऊन बसविणारे नव्हेत, तर खाईंत लोटणारे पुढारी आहेत. मागें रानटीपणाकडे नेणारे ते पुढारी आहेत, पुढें उदात्त संस्कृतीकडे नेणारे ते नव्हत. वंशवर्चस्वाच्या तत्त्वाला नकली ईश्वरी इच्छेचें स्वरूप आणून देणारे ते पुढारी आहेत; ईश्वराच्या कृपाछत्राखालीं विश्वबंधुत्वाची जोपासना करणारे पुढारी ते नव्हेत.

मागें वळून इतिहासाच्या धुक्याकडे न्याहाळून पाहून त्यापासून दृष्टिगत होणारें तात्पर्य आत्मसात् करणाऱ्या व त्याचे परिणाम काय घडून येतात तें समजावून घेणाऱ्या कोणत्याहि मनुष्याला याविषयीं शंका उरणार

नाहीं, कीं अखेरीला या आधुनिक सीझरांनीं चालविलेली हिंसेची उपासना यशस्वी होणारी नसून गांधीजींची अहिंसेची शिकवणच यशस्वी ठरणार आहे. गांधींचे विजय हे आध्यात्मिक भूमींत मिळवलेले विजय आहेत, मानवजीवनाच्या पुनरुज्जीवनाचें बीज त्यामुळें पेरलें जात आहे. याच्या उलट, त्यांचे विजय आधिभौतिक जगांतील असून त्यांचा विजयमार्ग रक्तानें व अश्रूंनीं न्हालेला आहे. गांधी आत्मक्लेशानें आपल्या विरोधकाला जिंकतील, तर हे जे कांहीं व जो कोणी आपल्या आड येईल त्याचें क्रूरपणें निर्दालन करून मानवजातीच्या क्लेशांत भर टाकतील.

कित्येक वर्षांपूर्वी गांधीजी मला म्हणाले, " राजकारणांत गुरफटून पडलेला हा एक संत आहे, "असें लोक मला म्हणतात. खरी गोष्ट अशी आहे कीं, " मी संत बनण्याचा आटोकाट प्रयत्न करणारा राजकारणी पुरुष आहे." हेतुपुर:सर व नियमपालनानें पूर्णतेच्या उच्चतर पातळीपर्यंत उत्क्रांत होऊं पाहणाऱ्या मानवी अपूर्णतेची त्यांनीं दिलेली ही एक नम्र, साधीसुधी व वर्तमानकालीन कबुली आहे. ' सत्यशोधक ' म्हणून त्यांनीं केलेल्या यात्रेच्या पन्नास वर्षांच्या कालांत त्यांच्या हातून घडलेल्या व त्यांनीं मान्य केलेल्या आचारांतील व विचारांतील स्खलनांचा यावरून उलगडा होतो. ' सत्यापरता नाहीं धर्म ' असा दृढ आग्रह धरण्याच्या कामीं त्यांनीं कधींहि कसूर केलेली नाहीं, हें मान्य करण्याकरितां त्यांच्या मतें ठरलेले उत्तम मार्ग यांविषयीं त्यांच्याशीं आपलें सहमत झालेंच पाहिजे असें नाहीं. ध्येय अढळ ठेविलें; श्रद्धा अचल राखिली; माणसाकडून यापेक्षां अधिक अपेक्षा कां करावी ? क्वचित् प्रसंगीं ते अडखळले किंवा घसरले तर काय झालें ? सत्यपंथास लागलेल्या मानवाला येणारे हे तर नित्याचे प्रसंग नव्हेत काय ? आपण माघारीं फिरावें व स्वत: आंखलेल्या ध्येयाप्रत अधिक बिनचूक रीतीनें जावें, म्हणून देण्यांत आलेल्या भयसूचना या दृष्टीनें मी अशा प्रसंगांकडे पहातों, अशी खात्री असूं द्या, असें गांधी आपणांस सांगत असतात.

आपल्या यात्रेंत ते अनेक तत्त्वें शिकले, व त्यांनीं व्यवहारज्ञानाचा संचयहि केला. याच मार्गानें जाणाऱ्या यच्चयावत् व्यक्तींची मालकी या

धनसंचयावर आहे. ( तत्त्व ) मंत्रांच्या नुसत्या पठणाबद्दल त्यांना आस्था वाटत नाहीं. मानवी जीवनाच्या गरजांसाठीं जे सामान्य व्यवहार चालले आहेत, त्यांना जुळता असा अर्थ त्यांत असला पाहिजे. शिवाय तीं सर्वत्र लागू पडलीं पाहिजेत. तशीं न पडतील तर तीं बहुतांशीं असत्य असलीं पाहिजेत असें त्यांना वाटतें. म्हणून जीवनांतील एक व्यवहार्य नियम म्हणून त्यांनीं केलेलें अहिंसेच्या तत्त्वाचें पुढील स्पष्टीकरण आश्चर्य-कारक वाटण्याचें कारण नाहीं.

" इतरांशीं येणाऱ्या आपल्या संबंधांत जर आपण अहिंसा ( दुसऱ्या एका ठिकाणीं गांधीजींनीं या अहिंसेला 'सत्याचें परिपक्क फल' असें संबोधिलें आहे ) पालन केली नाहीं व मोठ्या कार्यांत मात्र तिचा उपयोग करण्याची आशा बाळगिली तर ती फार मोठी चूक होईल. दातृत्वा-प्रमाणेंच अहिंसेलादेखील घरापासूनच प्रारंभ झाला पाहिजे. जर व्यक्तीला अहिंसेची शिकवण देण्याची आवश्यकता आहे, तर राष्ट्राला अहिंसेची शिकवण देणें अधिकच आवश्यक ठरतें. स्वतःच्या परिवारांत अहिंसेचें पालन करावयाचें व बाहेर मात्र हिंसा करावयाची हें अशक्य आहे. किंवा कदाचित् आपल्या परिवारांतसुद्धां खरी अहिंसा आपण पाळीत नसूं. पुष्कळ वेळां ही अहिंसा दिखाऊ असते. जेव्हां प्रतिकार होऊं लागतो, तेव्हांच फक्त आपल्या अहिंसेची कसोटी लागते. सज्जन मनुष्यांमध्यें राहत असतांना आमची वागणूक अहिंसक होती, या म्हणण्यांत तथ्य नाहीं. परस्पर–सहिष्णुता ही अहिंसा होय. म्हणून अहिंसा हाच जीवनधर्म आहे अशी खात्री होतां क्षणीं, जे तुमच्याशीं हिंसेनें वागतात त्यांच्याशीं तुम्हीं अहिंसेनेंच वागलें पाहिजे. आणि हा धर्म व्यक्तीप्रमाणेंच राष्ट्रांनाहि लागू केला पाहिजे. याला अभ्यासाची आवश्यकता आहे हें निःसंशय. आरंभ हा नेहमींच अल्प असणार. पण जर निश्चय असेल तर बाकीच्या गोष्टी आपोआप होत जातील." " तुम्हीं योग्य तीं ध्येयें ठेवा म्हणजे केव्हांना केव्हां तरी तीं साध्य होतील " हें जें त्यांचें एक जुनें वचन आहे, तेंच येथें विस्तारानें सांगितलेलें आहे.

ज्यांच्या सत्ता–संपादनाच्या राजकारणामुळें आपणांला वाटणाऱ्या उदात्त वस्तुजाताचा विच्छेद होण्याचा धाक जगाला उत्पन्न झाला आहे, अशा

हुकुमशहांना, हिंसा व क्रौर्य यांचे बली बनलेल्या भयमूढ लोकांना, आणि आधुनिक विजयलालसेच्या निर्दयतेचें व लोभाचें लक्ष्य बनलेल्यांना, हिंदुस्थानांत ( व पॅलेस्टाइनमध्यें ) प्राचीन काळापासून चालत आलेली ही शिकवण निव्वळ खुळेपणाचीच वाटणार. तथापि, प्रेमानें द्वेष जिंकावा, स्वतःवर करतों त्याचप्रमाणें शेजारच्यावरहि प्रेम करावें, आपण सर्व एकमेकांचे बंधू आहोंत, हें सांगणारे गांधीजी व त्यांचे आध्यात्मिक पूर्वज हेच बरोबर असण्याचा संभव नाहीं काय ? दळणवळणाच्या व वहातुकीच्या साधनांची गति वाढलेल्या, विचारांची देवाण घेवाण व परस्परावलंबित्वाची जाणीव वाढत्या प्रमाणावर होत असलेल्या या जगांत मानवजात व उच्च नीति हीं टिकून राहावयाचीं असतील, तर पुरातनच पण आधुनिक भाषेंत सांगण्यांत येणारें हें तत्त्व व्यवहारांत आणणें हा एकच उपाय ठरलेला नाहीं काय ?

इतरांचें वर्णन ‘ पुढारी ’ म्हणून करण्यांत येतें, तर गांधीजींना ( त्यांना अगदीं नापसंत असून सुद्धां ) ‘ महात्मा ’ अशी पदवी देण्यांत येते, ती उगीच नाहीं. तीस वर्षांपूर्वी खोल दृष्टीनें एका महान् आत्म्यानें पुढीलप्रमाणें लिहून ठेविलें आहे. “ आत्म्याचें सामर्थ्य अतुल आहे. शस्त्रबळापेक्षां तें श्रेष्ठ आहे. असें असतां तें केवळ दुर्बळांचें आहे असें कसें म्हणतां येईल ? जे लोक हिंसेचा उपयोग करतात, ते सत्याग्रहीला आवश्यक असणाऱ्या धैर्याशीं अपरिचित असतात...खरा लढवय्या कोणाला म्हणावें ? जो मृत्यूला सदैव जिवलग मित्राप्रमाणें समजतो त्याला. मनावर ताबा असला म्हणजे झालें. तसा ताबा मिळविला, कीं मनुष्य मुक्त होतो... आणि त्याच्या केवळ दृष्टिपातानें शत्रूचें भस्म होतें. ” “ अखेरपर्यंत एकाद्यासुद्धां सत्याग्रह्यानें टिकाव धरला तरी विजय ठेवलेला आहे, ही माझी अढळ श्रद्धा आहे ” असें ते आग्रहानें व न कचरतां जाहीर करीत असतात, यांत आश्चर्य नाहीं.

हल्लींच्या काळांत युद्धपिपासू व्यक्ती जगाला उद्देशून ध्वनिक्षेपकांतून हुकूम सोडीत असतात आणि आपल्या भाषणांतले जणुं स्वल्पविराम, पूर्णविराम म्हणून बॉम्बफेक व विषारी धूर यांचा उपयोग करतात. इतर राष्ट्रांवर मिळविलेल्या विजयाचा डंका गाजवीत धुळीस मिळविलेल्या

स्वातंत्र्यागारांतून मस्तपणें फिरत असतात. जनता ही त्यांच्या आत्मश्लाघेचें साधन व त्यांच्या हिंसेचा बळी झालेली असते. हिंदुस्थानांतील आजच्या या उपदेशकाच्या सौम्य वचनाहून, मानवाच्या आध्यात्मिक शक्तीसंबंधीं तो धरीत असलेल्या आग्रहाहून, शांति, प्रेम व बंधुत्व यांच्या प्राचीन संदेशाची जी स्मृति तो करून देत आहे तिच्याहून, उपरोक्त गोष्टी किती भिन्न दिसतात! नवयुगाचा संदेश नेहमींप्रमाणेंच आतांहि पूर्वेकडूनच दिला जात आहे. तो ऐकण्याची व समजूत घेण्याची पात्रता आपणांजवळ आहे काय? आपण कांहीं अभिनव सांगत आहोंत अशी बतावणी गांधीजी करीत नाहींत. आपल्या आत्मकथेंत ते म्हणतात, "ज्या ऋषीला सत्यज्ञान झालें, त्यानें भोंवतीं माजलेल्या हिंसेंतून अहिंसा शोधून काढिली आणि त्यानें सांगितलें कीं, 'हिंसा मिथ्या असून अहिंसा हेंच सत्य आहे.'"

गेल्या पिढींत धर्माची विटंबना करणें व मानवी अज्ञानापैकीं श्रद्धेमुळें उरलेला एक अवशेष म्हणून धर्माला त्याज्य ठरविणें ही टूम होऊन बसली होती. तिचाच तरुण मंडळींत पुनः एकवार उद्भव झालेला दिसतो. हिंदुस्थानांत सुद्धां हीच सदोष विचारसरणी पसरलेली असेल व तेथील अनेक तरुण स्त्रीपुरुष वाडाबरोबर ऊंसहि टाकायला तयार झाले असतील याविषयीं मला शंका नाहीं.

तेथील महान् ऋषींच्या वचनांचें ते अधिक मनन करतील व प्राचीन ज्ञानांतील सत्यार्थ पुनः संशोधून काढण्याचा प्रयत्न करतील, तर फार बरें होईल. प्राचीन ज्ञानापासून शहाणपण शिकण्याची त्यांची तयारी नसेल, तर स्वतःच्या थोर राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं अधिकारवाणीनें जें लिहिलें आहे, त्यापासून तरी निदान त्यांनीं बोध घ्यावा.

"धर्म म्हणजे आपणाला परकी अशी कोणतीहि चीज नव्हे...तो अंतःकरणांतून विकास पावावयाचा असतो. तो नेहमींच आपल्या ठायीं असतो. कांहींच्या ठिकाणीं तो जागृत असतो, कांहींच्या ठिकाणीं तो सुप्त असतो. पण तेथें तो सदैव आहेच, आणि आपणांस कोणतीहि गोष्ट योग्य मार्गानें करणें असेल, अथवा टिकाऊ अशी एकादी गोष्ट साध्य करणें असेल तर ही आपल्या ठिकाणीं असलेली धर्मविषयक सहजप्रवृत्ति

जागृत करणें भाग आहे. मग ती बाह्य साहाय्यानें जागृत होवो किंवा अंतर्विकासानें जागृत होवो. ”

त्याचप्रमाणें त्यांनीं आपणांस असेंहि सांगितलें आहे कीं, अहिंसा हा सत्याचा आत्मा असून अहिंसा हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे. ते पुढें म्हणतात— मग आपला त्यावर विश्वास असो अथवा न असो— “ कधींहि न पुसटला जाणारा ठसा आपल्या शत्रूच्या मनावर उमटवील अशा प्रकारें तुम्हीं आपलें प्रेम—अहिंसा—व्यक्त केलें, तर त्यालाहि त्या प्रेमाची परतफेड करावी लागेल. ”

टॉल्स्टॉयच्या नंतर थोड्याच अवधींत दुसरा एक थोर मानवभक्त ज्या काळांत निर्माण झाला, अशा काळांत राहणें ही आनंदाची गोष्ट आहे. हे लहानथोर साधू आणि संत, द्रष्टे आणि भक्त, वातावरण शुद्ध करून सर्व बाजूंनीं घेरून टाकणाऱ्या अंधारांत कशी प्रभा फांकीत आहेत पहा! आपणांस आपल्या ठिकाणच्या दैवी गुणांचा पुनः एकवार लाभ व्हावा व उमेदीनें आपली प्रयत्नक्षमता विकसित करून ज्या उच्च भूमीला आपले पाय लागलेले नाहींत तेथें चढून जाण्याचें अचल धैर्य अंगीं यावें, यासाठीं प्रत्येक युगायुगाला व पिढीपिढीला आपलीं अंतःकरणें निर्मळ धुणारे असले अध्यात्मवादी रजक उपलब्ध झाले नसते, तर आपली काय दशा झाली असती?

ऑलिव्ह श्राइनरच्या एका गद्यकाव्यांत तिनें एका सत्यशोधकाचें चित्र रेखाटलें आहे. स्वप्नांत पाहिलेल्या ‘सत्यविहंगमा’च्या शोधासाठीं तो भटकत असतो. एका गिरिशिखरावर त्या विहंगमाचें गळलेलें पीस हृदयाशीं कवटाळून तो मरणोन्मुख पडलेला आहे, अशा स्थितींत तिनें आपला कथाभाग संपविला आहे. आपल्या सत्तराव्या वर्षीं गांधीजींनीं आपणांला जो संदेश दिला आहे, तो त्या पिसाप्रमाणेंच असण्याचा संभव आहे. आपल्या मरणकालीं जरी तो आपण आपल्या हृदयाशीं कवटाळला व आत्मसात् केला, तरी देखील आपण खरे भाग्यवान् ठरलों असें म्हणतां येईल.

# गांधींकडून हिंदुस्थाननें घेतलेलें ऋण

## लेखक : **बाबू राजेंद्रप्रसाद**, एम्. ए.

### ( अध्यक्ष, हिंदी राष्ट्रीय सभा, पाटणा )

हिंदी राजकारणांत महात्मा गांधींनीं टाकलेली भर फार मोठी आहे. १९१५ सालीं दक्षिण आफ्रिका कायमची सोडून ते हिंदुस्थानाला परतले, तत्पूर्वी तीस वर्षे हिंदी राष्ट्रीय सभा अस्तित्वांत होती. राष्ट्रीय सभेनें थोड्याशा प्रमाणांत राष्ट्रीय भावना जागृत व संघटित केली होती; पण ती जागृति इंग्रजी शिक्षण घेतलेल्या मध्यम वर्गापुरतीच मर्यादित होती; जनतेंत तिचा शिरकाव झालेला नव्हता. गांधींनीं तिचा प्रवेश जनतेंत करून दिला व तिला जनतेच्या चळवळीचें स्वरूप आणलें. महात्मा गांधींच्या चळवळीचें कार्य समाजांतील वरच्या थरापासून खालच्या थरापर्यंत व समाजाच्या एका अंगापासून दुसऱ्या अंगापर्यंत चालतें. सर्वस्वीं राजकीय नव्हेत, परंतु जीं फार मोठ्या जनविभागाच्या जीवनाशीं निगडित झालीं आहेत, अशीं कार्यें त्यांनीं हातीं घेतलीं. मळेवाल्यांच्या हितासाठीं जुलमानें निळीची लागवड करण्याची जी अन्याय्य पद्धति होती तिच्यामुळें शभर वर्षांहून जास्त काळ ज्या शेतकऱ्यांनीं व शेतमजुरांनीं क्लेश भोगले, त्यांच्या वतीनें चंपारण्यामध्यें त्यांनीं जो यशस्वी सत्याग्रह केला,त्यामुळें राष्ट्रीयसभेचें कार्यक्षेत्र वाढून त्याला एकदम जनतेच्या चळवळीचें स्वरूप प्राप्त झालें. अन्याय्य अशा साऱ्याची फेरआकारणी व्हावी म्हणून खेडा जिल्ह्यांत त्यांनीं जो तितकाच यशस्वी सत्याग्रह केला त्याचाहि तेथील जनतेवर तसाच परिणाम झाला. देशांतील मोठ्या नोकऱ्यांतून अथवा गव्हर्नरच्या कार्यकारी मंडळांतून अधिक जागा मागणें एवढ्यापुरतेंच कॉंग्रेसचें राजकारण मर्यादित राहिलें नाहीं. श्रमजीवी जनतेच्या क्लेशांशीं तें समरूप झालें; इतकेंच नव्हे, त्यांचे क्लेश हरण करण्याच्या कामीं तें यशस्वी ठरलें. १९१७ व १८ सालीं झालेल्या या प्रारंभींच्या चळवळींसारख्याच इतर

चळवळी नंतर झाल्या. एकाद्या छोट्या वर्गाचें अथवा गटाचें नव्हे, तर सर्वसाधारण जनतेचें हित साधणें हें या सर्व चळवळींचें ध्येय आहे. सवलती मिळविण्यासाठीं झालेले हे लढे केवळ ब्रिटिश खोतांविरुद्ध अगर ब्रिटिश सरकारविरुद्ध उभे करण्यांत आले होते असें नाहीं. हिंदी खोत व सनातनी यांच्यावर तितक्याच जोरानें वेधडकपणें हल्ला चढविण्यांत आला. कारखान्यांतून हिंदी मजुरांना असमाधानकारक परिस्थितींत काम करावें लागतें, ही गोष्ट गांधींच्या दक्ष नजरेंतून सुटली नाहीं. अगदीं सुरवातीलाच त्यांनीं कोणती गोष्ट केली असेल, तर ती म्हणजे अहमदाबादच्या कामगारांना सवलती मिळवून देणें. दलितवर्गांना सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांमुळें हिंदूमध्यें प्रचलित असलेल्या दुष्ट व अन्यायी अशा अस्पृश्यतेच्या चालीवर कठोरपणें हल्ला चढवणें आवश्यक झालें. महात्मा गांधींनीं स्वतःचे प्राण धोक्यांत घालून तिच्यावर हल्ला चढविला. राष्ट्रसभेची संघटना वाढली असून ह्या विशाल देशाच्या कडेपर्यंत ती पसरली आहे व तिच्या पटावर लाखों स्त्रीपुरुषांचीं नांवें नोंदलेलीं आहेत; परंतु राष्ट्रीय सभेच्या सभासदांच्या संख्येवरून दर्शित होते, त्यापेक्षां तिची प्रतिष्ठा अधिक व्यापक आहे. राष्ट्रीय सभेनें हांक मारतांच जें क्लेशांचें व त्यागाचें दिव्य लोकांनीं पार पाडलें, त्यावेळीं तिच्या प्रतिष्ठेची कसोटी लागली.

परंतु पूर्वीं कधींहि झाली नव्हती अशी संघटना केली व हिंदुस्थानांतील जनतेंत राजकीय जागृति केली यांत महात्मा गांधींच्या अत्यंत थोर अशा देणगीचें महत्त्व सांठविलेलें नाहीं. अन्यायाशीं झुंजण्याची त्यांनीं सांगितलेली व वापरलेली पद्धति ही हिंदी राजकारणाला व कदाचित् अखिल जगतांतील यातनामग्न मानवजातीलाहि त्यांनीं दिलेली महान् देणगी होय, असें मला वाटतें. शस्त्रावांचून प्रबळ अशा ब्रिटिश साम्राज्याबरोबर यशस्वी रीतीनें लढा करणें कसें शक्य होतें, तें त्यांनीं आम्हांस शिकविलें आहे. आम्हांला व सर्व जगाला त्यांनीं युद्धाऐवजीं उपयोगी पडणारा एक नैतिक पर्याय सांगितला आहे. मिथ्याभास व असत्य यांत राजकारण रुतलेलें होतें; तें अधोगतीला पोंचलें कीं त्याला कृष्णस्थानांचें स्वरूप येई, व फार उन्नत झालें तरीहि राजकारणाच्या वक्र वचनांतून आणि गुप्त कारस्थानांतून त्याला बाहेर पडतां येत नसे, अशी स्थिति होती. तेथून त्याला उद्धरून

त्यांनीं राजकारणास अशा उच्च ध्येयवादाच्या भूमिकेवर नेऊन बसविलें आहे, कीं जेथें उद्दिष्ट कितीहि उदात्त असलें तरी कोणत्याहि परिस्थितींत अशुद्ध व अस्वच्छ साधनें वापरणें समर्थनीय ठरूं नये. प्रत्यक्ष राजकारणांतसुद्धां त्यांनीं सत्याला त्याच्या उज्ज्वल स्थानावर कायम ठेविलें आहे. मग त्या क्षणापुरते त्याचे परिणाम कितीहि अपायकारक दिसोत. त्यांचा स्पष्टवक्तेपणा व आपल्यांतील ओंगळ व दोषास्पद स्थळांचें आपले शत्रू समजण्यांत येणाऱ्या लोकांसमोर त्यांच्याकडून होणारें आविष्करण, या दोन गोष्टींमुळें त्यांचे शत्रू-मित्र दोघेहि गोंधळून जातात; परंतु स्वतःचे दोष झांकून नव्हे तर ते ओळखून त्यांच्याशीं दोन हात करण्यानें अंगीं सामर्थ्य येतें, असें ते मानतात. अहिंसेकडे दुर्लक्ष करून अथवा ती जरा शिथिल करून अल्पकालीन फायदे होतात असें वरकरणी दिसलें, तरी अनुभवानें असें पटलें आहे कीं, अहिंसेचें कांटेकोर पालन करणें, हा केवळ ऋजुपणाचा मार्ग आहे असेंच केवळ नव्हे; तर ती चातुर्याची राजकीय नीतीहि आहे. त्यांच्या शिकवणुकींतील नैतिक व आध्यात्मिक आवेशामुळेंच जनमन त्यांना वश झालें. जनतेला दिसून आलें कीं, सगळीकडे अंधाराचा वेढा पडला असतां आपल्या दुःखांतून व गुलामगिरींतून बाहेर पडण्याचा मार्ग त्यांनींच काढिला आहे. निस्सीम दुबळेपणाची भावना आपणांस झाली असतां सत्य व अहिंसेच्या द्वारा त्यांनीं आपणांस आपल्या शक्तीची साक्ष पटवून दिली आहे. मनुष्य कांहीं जन्मतःच शस्त्रसंनद्ध नसतो. त्याला वाघाप्रमाणें नख्याहि नसतात, अथवा रानरेड्याचीं शिंगेंहि नसतात. आत्मा तेवढा जन्मतः त्याच्यापाशीं असतो. स्वतःच्या रक्षणासाठीं व उद्धारासाठीं त्यानें असल्या बाह्य वस्तूंवर कां अवलंबून राहावें? त्यांच्यावर अवलंबून राहिलें तर आपण मृत्यूच्या व संहाराच्या भक्ष्यस्थानीं पडूं. उलट, आपल्या ठिकाणचा आत्माराम आपण जागृत केला तर जीवन व स्वातंत्र्य यांचा लाभ आपणांस होईल, हें महात्मा गांधींनीं आपणांस शिकविलें आहे. आत्मशक्ति एकदां जागृत झाली, बाह्य वस्तू व परिस्थिति यावर अवलंबून राहण्याचें सोडून दिलें आणि आत्मविश्वास व आत्मावलंबन निर्माण झालें, म्हणजे आपल्याला दास्यांत ठेवील अशी कोणतीहि शक्ति अवनीतलावर उरणार नाहीं.

हा आत्मसाक्षात्कार हिंदुस्थानला हळुहळू परंतु निश्चित व अखंडपणें होत चालला आहे व त्या आत्मसाक्षात्काराच्या प्रमाणांत त्याच्या अंगीं दुर्धर्षत्व येत आहे. देव करो आणि महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं स्वीकारलेल्या सत्याच्या व अहिंसेच्या सरळ पण अरुंद मार्गापासून हिंदुस्थान कधींहि च्युत न होवो. महात्मा गांधींनीं हिंदुस्थानच्या राजकारणाला दिलेली महान् देणगी ती हीच. आणि हीच देणगी हिंदुस्थानकडून जगाच्या मुक्ततेसाठीं अर्पण करण्यांत येईल.

---

# कविवर्यांचा निर्णय

## लेखक : **रवीन्द्रनाथ टागोर**

( शान्तिनिकेतन, बोलपूर, बंगाल )

ज्यांची मानसिक उंची सामान्य मानवांच्याहून अधिक आहे असे इतिहासनिर्माते पुरुष राजकारणाच्या क्षेत्रांत अधुनमधून दृष्टोत्पत्तीस येतात. मानवी स्वभावांतील लोभ, भीति, अभिमान इत्यादि विकारांना वश करून सत्ता गाजविण्याचें असें एकादें साधन ते धारण करतात, कीं जें इतरांना वांकविण्याच्या बाबतींत जवळजवळ बाहुबलासारखेंच बलात्कारी व अनेकदां त्याच्याप्रमाणें निर्दय असतें.

पण जेव्हां महात्मा गांधी येथें आले व त्यांनीं हिंदुस्थानाला स्वातंत्र्याचा मार्ग खुला करून दिला, तेव्हां त्यांच्या हातीं कोणतेंहि दृष्टिगोचर असें सत्तासाधन नव्हतें; शत्रूला नमविण्याचा अनिवार्य असा अधिकार नव्हता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वापासून फांकणारी अधिकारप्रभा संगीताप्रमाणें किंवा सौंदर्याप्रमाणें वर्णनातीत होती. इतरांवर तिची फार मोठी सत्ता चालत होती. याचें कारण सहजस्फूर्त आत्मसमर्पणाचा साक्षात्कार तिनें करून

दिला हें होय! विरोधी परिस्थितीला इष्ट त्या रीतीनें वळविण्याचें जें सहज-चातुर्य त्यांच्या ठिकाणीं आहे, त्याचा या देशांतील जनता कधींच विशेष उल्लेख करतांना दिसत नाहीं, तें यामुळेंच. त्यांच्या स्वभावांतून जें निर्मळ सत्यप्रेम प्रकाशत असतें, त्यावरच विशेष भर देण्यांत येतो. याच कारणामुळें व्यवहार्य राजकारण हें त्यांचें कार्यक्षेत्र असलें तरीदेखील मानवतेचे भिन्न भिन्न आविष्कार समजून घेऊनहि त्याच्या पार पाहाणारी आणि संसारी बुद्धीला सत्यज्ञानाच्या अक्षय्य अशा उगमस्थानापासून स्रवणाऱ्या प्रकाशासन्मुख उभी करणारी आध्यात्मिक स्फूर्ति ज्यांच्याकडून प्राप्त होते, त्या महर्षींच्या स्वभावाशीं गांधींच्या स्वभावाचें जें साम्य आहे, त्याच्याकडेच लोकांचें मन वेधलें जातें.

---

# मुक्ति व परिग्रह

## लेखक : **विल्यम अर्नेस्ट हॉकिंग**

(तत्त्वज्ञानाचे आचार्य, हार्वर्ड विद्यालय)

इतर अनेक बाबतींत गांधीजींनीं आपल्या कालांतील लोकांना ज्याप्रमाणें मार्गदर्शन केलें आहे तसेंच मार्गदर्शन, इहलोकांतील मालकीच्या वस्तू व इतर सामाजिक संबंध यांच्या योगानें क्रियास्वातंत्र्य, इतकेंच काय, पण विचारस्वातंत्र्यसुद्धां कसें मर्यादित होत जातें, याचा अनुभव आला असतां व्यक्तिमात्रासमोर जो पेंच येऊन पडतो, त्याच्याहि बाबतींत गांधीजींनीं केलेलें आहे.

आपल्या संस्थांसंबंधीं आपण विचार करूं लागलों म्हणजे त्यांच्यांतील दोष प्रथम आपल्या ध्यानांत येतात. पाश्चात्य देशांतील सुशिक्षित माणसाला चर्चचे अनुयायी बनणें कठिण पडणें; कारण, चर्चचा कोणताहि

सांप्रदायिक सिद्धान्त जशाचा तसा स्वीकारणें त्याला शक्य होत नाहीं. त्याला कोणत्याहि राजकीय पक्षाचा स्वीकार करतां येत नाहीं. कारण, ते सर्व पक्ष आडमुठेपणामुळें व स्वार्थामुळें कलंकित झालेले असतात. या बंधनांपासून व कुटुंबाच्या आणि देशाच्या बंधनांपासून माणसाला मुक्त करण्याची फार बलिष्ठ अशी प्रवृत्ति तत्त्वज्ञानाच्या अभ्यासांत असते. तत्त्वज्ञानी हा पक्षाभिनिवेशी असतांच कामा नये; तो कलहातीत असला पाहिजे. तेंच वैराग्यधर्मामुळें आणखी एक टप्पा पुढें जातें. ईश्वराशीं सायुज्य जोडलें गेलें म्हणजे सर्व भेद लोपतात व सर्वव्यापी चिच्छक्तीशीं मनुष्य तत्त्वत: एकरूप बनतो. त्याचबरोबर व्यवहारदृष्ट्या त्याची उपयुक्तता व सार्थकताहि संपते.

गांधीजींनीं आपल्या देवतेला 'सत्य' या नांवानें संबोधिलें आहे. हें सत्यतत्त्व विश्वव्यापी असून विवादातीत आहे. त्यालाच ते 'राम' असेंहि म्हणतात. राजकारणांतून त्या एका तत्त्वाकडे जाण्याचा मार्ग ते शोधीत असतात; यामुळें आपल्या धोरणापासून व हितसंबंधांपासून अत्यंत दूर असणाऱ्या लोकांशींहि संभाषण करण्यास योग्य अशी समान भूमि त्यांच्याजवळ असते. तरीदेखील त्यांचाहि एक पक्ष आहे. ते स्वत: म्हणजेच तो पक्ष असेंसुद्धां म्हटलें तरी चालेल. ते मुद्यांची आंखणी करतात, निश्चित अशा सूचना मांडतात व त्यांच्या समर्थनार्थ 'हरिजनां'-तून व इतर पत्रांतून वादविवादहि करतात. व्यवहारास निरुपयोगी अतएव निरर्थक झालेल्या व्यक्तीच्या जीवनाहून अगदीं उलट स्वरूपाची अशी त्यांची ही स्थिति आहे.

थोडक्यांत म्हणजे संन्याशाचें वैराग्य हें राजकारणी पुरुषाच्या कर्तबगारीला उपयुक्त कसें ठरतें, आणि मर्यादित क्षेत्रांतील कार्यांचा स्वीकार व विविध स्वरूपाचा परिग्रह ठेवूनहि अधिकांत अधिक व्यक्तिस्वातंत्र्य कसें उपभोगतां येतें, तें त्यांनीं दाखविलें आहे. प्रत्यहीं आपल्याला मनापासून कराव्याशा वाटणाऱ्या गोष्टी करीत राहणारी व त्या आचरण्यांत आनंद मानणारी गांधींसारखी व्यक्ति मला अद्यापि भेटलेली नाहीं.

हें आचरण अगदीं सोपें आहे असें त्यांना वाटतें. पण इतरांना त्याचें स्पष्ट ज्ञान होत नाहीं; हेंच जगांतल्या पुष्कळशा दुःखांचें व गोंधळांचें

मूळ आहे. आपल्या अमेरिकेमध्यें अशीं पुष्कळ माणसें आहेत, कीं जीं परिग्रह व त्यामुळें येणाऱ्या जबाबदाऱ्या टाकून, कुटुंब करून जोडलेल्या संबंधापासून, राजकीय कार्यापासून, संघटित धर्मापासून व शेवटीं स्थानिक परिस्थितीनें रंजित अशा स्वतःच्या व्यवहारबद्ध देहापासूनहि दूर सरून मुक्त होण्याची धडपड करीत असतात. लोकसत्ताक राज्यपद्धति ठेंचा खात आहे याचें कारण असें आहे कीं, जे तिचा भार उत्कृष्ट रीतीनें सहन करतील ते निवृत्तिपर ज्ञानमार्गी झाल्यामुळें त्यांच्या सेवेला ती पारखी झाली आहे. अपूर्ण जगाची थोरवी आम्हांला अजून समजली नाहीं. तत्कालीन प्रश्न व स्थानिक परिस्थिति या उपाधी दूर सारून मुक्त होण्याचा जो प्रयत्न करतो, तो आपल्या अस्तित्वापासूनच मुक्त होण्याचा प्रयत्न करीत आहे असें म्हटलें पाहिजे; कारण अस्तित्व म्हणजेच उपाधि होय.

स्वतःच्या जातींत म्हणजे मानवजातींत दाखवलेल्या थोरपणापलीकडे जगांत थोरपणा नाहीं, आपल्या कार्यक्षेत्रांत आचरिलेल्या विश्वधर्मापलीकडे विश्वधर्म नाहीं, स्वतःच्या उपाधींत राहून मिळविलेल्या मुक्तीवांचून अन्य मुक्ति नाहीं, अशी आपणांस गांधीजींची शिकवण आहे.

---

# गांधींच्या थोरपणाचें स्वरूप

## लेखक : जॉन हेनेस होल्मस्

(कम्यूनिटी चर्च, यु. स्टे. अमेरिका)

"गांधी हे जगांतील सर्वश्रेष्ठ पुरुष आहेत" असें अमेरिकन जनतेपुढें मीं जाहीर केल्याला जवळजवळ वीस वर्षें होत आलीं. माझ्या देश-बांधवांना त्या वेळीं गांधींचा परिचय झालेला नव्हता. आमच्या पाश्चात्य

जगापर्यंत त्यांचें नांव पोंचलेंच नव्हतें ! पण त्यानंतरच्या काळांत दुसऱ्या कोणत्याहि विद्यमान् व्यक्तीइकेंच त्यांचें नांव विख्यात झालें असून, मीं त्यांचें " सर्वश्रेष्ठ " म्हणून अभिवादन केलें तें योग्यच होतें ही गोष्ट अमेरिकन लोकांना पटली आहे.

या युगांतल्या गांधींच्या सर्वश्रेष्ठत्वाला ज्यास सामान्यतः असामान्य प्रज्ञा अथवा वैभव असें मानण्यांत येतें ती कारणीभूत झालेली नाहीं. त्यांच्या हाताखालीं सैन्यें नाहींत, कीं त्यांनीं प्रदेशहि पादाक्रांत केलेले नाहींत. फार मोठ्या अधिकारपदावरून राष्ट्राचीं भवितव्यें ठरविणारे ते कोणी राजकारणी पुरुषहि नव्हेत. ते तत्त्वज्ञानी अथवा साधु नाहींत. महान् ग्रंथ अथवा कविता त्यांनीं लिहिलेल्या नाहींत. ज्यामुळें मनुष्याची निदान बाह्यात्कारी तरी एकदम छाप पडावी अशी भव्य आणि उठावदार शरीरयष्टीची देणगीहि त्यांच्यापाशीं नाहीं. त्यांची प्रतिभा त्यांच्या आवडीच्या आध्यात्मिक क्षेत्रांत दिसून येते. अतुलनीय अशा अधिकाराच्या व नेतृत्वाच्या पदावर ते चढले असतील आणि इतिहासांतील अत्यंत महान् अशा विभूतींवांचून इतरांना असाध्य अशा गोष्टी जर त्यांनीं साध्य केल्या असतील, तर तो त्यांच्या आध्यात्मिक सामर्थ्याचाच प्रभाव होय.

हिंदुस्थान शेवटीं ज्यावेळीं स्वातंत्र्य मिळवील त्यावेळीं त्या स्वातंत्र्याचें श्रेय दुसऱ्या कोणत्याहि हिंदी माणसापेक्षां गांधींनाच अधिक लाभेल. आपल्या देशबांधवांच्या स्वभावसिद्ध संस्कृतीचें पुनरुज्जीवन करून, वैयक्तिक प्रतिष्ठा व स्वाभिमान या भावना त्यांच्यांत उद्दीपित करून, त्यांच्या अंतर्जीवनांत संयमाची शिस्त आणून, म्हणजेच त्यांना आध्यात्मिक व राजकीय दृष्ट्या स्वातंत्र्याला पात्र व रक्षण्यास समर्थ बनवून स्वतंत्र करण्याची महान् कामगिरी बजावल्याचें श्रेयहि त्यांनाच मिळेल. यातनामय बंधनांतून अस्पृश्यांना मुक्त केल्याच्या थोर कार्याची यांतच भर पडली आहे. मानवांच्या उद्धाराचीं जीं कार्यें इतिहासाला ज्ञात आहेत, त्यांतील एक अत्यंत थोर कार्य म्हणून हें स्मरणीय ठरेल. अहिंसेचें तत्त्व स्वीकारून त्या आधारावर जगांत स्वातंत्र्य, न्याय व शांति प्रस्थापित करणारें तंत्र बनवून गांधीजींनीं जी श्रेष्ठ साधना केली आहे तिचा उल्लेखहि शेवटीं केला

पाहिजे. इतरांनीं ज्या तत्त्वाची व्यक्तिगत जीवनांतील संवय म्हणून शिकवण दिली, त्याचें गांधींनीं जगदुद्धारासाठीं करावयाच्या सामाजिक कार्यक्रमांत रूपांतर केलें.

गतयुगांतील सर्वश्रेष्ठ पुरुषांच्या बरोबरीनें गांधीजींची श्रेष्ठता आहे. आल्फ्रेड, वॉलेस, वॉशिंग्टन, कोस्किउस्को, लाफॉये यांच्या बरोबरीनें राष्ट्रीय नेते म्हणून त्यांची श्रेष्ठता आहे. क्लार्सन, विल्बरफोर्स, गॅरिसन, लिंकन यांच्या प्रमाणें दासांना मुक्त करणारे म्हणून त्यांची श्रेष्ठता आहे. ज्याला ख्रिश्चन धर्मग्रंथांत "अप्रतिकार" अथवा अधिक समर्पकतेनें "अविनाशी ध्येय" असें संबोधण्यांत आलें आहे त्याची शिकवण देणाऱ्या संत फ्रान्सिस, थोरो, टॉल्स्टॉय या उपदेशकांच्या बरोबरीनें त्यांची गणना होते. लाओत्से, बुद्ध, झरतुष्ट किंवा येशू यांच्याप्रमाणें आतांपर्यंतच्या सर्वश्रेष्ठ धर्मद्रष्ट्यांमध्यें त्यांचें स्थान आहे. माझ्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'विचारप्रवण धर्म' या पुस्तकांत ज्याचें मीं पुढील प्रमाणें वर्णन केलें आहे तो पुरुष सर्वश्रेष्ठ होय.

"ते नम्र आहेत, सौम्य आहेत. त्यांची कृपा अखंड आहे. त्यांची विनोदबुद्धि दुर्दम्य, व त्यांच्या व्यवहारांतील साधेपणा आकर्षक आहे. वागण्यांत ते शांत, मृदु असून देखील त्यांची इच्छाशक्ति अदम्य व त्यांचें धैर्य वज्राप्रमाणें आहे. त्यांचा प्रामाणिकपणा अंतर्बाह्य शुध्द असून त्यांची सत्यभक्ति कठोर आहे. गमावण्यासारखें त्यांच्याजवळ कांहींच नसल्यामुळें त्यांची भूमिका अभंग आहे. स्वतः सर्वस्वाचा त्याग केलेला असल्यामुळें ते इतरांना सर्वस्व त्याग करावयास सांगूं शकतात. भौतिक विचार, भौतिक चिंता व आकांक्षा यांचा त्यांच्या जीवनांतून केव्हांच लोप झाला आहे. सत्य व प्रेम यांतून स्फुरणारा आत्मा त्यांचा पूर्णांशानें स्वामी बनला आहे. गांधी म्हणतात, 'ईश्वरसेवा म्हणजेच मानवसेवा हा माझा धर्म आहे...आणि सेवा म्हणजे विशुद्ध प्रेम.'"

# गांधी व शांततावादाचें भवितव्य

## लेखक : लॉरेन्स हाऊसमन

(स्ट्रीट, सॉमरसेट, इंग्लंड)

यशस्वी शांततावादाच्या विद्यमान आचारप्रणेत्यांत महात्मा गांधी हे सर्वश्रेष्ठ आहेत. सक्रिय शांततावाद ही जागतिक राजकारणांतील एक शक्ति आहे हें त्यांनीं दाखवून दिलें आहे. म्हणजे हिंसा व बलात्कार यांच्या बळावर चालणाऱ्या शासनसंस्थेच्या साधनांपेक्षां हें साधन बलवान् आहे असें आपोआपच सिद्ध झालें आहे. दक्षिण आफ्रिकेंत त्यांनीं संपूर्ण विजय मिळविला; हिंदुस्थानांत त्यांनीं तो बऱ्याच प्रमाणांत संपादन केला आहे. त्यांचे अनुयायी संख्येनें अधिक असते आणि त्यांच्यातील अहिंसा अधिक एकजात असती, तर गांधींचें अहिंसायुक्त साधन पूर्ण विजयी झालें असतें.

" व्यवहार्य राजकारणाच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या क्षेत्रांत शांततावादाच्या सामर्थ्याचें अशा प्रकारें निदर्शन व्हावें ही गोष्ट अत्यंत मोलाची असून, स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या सर्व राष्ट्रांना व वंशांना ती मार्गदीपिका झाली आहे. "

सामान्य जनांकडून नेहमीं वापरण्यांत येणाऱ्या पद्धतीहून अत्यंत भिन्न अशी ही पद्धति असल्याकारणानें आणि अन्याय-निराकरणाचा उपाय म्हणून हिंसेचा स्वीकार करण्याच्या प्रमादी प्राचीन परंपरेच्या ती इतकी पूर्णपणें विरुद्ध असल्यामुळें अहिंसेचें हें यश अधिकच वेधक ठरतें. परंपरा वरीलप्रमाणें असूनदेखील महात्मा गांधींना इतक्या कठिण दिव्यांतून जाणारा एवढा मोठा व एकंदरींत बऱ्याच प्रमाणांत विश्वासू असा अनुयायीगण गोळा करतां आला, ही गोष्ट काय सिद्ध करते ? मानवी स्वभावांतील जें सुप्त व मूलभूत सत्य आहे त्याचाच ते उपदेश करीत आहेत, आणि समोर आदर्श ठेवला तर तें सत्य समजून घेणें सामान्य

स्त्रीपुरुषांच्या अटोक्याबाहेरचें नाहीं, किंवा थोर कार्याला साहाय्य म्हणून तें आचरणें त्यांच्या शक्तीपलीकडचें नाहीं, याचा हा पुरावा आहे असें मला वाटतें.

या सर्व कारणांमुळें आजच्या घटकेला महात्मा गांधींचे प्राण हे अत्यंत मूल्यवान् आहेत अशी माझी श्रद्धा आहे. म्हणूनच आहेत त्यापेक्षां ते बरेच तरुण असते तर बरें झालें असतें; कारण मग त्यांच्या उज्ज्वल नेतृत्वाचा लाभ आणखी कित्येक वर्षें मिळविण्याची योग्य आशा जगाला करतां आली असती असेंहि त्यांच्या सत्तराव्या जन्मतिथीचे दिवशीं त्यांचें अभिनंदन करीत असतां मला म्हणावेंसें वाटतें.

---

# एका हिंदी राजकारणी पुरुषाची प्रशंसांजलि

## लेखक : **सर मिर्झा इस्माइल**, के. सी. आय्. इ.

### (म्हैसूरचे दिवाण, बंगलोर)

राजकारण म्हणजे कृष्णकारस्थान, किंवा राजकारणांत प्रसंगविशेषीं पुष्कळ वेळीं सदसद्विवेकबुद्धीला मुरड घालावी लागते, या म्हणण्यांत थोडासा हताशाजन्य कटुभाव ( Cynicism ) असला, तरी त्यांत सत्याचाहि अंश आहे. नीतिनियमांची ज्याला विशेष चाड नाहीं अशालाच राजकारणांत यश लाभतें असें म्हणतात. आणि महात्मा गांधी तर असे आहेत, कीं सर्व हिंदी लोकांत ते अत्यंत सदसद्विवेकी, नीतिमान् व तत्त्वनिष्ठ असूनसुद्धां सर्वांपेक्षां यशस्वी असे राजकारणीहि ठरले आहेत ! ते म्हणजे न सुटणारें एक कोडें आहे. दुर्मीळ अशा उदात्त नीतीनें, निरपवाद व्यक्तिगत जीवनानें, अन्तर्बाह्य शुद्ध अशा वर्तणुकीनें व धर्मप्रवण प्रवृत्तीनें युक्त अशा या पुरुषाकडे पाहून थोर आध्यात्मिक प्रणेत्यांची व संतांची आठवण

होते. पण पुनरुत्साहित भारताचें नवचैतन्य, स्वाभिमान व स्वसंस्कृतीविषयीं गौरवभाव निर्माण करणारे स्फूर्तिशाली अग्रणी म्हणून त्यांचें स्थान केवळ राजकारणी पुरुषांहून श्रेष्ठ आहे.

"ज्याचा देहाकार अद्यापि अस्थिर क्षणभंगुर असला, तरी ज्याची रूपरेखा दृग्गोचर होऊं लागली आहे असें हिंदी राष्ट्र उदयास येत असून गांधी हे त्याचे रचयिते होत," असें रिचर्ड फ्रूड यानें 'स्पेक्टेटर'-मध्यें जें लिहिलें होतें, तशीच वस्तुस्थिति आहे.

इंग्रज लोकांना घोटाळ्यांत पाडणारें संत व राजकारणविशारद यांचें हें मिश्रण गांधींच्या हिंदुस्थानांतील अनुयायांस उलगडलें नसलें, तरी त्यांनीं त्याचा स्वीकार केलेला आहे. सर्व लोकांकडून पूजिले जाणारे पण फारच थोडक्या लोकांनीं ओळखलेले जे महापुरुष जगांत आहेत, त्यांच्या-पैकींच महात्मा गांधी होत. राजकारणांत त्यांनीं धर्माचा व सदाचारांचा शिरकाव केला, व्यावहारिक ध्येयांच्या साधनेसाठीं भौतिक बळाशीं झुंजण्याकरतां लोकविलक्षण अशीं नैतिक शस्त्रें घडवलीं, राजकारणांत धर्माचा प्रवेश करवून त्यांनीं राजकारणाचें जसें परमार्थीकरण केलें तसेंच त्यांनीं धर्मांत राजकारण आणून सनातनी हिंदूंकडून निव्वळ धार्मिक समजल्या जाणाऱ्या अनेक प्रश्नांना लौकिक स्वरूप दिलें. अशा प्रश्नांपैकीं अत्यंत ठळक अशी बाब म्हणजे हरिजनांचा उद्धार. त्या प्रश्नाबाबत बुद्धिवादी हिंदी लोकांनीं सनातनी हिंदुत्वाविरुद्ध केलेल्या बंडाचें नेतृत्व त्यांनीं पत्करलें. परंतु या देशांतील अस्पृश्यतेची अन्याय्य चाल समूळ नष्ट करण्याचे त्यांचे प्रयत्न हे त्यांच्या ठिकाणच्या खऱ्या मानवप्रेमाच्या ऊर्मीप्रमाणेंच त्यांच्या सुधारणाविषयक उत्साहामुळें व राजकीय मर्मज्ञते-मुळेंहि प्रेरित झालेले आहेत, ही गोष्ट मान्य करणें उचित होय.

महात्मा गांधींचा आत्मविश्वास फार दांडगा आहे. आत्मिक शक्तीच्या कार्यक्षमतेवर त्यांची जी गूढ श्रद्धा आहे व जिला कधीं कधीं प्रतिभेचें स्वरूप प्राप्त होतें तिच्यामुळें त्यांचा तो आत्मविश्वास अधिकच वृद्धिंगत झाला आहे. त्यांच्यावर तर्कापेक्षां भावनेचें व बुद्धीपेक्षां सहजप्रेरणेचें प्रभुत्व विशेष आहे व त्यांच्याच साहाय्यानें ते इतरांवर प्रभुत्व गाजवतात. आपण दिलेला अत्यंत घोटाळ्याचा वाटणारा एकादा सल्ला अथवा

अनुक्रम
विभाग

कांहीं विशिष्ट परिस्थितींत केलेली न समजण्यासारखी, वर्तणूक स्वतः ते आपल्या अनुयायांना विवरण करून सांगतांना ते अनेकदां “ आंतल्या आवाजा ”चा गूढ उल्लेख करून मोकळे होतात. “ साधी राहणी व उदात्त विचारसरणी ” हें त्यांच्या जीवनांतील ब्रीदवाक्य असून त्यांनीं आपले विकार, आपली वागणूक, इतकेंच काय, आपलें शरीरयंत्र यांच्यावर असा नियंतेपणा साध्य केला आहे, कीं त्यांच्याकडे पाहून कमी प्रतीच्या मनुष्यांच्या मनांत आदर व निराशा या दोन्ही भावना एकाच समयीं निर्माण होतात. “ तुम्हांला स्वतःचें नियमन करतां आलें, तर राजकारणाचेंहि तुम्ही नियमन करूं शकाल ” असें गांधींना वाटतें. देहाचें कोणतेंहि कोडकौतुक ते करीत नाहींत. आवडीनिवडीच्या व संवयींच्या बाबतींत ते स्पार्टन लोकांप्रमाणें अगदीं साधे आहेत. स्वतःच्या जीवनाचें तारू आणि त्याचप्रमाणें कॉंग्रेसच्या व राष्ट्राच्या राजकारणाची नौका हिंदी राजकारणाच्या खवळलेल्या दर्यांतून हाकारतांना अहिंसा व सत्य या दोन अढळ ताऱ्यांचें साहाय्य त्यांनीं घेतलेलें आहे.

हिंदी जनतेवर त्यांचें जें असीम प्रभुत्व आहे त्याचा उलगडा करून दाखवा, असें जर मला कोणीं सांगितलें. तर राजकारणी म्हणून त्यांच्या अंगच्या कर्तृत्वाचा–तें तर अपूर्व आहेच–अथवा हिंदुस्थानची समस्या सोडवण्यासाठीं त्यांनीं जी पद्धति अंगीकारली तिला मिळालेल्या यशाचा विचार माझ्या मनांत प्रामुख्यानें येणार नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांच्या मनावर आचरणाचा विलक्षण परिणाम होतो व बुद्धिप्रधान नेतृत्वापेक्षां नीतिप्रधान नेतृत्वाकडे ते अधिक आकर्षित होतात. महात्माजींच्या ठिकाणीं असलेल्या अव्यभिचारी ध्येयनिष्ठेच्या व हेतुशुद्धतेच्या गुणांना बिनडाग अशा चारित्र्याची जोड असल्यामुळेंच त्यांना आपल्या राजकीय अनुयांचीच केवळ नव्हे, तर त्यांच्या दृष्टिकोनाशीं सहमत नसणाऱ्या व त्यांचीं राजकीय तत्त्वें व पद्धति मान्य नसणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या बाहेरील लोकांचीसुद्धां श्रद्धा व प्रेम संपादन करतां आलीं आहेत.

सुमारें पांच वर्षांपूर्वी म्हैसूरच्या विधिमंडळांतील सभासदांना उद्देशून मीं म्हटलें होतें कीं, “ आपल्या अडचणी सोडविण्याच्या कामीं व स्वयं-शासनाला आधारभूत असें आचरणाचें जें नवीन स्वरूप तें निर्माण

करण्याच्या कामीं जो आपणांला इतरांपेक्षां अधिक मदत करील असा एक पुरुष आहे. महात्मा गांधींनीं राजकारणांतून निवृत्त व्हावें असें इच्छिणारांपैकीं मी एक नाहीं. सच्चा नेत्याच्या मार्गदर्शनाची हिंदुस्थानला पूर्वीं कधीं नव्हती इतकी आज आवश्यकता आहे. राष्ट्रांत अनन्यसामान्य असें स्थान असलेला शांतताप्रेमी व जाज्वल्य देशभक्तच नव्हे, तर दूरदृष्टि व चातुर्य यांनीं युक्त अशी राजकीय बुद्धि असलेला हा पुरुष आहे. देशांतील विरोधी घटकांत समन्वय करून स्वयंशासनाच्या मार्गांतील आणखी एका टप्प्यापर्यंत एकजुटीनें जाण्यासाठीं त्या सर्वांचें मन वळविण्याचें कार्य करण्यास आवश्यक ते गुण दुसऱ्या कोणत्याहि व्यक्तींपेक्षां त्यांच्याच ठिकाणीं आधिक्यानें आहेत असें मला वाटतें. हिंदुस्थान व ग्रेटब्रिटन यांच्यामध्यें अत्यंत गोडीगुलाबीचे संबंध प्रस्थापित करण्याचें सामर्थ्य जसें त्यांच्या ठिकाणीं आहे, तसें इतरांच्या ठिकाणीं नाहीं. ते सरकाराचे अत्यंत शक्तिमान् असे दोस्त व ग्रेटब्रिटनचे सच्चे मित्र आहेत, असें माझें मत आहे. या प्रसंगीं ते राजकारणांतून निवृत्त झाले, तर अर्थशून्य घोषणा करून स्वतःची व राष्ट्राची दिशाभूल करण्याचा चंग बांधलेले तोंडाळ आणि स्वप्नाळू लोक त्यांच्या जागीं बहुधा येतील, अशीं चिन्हें दिसत आहेत."

हे शब्द मीं उच्चारल्यानंतर अनेक घडामोडी झाल्या आहेत. विधिमंडळाला जबाबदार असणारीं मंत्रिमंडळें सर्व प्रांतांतून अस्तित्वांत आलीं असून हिंदुस्थानच्या संयुक्त राज्याच्या प्रश्नाची चर्चा प्रामुख्यानें होऊं लागली आहे. गांधीजींनींच स्वतः म्हटल्याप्रमाणें "ते इतःपर राष्ट्रसभेंत नसले तरी ते राष्ट्रसभेचेच आहेत." तथापि मीं जे विचार व्यक्त केले होते ते परत घ्यावेत अथवा त्यांत सुधारणा करावी असें वाटण्यासारखें अजून कांहींहि घडलेलें नाहीं. अद्यापि प्रभावी असणाऱ्या–मी तर म्हणेन कीं पूर्वींइतक्याच प्रभावी असणाऱ्या–महात्मा गांधींना वगळलें तर निर्वाणीच्या काळीं मार्गदर्शन करील अशी कोणतीहि व्यक्ति राष्ट्रांत विद्यमान नाहीं. राजकारणांत युक्ताचार, विवेक व व्यवहारदृष्टि यांच्या बाजूनेंच महात्माजींचें सामर्थ्य उभें असतें; आणि त्यांना वगळून हिंदुस्थानाचें या

घटकेला किंवा जेथपावेतों नजर पोंचते त्या भविष्यकाळांतहि कांहीं चालणार नाहीं.

महात्मा गांधींचें जीवन आपणां हिंदुस्थानांतील लोकांसाठीं ज्याप्रमाणें इतकें अर्थपूर्ण व मौल्यवान् आहे, त्याचप्रमाणें वर्तमानकाळीं युद्धें व युद्धाची भीति यांच्या योगानें बावचळून गेलेल्या बाहेरच्या जगाच्या दृष्टीनेंसुद्धां त्यांच्या जीवनाला व कार्याला अर्थपूर्णता प्राप्त झाली आहे हीहि गोष्ट तितकीच खरी. तत्त्वतः शांततावादी असणारें त्यांचें राजकीय तंत्र आणि प्रेम, सत्य व अहिंसा या त्रिसूत्रीवर आधारलेलें त्यांचें राजकीय आचारधर्माचें तत्त्वज्ञान हीं, ज्या राष्ट्रांचे परस्परसंबंध सांप्रत काळीं कारस्थानें, द्वेषबुद्धि व युद्धें यांनीं नियंत्रित होत आहेत, त्या राष्ट्रांच्या विचारशक्तीला चालना देण्यास पुरेशीं आहेत.

महात्मा गांधींचें त्यांच्या सत्तराव्या जन्मतिथीच्या दिवशीं अंतःकरणपूर्वक अभिनंदन करून आणि विशेषेंकरून हिंदुस्थानच्या व सर्वसामान्यरीत्या जगाच्या सेवेसाठीं, आरोग्यमय, आनंदमय, व साफल्य-समृध्द असें उदंड आयुष्य त्यांना लाभो अशी इच्छा करून आटोपतें घेतों.

---

# गांधींचें राजकारणपटुत्व

लेखक : **आल्बर्ट आइन्स्टाइन**, डी. एस्‌सी.

( प्रिन्स्टन् विश्वविद्यालय, यु. स्टे. अमेरिका )

राजकीय इतिहासांत गांधी अपूर्व आहेत. दलित जनतेच्या, दास्यविमोचनाच्या झगड्याचें सर्वस्वीं अभिनव व मानवधर्माला अनुरूप असें एक नवीन तंत्र त्यांनीं शोधून काढिलें असून अत्यंत धडाडीनें व श्रध्देनें त्यांनीं तें सिध्दीस नेलें आहे. सुसंस्कृत जगांतील लोकांवर त्यांनीं जें नैतिक

प्रभुत्व मिळविलें आहे, तें आपल्या या पाशवी शक्तीचा 'उदोउदो' चालणाऱ्या युगांत लोकांना वाटतें त्याहून जास्त काळ टिकाऊ ठरण्याचा संभव आहे. आपल्या स्वतःच्या उदाहरणानें व विनयाधान करण्याच्या शक्तीनें आपल्या देशबांधवांच्या नैतिक भावना जागृत व संघटित करण्याच्या कामीं ज्या प्रमाणांत राजकारणी पुरुषांच्या कार्यांत यश येईल, त्याच प्रमाणांत त्यांच्या कार्याला चिरंतनत्व येत असतें.

भावी पिढ्यांना मार्गदीपक बनेल इतका तेजोमय पुरुष आपला समकालीन असण्याचें भाग्य लाभलें, याबद्दल आपण दैवाचें कृतज्ञ असलें पाहिजे.

---

# गांधींचा आध्यात्मिक प्रभाव

## लेखक : **गिल्बर्ट मरे**, एम्. ए., डी. सी. एल्.

### ( इमेरिटस् प्रोफेसर ऑक्स्फर्ड विद्यालय )

जेथें राष्ट्रांचे शासनकर्ते पाशवी शक्तीवर अधिकाधिक विसंबून राहत आहेत आणि कायदा व विश्वबंधुत्व हीं नाकबूल करणाऱ्या शासनपद्धतीच्या हातीं राष्ट्रें आपलें जीवन व आशा सोंपवीत आहेत अशा या जगांत श्री. गांधी ही व्यक्ति सर्वांपासून अलग व अत्यंत प्रभावी अशी भासते. त्यांच्या भीतीमुळें नव्हे, तर त्यांच्यावर प्रेम आहे म्हणून, संपत्ति, हेर, यांत्रिक बंदुका हीं त्यांच्या ताब्यांत आहेत म्हणून नव्हे, तर जी दैवी संपत्ति एकदां निश्चय झाल्यावर जडसृष्टींतील सर्व सामर्थ्यें जणुं कांहीं बलहीन बनवून सोडते अशा दैवी संपत्तीनें ते संपन्न आहेत म्हणून, ज्यांची आज्ञा लक्षावधि लोक मानतात असे ते शासनकर्ते आहेत. 'जणुं कांहीं' असें मीं वरील वाक्यांत म्हटलें, कारण सदसद्विवेकबुद्धि अथवा दया यांचा

संपर्कहि न झालेल्या निव्वळ जडशक्तीशीं विरोध आला तर दैवी संपत्ति अगतिक बनेल. ती युद्धांत विजयी होते याचें कारण शत्रूच्या ठिकाणच्या आध्यात्मिक भावावर तिचा गूढ असा परिणाम होत असतो. तो भाव माणसांनीं पाशवी बनण्याचा कितीहि कसून प्रयत्न केला, तरी त्याला पूर्णपणें झटकून टाकतां येत नाहीं. "असहाय अशा मानवी आत्म्याचा प्रचंड अशा जडशक्तीशीं संग्राम सुरू आहे; जडशक्तीच्या तुकड्या स्वतःच्या निशाणाचा त्याग करून आत्म्याच्या बाजूला जाऊन मिळण्यांत त्या संग्रामाचा शेवट होत आहे!" वीस वर्षांपूर्वी महात्मा गांधींच्याबद्दल मीं याप्रमाणें लिहिलें होतें.

अर्थातच आध्यात्मिक अधिकाराचा पुरुष मार्गदर्शनाचें काम नेहमींच बिनचूक करील असें गृहीत धरणें शक्य नाहीं. त्यानें मांडलेली बाजू अथवा त्यानें दिलेले निर्वाळे सिद्ध किंवा असिद्ध करणें क्वचितच शक्य होतें. सामान्य मानवांची प्रमादशीलता त्यांच्याहि ठिकाणीं असते व सत्तेमुळें हुकूमशहा ज्याप्रमाणें भ्रष्ट होतात तसे तेहि भ्रष्ट होणें शक्य असतें. परंतु सामाजिक शास्त्यांमध्यें, किंबहुना, सामान्यपणें सर्वच शास्त्यांमध्यें गांधीजी हे केवळ अपूर्व होत. पहिली गोष्ट अशी कीं, ते कोणतेंहि वेदवाक्य बोलत नाहींत, अथवा हुकूम सोडीत नाहींत; फक्त विनंति करतात. तुमच्या आमच्या आत्म्याला आळवतात. खरें वाटतें तें व्यक्त करतात, परंतु दुसऱ्या एखाद्या मार्गानें तत्त्वशोधन करणारांना ते पंक्तिबाह्य करीत नाहींत अथवा निषेधीत नाहींत.

दुसरी गोष्ट अशी कीं, त्यांची युद्धपद्धतीहि अपूर्व आहे. दक्षिण आफ्रिकेमध्यें हिंदी लोकांच्या हक्कासाठीं त्यांनीं पंधरा वर्षेंपावेतों केलेल्या लढ्यावरून हें दिसून आलें आहे. त्यांना व त्यांच्या अनुयायांना वारंवार बंदींत ठेवण्यांत आलें, चोरडाकूबरोबर कोंडण्यांत आलें, मानवयोनीहून हीन कोटींतल्या जीवांप्रमाणें त्यांस वागविण्यांत आलें. तथापि त्यांना छळणारें सरकार ज्या ज्या वेळीं असहाय झालें किंवा अडचणींत गवसलें त्या त्या वेळीं मोका आला म्हणून आपलें म्हणणें पुढें रेटीत नेण्याऐवजीं त्यांनीं माघार घेऊन सरकारला मदतच केली. संकटमय युद्धांत सरकार सांपडलें

असतां हिंदी रुग्णसेवकांचें एक खास पथक त्यांनीं सरकारच्या मदतीसाठीं बनवलें. त्यांच्या हिंदी अनुयायांनीं अहिंसात्मक संप पुकारला असतां मध्येंच एका क्रांतिकारक संपाचें संकट सरकारवर कोसळलें असतां विरोधक म्हणजे सरकार त्यांतून निभावून जाईपर्यंत आपल्या लोकांनीं कामावर पुन्हां रुजू व्हावें अशी आज्ञा त्यांनीं आपल्या अनुयायांस तत्काळ दिली. मग त्यांना विजय मिळाला यांत काय आश्चर्य ! खरें मानवी अन्तःकरण असलेला कोणताहि शत्रु या युद्धपद्धतीला तोंड देऊं शकणार नाहीं.

असंख्य जनतेकडून पूजिल्या व ध्येयरूप मानल्या जाणाऱ्या पुढाऱ्याला अत्यंत कठिण अशी गोष्ट ते करतात; ती म्हणजे आपण प्रमादातीत असल्याचा दावा ते केव्हांहि मांडीत नाहींत, ही तिसरी गोष्ट. ‘ असहकाराच्या ’ चढाईला ते या क्षणीं विराम देत आहेत याचें कारण मला असें असावेसें वाटतें कीं, आपणाला व आपल्या अनुयायांना विचार करण्यास अवधि मिळावा अशी त्यांची इच्छा आहे.

एका निःशस्त्र व्यक्तीचा असंख्य जनसमूहावर चालणारा आध्यात्मिक प्रभाव हीच मुळीं आश्चर्यजनक गोष्ट होय. त्यांतून ती व्यक्ति जेव्हां हिंसेचा त्याग करते, शत्रूला संकटकालीं साहाय्य करते, इतकेंच काय, पण स्वतःच्या ठायीं मानवाला स्वाभाविक अशी प्रमादशीलता असल्याचें कबूल करते, तेव्हां ती निरपवादपणें जगाचें प्रशंसास्थान बनून राहते.

दूरच्या देशांतला, सर्वस्वीं परकी संस्कृतींत वाढलेला, व्यवहारांतील अनेक समस्यांचे बाबतींत भिन्न मतें धारण करणारा, जेथें अज्ञानाच्या व पाशवी शक्तीच्या बडग्यापुढें सदसद्विवेक व तर्कशक्ती क्षणभर अशरण बनल्यासारख्या दिसत आहेत त्या युरोपांतल्या विरोधी व चिंताकुल अशा विचारधारांत उभा असलेला मी, त्यांच्या शिष्यगणांनीं त्यांना दिलेली पदवी मोठ्या आनंदानें त्यांस अर्पण करून मोठ्या आदरपूर्वक त्यांचा नामघोष करतों : “ महात्मा गांधी. ”

# अतिपूर्व देशातर्फे भेट

## लेखक : योने नागूची

### ( कीयो विश्वविद्यालय, टोकियो, जपान )

१९३५ च्या डिसेंबरअखेर नागपूरहून मुंबईस जात असतां मी वर्ध्यास थांबलों. तें बिनमहत्त्वाचें असें देशावरील एक छोटेसें शहर आहे; पण गांधींच्या चळवळींचें तें एक आध्यात्मिक केंद्र आहे. तेथील आश्रमोचित वातावरणांत गांधींना भेटण्यास मला विशेष आनंद झाला. पुराणकाळच्या संन्याशांहून भिन्न असा हा आधुनिक द्रष्टा तेथें राहून राष्ट्राच्या जीवनांतील आशेच्या अथवा दुःखाच्या प्रत्येक वेदनेशीं सहसंवेदना राखीत आहे. दुमजली, चौकोनी व मध्यें आंगण असलेल्या एका घराच्या धाब्यावर ताणलेल्या तंबूमध्यें आजारी असल्यामुळें ते पडून राहिले होते. मी गेलों तेव्हां त्यांच्या मुखावर साधुत्वाचें मंदस्मित मला दिसलें. त्यांचे दांत पडलेले होते. क्रिकेटपक्ष्याच्या पायाप्रमाणें सडसडीत असलेले व पोलादी तारेप्रमाणें कणखर असलेले आपले उघडे पाय त्यांनीं लांब केले होते व त्यांचा एक शिष्य ते चेपीत बसला होता. दिसावयाला अत्यंत साधा-भोळा असा हा माणूस आणि एके काळीं इंग्लंडचें महाजड अंतःकरण भयाकुल करून सोडणारे त्याचे ते वीरोचित उपवास, यांची संगति लावणें मला कठिण झालें. कापडाच्या घडीमध्यें गुंडाळून ते डोक्यावर कांहींतरी ठेवीत आहेत असें पाहून " हें काय ? " असें मीं त्यांना विचारिलें. त्यांनीं सांगितलें कीं, " ही ओली माती असून माझ्यासारख्या विशेष रक्तदाबाचा विकार असणाऱ्या माणसाला तिच्यापासून फायदा होतो, असा माझ्या डॉक्टरनें सल्ला दिला आहे. " नंतर वैफल्यवाद व तत्त्वज्ञान यांनीं संमिश्र असें हास्य करून स्पष्टीकरणादाखल ते म्हणाले, " हिंदुस्थानच्या मातीं-तूनच मी उगवलों ना ! ती हिंदुस्थानची मातीच माझ्या मस्तकीं विराजत आहे. "

थोड्याशा संभाषणानंतर मीं त्यांचा निरोप घेतला. मला आश्रम दाखविण्यास नेण्याकरितां त्यांचे तीनचार शिष्य माझी वाट पहात होते; म्हणून मी जिना उतरलों. मधमाशांचीं पोळीं ठेवलेल्या जागेवरून पुढें गेल्यावर करडईचें तेल गाळणारा घाणा एक बैल फिरवीत होता त्या खोपटांत मला नेण्यांत आलें. नंतर आम्ही कागद बनवण्याचे प्रयोग चालले होते तेथें गेलों. एक शिष्य मला म्हणाला, "पाहा, कागद बनवणें किती सोपें आहे तें! जोडधंदा म्हणून आमच्या देशांत हें कागद बनविण्याचें काम लोकप्रिय झालें, तर कितीतरी पैसा आम्हांला देशांतल्या देशांतच ठेवतां येईल." आश्रमामध्यें चरख्याला महत्त्वाचें स्थान आहे हें सांगणें नकोच. एक बसकी लाकडी पेटी मला दाखविण्यांत आली. ती उघडल्यावर तुरुंगांतल्या फुरसतीच्या वेळांत गांधींनीं स्वतःच बनवलेला एक छोटेखानी चरखा दृष्टीस पडला. त्याची माहिती देणाऱ्यांनीं सांगितलें, "हातपिशवींतसुद्धां हा घालतां येतो व आगगाडीमध्यें रिकाम्या वेळांत फिरवण्यासाठीं घेऊन जातां येतो."

पुढे ते म्हणाले, "गांधी अतिशय शास्त्रशुद्ध वागतात; आणि अंगीं चिकाटी असल्यामुळें त्यांच्या शोधकबुद्धीला संपूर्ण यश लाभतें. ते घड्याळजी असते, तर जगांतील अत्युत्कृष्ट घड्याळ बनवण्याचें श्रेय त्यांनीं मिळवलें असतें. शास्त्रवेत्ते किंवा कायदेपंडित म्हणूनहि ते सर्वश्रेष्ठ अशा स्थानीं जाऊन बसले असते. परंतु १९२२ मध्यें आपल्या खटल्यांत "शेतकी व विणकाम हा आपला धंदा" असें सांगून शारीरिक श्रमाचें पावित्र्य प्रस्थापित करण्याचें व्रत त्यांनीं घेतलें आहे. त्यांत अंतर्भूत होणाऱ्या विविध कार्यांत विणकामाचा दर्जा ते फार मोठा समजतात. कारण, त्यामुळें माणसाला बिनचूकपणाची संवय व काटकसरीच्या नियमांचें कांटेकोरपणें पालन करण्यास आवश्यक असणारें मानसिक शिक्षण मिळतें. गांधींना उधळपट्टीचा सर्वांत अधिक तिटकारा आहे. शारीरिक श्रमच हिंदुस्थानाला नवजीवन प्राप्त करून देतील या श्रद्धेमुळें त्यांनीं चरख्याला आपलें प्रतीक मानलें असून स्वावलंबी जीवनाच्या पवित्र ध्वजाखालीं उभें राहण्याची हांक ते जनतेला देत आहेत. त्यांच्या चळवळीला ब्रिटिश राज्यसत्तेविरुद्ध बंडाचें स्वरूप यावें हें केवळ प्रसंगोपात्त आहे. कारण, अधःपातापासून

हिंदुस्थानचें रक्षण करण्याचा प्रयत्न करीत असतां सृजनशील प्रयत्नाची, व भूमीशीं अनुसंधान ठेवणाऱ्या जीवनाच्या निर्मितीची शिकवणूक मिळून इतर देशांचें रक्षणहि त्यांच्या चळवळीमुळें होणार आहे. फार दूरच्या ध्येयांच्यामागें चांचपडत न जातां निकटवर्ति भागांत केलेल्या सेवेचें महत्त्व हिंदुस्थानापुरतेंच मर्यादित आहे असें नव्हे; "स्वावलंबी व स्वयंपूर्ण" अशा स्वदेशीची ही वीर्यवती भावना सर्वकालीं व सर्व जगांत मान्य व्हावयास हवी.

दरिद्री जनांची सेवा करणें व त्यांच्याशीं तद्रूप होणें यापरता ईश्वरोपासनेचा दुसरा उच्चतर मार्ग गांधींना दिसत नाहीं. आगगाडीचा प्रवास करतात तेव्हां ते तिसऱ्या वर्गाचें तिकिट काढतात आणि मानवप्रेम व बंधुत्व हे गुण ज्यांच्यांत सर्वांहून आधिक्यानें दृष्टोत्पत्तीस येतात, त्या मानवजातीच्या दरिद्री वर्गांतलेच आपणहि एक आहों, याचें ते स्वतःला स्मरण करून देतात. ज्यांनीं आपल्या आयुष्यांतील फार महत्त्वाचा भाग श्रमजीवी जनतेच्या सान्निध्यांत काढला आहे व जे तिच्या आनंदांत व दुःखांत बरोबरीनें सहभागी झाले आहेत, त्या गांधींनीं "स्वावलंबी व स्वयंपूर्ण" जीवनाचें स्फूर्तिस्थान म्हणून आपल्या श्रमजीवी मित्रांस चरखा अर्पण केला आहे.

मुंबईला जाणाऱ्या गाडींतल्या माझ्या डब्यांत मी एकटाच पडलों असतां माझ्या डोळ्यांसमोरून महात्मा गांधींची मूर्ति दूर करणें मला शक्य होईना. 'स्वखुषीनें स्वीकारलेलें दारिद्र्य' या नांवाचा त्यांनीं लिहिलेला एक छोटासा निबंध वाचण्याची संधि मला लाभली होती. पूर्वी संग्रहित केलेल्या वस्तूंचा त्याग करतांना झालेल्या आनंदाचें त्यांत त्यांनीं वर्णन केलें आहे. हिंदुस्थानासारख्या देशांत कोणत्याहि व्यक्तीला अगदीं आवश्यक असणाऱ्या वस्तूंहून अधिक वस्तू संग्रहित करणें म्हणजे चोरी करून जगण्यासारखें आहे असें त्यांस वाटतें. उघड्या अंगानें जो बाहेर झोंपतो त्याच्याप्रमाणें तुम्ही बनल्याशिवाय हिंदुस्थानाचें व हिंदुस्थानांतील जनतेचें आपण रक्षण करीत आहोंत, असें जाहीर करण्याचा कोणालाहि अधिकार नाहीं. गांधीजी जें वस्त्र नेसतात तें शक्य तितकें लहान करण्याचा प्रयत्न त्यांनीं केला आहे असें मला सांगण्यांत आलें. या दारिद्र्यप्रशस्तीपासून

आरंभ करून ज्याच्या द्वारें आत्मशोधनासाठीं पंचेंद्रियांचें नियमन करायचें असतें त्या संन्यासधर्मांकडे गांधींनीं प्रगत होत जावें हें साहजिक होय.

A warrior in combat near Heaven with a prospect of
unseen victory,
Blowing a bugle that rings to the last gulf of Hell,
A lonely hero challenging the future for response.
Withered and thin,
But :with a mammoth soul shaking the world in
fear—
Through this man love, profaned and ignored,
Through this man life's independence, shattered and
fallen,
Through this man, body-labour, bereft of honour
and prize,
Cry rebel-call against tyranny; to God's justic be
praise !
A sad chanter of life close to the mother-earth,
( Where is there a more burning patriot than this
man ? )
A lone seeker of Truth denying the night and self-
pleasure
( Where is there a more profetic soul than this
man's ? )
A pilgrim along the endless road of hunger and
sorrow.

# महात्मा गांधी व युयुत्सु शांततावाद

## लेखक : दी रेव्हरंड जॅक सी. विन्स्लो

( पुणें आणि लंडन )

महात्मा गांधींच्या वर्तणुकीपासून व शिकवणीपासून जी व्यक्तिगत स्फूर्ति मला मिळाली आहे, तिच्याबद्दल मला पुष्कळसें लिहितां येईल. त्यांचा परिचय झाला हा माझा आयुष्यांतील फार मोठा मान होय. परंतु युद्धाची जागा निश्चित भरून काढील अशा प्रकारचा शांततावाद त्यांनीं जगाला दाखवून दिला आहे एवढ्या एकाच मुद्यावर या लहानशा लेखांत मी भर देणार आहें.

पाश्चात्य देशांत अनेकवार ज्या प्रकारचा शांततावाद व्यक्त करण्यांत आला आहे, त्या शांततावादाला परिणामकारक रीतीनें युद्धपद्धतीचें उच्चाटन करणें शक्य होणार नाहीं. युध्दाचा त्याच्याकडून होणारा निषेध आणि जित व जेते या दोघांवरहि युध्दामुळें अधिक संकटें मात्र कोसळतात हा त्यांचा सिध्दांत, हे निःसंशय योग्यच आहेत. उच्चतर मार्ग म्हणून अहिंसा-मार्गाची त्यांच्याकडून होणारी तरफदारीहि उचित होय. परंतु संकट सामोरें आलें असतां समर्थ व परिणामकारक अशा चढाऊ वृत्तीच्या अभावीं पाश्चात्य शांततावाद पुष्कळदां हीनबल ठरतो. सहजासहजीं त्याची अधोगति होऊन त्याचें निष्क्रियतेंत रूपांतर होतें. घडलेल्या अपराधांमुळें ज्यांचें रक्त कढत आहे व चढाई थोपवून धरण्यासाठीं जे तळमळत आहेत, ते शांततावाद्याला अशा चढाईच्या काळीं मजेंत, बेफिकीरपणें हातपाय जोडून बसणारा असें समजतात. ( आणि ही समजूत सर्वस्वीं निराधार आहे असें नव्हे. ) इटलीनें ॲबिसीनियावर केलेलें अतिक्रमण अथवा जर्मनीमध्यें ज्यूविरुद्ध केलेले कायदे यांच्यासारख्या कृत्यांचा प्रतिकार करण्याची आशा शांततावाद्यांच्या मार्गांत त्यांना आढळून येत नाहीं.

आपल्यामागें उच्च अशा नैतिक शक्तीचें पाठबळ आहे असें पाश्चात्य शांततावादी म्हणत असला, तरीहि त्याला निष्ठावान् अशा ख्रिश्चनधर्मीय लोकांमध्येंसुद्धां सार्वत्रिक अथवा खरोखरीनें व्यापक असा पाठिंबा मिळत नाहीं याचें तरी हेंच कारण होय. शांततावाद्याची अशी समजूत होण्याचा संभव असतो कीं, आपला मार्ग फारच उच्च प्रतीच्या अपेक्षा करीत असल्यामुळेंच त्याचा ख्रिश्चनसमुदायाकडून त्याग करण्यांत येतो. पण त्याच्या नैतिक अपेक्षा फार थोडक्या असल्यामुळेंच बरेचसे लोक त्याचा त्याग करतात अशी वस्तुस्थिति आहे. पुष्कळ ख्रिश्चनांना असें वाटतें कीं, नैतिक दुष्कृत्यांच्या बाबतींत शांततावादी लोकांकडून बेफिकीर राहण्याचा प्रमाद होत असतो. धर्मप्रवणता व प्रेम यांच्या प्रकर्षांत ते कमी पडतात. प्रत्येक प्रकारच्या अन्यायाशीं निष्ठुर विरोध अधिक उत्कटतेनें व्यक्त होईल अशा वर्तनाची अपेक्षा खिस्ती धर्मीय लोक शांततावाद्याकडून करीत असतात. याच बाबतींत पाश्चात्य देशांतल्या सामान्य शांततावादाहून महात्मा गांधींच्या युयुत्सु शांततावादाची श्रेष्ठता दिसून आली आहे. गांधींच्या सत्याग्रहांत शांततावाद्यांना हवे असणारे सर्व गुण तर आहेतच; पण उपरोक्त गुणांचाहि प्रकर्ष व आग्रह त्यांत दिसून येतो. "अहिंसेचें इंग्रजींतील खरें भाषांतर म्हणजे प्रेम अथवा औदार्य" असें गांधींनीं लिहिलें आहे. "अहिंसेचें विधायक स्वरूप म्हणजे सर्वव्यापी प्रेम, सर्वगामी औदार्य." "माझ्या दृष्टीनें ईश्वरज्ञानाचा एकमेव मार्ग म्हणजे अहिंसा, प्रेम हा आहे." केवळ हिंसेपासून परावृत्त होणें नव्हे, तर शत्रूविषयीं कोणत्याहि प्रकारची दुर्बुद्धि अथवा कटु विचार न ठेवणें आणि त्याला प्रेमानें व आत्मक्लेशानें वश करून घेण्याचा सदोदित प्रयत्न करणें, हें सत्याग्रहाचें सार आहे. पण सत्याग्रहामध्यें या गुणाप्रमाणेंच दुर्दम्य, चढाऊ असाहि गुण आहे. दुष्कृत्यांचा प्रतिकार करण्यासाठीं आपल्या शक्तीप्रमाणें शक्य तितक्या मोठ्या प्रमाणांत 'आत्मबला' चा उपयोग करणें म्हणजे सत्याग्रह. दुष्कृत्यांना पराभूत केल्याशिवाय तो स्वस्थ बसणारा नाहीं व त्यासाठीं जरूर तर मृत्युसकट सर्व प्रकारचे क्लेशहि तो भोगील.

हिंदुस्थानावर ब्रिटिशांनीं लादलेलें दास्य हें या देशाला व खुद्द ब्रिटिशांनासुद्धां अपायकारक आहे या विचारानें ब्रिटिश राजवटीचा अंत

करण्यासाठीं सर्व आत्मबल पणाला लावून गांधीजींनीं कंबर कसली. परकीयांबद्दल कोणत्याहि प्रकारची द्वेषबुद्धि न ठेवतां, केवळ प्रेम व सदिच्छा मनांत बाळगीत असतांहि त्यांच्या श्रद्धाविषयक झालेल्या तत्त्वांनींच परकीय सत्तेवर कडवेपणानें चढाई करण्यास त्यांना उद्युक्त केलें. पाश्चात्य अधिराज्याचे नैतिक अपाय समोर दिसत असतां निष्क्रिय बसण्याचा सल्ला त्यांनीं आपल्या बांधवांस दिला नाहीं. उलट, आपल्या मतें हिंसात्मक प्रतिकारापेक्षांहि नैतिकदृष्ट्या हीन प्रतीची असलेली ही दास्यवृत्ति उखडून टाकण्याचे प्रयत्न त्यांनीं आरंभिले; आणि आपल्या अहिंसात्मक असहकाराच्या योगानें पुढें न नमणारा पण त्याचबरोबर मत्सरापासून अलिप्त असा स्वातंत्र्याचा एक मार्ग हिंदुस्थानला त्यांनीं दाखवून दिला. हिंसामय युद्धांतल्याप्रमाणेंच खंबीरपणा व भावनावेग ज्यांत आहे, अशा स्वरूपाच्या परकीय सत्तेवर चढविलेल्या हल्ल्याची अपेक्षा त्यांत होती; पण त्याचबरोबर आत्यंतिक आत्मसंयमन, आत्मक्लेश व प्रेम यांचीहि अपेक्षा तो मार्ग स्वीकारणाऱ्यांकडून करण्यांत आली होती.

हा सत्याग्रहाचा मार्ग ख्रिस्ताच्या मार्गाशीं अगदीं जुळता आहे हें ध्यानांत घेतलें पाहिजे. महात्मा गांधींनीं येशू ख्रिस्ताला ' सत्याग्रह्यांचा राजा ' असें संबोधिलें आहे. रोमन सत्ता उखडून टाकण्याचा प्रयत्न ख्रिस्तानें कधीं केला नाहीं हें खरें. स्वदेशबांधवांचीं व त्यांच्या पुढाऱ्यांचीं पापें त्याच्या दृष्टीला परकीय सत्तेमुळें होणाऱ्या पापांहून घोर अशीं वाटत. या पापकृत्यांना त्यानें दुर्दम विरोध केल्यामुळेंच शेवटीं तो मृत्युमुखीं पडला. पण हीं पापकृत्यें करणारांविषयींचें त्याचें प्रेम कधींहि मंद झालें नाहीं. उलट, तें वाढत गेलें. तें इतकें कीं, त्यांचा व सर्व मानवांचा उद्धार व्हावा म्हणून त्यांनीं दिलेली पराकोटीची शिक्षाहि त्यानें आनंदानें सोसली.

पहाडावरील प्रवचनांच्या द्वारा व टॉल्स्टॉयच्या लेखनाच्या द्वारा त्याचप्रमाणें हिंदु धर्मग्रंथांच्या द्वारा ही जी ख्रिस्ताच्या सत्याग्रहाची शिकवण महात्मा गांधी शिकले, तिचीच युरोपला व जगाला आज आवश्यकता आहे, अशी माझी खात्री झाली आहे. मानवजातीवर अवर्णनीय आपदा आणूं पाहणाऱ्या दुराचरणासमोर स्वस्थ बसणारा नव्हे, तर

त्याच्यावर चालून जाणारा युयुत्सु शांततावाद युरोपला व जगाला आज हवा आहे.

आजच्या युरोपच्या स्थितींत या तत्त्वांची अंमलबजावणी करणें सोपें नाहीं. उदाहरणार्थ, आपणांवर लादलेल्या जुलमी कायद्यांचा अहिंसात्मक प्रतिकार करण्यासाठीं आपल्या मंडळींना एकठाय करणें जर्मन किंवा ऑस्ट्रियन ज्यू पुढाऱ्यांना सोपें गेलें नसतें. त्यासाठीं त्यांच्यापैकीं कांहींना निःसंशय बलिदान करावें लागलें असतें. परंतु अशा बलिदानाचे जे नैतिक व आध्यात्मिक परिणाम जगावर झाले असते, त्यांतून सध्यां जर्मनीच्या तुरुंगांत जे उपदेशक क्लेश सहन करीत पडले आहेत त्यांच्या क्लेशांतून होणाऱ्या फलनिष्पत्तीप्रमाणेंच, अत्यंत महत्त्वाची फलनिष्पत्ति साध्य झाली असती.

वर्तमानकालीं सत्याग्रहाची अंमलबजावणी कशी करावी तें लक्षांत येणें अथवा त्याचें आचरण करणें हें सोपें नसलें, तरीहि सत्याग्रहाचें तत्त्व संशयातीत आहे. आगामी नाशाची जाणीव अधिकाधिक होत चाललेल्या जगाला या भुताटकीच्या घरांतून निसटून समजूतदारपणाच्या व शांततेच्या सूर्यप्रकाशांत जावयाचें असल्यास उघडावा लागणारा दरवाजा याच एका किल्लीनें उघडूं शकेल असें मला वाटतें.

आपलें शस्त्र बाजूला ठेवून अंतिम मोक्षासाठीं संन्यासाची तयारी करण्याचा अधिकार ज्या वयांत प्राप्त होत असतो, अशा वयांतसुद्धां एक अखेरचें कार्य—या पाश्चात्य जगांत लढाईवांचून अथवा द्वेषावांचून, न्याय्य व शाश्वत स्वरूपाची तडजोड व्हावी व शांति नांदावी म्हणून तळमळणाऱ्या सर्व युरोपांतील नेतृत्वहीन अशा लक्षावधि लोकांचें नेतृत्व पत्करण्याचें व अशा शांतीसाठीं आम्हीं काय केलें पाहिजे व कोणते क्लेश भोगले पाहिजेत तें दाखविण्याचें कार्य—करून आपल्या सर्व आयुष्यांतील कार्यांवर कळस चढवण्याचें भाग्य तर त्यांच्या वांट्याला येणार नसेल ना, अशी अंधुक आशा अलीकडे पुष्कळदां माझ्या मनांत उद्भवूं लागली आहे.

# एका मित्राची प्रशंसांजलि

## लेखक : सी. एफ्. अँड्र्यूज

### ( बोलपूर, बंगाल )

भावी कालांत शेंकडों वर्षेंपर्यंत महात्मा गांधींचें नांव ज्या दोन गोष्टी-मुळें टिकून राहील त्या दोन गोष्टी म्हणजे ( १ ) त्यांचा खादीचा कार्यक्रम व ( २ ) त्यांचें सत्याग्रहाचें आचरण.

( १ ) या आधुनिक यांत्रिक युगांत जगांतील शेतकरी जनतेमध्यें ग्रामीण उद्योग फार मोठ्या प्रमाणावर पुनरुज्जीवित करणारे ते आद्यपुरुष आहेत. वर्षांतील ज्या ऋतूंमध्यें शेतांत काम करणें अशक्य असतें व शेत-काम स्थगित झालेलें असतें, त्या वेळीं लक्षावधि लोकांना कामधंदा मिळवून देण्याचें साधन म्हणून त्यांनीं तो कार्यक्रम पुढें मांडला. हिंदुस्थान-मध्यें वर्षाकाठीं चार किंवा पांच महिनेपर्यंत असा बेकारीचा काळ असतो. पूर्वीच्या काळीं यंत्रशक्ति नव्हती तेव्हां कुटुंबांतील अगदीं लहानांतल्या लहान मुलांपासून प्रत्येक माणसाचा वेळ कांतणें, विणणें इत्यादींसारख्या ग्रामीण उद्योगांत खर्च होत असे आणि नेहमींच्या वापरासाठीं टिकाऊ वस्त्रप्रावरणें तयार केलीं जात.

मानवजातीपैकीं निदान निम्मा तरी लोकांवर, विशेषेंकरून या यंत्रावर तयार झालेल्या कापडामुळें, कांहीं ठराविक काळ बेकार राहण्याची वेळ आली आहे. कारण, यंत्रावरील कापडाच्या सवंगपणामुळें हळुहळू खेडे-गांवांतील हस्तव्यवसाय नष्टच झाले आहेत.

गांधींच्याच ठिकाणीं अशी उज्ज्वल श्रद्धा प्रथम निर्माण झाली, कीं सर्व प्रकारच्या ग्रामीण व्यवसायांचें पुनरुज्जीवन करणें अद्यापि शक्य कोटींतलें असून त्याच्या योगानें नैतिक व शारीरिक उपासमारीसून खुद्द ग्रामवासीयांचा बचाव करतां येईल. लक्षावधि लोकांच्या मनांत या

दृष्टीनें एक नवीन आशा फैलावण्याचें कार्य ते करूं शकले आहेत. त्यांच्या प्रतिभेचा स्पर्श केवळ हिंदुस्थानालाच झाला आहे असें नाहीं. युद्धाच्या आपत्तीमुळें चीनमधील शेतकऱ्यांनीं कपाशीचें पीक वाढवून कांतण्याचा व कापड विणण्याचा धंदा केव्हांच सुरू केला आहे. उत्तर ध्रुवाजवळच्या कॅनडामधील व इतर राष्ट्रांतील प्रदेशांत थंडीच्या ऋतूंत जेव्हां रात्री फार मोठ्या व अंधाऱ्या असतात, तेव्हां अशाच प्रकारच्या हस्तव्यवसायांचें पुनरुज्जीवन होणें अगदीं शक्य आहे.

( २ ) अहिंसेचा त्यांनीं जो अत्यंत अभिनव असा पुरस्कार स्वतःच्या जबाबदारीवर केला, त्याच्या योगानें त्यांनीं जगाला असें दाखवून दिलें आहे कीं, संघटित अशा नैतिक प्रतिकाराच्या म्हणजेच सत्याग्रहाच्या संपूर्णत: स्वेच्छेनें भोगलेल्या आत्मक्लेशांनीं युद्धांतील हिंसेला पराभूत करणें आजच्या घटकेलाहि शक्य आहे. दक्षिण आफ्रिकेमध्यें त्यांनीं या बाबतींत घसघशीत विजय मिळविला. त्यांनीं आपल्या सत्याग्रहींची ‘ भिकारडी फौज ’ ड्रॅकन्सबर्गच्या पहाडांतून ज्यावेळीं ट्रान्सवालमध्यें नेली तेव्हां जनरल स्मट्सनें त्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्या. हिंसक शस्त्रावांचून चालवलेली ही युद्धाची पद्धत दुर्दम्य आहे ही गोष्ट जनरल स्मट्सनें मान्य केली.

प्रस्तुत निबंधाच्या या शेवटच्या विभागांत अशा महान् विषयावर विस्तारानें लिहिणें शक्य नाहीं. पण या ग्रंथांत दुसरे लोक यासंबंधीं जास्त लिहिण्याचा संभव आहे. मागेंच उल्लेखिलेल्या संत फ्रान्सिसच्या उदाहरणाकडे वळून मी पुरें करणार आहें. ते सुद्धां खेडेगांवच्या लोकांनीं तयार केलेली खादीच रोजचें वस्त्र म्हणून वापरीत असत. आपल्या काळांत त्यांनीं अशा रीतीनें खादीला पुनः मानाचें स्थान मिळवून दिलें. युद्धमग्न सैन्यांत आपल्या प्रेमाच्या संदेशानें शांति प्रस्थापित करण्यासाठीं संत फ्रान्सिस हे सारासेन लोकांच्या सशस्त्र सैन्यांत असेच शस्त्र न घेतां, क्लेश भोगण्याच्या तयारीनें गेले होते. एवंच, महात्मा गांधींना ज्या कल्पना प्रिय वाटतात, त्याच संत फ्रान्सिस यांच्या मनांत होत्या. म्हणजे ह्या दोघांचेहि आत्मे समानधर्मी ठरतात. पण आतां महात्मा गांधी याच्याहि पुढें गेले आहेत; त्यांचे खादीचे व सत्याग्रहाचे दोन महान् ‘ सत्याचे

प्रयोग ' ( त्यांना ते याच नांवानें संबोधतील व तें उचितहि आहे ) मानवजातीच्या सामुदायिक जीवनामध्यें आतां सामील करून घेण्यांत आले आहेत. मानवी इतिहासांत कधींहि झाले नसतील एवढ्या मोठ्या प्रमाणावर त्यांचे प्रयोग होऊन गेले आहेत. अतएव, कोणत्याहि विद्यमान व्यक्तीपेक्षां ते श्रेष्ठ असे शांतिदूत व मानवजातीचे कल्याणकर्ते ठरले आहेत.

---

# समाजशास्त्रज्ञ व समाजसंशोधक म्हणून गांधींचें स्थान

लेखक : **रिचर्ड बी. ग्रेग** ( यु. स्टे. अमेरिका )

हिंसेचा प्रश्न व तो सोडवण्याची गांधीजींची पद्धति यांचें विवेचन मीं माझ्या " अहिंसेचें सामर्थ्य " ( The power of Non-violence ) या पुस्तकांत केलेंच आहे. त्या विषयाचें अधिक विवेचन येथें करण्याचा प्रयत्न मी करीत नाहीं. त्यांच्या पद्धतीमुळें हिंदुस्थानाला अद्यापि स्वातंत्र्य मिळालें नसलें, तरी त्याच्या योगानें फार मोठी प्रगति साधली असून जवळजवळ सर्व जनतेची राजकीय व सामाजिक दृष्टि पालटली आहे. बहुतेक लोकांचा पूर्वीचा हीनगंड नष्ट झाला असून त्याच्या ऐवजीं आतां त्यांच्या मनांत आशा, आत्मविश्वास, राजकीय उत्साह व नवीन प्रकारची शक्ति निर्माण झाल्याचें प्रत्ययास येत आहे.

दारिद्र्य व बेकारी यांवर उपाय म्हणून हातपिंजण, हातकांतण, हातविणाई यांचें पुनरुज्जीवन व दुसऱ्या हस्तव्यवसायांचा पुनर्विकास करावा असे गांधीजी सुचवतात. पाश्चात्य देशांत व पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या व शहरी राहणीचा परिचय झालेल्या हिंदी लोकांकडून हिंदुस्थानांतहि या सूचनेची इतक्या मोठ्या प्रमाणावर हेटाळणी चालू आहे कीं, पाश्चात्य

कल्पनांच्या परिभाषेंतच त्या सूचनेंतील तर्कशुध्दतेचें विवेचन करावें असा माझा विचार आहे.

हिंदुस्थानांतल्या ऋतुमानामुळें म्हणजे थोडे महिनेच टिकणारा पण सलग असा पाऊसकाळ व नंतर लांबलचक असा उन्हाळा, अशा प्रकारच्या विभागणीमुळें देशभर तीन ते सहा महिने असे असतात, कीं शेतकऱ्यांना अगदीं स्वस्थ बसावें लागतें. ही गोष्ट हिंदुस्थानांत चांगली ज्ञात आहे, पण बाहेर ती क्वचितच कोणाला ठाऊक असेल. उन्हाळ्याच्या कडाक्यांत कठिण झालेली जमीन नांगरतां येत नाहीं. पेरणी अथवा कापणी तर नसतेच. आणि हिंदुस्थानांतल्या शेतांत व रानांत खपणारे असे सुमारें १२,००,००,००० लोक असल्यामुळें या हंगामी बेकारीचें प्रमाण, मुळांतच व लोकसंख्येच्या मानानेंहि, फार प्रचंड असें आहे. त्यायोगानें आर्थिक नुकसानहि अतोनात होऊन जें मानसिक व नैतिक नैराश्य त्यामुळें येतें तें भयंकर असतें. पाश्चात्य देशांतून गिरणीचें कापड येऊं लागण्यापूर्वी हा फावला वेळ शेतकरी सूत कांतण्यांत, स्वतःचे कपडे विणण्यांत व इतर जोडधंदे करण्यांत घालवीत असत. आजसुध्दां हिंदुस्थानांत वापरण्यांत येणाऱ्या कापडापैकीं सुमारें एक तृतीयांश कापड हातमागावरच विणलें जात आहे. हिंदुस्थानांतल्या बहुतेक प्रत्येक प्रांतांत कापूस पिकतो. या हातमागाची किंमत शेतकऱ्याच्या निकृष्ट मिळकतीला झेपेल अशी असते. हस्तव्यवसायांची परंपरा अद्यापि लुप्त झालेली नाहीं. हातबनाईच्या कापडाची किंमत गिरणी-कापडाच्यापेक्षां फारशी अधिक नसते, व जे स्वतःचे सूत कांततात त्यांना तर ती कमीच पडते. लोकसंख्येपैकीं बहुतेकांचा वस्त्रप्रावरणावरील खर्च एकंदर राहणीच्या एकपंचमांशापासून एकषष्ठांशापर्यंत भरतो. एकदर खर्चाच्या एकदशांशाइतकी बचत झाली–ती या मार्गानें विशेष ताण न पडतां होणें शक्य आहे–तर अगदीं हातावर पोट भरणाऱ्या लोकांना ती फार मोठी मदत होईल. असे हस्तव्यवसाय फक्त आर्थिक दृष्ट्याच मोलाचे असतात असें नव्हे. आशा, उभारी, स्वाभिमान व स्वावलंबन ह्या सर्वांची दीर्घकालीन बेकारी व दारिद्र्य यामुळें जी वाताहत उडालेली असते ती पुनरपि प्रस्थापित करण्याचें कार्य न कळत पण फार जोरदार रीतीनें हस्तव्यवसायांच्या

साहाय्यानें साध्य होतें. हस्तव्यवसायांच्या अंगीं असलेली ही शोधनाची व रोपणाची शक्ति आधुनिक मानसवेत्त्यांना चांगली पटली असून, 'व्यावसायिक उपचारपद्धति' या नांवानें, मानसिक रोग व विशेषेंकरून मन शिथिल करून टाकणाऱ्या वेडेपणावर उपाय म्हणून या व्यवसायांची योजना सर्वत्र होत आहे. अतएव, हिंदुस्थानांतील बेकारी नष्ट करण्याचा उपाय म्हणून हस्तव्यवसाय पुनरुज्जीवित करण्याची ही योजना प्रथमदर्शनीं वाटते तितकी वेडगळपणाची नाहीं.

तरीहि अनेक लोक या कल्पनेची टर उडवतात; आणि ही परागति आहे, हा कालविपर्यास आहे, घड्याळाचे काटे उलटे फिरवण्याचा यांत प्रयत्न आहे, श्रमविभागाचें जें अत्यंत फलदायी तत्त्व त्याचा त्याग करण्याप्रमाणें हें आहे, यंत्रें व विज्ञान यांना दूर भिरकावून देण्यासारखें हें आहे, असें त्याचें म्हणणें असतें.

कोणतीहि व्यवसायपद्धति तिचा अवलंब ज्या समाजाकडून करण्यांत येतो त्या समाजाच्या कल्याणाकरितां असते, असें समजण्यास प्रत्यवाय नाहीं. ती जर समाजांतील एका मोठ्या गटाला हितकर होत नसेल, तर स्वतःची आर्थिक स्थिति खरोखरीच सुधारील अशा दुसऱ्या कोणत्या तरी व्यवसायपद्धतीचा अंगीकार करण्यांत कसलाच मूर्खपणा नाहीं. स्वीकृत व्यवसायपद्धति, लक्षावधि लोकांना त्यांच्या गरजा पुरवण्यास समर्थ होईनाशी झाली म्हणजे त्या लोकांचा मार्ग खुंटल्याप्रमाणें होतो. अशा परिस्थितींत त्यांनीं स्वतःच्या काबूंत ठेवतां येईल असा मार्ग आढळेपर्यंत मागें मागें सरत न जाणें हा मूर्खपणा ठरेल. आर्थिक व्यवस्थेचें घड्याळ त्यांच्यापुरतें तरी बंद पडल्यासारखेंच होतें. मग कोणत्याहि गतीनें का होईना, जी व्यवसायपद्धति स्वतःच्या मुख्य गरजा प्रत्यक्षपणें भागवूं शकेल ती स्वीकारणें म्हणजे घड्याळ मागें फिरविणें नव्हे, तर तें पुन्हां सुरू करणें होय. हस्तव्यवसायांपेक्षां आधुनिक युद्धेंच अधिक परिणामकारक रीतीनें घड्याळाचे काटे उलटे फिरवतील. तरीहि युद्धासाठीं एकाहून एक प्रचंड अशा रकमा राजकारणी पुरुष खर्च करीतच आहेत आणि त्या गोष्टीला बहुतेक सगळे यंत्रशास्त्रज्ञ व इतर "सुशिक्षित" लोक मान्यता देत आहेत.

हस्तव्यवसाय सुरू होते त्या वेळीं व्यवसायाचें जें समाजासंबंधींचें कार्य होतें तें आधुनिक यंत्रपद्धतीनें अधिक खालच्या दर्जावर आणून ठेवलें. हस्तव्यवसायांच्या काळांतल्यापेक्षां हल्लीं नैतिक आचरणांतील सुसंबद्धता आमच्या फारशी पुढें गेलेली नाहीं. मानवसमाज हा एकदेही आहे हें न उमगण्याचा व तदनुरूप आचरण न करण्याचा, आणि तो एकदेहीपणा दैनंदिन व्यवहारांत व व्यवसायांत व्यक्त होईल अशा पद्धती, अवजारें, व विनिमयाचीं साधनें पसंत न करण्याचा निर्बुद्धपणा जेव्हां आमच्या बापजाद्यांनीं व आम्हीं केला तेव्हांच आमची खरी "पीछेहाट" झालेली आहे.

हस्तव्यवसायांचा स्वीकार केला म्हणजे श्रमविभागाचें तत्त्व सोडून दिलें असें नव्हे. पूर्णपणें स्वयंचालित व अंशतः स्वयंचालित यंत्राच्या योगानें तें तत्त्व थोडेंफार पुराणेंच झालें आहे. दुसऱ्याहि कांहीं कारणामुळें तें तत्त्व कांटेकोरपणानें लागू करणें शक्य राहिलेलें नाहीं; कारण त्याच्यासाठीं आवश्यक अशा दोन बाबतींत बदल झालेला आहे. एक म्हणजे पूर्वींच्या मोठ्या बाजारपेठा संकोच पावल्या आहेत, आणि दुसरें म्हणजे कामगार, व्यवस्थापक, व भांडवलदार यांच्यामधील पूरक साहाय्याची वृत्ति, परस्परावलंबित्व व सुसंगति हीं कमी झालीं आहेत. श्रमविभागाच्या तत्त्वाची कल्याणप्रदताहि मर्यादित असून त्या मर्यादासुद्धां अलीकडे आकसलेल्या आहेत.

गांधीजींची योजना विज्ञान वा यंत्रसामुग्री यांना त्याज्य समजत नाहीं. सध्यां वापरण्यांत न येणाऱ्या मानवी शक्तीच्या संचयाशीं—बेकारांशीं—साध्या यंत्रसामुग्रीला निगडित करण्याचें कार्य ती योजना करीत आहे. जनतेच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीशीं जुळते म्हणून विशिष्ट प्रकारची यंत्रसामुग्री पसंत करण्यांत आली असून, आधींच फार मोठ्या अडचणींच्या काळांत आणखी अवघड अशा सामाजिक व आर्थिक प्रश्नांची भर त्या विशिष्ट यंत्रसामुग्रीमुळें पडणार नाहीं, म्हणूनहि ती पसंत करण्यांत आलेली आहे.

सांप्रत काळीं सर्व राष्ट्रांत युद्धसामुग्री व लष्करी कामें यांच्या खातीं सरकारी खजिन्यांतून एकसारखी वाढती रक्कम खर्चीं पडत असून त्यामुळें

सर्वसामान्य राहाणीचें मान एकसारखें घसरत चाललें आहे व शिक्षण, आरोग्य इत्यादि सार्वजनिक सेवेच्या खात्यांना काट बसत आहे. अर्थव्यवहाराच्या पद्धतीला पडता काळ आला आहे. कारण कांहींहि असो, पाश्चात्य देशांत समाजाची अखंड अशी परागति व विघटना होत चालली असून वेडेपणा, आत्महत्त्या, व गुन्हे यांची वाढ झालेली दिसत आहे. आणखी एक जागतिक युध्द ओढवलें, तर हस्तव्यावसायिक उपचारांची मानवजातीला मोठ्या प्रमाणावर आवश्यकता भासूं लागेल. खादी व अन्य सर्व प्रकारचे हस्तव्यवसाय सगळीकडच्या जनतेच्या दृष्टीनें आर्थिक पध्दति म्हणून अधिकच मोलाचे ठरतील.

तसेंच यंत्रपूर्ण देशांतील लोकसंख्या झपाट्यानें घटण्याच्या बेतांत आहे, ही गोष्टहि आपण दृष्टिआड करतां कामा नये. यासंबंधींचा संगतवार पुरावा कार-सॉंडर्स, कुकझिन्स्कि, टी. एच्. मार्शल, एनिड चार्लस, एच्. डी. हेंडरसन, ऑर्नोल्ड प्लान्ट व हॉग बेन यांच्यासारख्या अधिकारी व्यक्तींनीं मांडलेला आहे. लोकसंख्या घटल्यामुळें व विशेषेंकरून पाश्चात्य देशांत ती घटल्यामुळें जे प्रचड आर्थिक व सामाजिक परिणाम होतील ते फार दुर्लंघ्य व जगद्व्यापी असे होतील. याहि कारणास्तव हस्त-व्यवसायांचा, विशेषेंकरून खादीचा, अतिशय उपयोग होणार आहे.

इतर अनेक कारणांपैकीं वर सांगितलेल्या या कारणामुळें माझी अशी खात्री पटली आहे कीं, गांधीजी हे एक महान् समाजशास्त्रज्ञ व समाज-संशोधक आहेत. त्यांच्या कर्तबगारीवरून मला एका प्राचीन संस्कृत वच-नाची आठवण झाली. “अवघड कर्मं केलीं म्हणून नव्हे, तर शुद्ध मनानें कार्यें केलीं म्हणून मनुष्याला सिद्धि प्राप्त होत असते.” उदात्त व एकनिष्ठ हेतूच्या आणि अव्यभिचारी श्रद्धेच्या व्यक्तीलाच आश्चर्यजनक कार्यें पार पाडतां येतात, हाच याचा अर्थ. गांधीजींच्या रूपानें ही देणगी आम्हांस दिल्याबद्दल आपण ईश्वराचे उपकार मानूं या !

# एका पाश्चात्यश्रेष्ठाचा गांधीजींना प्रणाम

## लेखक : रोमा रोलाँ

( व्हिला ओल्गा, व्हिलेनुव्ह, स्वित्सर्लंड )

ज्यांची कथागत स्मृति युगानुयुगेंपर्यंत कायम राहील असे हिंदुस्थानच्या राष्ट्रीय इतिहासांतील एक वीरपुरुष, एवढेंच कांहीं गांधीजींचें माहात्म्य नाहीं. हिंदुस्थानच्या जनतेंत स्वतःच्या एकीची, स्वसामर्थ्याची व स्वातंत्र्याची अभिमानास्पद जाणीव जागृत करणाऱ्या कार्यप्रवण जीवनाची प्रेरणा देणें एवढेंच कांहीं त्यांचें कार्य नव्हे. पाश्चात्य देशांतील लोकांसाठीं त्यांच्याच ख्रिस्ताचा लुप्तस्मरण व भ्रष्ट झालेला संदेश पुनरुज्जीवित करण्याचें कार्य त्यांनीं केलें आहे. मानवजातींतल्या ऋषींच्या आणि संतांच्या मालिकेंत त्यांनीं आपलें नांव चिरस्थायी केलें असून त्यांच्या व्यक्तिमत्वाची प्रभा पृथ्वीच्या पाठीवर देशोदेशीं फांकली आहे.

युरोपखंडाच्या डोळ्यासमोर ते अशा क्षणीं उभे राहिले कीं, ज्यावेळीं त्यांच्यासारखा आदर्श एकाद्या चमत्काराप्रमाणें वाटावा. चार वर्षे चाललेल्या तुंबळ संगरांतून युरोपखंड नुकतेंच कोठें बाहेर पडत होतें. युद्धामुळें झालेला विध्वंस, लूटमार ह्या गोष्टी अद्यापि ताज्या होत्या, व त्यानें भडकलेला द्वेषाग्नि धुमसत होता. त्यामुळें नव्या व पूर्वीपेक्षांहि दुर्दम अशा युद्धांची व त्यांच्याशीं संलग्न असणाऱ्या समाजोन्मूक क्रांतीचीं बीजें पेरलीं जात होतीं. क्रांतीपाठोपाठ समाजांत उद्भवणारे विद्वेष अनेक राष्ट्रांचें अंतःकरण फाडून खात होते. क्लेशगर्भ व निराशागर्भ अशा घनतिमिराचें दडपण युरोपवर पडलेलें असून प्रकाशाचा एक किरणसुद्धां कोठें दिसत नव्हता. सर्व हिंसेचा त्याग ज्यानें केला आहे, केवळ बुद्धि व प्रेम हींच ज्याचीं आयुधें आहेत, ज्याच्या मृदुकठोर सभ्याचाराला नुकतेच कोठें विजय प्राप्त होऊं लागले आहेत, अशा दुर्बळ व उघड्यानागड्या शरीराच्या

गांधींचा उदय म्हणजे पाश्चात्य देशांनीं परंपरेनें व निःशंकपणानें अंगीकृत केलेल्या राजकारणाचा व तत्त्वज्ञानाचा तो उघडउघड निषेधच होता. परंतु त्यांच्या उदयामुळें निराशांधकाराचा वेध करणाऱ्या आरोग्यदायी तेजोकिरणांचा लाभ झाला! त्या दृश्यावर विश्वास ठेवणेंसुद्धां कठिण होतें...अशा विलक्षण गोष्टीची सत्यता पटण्यासाठीं कांहीं काळ जावा लागला...या बाबतींत माझ्याहून अधिक माहिती कोणाला असणार? कारण महात्माजींचे गुण सर्वांच्या आधीं ओळखून त्यांचा संदेश पाश्चात्य देशांत पसरविणाऱ्यांपैकीं मी एक होतों...परंतु हिंदुस्थानच्या आध्यात्मिक गुरूच्या अस्तित्वाची आणि अखंड, अविचल व प्रगतीपर अशा त्यांच्या कर्तृत्वाविषयींची खात्री जसजशी पटूं लागली, तसतशी मान्यता व श्रद्धा यांचा एक पूरच पाश्चात्य देशांकडून त्यांच्याकडे लोटूं लागला. पुष्कळांना वाटलें, त्यांच्या रूपानेंच ख्रिस्त परत आला आहे. ज्या पाश्चात्य संस्कृतीच्या गतीवर कोणत्याहि नैतिक तत्त्वांचें नियंत्रण उरलें नव्हतें व जिच्या ठिकाणची आश्चर्यकारक शोधबुद्धि विकृति पावून आत्मनाशासाठींच उपयोगांत आणली जात होती, त्या पाश्चात्य संस्कृतीच्या स्वैर आचारामुळें उद्विग्न झालेल्या इतर स्वतंत्र विचारवंतांना, गांधी म्हणजे संस्कृतीनें उत्पन्न केलेलें अभ्रपटल व दुराचरण यांचा निषेध करून निसर्गाकडे, साध्या जीवनाकडे, आरोग्याकडे वळा, असा उपदेश मानवजातीला करणाऱ्या जीन जॅक्स् रूसो व टॉल्स्टॉय यांचा अवतारच वाटला. सरकारनें त्यांची उपेक्षा व तिरस्कार करण्याची बतावणी केली. परंतु राष्ट्राराष्ट्रांतील जनतेला ते आपले श्रेष्ठ मित्र आहेत, आपले बंधु आहेत, असें वाटलें. या स्वित्स-लँडमध्यें दऱ्याखोऱ्यांतील दरिद्री शेतकऱ्यांच्या अंतःकरणांत शुद्ध प्रेमाची ज्योत त्यांनीं कशी पेटविली आहे, याचा मला अनुभव आहे.

"गिरीवरील धर्मप्रवचना"च्या प्रवक्त्यानें* दिलेल्या संदेशाप्रमाणेंच गांधींच्या बुद्धिबल व प्रेम यांच्या संदेशामुळेंहि असंख्य सद्वृत्त लोकांचीं अंतःकरणें भारावून गेलीं होती. तरीहि त्या गोष्टींवर विसंबून युध्दें व संहार यांचे उपासक बनलेल्या जगाच्या भवितव्याचा मार्ग बदलण्याची

---

* येशू ख्रिस्तानें. गिरीवरील धर्मप्रवचन–Sermon on the Mount.

हाव गांधींनीं धरली नाहीं. राजकारणामध्यें अहिंसेच्या तत्त्वाची अंमल बजावणी करायची असेल, तर युरोपमध्यें सध्यां फैलावलेल्या वातावरणाहून अगदीं निराळें असें नैतिक वातावरण असणें अवश्य आहे. लक्षावधि लोकांचें रक्त सांडून आपल्या क्रौर्याच्या खुणा ज्यांनीं मागें ठेविल्या आहेत व जगामध्यें ज्या बध्दमूल झालेल्या आहेत अशा नवीन पध्दतीच्या सर्वाधिकारशाह्यांच्या वाढत्या निर्घृणतेपुढें ज्याला तात्काल यश मिळविण्याची यत्किंचितहि आशा नाहीं अशा संपूर्ण, प्रचंड व सर्वसंमत आत्माहुतीची, आवश्यकता आहे. त्या प्रकारचें नैतिक वातावरण निर्माण करावयाचें तर दीर्घ काळपर्यंत यातनांच्या दिव्यांतून जनता गेल्यावांचून असलें बलिदान विजयी होण्याची व त्याची प्रभा फांकण्याची संभाव्यता अथवा आशा नाहीं; आणि मन उदात्त करणारी व त्याला धीर देणारी श्रध्दा गांधींच्याप्रमाणें अंगीं आल्याशिवाय जनतेमध्यें असल्या वीरधर्माचें बळ संचारणार नाहीं. या ईश्वरावरील श्रध्देची पाश्चात्य देशांतील बहुसंख्य लोकांत, जनतेंत व त्याचप्रमाणें त्यांच्या पुढाऱ्यांतहि वाण आहे. नवोदित धर्म–मग ते राष्ट्रवादी असोत अथवा क्रांतिवादी असोत–हिंसाजनक आहेत. फासिस्ट व वंशवादी राष्ट्रांच्या संयुक्त व सर्वभक्षक अशा साम्राज्यवादामुळें धोक्यांत आलेलें आपलें स्वातंत्र्य, नागरिकत्वाचे हक्क, किंबहुना, आपले प्राण, मिळेल त्या साधनांनीं रक्षण करणें हेंच युरोपांतील सर्व जनतेपुढें वाढून आलेलें अत्यंत निकडीचें काम आहे. राजसत्तेपासून ते भ्रष्ट होतील, तर कदाचित् कित्येक शतकेंपर्यंतसुद्धां मानवजात खासच दास्यांत पडेल. म्हणून अशा परिस्थितींत गांधींच्या तत्त्वाविषयीं आम्हांला कितीहि आदर असला, तरी व्यवहार्य म्हणून त्यांची शिफारस करणें शक्य होणार नाहीं.

मध्ययुगांत महान् अशा ख्रिश्चन मठांनीं जी कामगिरी बजावली ती जगामध्यें बजावण्याचें कार्य गांधी–तत्त्वज्ञानाकडे आलेलें आहे, असें वाटतें. खवळलेल्या समुद्रांतील बेटाप्रमाणें ते मठ होते. त्यांत नैतिक संस्कृतीचें अत्यंत निर्मल असें धन म्हणजे प्रेम व प्रतिष्ठित प्रज्ञा, यांचें जतन केलेलें असे. केवढें गौरवास्पद व पवित्र कार्य! ख्रिश्चन पंथाच्या संत ब्रूनो, संत फ्रान्सिस इत्यादि प्राचीन संस्थापकांप्रमाणेंच गांधींचाहि आत्मा, ज्या ह्या

क्लेशनिर्भर व संकटमय युगांतून मानवजात पार होत आहे, त्या युगांत मानवप्रेमाच्या व सुसंवादित्वाच्या भावना तेवत ठेवो !

आणि आम्ही बुद्धिवादी लोक, शास्त्रज्ञ, साहित्यिक, कलाकोविद, आम्ही-देखील आमच्या अल्पशक्तीप्रमाणें " अखिल मानवांची नगरी । जेथें विठू राज्य करी " उभारण्याच्या प्रयत्नांत आहों. आम्ही चर्चच्या परि-भाषेंत राज्याचे तृतीयपाद आहों व अखिल मानवबंधुत्वाला आम्ही मान्यता देणारे आहोंत. आम्ही मनानें व क्रियेनें आमच्या भावी मानवधर्माच्या ध्येयाची साधना चालविणाऱ्या आणि आम्हांस गुरुसमान व बंधुसमान असणाऱ्या गांधींना आमची प्रेमादराची अंजलि अर्पण करतों.

---

# सत्याग्रहाचा मार्ग

## लेखिका : **श्रीमती सोफिया वाडिया** ( मुंबई )

हिंदुस्थानाचे राजकीय पुढारी म्हणून गांधीजी जगाला सुपरिचित आहेत. गूढवादी व धर्मशील व्यक्ती म्हणून लोक त्यांचा उल्लेख करतात हें खरें; पण पुष्कळ वेळां त्यांच्या धर्मशीलतेला गौण स्थान देण्यांत येतें. ब्रिटिश लोक, इतकेंच काय, पण त्यांचे देशबांधवदेखील त्यांचीं विधानें समजून घेण्याच्या बाबतींत चुका करतात. कारण ते तीं अशा भावनेनें ऐकतात वा वाचतात, कीं तीं विधानें जणुं कांहीं एकाद्या देशाभिमानी मुत्सद्यानेंच केलेलीं आहेत. " नीतिविरहित राजकारण त्याज्य समजा-वयाचें " हा जो त्यांचा दंडक आहे, त्याच्या महत्त्वाकडे त्यांचें दुर्लक्ष होतें. " माझा धर्म व माझा देशाभिमान यांत सेव्यसेवकभाव आहे " असें जेव्हां गांधीजी म्हणतात, तेव्हां जगांतील सांप्रतच्या उत्पातांचें आदिकारण असलेला जो राष्ट्रवाद व देशनिष्ठा यांना नवीन अर्थ प्राप्त करून देण्याची त्यांची इच्छा असते. हिंदुस्थानाच्या शत्रूलाहि ते अपाय

करणार नाहींत; कारण कोणाहि व्यक्तीला अपाय करणें, हें धर्मविरुद्ध होय.

अतएव, गांधींच्या मनोगत धर्माविषयीं आपण अधिक ज्ञान करून घेणें आवश्यक ठरतें. स्वतःला ते हिंदु म्हणवतात. याचा अर्थ इतकाच कीं, हिंदुधर्मांत जीं साधनसत्यें सांगितलेलीं आहेत तीं त्यांच्या अन्तःकरणाला पूर्णपणें पटतात. ते म्हणतात :

" परमार्थानें हिंदुधर्म, इस्लामधर्म, ख्रिश्चनधर्म इत्यादींचा धर्मांत अन्तर्भाव होत असला, तरी पण धर्म हा त्या सर्वांहून श्रेष्ठ होय. त्याला सत्य या नामाभिधानानें ओळखावें. हें सत्य म्हणजे प्रसंगोपात्त दाखवलेला प्रामाणिकपणा नव्हे, तर सर्वांना व्यापणारें व सर्व संहारानंतर व रूपांतरानंतर टिकून राहणारें जीवनसत्य.

" धर्म मला प्रिय आहे. हिंदुस्थान अधार्मिक बनत चालला आहे ही माझी मोठी तक्रार आहे. हें म्हणत असतां माझ्या मनांत हिंदु-मुसलमान, अथवा पारशीधर्माचा विचार येत नाहीं. सर्व धर्मांना आधारभूत असणाऱ्या धर्माविषयीं हें मी बोलत आहें. आपण ईश्वरापासून दूर चाललों आहों. "

" सर्वव्यापी, अव्याख्येय अशी गूढ शक्ति " अशी गांधीजी ईश्वराची व्याख्या करतात. स्पष्टीकरणादाखल ते म्हणतात :

" माझ्या सभोंवारचें वस्तुजात एकसारखें बदलत आहे, एकसारखें नष्ट होत आहे; असें असतांहि या सर्व रूपांतराच्या मुळाशीं सर्वांना निगडित करणारी, निर्माण करणारी, सृष्टीचा लय करून पुनः तिला निर्माण करणारी अक्षय्य अशी चैतन्यमय शक्ति आहे हें मला स्पष्ट दिसत आहे. ही सर्वाभूतीं वास करणारी शक्ति अथवा आत्मा म्हणजेच ईश्वर होय. "

हा ईश्वर सच्चिदानंदस्वरूपी, त्रिविध आहे.

" सत्य हा शब्द, सत् म्हणजे असणें, यापासून साधलेला आहे. सत्याशिवाय दुसरी कोणतीहि गोष्ट आस्तित्वांत नसते...आणि जेथें सत्य आहे तेथेंच ज्ञान नांदतें...आणि जेथें खरें ज्ञान असतें तेथेंच सदैव आनंदाचा वास असतो. "

तो ईश्वर भूतमात्राचे ठायीं असून भूतमात्र या ईश्वराच्या मूर्ती असल्यामुळें आपणां प्रत्येकाच्या ठिकाणीं सच्चिदानंदाचा निवास आहे.

पण तो अल्पांशानेंच व्यक्त झालेला असतो. कारण, अज्ञान व प्रमाद यांनीं तो झांकला गेलेला आहे. अंतरात्म्याच्या ठिकाणीं असणाऱ्या दैवी संपत्तीच्या नियंत्रणांप्रमाणें आचरण ठेवण्याचा प्रयत्न मानवांनीं केला पाहिजे. हिंदी लोक ईश्वराला विमुख होत आहेत, अशी तक्रार जेव्हां गांधीजी करतात, त्यावेळीं त्यांच्या म्हणण्याचा अर्थ असा असतो कीं, त्यांच्या ठिकाणच्या ईश्वरी आदेशानुसार आचरण ठेवण्याचा ते प्रयत्न करीत नाहींत. " मनुष्य हा पशूहून उच्च असून त्याला कांहीं दैवी कार्य साधावयाचें असतें. " जडसृष्टि आपल्या परिचयाची आहे; परंतु आपल्या अंतःकरणांतील स्वर्गीय गोष्टी आपणांस अपरिचित आहेत.

मनुष्यमात्राचें उच्चतर कर्तव्य तें कोणतें ? अखंड आनंदाचा लाभ करून देणारें एकमेव साधन जें ज्ञान, त्याच्या साह्यानें सत्याचा शोध लावणें हेंच तें कर्तव्य होय. " सत्याचें संपूर्ण ज्ञान होणें म्हणजेच स्वतःची व स्वतःच्या भवितव्याची ओळख करून घेणें, म्हणजेच पूर्ण बनणें. "

परंतु माणसाच्या ठायीं कनिष्ठ अशा पशुभावांचा देखील वास असतो. म्हणून ज्या मातीचा मनुष्यदेह बनला आहे, तिच्यावर अपूर्णतेचा शिक्का बसलेला असतो. आपल्या ठिकाणच्या सुप्त पूर्णतेचें व त्याचबरोबर त्याला आवृत करून ठेवणाऱ्या अपूर्णतेचें ज्ञान करून घेणें ही प्रथमावश्यक गोष्ट आहे. ह्या आपल्या दैवी व आसुरी संपत्तीच्या सन्मुख उभे राहिल्यानंतर आपणांस जी कामगिरी बजावावी लागते तिचें वर्णन गांधीजींनीं फार मार्मिक रीतीनें केलें आहे. ते म्हणतात :

" माझ्या ठिकाणच्या अपूर्णतेची मोठी क्लेशदायक जाणीव मला असते व त्या जाणीवेंतच माझ्या ठिकाणचें सर्व सामर्थ्य सामावलेलें आहे. कारण, माणसांनीं आपल्या स्वतःच्या मर्यादा ओळखणें, ही मोठी दुर्मीळ गोष्ट होय. "

आपणांला आपल्या मर्यादा नीट माहीत नसल्याकारणानें आपल्या ठिकाणची दैवी संपत्ति आपल्या डोळ्यांस दिसत नाहीं. आपल्या ठिकाणच्या अपूर्णतेमुळें तिच्याशीं दोन हात करण्याचा व तिला पराभूत करण्याचा प्रश्न उपस्थित होतो. तो उपस्थित झाला कीं लगेच आपण आत्मा व

आत्म्याचें सामर्थ्य या मुद्यापर्यंत येऊन पोंचतों. या अपूर्णतेवर मिळविलेल्या विजयामुळेंच " जीवन हें मृत्युंजय ठरतें. "

आपल्या ठिकाणची अव्यक्त पूर्णता व्यक्त व्हावी याकरतां आपल्या अपूर्णतेवर मात करावयाचें जें तंत्र आहे तें गांधीजींनीं पुढील आदेशांत सांगितलें आहे : " आपणां सर्वांच्या ठायीं सुप्त असलेली अहिंसा जागृत व विकसित करा. " यांतील अर्थ लक्षांत घ्या. जें अव्यक्त आहे, तें प्रयत्नानें व्यक्त करावयाचें आहे. हा प्रयत्न कसा करावा ?

" माणसाला जर कोणता दैवी आदेश पार पाडावयाचा असेल, तर तो म्हणजे अहिंसा हाच होय. भोंवतीं सर्वत्र हिंसा पसरली असली, तरी अंतरात्म्याच्या गाभाऱ्यांत लीन होऊन मनुष्याला जगापुढें अशी घोषणा करतां येईल कीं, या हिंसामय जगांत अहिंसा हेंच मानवी कर्तव्य आहे. ज्या प्रमाणांत तो अहिंसेचें पालन करील, तितक्या प्रमाणांतच तो मानवजातीला ललामभूत ठरेल. हिंसा हा मानवाचा स्वभावधर्म नसून अहिंसा हाच त्याचा स्वभावधर्म आहे. कारण, आत्मानुभवावरून त्याला असें म्हणतां येतें कीं, मनुष्य म्हणजे देह नव्हे, तर आत्मा. आत्मानुभवाचें साधन म्हणूनच देहाचा उपयोग करावयाचा असतो. " परंतु हा निश्चय कायम ठेवावा लागतो. मनुष्य अंतर्निरीक्षण करूं लागला म्हणजे त्याला चांगल्यावाईट दोन्ही गोष्टी दिसूं लागतात. वोहु–मनो व अकेम–मनो हीं झोरोस्ट्रियन धर्मांत सांगितलेलीं दोन मनें असून त्यांचे व्यापार आंतल्या बाजूस सुरू असतात. माणसाची स्वतःची सदसद्विवेकबुद्धि ही त्याच्या अंतरात्म्याचेंच एक स्वरूप असली, तरी तिच्यानें काम भागत नाहीं. " सदसद्विवेकबुद्धि ही सर्वांच्या ठिकाणीं सारखीच नसते " असें जें गांधीजींनीं म्हटलें आहें तें खोटें नव्हे. माणसाच्या सदसद्विवेकबुद्धीला मार्गदर्शन करणारा कोणता दीप आहे ? प्रमादातीत असा कोणता शंकराचार्य आहे, कोणता वेद आहे ? गांधींच्या लिखाणांतील अत्यंत मार्मिक अशा लेखांत गांधीजी म्हणतात :

" प्रमादातीत मार्गदर्शन अथवा स्फूर्ति मला लाभली आहे असें मला म्हणतां येणार नाहीं. माझ्या अनुभवांवरून तरी असें दिसतें कीं, माणसानें आपण प्रमादातीत आहों असा दावा करणें असमर्थनीय

होय. कारण जो द्वंद्वातीत झाला, त्यालाच केवळ स्फूर्ति प्राप्त होणें शक्य आहे. आणि विशिष्ट प्रसंगीं आपण द्वंद्वातीत आहों असा दावा करणें योग्य ठरेल कीं अयोग्य ठरेल, तें सांगणें कठिण असतें. म्हणून प्रमादातीत असल्याचा दावा मांडणें ही मोठी अनर्थकारक गोष्ट होय. पण याचा अर्थ मार्गदर्शनाचें आपणांजवळ कांहींच साधन नाहीं असा नव्हे. जगांतील महर्षींचा अनुभवसमुच्चय आपणांस उपलब्ध आहे व तो सदैव उपलब्ध होत जाईल. शिवाय मूलभूत अशीं सत्येंहि अनेक नाहींत. मूलभूत सत्य एकच आहे, तें म्हणजे 'सत्य' हेंच होय. त्याचेंच दुसरें नांव अहिंसा. अपूर्ण अशा मानवाला पूर्ण सत्याचें व प्रेमाचें ज्ञान कधींच होणें नाहीं. पण मार्गदर्शनापुरतें ज्ञान आपणांला होतें. त्याचें आचरण करतांना आपण प्रमाद करूं, कांहीं वेळीं घोर प्रमादहि हातून घडतील. पण मनुष्य हा स्वयंशास्ता आहे आणि प्रमाद करण्याचा व जितक्या वेळां प्रमाद घडतील तितक्या वेळां ते सुधारून घेण्याचा अधिकार स्वयंशासनांत अवश्यमेव अन्तर्भूत झालेला असतो."

गांधीजींच्या हातून प्रमाद घडले आहेत कीं नाहींत? प्रमाद सर्वांच्याच हातून घडतात. चुका करीत असतां अत्यंत महत्त्वाची गोष्ट कोणती समजावयाची? मनुष्यमात्र प्रमादशीलच आहे. पण झालेले प्रमाद ओळखण्याची पात्रता किती जणांत असते? आणि शिवाय आपल्या चुका कबूल करण्याचें मनोधैर्य तरी कितीजणांचे अंगीं आढळतें? गांधीजींच्या पूर्णत्वाचें एक गमक असें आहे कीं आपल्या चुका ते प्रांजलपणें मान्य करतात. आपल्या अनुयायांतील दोषस्थळें, वा आपल्या कुटुंबांतील मंडळींच्या चुका किंवा आपल्या राजकीय पक्षाचा कमकुवतपणा, ते निर्भीडपणें चव्हाट्यावर आणतात हें त्यांच्या पूर्णत्वाचें दुसरें एक गमक होय. स्वधर्मीयांची धार्मिक अधोगति दाखवून देतांना ते कचरत नाहींत. '**माझे सत्याचे प्रयोग**' या पुस्तकांतल्याप्रमाणें स्वतःच्या देहांतील सैतानी वासना जनतेला उघड करून सांगतांना जो डगमगला नाहीं, त्यानें जबरदस्त अशा साम्राज्यवादी सरकारला "सैतानी सरकार" असें म्हणतांना डरावें काय म्हणून?

वर उद्धृत केलेल्या मार्मिक लेखांत त्यांची स्वयंशासित सरकारची कल्पनाहि आढळून येते. जो स्वतःचें नियंत्रण करतो तो सर्वश्रेष्ठ सुधारक, ही कल्पना गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा पाया आहे. आर्थिक सुधारणा, राजकीय सुधारणा, सामाजिक सुधारणा, धार्मिक सुधारणा हे सारे वैयक्तिक सुधारणेपासून निघालेलेच फाटे आहेत. उदाहरणार्थ, अत्यंत व्यावहारिक अशा सुधारणेविषयीं—आर्थिक सुधारणेविषयीं—ते लिहितात:

" माझ्या दृष्टीनें हिंदुस्थानाचें आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे प्रत्येक स्त्रीपुरुषाचा, स्वतःच्या जाणतेपणानें केलेल्या प्रयत्नानें होणारा आर्थिक उद्धार. "

ज्या समाजांत मनुष्य राहतो त्या समाजाशीं असणाऱ्या माणसाच्या संबंधाचा अन्तर्भाव अशा जाणतेपणानें केलेल्या प्रयत्नांत होत असतो. या आर्थिक प्रश्नाचें राष्ट्रवादी स्वरूप त्यांनीं मोठ्या मार्मिक रीतीनें दाखविलें आहे. ते पुढें म्हणतात :

" सब्ब भूमि गोपालकी; त्यांत बांध आहेतच कोठें? बांध माणसानें घातले. म्हणून माणसाला ते बदलूनहि घेतां येतील. " असें शिकवणाऱ्या आपल्या पूर्वजांकडून खऱ्या समाजवादाची देणगी आपणांस प्राप्त झालेली आहे. गोपाल याचा शब्दशः अर्थ गुराखी. ईश्वर असाहि त्याचा अर्थ आहे. आधुनिक भाषेंत त्याचा अर्थ शासनसंस्था म्हणजे जनता असा आहे. हल्लींच्या काळीं भूमीवर जनतेचें स्वामित्व राहिलेलें नाहीं हें अगदीं खरें. पण त्याचा दोष शिकवणुकींत नाहीं. दोष आहे तो शिकवणुकीप्रमाणें वर्तणूक न ठेवणाऱ्या आपणांमध्यें. "

ज्या समाजांत व्यक्ति वावरते व त्याच्यावर आपल्या वर्तनानें परिणाम घडवून आणते त्या समाजाशीं असलेला तिचा संबंध कौटुंबिक संबंधाप्रमाणें असतो. कुटुंबाकरितां एक व राष्ट्राकरितां एक असे निरनिराळे आचारधर्म आहेत असें मानण्यास जागा नाहीं; म्हणून सामाजिक कार्याचा एक व्यवहार्य व अत्यंत महत्त्वाचा नियम पुढीलप्रमाणें त्यांनीं सांगितला आहे :

" सार्वजनिक सत्याग्रहाच्या प्रत्येक प्रसंगीं तत्समान अशा कौटुंबिक सत्याग्रहाच्या प्रसंगाची कल्पना मनांत आणून त्याची इष्टानिष्टता ठरवावी. "

म्हणजे सार्वजनिक व्यवहार करीत असतां मनुष्यानें अखिल मानवजात आपल्या कुटुंबाप्रमाणें मानावयास शिकलें पाहिजे. मग गृहस्थधर्माचें पालन करूं इच्छिणाऱ्या आदर्श गृहस्थानें चोर, गुंड, परपीडक इत्यादींशीं कशी वर्तणूक ठेवावी? आर्यराष्ट्रांनीं हुकूमशहांशीं व विद्वेषांशीं कसें वागावें? हिंसा टाळून क्रांति करा, हें ह्या प्रश्नाचें उत्तर आहे. व्यक्तीनें अथवा राष्ट्रानें गुंडाला आपल्या मस्तकीं पाय ठेवूं द्यावा काय? ह्या प्रस्तुत प्रश्नाचें उत्तर देऊन गांधींनीं अखिल मानवजातीची सेवा केली आहे व करीत आहेत. ती कशी?

व्यवहारांत उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांची विविधता, अगदीं कौटुंबिक संबंध घेतले तरीसुद्धां अगणित आहे. अहिंसाचरण करण्यास ज्ञान आवश्यक असतें. सत्याग्रहाच्या आचारशास्त्राप्रमाणें एका विशिष्ट परिस्थितींत कशा प्रकारचें वर्तन करावें, याचें उत्तर देणें सोपें नाहीं, अशी साक्ष सत्याग्रहाचें पालन थोडा काळपर्यंत केलेले लोकहि देतील. सत्याग्रहाच्या तत्त्वानुसार जें राष्ट्र आपलें आचरण ठेवण्याचा व प्रगति करण्याचा प्रयत्न करतें, त्याचें कार्य याहून कितीतरी कठिण आहे. दक्षिण आफ्रिकेंत व हिंदुस्थानांत जे प्रसंग निर्माण झाले त्यांना तोंड देतां देतां पापाचा प्रतिकार पुण्यानें कसा करावा व खड्गाशीं शांतिपूर्ण हृदयानें कसा सामना खेळावा, एतद्विषयक तंत्राचा विकास गांधीजी करीत आहेत. केवळ सामाजिक कार्यांतच नव्हे, तर व्यक्तिगत खासगी आयुष्यांतसुद्धां हरवख्तीं प्रत्यक्ष आचरणानें हें सत्यग्रहाचें चक्र कसें फिरवावें तें गांधीजी दाखवीत आहेत. त्यांचा आवडता चरखा हें सत्याग्रहाचेंच व्यक्त असें भौतिक स्वरूप होय.

आपल्या युगांतील रूढ संस्कृति सत्याग्रहाला अनुकूल नाहीं. अनुकूल असणें शक्य नाहीं. परंतु आधुनिक संस्कृतीचें अपयश सगळीकडे दिसून येत आहे. आपली संस्कृति टिकवून ठेवावयाची असेल, तर तिच्या अनेक जुन्या कार्यपद्धती टाकून दिल्या पाहिजेत हें विचारी सुधारकांना मान्य झालेलें आहे.

अशा सुधारकांनीं काय करावयास हवें आहे?

सत्याग्रहशास्त्राच्या तत्त्वाचा अभ्यास सुरू करून मनाला त्याचें स्पष्ट आकलन झाल्यावर स्वतःचें नियमन करण्यास त्यांनीं सुरवात केली पाहिजे.

जगांतच नव्हे, तर मुख्यतः व्यक्तिमात्रांत त्रिविध पापशक्ती विद्यमान आहेत. काम, क्रोध व लोभ. ज्या राष्ट्रांत जग विभागलें गेलें आहे, त्यांत या त्रयींचा उत्कर्ष होत असल्यामुळें जगभर ती वाढीस लागल्याचें दिसतें. हरएक राष्ट्रांत वर्गयुद्धांचा व वर्णयुद्धांचा उत्पात ती निर्माण करीत आहे. परंतु व्यक्ति हेंच तिचें मूलस्थान होय. जोंपर्यंत व्यक्तीच्या अंत:करणांत या शक्तींच्या चेष्टा चालल्या आहेत, त्याची शांति नष्ट करीत आहेत, मनांत संमोह उत्पन्न करीत आहेत, मानवजातींतील सर्वच नव्हे, पण बहुसंख्य घटकांविषयीं त्याच्या मनांत कठोर भाव निर्माण करीत आहेत, तोंपर्यंत त्या व्यक्तीचें जगाशीं शांतियुक्त आचरण असणें शक्य नाहीं.

प्रत्येक सत्याग्रहीच्या आचारधर्मांतील चिरतत्त्व असणारा जो मध्यवर्ती गुण, तो म्हणजे धैर्य. स्वतःच्या मनांतील कनिष्ठ वासनांचा प्रतिकार करतांनाच नव्हे, तर जेथें अभिलाषेलाच प्रेम असें चुकीनें मानण्यांत येतें, जीवनस्पर्धेंतील आवश्यक शक्ति म्हणून जेथें लोभाचा उत्कर्ष होत असतो, आपल्या विरोधकांविरुद्ध कौशल्यपूर्ण रीतीनें छपवलेली हिंसाशक्ति जे प्रतिस्पर्धी यशस्वी रीतीनें वापरतात तेच तगून राहण्यास लायक, असें जेथें समजण्यांत येतें, अशा जगांत उद्भवणाऱ्या विलोभनांच्या प्रतिकारार्थदेखील त्या धैर्याचा उपयोग करावयाचा असतो. विश्वात्म्याशीं तद्रूप झालेल्या अंतःस्थ चैतन्याशीं तदाकार झाल्यामुळें उत्पन्न होणारें जे आध्यात्मिक धैर्य त्याची आपणांस पदोपदीं गरज असते.

सत्याग्रह म्हणजे भीरूचा मार्ग नव्हे, हा मुद्दा गांधीजींनीं इतक्या आवेशानें प्रतिपादलेला आहे कीं, पुष्कळ पाश्चात्यांना गोंधळ उडविणाऱ्या या मुद्यासंबंधीं स्वतः गांधीजींचेंच म्हणणें उध्दृत करणें योग्य होईल. ते लिहितात :

" भित्रेपणानें स्वतःची बेअब्रू करून घेण्यापेक्षां अथवा ती झालेली पाहत बसण्यापेक्षां आपल्या अब्रूसाठीं हिंदुस्थानानें हातीं शस्त्र धरलें तरी मला परवडेल. क्लेशबलानें म्हणजेच अहिंसेनें आपले, आपल्या स्त्रियांचें व आपल्या देवळांचें रक्षण कसें करावें हें उमगत नसेल, तर ( आपण मनुष्यें असूं तर ) लढून तरी निदान आपण त्यांचें रक्षण केलेंच पाहिजे. "

थोड्या दिवसांपूर्वी भेटीस आलेल्या कांहीं चिनी लोकांस उत्तर देत असतां गांधीजी म्हणाले कीं, " चिनी लोकांना अहिंसेची राष्ट्रव्यापक अशी संघटना करणें व चीनमध्यें जपाननें अनाचारांचा जो वणवा पेटवला आहे त्याचा प्रतिकार करणें, आधींच फार विलंब झाल्यामुळें आतां शक्य नाहीं. एका दिवसांत शांतिसेना निर्माण करणें अशक्य आहे. बंदुक वापरण्याची अधम क्रिया सैनिकांना थोड्या वेळांत शिकतां येते, पण पापाचा प्रतिकार करण्याची उच्च कला तितक्या अवधींत शिकणें शांतिसेनेंतील सैनिकांना जमणार नाहीं. चीनमध्यें केवळ कांहीं व्यक्तींनाच अहिंसाचरण करतां येईल. तुमच्या दैवी* राज्यांतले पुरेसे प्रजाजन सत्याग्रहाचें खरोखरीच दैवी असें शास्त्र जर तत्काल अभ्यासूं व आचरूं लागतील, तर आणिबाणीच्या वेळीं—आणि तशी आणिबाणीची वेळ कोणत्याहि क्षणीं येऊन ठेपेल—त्यांना पुनः चीनच्या आत्म्याचें रक्षण करणें शक्य होईल." याच्या स्पष्टीकरणार्थ गांधीजी म्हणाले कीं, " राष्ट्राची संस्कृति जनतेच्या अंतःकरणांत व आत्म्यांत वास करीत असते...जनतेची इच्छा नसेल, तर तरवार उगारून घशांत मादक द्रव्य ओतणें जपानला शक्य होणार नाहीं."

भेटीस आलेल्यांनीं आपल्या देशबांधवांना पुढील संदेश सांगावा असें गांधीजी म्हणाले : " जपानी लोकांना आपला आत्मा भ्रष्ट करतां येणार नाहीं. चीनच्या आत्म्याला अपाय घडला, तर तो जपानकडून घडावयाचा नाहीं." ही गोष्ट प्रत्येक राष्ट्राच्या बाबतींत खरी आहे. ब्रिटनसारखीं अशीं कांहीं राष्ट्रें आहेत, कीं ज्यांना आपली शांतिसेना उभारून इतर राष्ट्रांतील जनतेच्या रक्षणाला साधनीभूत होणें शक्य आहे. ब्रिटनचा आरमारबांधणीचा कार्यक्रम जर इतर राष्ट्रें अनुसरतात, तर सत्याग्रहाचरणासाठीं ब्रिटननें संघटित प्रयत्न केल्यास इतरांनाहि तसेंच करण्यास हुरूप कां वाटणार नाहीं? " साध्या व ईश्वरपरायण जीवनामुळें जो शांतिपथ उपलब्ध होतो " तो अनुसरण्याची ब्रिटननें सिद्धता करावी.

---

* चीन राष्ट्राचें एक नांव.

# गांधी : एक स्वभावचित्र

## लेखक : **एडवर्ड थॉम्सन** ( आक्स्फर्ड )

माझ्यांतील एक उणीव मी प्रारंभींच कबूल करतों. श्री. गांधींशीं माझा दाट परिचय नाहीं. आणि त्यांच्या नवीन स्वरूपामुळें व हिंदुस्थानांतून येणाऱ्या बातम्यामुळें माझ्या मनांत अस्वस्थता उत्पन्न झालेली आहे. परंतु इतिहासांत स्थान मिळवण्याइतकी कामगिरी सुदैवानें त्यांनीं आधींच करून ठेवली असून धक्के देणारी स्पष्टोक्तिपूर्ण अशी बरीचशीं आत्मनिवेदनपर पुस्तकें लिहून आपली स्वभावविषयक व हेतुविषयक माहितीहि त्यांनीं पुरवलेली आहे.

ते गुजराथी आहेत. ही एक बिनलढाऊ जात असून तिला अनेकांनीं व विशेषतः मराठ्यांनीं पादाक्रांत केलें आहे, लुटलें आहे. जातीचें महत्त्व न कळल्याकारणानें त्यांच्या जातकुळीचा उल्लेख पाश्चात्य देशांत क्वचितच करण्यांत येतो. पण हिंदुस्थानांत कोणीहि ती गोष्ट सहसा विसरत नाहीं. अहिंसेवरच ते जो एवढा भर देतात, तो त्यांच्या बिनलढाऊ कुळीची निशाणी आहे असा टोला त्यांना मारण्यांत येत असतो. (या गोष्टीची त्यांना जाणीव असून त्या जाणीवेमुळें ते आपला मार्ग सोडून जात नाहींत, हा त्यांच्या नैतिक धैर्याचाच एक भाग होय.) आपण मराठे आहोंत व गांधी गुजराथी आहेत ह्या गोष्टीचें विस्मरण मराठ्यांस क्वचितच होत असेल. मराठ्यांवरील त्यांचें वजन चढतें-उतरतें आहे. दुसरी एक लढाऊ जात म्हणजे रजपुतांची. त्यांच्याहि बाबतींत तशीच स्थिति आहे. मध्य हिंदुस्थानांतील एक राजा मला म्हणाला, "माझ्यासारख्या रजपुताला त्यांच्या अहिंसातत्त्वाची कल्पनाच करवत नाहीं! मारणें व युद्ध खेळणें हा रजपुतांचा धर्मच आहे!" तथापि अहिंसा हें श्री. गांधींच्या शिकवणुकीचें सार आहे. नाखुषीनें मतपरिवर्तन झालेल्या अनेक लोकांकडून त्यांना तिचें आचरण करवून घ्यावें लागलें असेल; तरी पण त्यांना मिळालेल्या असाधारण

बा. वा. १०९९ ३९७३१

विजयास तीच कारणीभूत झालेली आहे. पुन्हां मला या विषयाकडे वळावें लागेल त्यावेळीं सत्यस्थिति अशीच असल्याचें मी दाखवून देईन.

आपल्या वंशापासून व प्रारब्धापासून कोणीच पूर्णपणें अलिप्त राहूं शकत नाहीं. बिगरराजकारणी व बिनलढाऊ अशा राष्ट्रांतून व त्या राष्ट्रांतील एका छोट्या बिनमहत्त्वाच्या संस्थानांतून त्यांचा उद्भव झाला, यामुळें कदाचित् कांहीं वैगुण्यें निर्माण झालीं असतील. प्रजा जेव्हां जेव्हां पीडाग्रस्त असेल, तेव्हां तेव्हां राजा प्रजेला दर्शनसुलभ असा असावा हें ध्येय हिंदुस्थानांत अद्याप टिकून आहे; पण जगांतील शासनसंस्था व त्यांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय पद्धती आमूलाग्र बदलल्या नाहींत, तोंपर्यंत हें ध्येय व्यवहारापुरतें तरी गतकालीन ठरणार. जेथील स्वतंत्र जनता संख्येनें फार मोठी नव्हती व जेथें प्रत्येक नामवंत व्यक्ति ओळखीची असे अशा पेरिक्लीजच्या अथेन्स नगरींत अथवा गांधींच्या बाळपणांतील पोरबंदरसारख्या छोट्या संस्थानांत हें ध्येय संभवनीय ठरेल. ग्रामीण अर्थ-व्यवहारांच्या कक्षेबाहेरील प्रश्नांच्या बाबतींत श्री. गांधींचें राजकारण पुष्कळ वेळां अपुरें पडतें. सर्वाधिकारशाह्यांनीं घेरलेल्या या जगांतील हिंदुस्थानाच्या संरक्षणाचा प्रश्न उदाहरणादाखल घ्या. छोट्या व प्राथमिक अवस्थेंतील घटकांच्या दृष्टीनें ते विचार करतात. आधुनिक जगाची गुंतागुंत त्यांना दिसत नाहींसें वाटतें. (कांहींतरी भीतिदायक व झटकून टाकण्यासारखी ती एक वस्तु आहे एवढ्यापुरतेंच त्यांना या गुंतागुंतीचें ज्ञान असावें. तिला झटकून टाकणें शक्य झालें असतें, तर फार बरें झालें असतें, असें मलाहि मनापासून वाटतें!) त्यांचे विचार नेहमींच व्यष्टिप्रधान असतात. कोणतें तरी एक टोंक स्वीकारणें आवश्यकच असेल, तर मनुष्यांचा समष्टिरूपानेंच विचार करणाऱ्या, माणसें म्हणजे ज्यांच्यापासून करभार-रूपीं फळें हालवून पाडून घेतां येतील अशीं जणुं कांहीं झाडेंच आहेत असें समजणाऱ्या, आर्थिक कारणांसाठीं ज्यांच्यांतील शेंकडों अथवा हजारों माणसें गोळ्या घालून मारण्यास हरकत नाहीं असा मानवशक्तीचा संचय अथवा युद्धबळी, याच दृष्टीनें माणसांकडे पाहणाऱ्या दृष्टीपेक्षां अगदीं विरुद्ध अशी ही गांधीजींची व्यष्टिनिष्ठ वृत्ति हजारपटीनें बरी! तथापि, हिंदुस्थानाचा बचाव करावयाचा असेल, तर या व्यष्टिवादी दृष्टीला मोठ्या

प्रमाणावरील योजनेची व कार्यांची जोड द्यावयास हवी. गांधींच्या मागोमाग नेहरू उभे करून ईश्वरानें हिंदुस्थानावर मोठीच कृपा केली. गांधींच्या कार्यांत जें कांहीं महान् व परिणामकारक असें होतें, तें सर्व हा तरुण पुरुष टिकवून धरील व ज्याविषयीं वृद्ध गांधींना आशंका वाटते अशा क्षेत्रांतहि तो त्यांचें कार्य चालू करील असा मला विश्वास वाटतो.

कांहीं अंशीं या मर्यादित दृष्टिकोनामुळें वर्तुलाकार परिषदेच्या वेळीं गांधींची बाजू जरा लंगडी भासून त्यांना गटांच्या व समुदायांच्या दृष्टीनें मनुष्यांचा विचार करणाऱ्या आपल्या विरोधकांच्या भूमिकेवर कधींच येतां आलें नाहीं. ज्या या जगांत राष्ट्रामागून राष्ट्र परस्पर–संहारासाठीं संघटित होत आहे, व त्याला संहारमंडळाचें स्वरूप प्राप्त होत आहे, तेथेंहि आजच्या घटकेला गांधीजींचा हा प्रश्न लंगडाच पडत आहे. त्यांच्या हातीं असलें कीं सतेज व समर्थ दिसणारें अहिंसेचें शस्त्र आज बोथट बनलें आहे. माझ्या घरीं झालेल्या एका विवादांत अशा एका उपमेचा उपयोग करण्यांत आला कीं, सत्याग्रह ही एक कात्री आहे. स्वतःचें एक व विरुद्ध पक्षाचें एक, अशीं दोन पातीं तिला असावीं लागतात. हिंदुस्थानांत तो यशस्वी झाला, कारण, बंड व दडपशाही यांचेसुद्धां कांहीं नियम आहेत असें मानणाऱ्या— मग ती मान्यता कितीहि अपुरी असो—सरकाराविरुद्ध त्याचा उपयोग करण्यांत आला होता. तेथील शत्रूंत मानवता व उदारता यांचा अंश होता. त्यामुळें पोलिसांच्या लाठ्या खाण्यासाठीं जेव्हां राष्ट्रवाद्यांच्या रांगां-मागून रांगा उभ्या राहूं लागल्या, जेव्हां त्या दृश्याकडे बघणारे ब्रिटिश लोक शरमिंधे होऊन जाऊं लागले व अमेरिकन वृत्तपत्रकार आपला संताप मायदेशीं तारा पाठवून व्यक्त करूं लागले, तेव्हां सरकार अगदीं रंजीस येऊन पोंचलें. तें वातावरणच असें होतें कीं, अखेरपर्यंत क्लेश सहन करण्याची शक्ति आपल्यामध्यें असेल, तर आपला व आपल्या ध्येयाचा विजय हमखास ठेवलेलाच होता.

तें सर्व वातावरण आतां लुप्त झालें असून ती परिस्थिति आपण डोळ्यांनीं पाहिली हें खरें वाटणेंसुद्धां मुष्किलीचें झालें आहे! “ॲबि-सिनियन लोकांनीं अहिंसेचें कांटेतोल पालन केलें असतें तर त्यांचा विजय झाला असता” असें श्री. गांधींनीं म्हटलें आहे. सत्याग्रहाविषयीं कात्रीची

उपमा देण्यांत आली तेव्हां ती त्यांनीं मान्य केली नाहीं. (ही गोष्ट सर्वाधिकारशाहीच्या जमान्यापूर्वींची, म्हणजे ज्या वेळीं प्रस्तुत काळीं दृष्टीसमोर वावरणाऱ्या राक्षसी व्यक्ती स्वप्नांतसुद्धां कोणी पाहिलेल्या नव्हत्या त्या काळांतली आहे.) पण धनुष्यबाणाप्रमाणेंच त्यांची अहिंसेची कल्पना खासच गतकालीन ठरली नाहीं काय? त्यांना फासिस्ट वा नाझी सत्तेला तोंड द्यावयाचें असतें, किंवा निर्दयपणानें आकाशांतून बॉंब टाकून शहरेंच्या शहरें बेचिराख करणाऱ्या अथवा आपल्या साऱ्याच्या साऱ्या कैद्यांना गोळ्या घालून उडवून देणाऱ्या या फासिस्ट मताच्या फौजांनीं हिंदुस्थानावर स्वारी केली असती, तर अहिंसेच्या मर्यादा आपणांस ध्यानांत घ्याव्या लागल्या नसत्या काय? राष्ट्रीय सभेमध्यें या बाबतींत तीव्र मतभेद माजले असले व अहिंसेचें शस्त्र तोड्याच्या बंदुका अथवा समशेरी यांच्याप्रमाणेंच वस्तुसंग्रहालयांत ठेवण्याच्या लायकीचें झालें आहे असें तरुणांस वाटूं लागलें, तर त्यांत नवल तें कसलें?

श्री. गांधी हे निरपवाद शांतिवादी आहेत, व मी तसा नाहीं, इतकाच या सर्व विवेचनाचा अर्थ आहे. **"मो. क. गांधींचें कोडें," "श्री. गांधींचें रहस्य," "साम्राज्याशीं दोन हात करणारा पुरुष"** असल्या पुस्तकांच्या शिफारशी पुस्तकमंडळें करीत राहतील, व या नाहीं तर त्या चरित्रकारानें अखेर एकदां गांधींच्या रहस्याचा स्फोट केला असल्याची परीक्षणकार ग्वाही देत बसतील. आणि तरीहि येथून शंभर वर्षांनंतर श्री. गांधींच्या व्यक्तित्वाचें माणसांना गूढ वाटत राहील तें राहीलच, हें मी जाणून आहें.

दहा वर्षांपूर्वी, कीर्तिशिखरावर ते आरूढ झालेले असतां, मोठी आकर्षक व्यक्ति म्हणूनच त्यांच्याकडे लोकांचें फार लक्ष लागून राहिलें होतें. त्यामुळें त्यांच्या कार्याकडे दुर्लक्ष झालें. केवळ त्यांच्या आंगच्या प्रेमळपणाची व अकृत्रिमपणाची प्रसिध्दी झाली. अर्थात् त्यामुळें उत्पन्न झालेल्या विनोदाची त्यांनाहि गंमत वाटे. स्वतःविषयीं प्रसृत झालेल्या दंतकथांच्या योगानें ते कधींहि फुशारून जात नाहींत. तिसऱ्या जॉर्ज बादशहाला जॉन विल्कीज एकदां म्हणाला, "सरकार मी स्वतः विल्कीजवादी कधींच नव्हतों." श्री. गांधी हे स्वतः केव्हांहि गांधीवादी नव्हते. आपल्या प्रभावळीविषयीं धीमी व किंचित् उपहासगर्भ अशी वृत्ति ते धारण करीत

असतात. आपल्या भगतगणापैकीं अनेकांनीं कार्याची हानि केली आहे हें ते जाणून आहेत. मिस्किलपणा हा त्यांच्या अंगच्या आकर्षक गुणांपैकीं एक गुण असून विनोदाभिरुचीमुळें त्यांना सदैव आनंदी राहतां येतें. स्वाभिमान राखून तुम्ही त्यांच्याशीं वागलांत, तर तुमचें त्यांच्याशीं अधिक चांगलें जमेल. संभाषण खेळकर पद्धतीचें ठेवलें म्हणून ते रागेजत नाहींत. त्यांच्या अंगीं उदंड प्रतिष्ठा असली तरी तिच्यासाठीं ते हपापलेले नाहींत. ते तुमची टिंगल करतील, उलट तुम्ही त्यांची टिंगल केली तरी तेंहि त्यांना आवडेल.

'कल्पनावादी' व 'साहित्यिक' लोकांच्याविषयीं त्यांना संशय वाटतो. त्यांना नापसंत असलेलें मत फेटाळून देतांना ते हंसत हंसत म्हणतील "हं, पण आपण पडलां कवि!" आणि हें ते अशा पद्धतीनें म्हणतील कीं मनांतून "अहो आपण पडला अर्धवट!" असें त्यांना म्हणावयाचें असून शिष्टाचारामुळें ते तसें बोलत नाहींत याची स्पष्ट कल्पना यावी. एकमेकांहून सर्वस्वीं भिन्न असलेले पण एकमेकांविषयीं गाढ व दृढ आदर बाळगणारे रवींद्रनाथ टागोर व गांधी यांच्यांतील संबंध अगदीं पाहत राहावें असा आहे. अनेक वर्षें या परस्परसंबंधाचें दृश्य हिंदुस्थानाच्या डोळ्यासमोर असून त्यामुळें सार्वजनिक शिष्टाचाराच्या शिक्षणभांडारांत बरीच भर पडली आहे. इतके परस्परविसदृश, पण स्वत:स इष्ट वाटणाऱ्या राष्ट्रोद्धारक कार्यास आपण किती आवश्यक आहों याची पूर्ण जाणीव असणारे दोन महापुरुष देशाला लाभलेले आहेत, ही जाणीव देशगौरवास पोषक अशीच आहे.

"मोठा तापदायक मनुष्य आहे!" त्यांच्याशीं संबंध आलेल्या प्रत्येकानें या नाहीं त्या वेळेला वरील वाक्य उच्चारलें असेल, आणि तेंहि प्रेमभावानें! तार पाठवून एकाद्या मित्राला अथवा सहकाऱ्याला ते शेंकडों कोसांवरून महत्त्वाच्या कामाच्या निमित्तानें बोलावून घेतील, आणि घरांतल्या आजारी माणसांना एनिमा देण्याची वेळ झाली म्हणून चर्चा मध्येंच थांबवतील! माझ्या मनांतली गोष्ट व्यक्त व्हावी म्हणून मीं हें सौम्यसें एक उदाहरण दिलें आहे! कारण नेहमीं सौम्योक्तीनें बोलावें हें बरें! एकदां म्हणजे मागें उल्लेख केलेल्या चर्चेच्या प्रसंगीं तीन घंटेपर्यंत त्यांच्यावर मंडळीकडून प्रश्नांचा मारा चालला असतां मी लक्षपूर्वक पहात

बसलों होतों. पृच्छकांत मास्टर ऑफ बॅलिओल, गिल्बर्ट मरे, सर मायकेल सॅडलर, पी. सी. लिओन इत्यादि व्यक्ती होत्या. चांगलें मेंदू शिणवणारें दिव्य होतें तें! पण एक क्षणभरदेखील ते कावले नाहींत, कीं गोंधळले नाहींत. माझी खात्री पटली, कीं संपूर्ण आत्मसंयम व मनःशांति या गुणांच्या बाबतींत जगाच्या पाठीवर सॉक्रेटिसानंतर गांधींच्या बरोबरीचा कोणीहि माणूस निपजला नसेल. त्या अजिंक्य शांतीच्या व अविचलतेच्या समोर बसलेल्या माणसांच्या जागीं मी बसलों आहें, अशी कल्पना एकदोनदां मनाशीं करून पाहिल्यावर अथीनियन लोकांनीं त्या 'तत्त्वज्ञानी हुतात्म्या'*ला विषप्राशन करावयास कां लावलें असावें त्याचा उलगडा झाल्यासारखें वाटलें. सॉक्रेटिसाप्रमाणें त्यांच्या अंगीं कसला तरी संचार होत असतो. आणि तसा संचार होऊन ते एकदां बोलले, कीं बुद्धिवादानें अथवा भयानें कशानेंच ते डगत नाहींत. प्रेस्बिटेरियन् पंथाच्या धर्मभिक्षूंना उद्देशून क्रॉम्वेल उद्गारला होताः "ख्रिस्तसाक्ष मी तुम्हांला विनवितों कीं, आपल्या हातून प्रमाद घडणें शक्य आहे, एवढें मानावयास तरी तुम्ही तयार व्हा!" तेच शब्द मोठ्या वैतागानें लिंडसे यांनीं त्या वेळीं उच्चारले होते, ते अद्यापि माझ्या कानांत घुमत आहेत. ते म्हणाले, "गांधीजी, तुमच्या हातून चूक घडणें संभवनीय आहे एवढें तरी मान्य करा कीं!" श्री. गांधींना आपल्या हातून चूक घडणें शक्य वाटलें नाहीं; कारण सॉक्रेटिसप्रमाणेंच त्यांच्याहि अंगीं 'समंध' संचारत असतो आणि त्याचा संचार होऊन ते एकदां बोलले, कीं मग मृत्यूचे पाश त्यांच्या गळ्याभोंवतीं पडोत किंवा जगांतील सर्व विद्यापीठें आपला सर्व बुद्धिवाद त्यांच्यापुढें मांडोत, गांधींची निष्ठा ढळणार नाहीं.

इंग्रजी भाषासरणीवर त्यांचें जें अप्रतिम प्रभुत्व आहे तें अंशतः त्यांच्या पूर्ण मनःसंयमामुळें प्राप्त झालेलें असावें. परकी माणसाला आमच्या भाषेंतील कठिण वाटणारी गोष्ट म्हणजे अव्ययें. त्यांच्यावर गांधींच्याप्रमाणें प्रभुत्व मिळवलेला एकहि हिंदी इसम मला आढळलेला नाहीं. वर्तुळाकार परिषदेच्या वेळीं दोनतीन वेळां स्वतःसाठीं कांहीं

---

* तत्त्वज्ञानी हुतात्मा—सॉक्रेटिस.

खुलाशांचे मसुदे तयार करण्यास त्यांनीं मला सांगितलें तेव्हां ही गोष्ट मला कळून आली. धंदेवाईक लेखक अव्ययांचा उपयोग काळजीपूर्वक करतात. हे मसुदे तयार करतांनाहि मी खरोखरच पुष्कळ परिश्रम घेतले होते. श्री. गांधी मसुद्याकडे दृष्टि टाकीत व अव्ययासंबंधीं एकादाच बारकाव्याचा बदल करीत. ( इंग्रजीचें ज्ञान मनामध्यें पुरें मुरलेलें नसेल तर ) एकाद्याला वाटलें असतें कीं, केलेला बदल अगदींच अल्पस्वल्प होता. पण तेवढ्यानें काम साधत असे. त्यामुळें एकादी पळवाट निर्माण होई. ( आणि राजकारणी लोकांना पळवाटी आवडतात असा त्यांच्याविषयीं प्रवाद आहेच. ) कसेंहि असो, माझा अर्थ बदलून त्याऐवजीं गांधींना हवा तो अर्थ त्यामुळें निर्माण होत असे एवढें खरें. आम्ही एकमेकांकडे पाहून हंसलों म्हणजे आमच्या नजरेवरून इष्ट तो बदल अर्थात् झाल्याचें कळून येई.

खरेंच, ते एक कायदेपंडितहि आहेत. आणि कायदेपंडित म्हटला कीं तो अत्यंत तापदायक असावयाचा. ब्रिटनचे प्रतिनिधी म्हणून जेव्हां कायदेपंडित लोक राष्ट्रसंघांत गेले होते, त्यावेळीं राष्ट्रसंघाला याचा अनुभव येऊन चुकला आहे. कोणत्याहि देशांत क्रांति होऊन जनतेच्या हातीं स्वतःच्या व्यवहाराचें नियंत्रण एकदां आलें, म्हणजे नेहमीं पहिली सुधारणा म्हणून सर्व कायदेपंडितांचीं डोकीं उडवण्यांत येत असतात. कदाचित् ही एवढीच अशी सुधारणा असावी, कीं जिच्याबद्दल पुढील काळांत कोणाला खेद वाटत नाहीं !

सरकारबरोबर लढा चालू असतां, ज्यानें हळुहळू इंग्रजी शब्दांतील अत्यंत सूक्ष्म अशा अर्थांची मोडणी आत्मसात् केली, ज्याला स्वतःच्या देहाबद्दल यत्किंचित्हि भीति अथवा चिंता उरली नाहीं, इतकेंच काय, पण वादविवादांत कशाहि प्रकारचा अनपेक्षित मुद्दा पुढें आला तरी जो गांगरून जात नाहीं, अशा कायदेपंडिताशीं गांठ पडल्यानंतर हिंदुस्थान सरकार तरी काय करणार ? आणि त्यांच्या अंगीं विनोदवृत्ति असल्यामुळें व स्वतःचें लघुत्व तुमच्यासमोर मान्य करावयास ते तयार असल्याकारणानें त्यांना डिंवचून पराभूत करणेंहि अशक्य होतें. त्यामुळें अधिकच बिकट परिस्थिति निर्माण झाली आहे आणि सर्वांत कडेलोटाची गोष्ट अशी कीं,

भूमातेचा स्पर्श होतांच अजिंक्यशक्ती होणाऱ्या अँटीयस्‌प्रमाणें गांधी हे जनतेशीं संसर्ग आला रे आला कीं अजिंक्य ठरतात. पौरस्त्यांची सहिष्णुता, औदासीन्य व कसोटीस उतरलेली त्यांची प्रतिकारपद्धति, यावर गांधीजींची सारी भिस्त असते.

खरें म्हटलें तर त्या काळांत अहिंसेचें काटेकोर पालन करणें एवढा एकच मार्ग हिंदुस्थानाला उरला होता आणि ही गोष्ट प्रतिभास्फूर्तीनें गांधीजींनीं सर्वांच्या आधीं ओळखली. अशा प्रकारच्या चढाईची अपेक्षा नसणारा, तिच्यामुळें भांबावून जाणारा, प्रत्याघात करण्याचें नाकबूल करणाऱ्या शत्रूवर घाव घालणें आपणास जमणार नाहीं अशी अंधुक भावना मनाशीं बाळगणारा शत्रू भेटला, तर अहिंसा हें तुम्हांला एक बिनतोड शस्त्र मिळालें असें होईल खरें. दुबळ्या व निःशस्त्र झालेल्या हिंदुस्थानाला तर दुसरें शस्त्रच राहिलें नव्हतें. यांत्रिक बंदुकांशीं धनुष्य-बाणांनीं सामना करणें म्हणजे मूर्खपणा होय. (अर्थात् केवळ धनुष्य व बाण एवढींच शस्त्रें तुमच्याजवळ उरलीं असतील तर.) कारण त्यामुळें शत्रूला "आत्मसंरक्षणार्थ" यांत्रिक बंदुका वापरण्याची संधि मात्र दिल्यासारखें होतें. एरव्हीं त्या वापरण्याची त्याला शरम वाटली असती. आजच्या घटकेला अहिंसा ही कितीहि निष्परिणामी दिसत असली, तरी आपल्या काळांत तिनें आपलें कार्य केलेलें आहे.

आणि या अशरणतेंतून व निराश अवस्थेंतून हा जो विचार उत्स्फूर्त झाला, त्याच्याच जोडीला दुसराहि एक विचार उद्भवला. हिंदुस्थानच्या आत्म्यानें हळूच हलक्या आवाजांत सुचविलें, "धरणें धरून बसा." गांधीजींच्या राजकीय पद्धतीचें मूळ 'धरणें' धरण्याच्या प्राचीन वहिवाटींत आहे ही गोष्ट मला वाटतें, रशब्रुक विल्यम्स यांनीं प्रथम शोधून काढिली. या वहिवाटीमुळें जॉन कंपनीच्या काळच्या हिंदुस्थानांत मोठा ताप होत असे. खस्याळ ऋणकोच्या दारांत अथवा शत्रूच्या दाराशीं एखादा पीडित माणूस मरेपर्यंत किंवा गाऱ्हाणें दूर होईपर्यंत उपवास करीत बसे. माणूस मेला म्हणजे त्याचें भूत तेथें कायमचें ठाण मांडी. कारण मग विनंतीचा अथवा पश्चात्तापाचा भुतावर कांहींच परिणाम होत नसे. हीच गांधीजींची सर्वांशीं स्वदेशी कार्यपद्धति. गेल्या जवळजवळ चाळीस

चर्षांच्या काळांत अधुनमधून गांधीजी ब्रिटिश साम्राज्याच्या दाराशीं धरणें धरीत आले आहेत. एकदां दोनदां आपल्या मानेवर त्यांचें भूत येऊन बसण्याची वेळ ठेपली होती. " अहिंसात्मक असहकार." बॉंब आणि पिस्तुलें घेऊन कुंपणा आडून गोळया झाडणाऱ्या व आगगाड्या उलथून पाडणाऱ्या अभिनव आयर्लंडकडे हिंदुस्थानचे नवयुवक एकाग्रतेनें पाहत राहिले होते. पण कॉर्कचा लॉर्ड मेयर मॅक्स्विनी यानें आमरण उपवास केला, त्या वेळीं पूर्वीपेक्षांहि अधिक एकचित्तानें आयर्लंडकडे हिंदुस्थानाचें लक्ष लागून राहिलें. १९२९ सालीं राजकीय हत्त्या केल्याचा आरोप असलेल्या एका विद्यार्थ्यानें तोच मार्ग अनुसरला. पंजाबमधून कलकत्त्यास घरापर्यंत त्याचें शव आणलें. तेव्हां जो देखावा दिसला, त्याचें कधींहि विस्मरण होणें शक्य नाहीं. परकी सरकारशीं आमरण झुंज चालू होती, हिंदी शस्त्रांनिशीं चालू होती. तीं शस्त्रें पाश्चात्य देशांनीं पूर्वीच स्वीकारलीं होतीं, तेथें तीं यशस्वीहि ठरलीं होतीं. नॉन्कन्फॉर्मिस्ट लोकांचें उदाहरण घ्या किंवा सफ्रेजेट्सचें घ्या. ( त्यांनीं तर एक पाऊल पुढें टाकून अन्नसत्याग्रहाचा विचार चालवला होता—पण ते कदाचित् पूर्णतः अहिंसावादी ठरले नसते. ) नंतर आयर्लंडचें उदारहण घ्या. तेथें अगदीं आमरणान्त अहिंसा आचरण्यांत आली !

" ते नैतिक आहेत, पण आध्यात्मिक नाहींत " असे उद्गार एका थोर हिंदी गृहस्थानें गांधींच्या बाबत काढले होते. दुसरे एक गृहस्थ म्हणाले, " शब्दांत ते कधीं सांपडणार नाहींत. परंतु सत्याच्या अत्युच्च भूमिकेवर ते आरूढ होऊं शकतात हेंहि निःसंशय. " मी याच विषयाकडे वळतों. वर्तुळाकार परिषदेच्या वेळीं लंडनमध्यें त्यांना भेटलेल्या कांहीं लोकांची त्यांनीं निराशा केली. लोक म्हणूं लागले, " हे संत नव्हेत ! " ते संत आहेत असें मलाहि वाटत नाहीं; आणि स्पष्ट बोलावयाचें तर ते संत आहेत कीं नाहींत याची मला फिकीर वाटली नाहीं. संतत्वाहून अधिक कठोर असें कांहींतरी त्यांच्या ठायीं आहे. ज्या काळांत आपण राहात आहोंत त्यांतील आणिबाणीच्या परिस्थितीला संतापेक्षां ज्याची अधिक जरुरी आहे असे ते कोणीतरी आहेत. मात्र सत्याच्या अत्युच्च भूमिकेवर ते आरूढ होऊं शकतात हें खरें आहे. उदाराचरणाच्या असामान्य अशा उच्च भूमिकेपर्यंतहि

ते पोंचतात. दक्षिण आफ्रिकेमध्यें हिंदी लोकांनीं केलेल्या असह्य अन्यायाच्या प्रतिकाराच्या ज्या लढ्याचें ते केंद्रस्थान व अग्रस्थान ( आणि सर्वस्व ) बनून राहिले होते, त्या कथाप्रसंगाची थोरवी एवढी आहे कीं, त्याचें माहात्म्य वर्णन करणें माझ्या शक्तीबाहेरचें काम आहे. केवळ अचाट धैर्यच त्यांनीं दाखविलें असें नाहीं; असीम असें औदार्यहि त्यांनीं दाखवलें. हिंदी लोकांच्या अंत:करणाचें औदार्य पाहून मला क्षणोक्षणीं अचंबा वाटतो. व्यष्टिदृष्ट्या व समष्टिदृष्ट्या आपण क्रोधातीत होऊं शकतों हें त्या लोकांनीं दाखवून दिलें आहे. माझ्यासारखा माणूस त्यांच्या जागीं असता तर ही गोष्ट शक्य होती ना, असें माझ्यासारख्या इंग्रज गृहस्थाला वाटतें. गांधींनीं प्रत्येक गोऱ्या माणसाचा जन्मभर द्वेष करावयास हवा होता—पण त्यांनीं तसें केलें नाहीं ! उलट, वस्तुस्थिति अशी आहे कीं, एडमंड कॅंडलरनें मार्गेच म्हणून ठेवल्याप्रमाणें त्यांना इंग्रज लोक अधिकच आवडतात. तदनंतर ज्याला झुलूंचें बंड म्हणतात तें नाताळप्रांतांत उद्भवलें. बारा झुलूंना फांशी देण्यापासून आरंभ होऊन गोळ्या घालण्याच्या व फटके मारण्याच्या हत्याकांडांत त्याचें रूपांतर झालें. आपण ब्रिटिशविद्वेषी नाहीं व संकटकालीं कामाचा वाटा उचलण्याची आपली व आपल्या अनुयायांची तयारी आहे हें दाखविण्याकरितां शुश्रूषापथकांत काम करण्यास गांधी तयार झाले. सरकारनें गाळीव मूर्खपणा ( त्याला हेंच नांव देणें मला शक्य वाटतें ) करून लष्करी कायद्याबरहुकूम फटके मारल्यामुळें रक्तबंबाळ झालेल्या झुलूंची शुश्रुषा करण्याचें काम त्यांस दिलें. सरकार भीतिग्रस्त झाल्यावर काय करूं शकतें, त्याचा मासला कळून यावा व हिंदी लोकांचीं मनें घट्ट व्हावींत म्हणून हें केलें असेल, तर त्यायोगें हिंदी लोकांना चांगलेंच ज्ञान मिळालें असें म्हटलें पाहिजे. या बाबतींत त्यांचीं मनें घट्ट झालीं, पण दुसरा कोणताच परिणाम त्यांच्यावर झाला नाहीं. बुद्धिवाद करून व बुद्धीला आळवून इंग्रज माणसाच्या मनावर परिणाम करतां येतो हा गांधींचा विश्वास कायमच राहिला. १९१९ च्या एप्रिलांत अमृतसरमध्यें जालियनवालाच्या खोलगट बागेंतील मृत्यूच्या सांपळ्यांत पकडून जनरल डायरनें जवळजवळ दोन हजार लोक गोळ्या घालून ठार केले. जखमी झालेल्यांना तेथेंच रखडत भेकत रात्र काढावी लागली.

उपरान्त पार्लमेंटच्या दोनहि गृहांतून या विषयावर रक्ताला उकळ्या फोडील असा गर्ह्य वादविवाद झाला आणि अधम अशी चळवळ होऊन प्रशस्तिनिधीसाठीं २६,००० पौंडांची वर्गणी जमा करण्यांत आली. पंजाबांत झालेल्या या प्रकरणाचा अहवाल तयार करण्याकरितां राष्ट्रसभेनें गांधी व जयकर यांना नियुक्त केलें. कत्तल करण्यास मिळावी म्हणून त्या बागेच्या खोलगट जागेंत जनरल डायरनें लोकांना बुद्धिपुरःसर भुलवून नेलें, हें प्रस्थापित करण्यासाठीं तपशिलवार पण अप्रत्यक्ष असा पुरावा त्यांच्यापुढें आग्रहपूर्वक मांडण्यांत आला होता. ( त्या वेळच्या क्लेशदायी व अपमानपूर्ण काळांत अशा पुराव्यावर सहज विश्वास बसत असे. ) अदम्य अशा भावनांचा व यातनांचा नेट त्या पुराव्याच्या मागें लागलेला होता. तरीहि श्री. गांधींनीं तो पुरावा अग्राह्य ठरवला व आपल्या लोकांचा आग्रहहि त्यांनीं बाजूला सारला. "माझा यावर विश्वास बसत नाहीं. अहवालांत तो नमूद करण्यांत येणार नाहीं" असें त्यांनीं सांगितलें.* त्यांचा मनोनिग्रह कधींहि इतका विजयी झाला नव्हता. अशा प्रसंगीं मनोनिग्रह राखणें हा एक थोर नैतिक विजय आहे. युद्धकाळांतून तुम्ही गेलेले असाल, तर संताप आणि देशाभिमान यांनीं देह थरथरत असतां न्यायबुद्धि स्थिर ठेवणें किती बिकट आहे, तें तुम्हांला समजून आलें असेल. पण गांधींनीं तीहि गोष्ट साध्य केली आहे. इंग्रज माणसानें कधींहि न अनुभवलेल्या पराभूत राष्ट्राच्या वाट्याला येणाऱ्या मानखंडनेच्या वातावरणांत गांधींनीं ती गोष्ट साधिली. हीच "सत्याची परमोच्च पायरी" होय. हें आचरणांतील सत्य आहे, केवळ वाचेंतील नव्हे.

मी देणार असलेलें शेवटचें उदाहरण म्हणजे १९२२ सालांतील त्यांचा खटला. त्यांना व त्यांच्या विरोधकांनाहि अभिमानास्पद असा तो प्रसंग आहे. भडका उडण्यासारखीं अनेक कारणें असतांहि त्या वेळीं दिसून आलेल्या उच्च दर्जाच्या शिष्टाचारामुळें तो असामान्य, कदाचित् अद्वितीय, असा प्रसंग ठरला व त्यामुळें उभय पक्षांतील प्रामाणिकपणा व न्यायबुद्धि

---

* श्री. जयकरांकडून मला ही बातमी मिळाली.

दिसून आली. त्या खटल्यापासून हिंदुस्थानांतील ब्रिटिशांच्या वृत्तींत (अंतःकरणांत असें मी म्हणत नाहीं) खराखुरा फरक पडण्यास आरंभ झाला. गांधींनीं त्यांना कितीहि सतावून सोडलेलें असलें, तरी त्यांच्याबद्दल ते पूर्वीपासूनच आदरभाव ठेवीत असत. आतां ह्या खटल्याच्या वेळीं उद्भवलेल्या नाट्यसदृश (पण ज्याचा आपण नाटकी म्हणून निषेध करतों अशा अवस्थेप्रत न पोंचलेल्या) प्रसंगीं त्या पुरुषाचें विचित्र, उपहासगर्भ, संपूर्णतया प्रामाणिक आणि उदात्त असें अनैहिक व धैर्यशाली मन त्यांना पाहावयास सांपडलें. इतरहि कोणकोणते गुण आम्हांस पाहावयास मिळाले तें मला सांगतां येणार नाहीं. ब्रिटिश माणसाचा एक नमुना म्हणून मला फक्त माझ्यापुरतें बोलतां येईल. ब्रिटिशांच्या केवळ अधिराज्यालाच नव्हे, तर ज्याला आव्हान देण्याची आपणांपैकीं पुष्कळांना इच्छा होत असेल, त्या मानवी जीवनाला यंत्रारूढ व यंत्रबद्ध करून सोडणाऱ्या सबंध आधुनिक संसारालाच ते आव्हान देत आहेत, ही गोष्ट मला तेव्हांपासून कळूं लागली. वाटत होतें त्यापेक्षां फार मूलग्राही व विशाल भूमिकेवरून त्यांचा आपणांशीं वाद चालू आहे!

ॲपेंडिसायटिस्‌वरील शस्त्रक्रियेच्या निमित्तानें त्यांची मुदतीपूर्वीच सुटका झाली ( १२ जानेवारी १९२४ ). स्वतःचा वैद्य अथवा त्यांच्या पसंतीचा कोणताहि शस्त्रवैद्य बोलावून घेण्याची परवानगी तुरुंगाधिकाऱ्यांनीं त्यांना दिलेली होती. शिष्टाचारांत हार न जाणाऱ्या गांधींनीं आपला देह अधिकाऱ्यांच्या हातीं सोंपविला व कोणतीहि खास सवलत घेण्याचें नाकारलें! शस्त्रवैद्यानें शस्त्रक्रियेच्या वेळीं विजेच्या टॉर्चचा उपयोग केला, पण काम अर्धवट झालें असतांच ती बिघडली. मग शस्त्रक्रिया पुरी होईपर्यंत परिचारिकेनें एक लालटेन दिवा जवळ धरला होता. रोगी गमावला असता, तर हिंदुस्थान व जग काय म्हणालें असतें याची आपणांस कल्पना येईल. मिस् मेयोनें या प्रसंगाचें खवचट वर्णन केलेलें आहे. तुरुंगांतील अधिकाऱ्यांना व “ मला स्वतःलाहि ” श्रेयस्कर असा तो एक ‘पवित्र’ अनुभव होता, असें गांधीजी त्याचें वर्णन करतात. तसा तो होता खराच. इतक्या बहुविध अप्रिय गोष्टी घडणाऱ्या या जगांत या प्रसंगाच्या रूपानें एक निराळ्या प्रकारची गोष्ट घडून आली.

त्यांच्या चरख्याच्या मार्गाबद्दल लिहिण्यास येथें सवड नाहीं. तो शहाणपणाचा व न्याय्य मार्ग होता असें मला वाटूं लागलें आहे. क्वचित्प्रसंगीं वेडगळपणानें त्याचा अतिरेक करण्यांत आला हें खरें. उदा., "टागोरांनीं दररोज सूत कांतावें," असें गांधी म्हणाले होते. आपले देशबांधव अस्पृश्यांच्या बाबतींत जो अन्याय करतात, त्याचें प्रायश्चित्त म्हणून आपल्या रुग्णालयांतलें गलिच्छांतील गलिच्छ काम मुद्दाम स्वतःच्या हातानें करण्यांत, किंवा (गाईनें अधिक दूध द्यावें म्हणून जी 'फुका' नांवाची क्रूर पद्धति वापरण्यांत येते तिचा निषेध म्हणून ) फक्त शेळीचेंच दूध पिण्यांत त्यांच्या ठिकाणचा जो अनपायकारक असा क्लेशवादाचा ( Masochism ) अंश दृग्गोचर होतो, त्याविषयींहि मला कांहीं लिहावयाचें नाहीं.

ते उत्कृष्ट मनुष्यपारखी आहेत. त्यांचें मानवप्रेम हें इतिहासाला ज्ञात अशा अत्यंत अगाध चिजांपैकीं एक चीज आहे. हरएक जातीबद्दल करुणा व प्रेम त्यांच्या मनांत वसत असून दरिद्री व दलित जनांबद्दल तर त्यांना आत्यंतिक करुणा व प्रेम वाटत असतें. ते खरोखरी निष्काम आहेत. सर्व स्त्रीपुरुषांना ते समान मानतात. त्यांना स्वतःच्या मुलाची मातब्बरी एकाद्या भंग्याच्या मुलापेक्षां अधिक वाटत नाहीं हें सगळ्या हिंदुस्थानांत सर्वांना ज्ञात आहे. स्वतःबद्दल त्यांना भीति अथवा चिंता कशी ती वाटतच नाहीं. ते विनोदी, प्रेमळ, आग्रही व शूर आहेत. हिंदुस्थान देश पिचलेला, दुभंग झालेला, तडकलेला तुकडेतुकडे झालेला, ठिगळें लावलेला असा होता. पृथ्वीच्या पाठीवर कोणताहि देश असा नसेल. युद्धानंतरच्या काळांत प्रथमच त्याच्या ठायीं असें चैतन्य निर्माण झालें, कीं जें त्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पसरलें. त्यानें अशी एक वायुलहर अनुभवली, कीं जिचा सर्वत्र स्पर्श झाला. असा एक नाद ऐकिला, कीं त्यांतले शब्द नेहमींच आकलन झाले नसले तरी जो सर्वत्र दूर घुमला. राष्ट्रीय चळवळींत गांधींच्याहून अधिक वक्तृत्वपूर्ण व अधिक विद्वान् माणसें होऊन गेलीं; पण हिंदुस्थानांतील स्त्रीपुरुषांना आपण तुमच्याच हाडामांसाचे आहोंत अशी खात्री पटवणारा एकच माणूस झाला. बहिष्कृतांच्या पुढें त्यांनीं आशामार्ग ठेवला. मानवांत आपली गणना होऊं लागली अशीं सुखस्वप्नें डोंब व हारी अनुभवूं लागले. राजकीय संघटनेहून व्यापक

अशा भावना व आशा त्यांनीं कार्योन्मुख केल्या. लोकांच्या भविष्यकाळां-तील वाटेला त्यांनीं निश्चितपणें निराळें वळण लावलें.

याहूनहि त्यांनीं अधिक कार्य केलेलें आहे. राजकारणी पुरुष म्हणून मीं त्यांच्यावर टीका केलेली आहे. परंतु इतरत्र मीं सांगितलें आहे त्याप्रमाणें, "कालखंडावर आपल्या कल्पनेचा ठसा उमटवणाऱ्या ज्या विरळा व्यक्ती असतात त्यांपैकीं एक, म्हणून त्यांचें नांव स्मरणांत राहील. त्यांची ही कल्पना म्हणजेच अहिंसा. तिनें इतर राष्ट्रांची सहानुभूति मोठ्या प्रभावी रीतीनें आपणांकडे आकर्षित करून घेतली आहे." त्याचप्रमाणें तिच्या-मुळें ब्रिटिश सरकारच्या 'दडपशाही'मध्यें सुद्धां एक प्रतियोगी गुण निर्माण झाला आहे (ही गोष्ट कोणाच्या लक्ष्यांत आलेली दिसत नाहीं). हिंदुस्थानांतील लढ्याच्या वेळीं रक्तपात झाला, पाशवी प्रकारहि झाले. उभय पक्षांतील अतिरेकी कैवारी कांहींहि म्हणोत, लढा ज्या रीतीनें चालला त्या रीतीमुळें व तिचा परिणाम म्हणून समजूतदारपणाचा व सुसंस्कृत-पणाचा असा संबंध या दोन राष्ट्रांत निर्माण होईल, अशी सावध आशा बाळगणें साधार ठरेल असें वाटतें.

असें घडून आल्यास सध्यां जगांत धुडगूस घालीत असलेली प्रमत्तता ओसरून गेल्यानंतर, माझा देश व त्याचप्रमाणें हिंदुस्थान, हीं दोन्ही राष्ट्रें या पुरुषाकडे आपला सर्वश्रेष्ठ व अत्यंत कर्तबगार असा सेवक व पुत्र म्हणून पाहूं लागतील. इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यांतील तंट्याचें जें वास्त-विक स्वरूप, म्हणजे कुटुंबांतील भांडणाचें स्वरूप, तें त्यांनीं कायम ठेवलें आहे. पुष्कळदां कुटुंबाकुटुंबांत अत्यंत गर्ह्य वर्तन घडतें, परंतु कधींहि न मिटणारीं अशीं भांडणें त्यांच्यांत विरळाच आढळून येतात.

# जगाच्या इतिहासांत गांधींचें स्थान

## लेखक : कौंट हरमान कायसरलिंग

### ( डार्मस्टाट, जर्मनी )

मानवी इतिहासाच्या कोणत्याहि कालखंडांत घडलेल्या प्रसंगांहून अत्यंत आवेगमय व व्यापक अशा संघर्षांच्या युगांत आपण राहात आहोंत. दिक्कालावर मानवानें विजय मिळविल्यापासून जगांतील अलगपणाची कल्पनासुद्धां आभासमय ठरली आहे. गेल्या जागतिक महायुद्धापर्यंत अल्पसंख्य लोकच वास्तविक सर्व जगांत राज्य करीत होते. मग ते कोणत्याहि राजकीय सिद्धांताचा देखावा करीत असोत. त्याच्या उलट, आज अल्पसंख्याकांच्याऐवजीं जनतेच्या—निदानपक्षीं फार मोठ्या बहुसंख्य समाजाच्या—हातीं राजकीय व सामाजिक सत्ता आल्यामुळें नुसत्या संख्येला महान् सामर्थ्य प्राप्त होऊन तद्द्वारा जनतेचे विशिष्ट गुण व्यक्त होऊं लागले आहेत. परस्परविरोधी व परस्परांशीं झगडणाऱ्या शक्तींचा अस्थिर समतोल (Unstable Equilibrium) असेंच जीवनाचें नित्याचें स्वरूप असल्या-कारणानें आणि त्यांपैकीं कित्येक शक्ती विजेप्रमाणें धन ऋणांच्या सहयोगानें व्यक्त होणाऱ्या असल्यामुळें, वर दर्शविलेल्या घडामोडींच्या योगें अशी परि-स्थिति प्राप्त झाली आहे, कीं भौतिक व आध्यात्मिक भूमीवर कल्पनातीत सामर्थ्यांच्या 'विद्युत्प्रवाहांशींच तुलितां येतील, असे अश्रुतपूर्व विविध शक्तिप्रवाह परस्परांच्या सहयोगानें कार्यप्रवृत्त झालेले दिसून येत आहेत. विशिष्ट चळवळींशीं निगडित झालेल्या निश्चित स्वरूपाच्या कल्पनांना विशेषसें महत्त्व राहिलेलें नाहीं; त्यांच्यामुळें नेहमीं दिशाभूल होत असते. कारण, एक तर त्यांच्या नांवावरून दिसून येतात त्यापेक्षां कितीतरी अधिक घटक त्या प्रत्येक चळवळींत समाविष्ट झालेले असतात, व तिच्यामुळें संमिश्र होऊन एक बनलेले असतात. दुसरी गोष्ट अशी कीं, या 'नाम-रूपां'च्या पलीकडे असणारी जी शक्ति तिचें या नामरूपांशीं शेवटीं फारच

थोडें साम्य उरतें असें इतिहासानें सिद्ध केलेलें आहे. एका विशिष्ट ध्येया-वर दृष्टि ठेवून ज्या चळवळीच्या जीवनक्रमास प्रारंभ होतो, तिची परिणति जीवनाच्या विकासाबरोबर निराळ्याच स्वरूपांत होत जाते.

अतएव, जागतिक चळवळींची जी प्रचलित नामाभिधानें आहेत, त्यांवर माझा यत्किंचित्हि विश्वास नाहीं. लोकसत्ता वा स्वातंत्र्य वा निरीश्वरता यांच्या प्रस्थापनेसाठीं आपण यत्न करीत आहों, असें म्हणणाऱ्या राष्ट्राच्या मनांतला आशय निराळाच असतो. वास्तविक स्वतःला अज्ञात अशा ध्येयामागें तें चांचपडत जात असतें. त्या ध्येयाला सध्यां ज्या गर्भपिंडाचें स्वरूप आहे, तो गर्भ उपजला, इतकेंच नव्हे, तर पूर्ण वाढला, म्हणजेच त्याच्या पूर्ण स्वरूपाचा आविष्कार होणार असतो. आपल्या युगांत ज्या तत्त्वांकरतां लोक झगडत आहेत, त्यांपैकीं कोणतेंहि एक तत्त्व अंतिम विजय मिळवणार नाहीं. कारण मानवी जग अति विशाल अशा संघर्षक्षेत्रांत, प्रचंड शक्तीच्या भिन्न केंद्रांत विभागलें गेलेलें असल्या कारणानें, जें जें तगेल त्या सर्वांचा सुसंवादी असा समन्वयच—हा समन्वय दूरस्थित व दुष्प्राप्य असा आहे—कांहीं प्रमाणांत स्थिर अशी तोलावस्था निर्माण करण्यास शेवटीं समर्थ होईल.[१]

आणखी एक अडचण विचारांत घ्यावयास हवी. अस्तित्वांत असलेल्या प्रबळ शक्तींपैकीं कोणती दीर्घकालपर्यंत बलवान् राहील आणि सध्यां धड अस्तित्वांतहि नसणारी कोणती निराळीच शक्ति जगांत बलिष्ठ ठरेल, याविषयीं भविष्य करणें सोपें नाहीं. परंतु ज्यांचें महत्त्व क्वचितच ध्यानांत घेण्यांत येतें अशीं दोन तत्त्वें, जर आपण त्यांचें सुबुद्धपणें आकलन केलें तर, आपणांला बऱ्याच प्रमाणांत अचूक असें भविष्य वर्तवण्याच्या कामीं साहाय्यभूत होण्यासारखीं आहेत. यांपैकीं पहिलें तत्त्व प्राचीन चिनी लोकांनीं मांडलेलें आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, प्रत्येक इतिहासप्रसंग दिसतो त्यापूर्वीं सुमारें पंचवीस वर्षें आधींच घडलेला असतो. या म्हणण्याचा आशय असा कीं, आजचीं मुलेंच—जाणतीं माणसें नव्हेत—

---

[१] याच विचारधारेचा विस्तार प्रस्तुत लेखकाच्या 'The Recovery of Truth' या ग्रंथांतील Tension and Rhythm या प्रकरणांत पहावा.

पंचवीस वर्षांनंतर जगावर अधिकार चालवणार आहेत. म्हणून मुलांमध्यें जी भावना आज खरोखर स्फुरत असेल तिच्या बिनचूक अंदाजावरून भविष्यकाळाचें स्वरूप वर्तवतां येईल.[२]

दुसऱ्या तत्त्वाचा संबंध ध्रुवीकरण सिद्धान्ताशीं ( Polarity ) आहे. प्रत्येक कार्यशाली शक्ति अवश्यमेव आत्मविरोधी शक्ति उत्पन्न करीत असते. कोणतीहि प्रभावी सिद्धांतप्रणाली आपल्या अंगच्या प्रभावाच्या योगानेंच विरुद्ध सिद्धांत उत्पन्न करून त्यांत चैतन्य भरीत असते. चळवळ जितकी अधिक एकतर्फी असेल, तितक्या मानानें विरोधी चळवळहि एकतर्फी असण्याचा संभव अधिक. माझ्या मतें याच एका दृष्टिकोणांतून महात्मा गांधींच्या ऐतिहासिक महत्त्वाचा बिनचूक अंदाज लावतां येण्याचा बराचसा संभव आहे. आणि अगदीं याच मुद्याच्या दृष्टीनें पाहिलें, तर त्यांचें महत्त्व अत्यंत थोर असल्याचें दिसून येतें. हिंसेला पूर्वीं कोणत्याहि युगांत मिळाली नसेल इतकी मान्यता या आपल्या युगांत मिळाली आहे. कारण, सद्यःकालीं सगळ्याच गोऱ्या राष्ट्रांतील बहुसंख्य जनता हिंसेच्या बाजूची असून बऱ्याचशा भिन्नवर्णीय राष्ट्रांतील जनतेपैकीं बहुसंख्याक लोकहि त्याच मताचे आहेत. असें असल्यामुळें हिंसाशक्तीनें जगांत बदल घडवून आणण्याची ही चळवळ तिच्यांतील सर्व शक्ती विनष्ट झाल्याशिवाय संपुष्टांत येण्याचा सुतराम् संभव नाहीं असें मला वाटतें. आणखी अनेक शतकेंपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर कोणत्या ना कोणत्या तरी ठिकाणीं युद्धांमागून युद्धें व झगड्यांमागून झगडे होत राहणार. आणि असें आहे म्हणूनच सकृद्दर्शनीं अकरणात्मक भासणाऱ्या अहिंसेच्या कल्पनेनें स्फूर्ति झालेल्या चळवळीला, भिन्न परिस्थितींत कधींहि मिळालें नसतें—व वस्तुतः कधींहि मिळालेलें नाहीं—इतकें चैतन्यप्रद व ऐतिहासिक महत्त्व लाभणार आहे.

हिंसा आणि अहिंसा या दोन ध्येयांतील संबंध जसा दोन ध्रुवांसारखा आहे, तसाच संबंध साध्याला महत्त्व द्यावें, कीं साधनाला महत्त्व द्यावें

---

[२] या विचारधारेचा विस्तार प्रस्तुत लेखकाच्या ‘Creative Understanding’ या ग्रंथांतील ‘Politics and Wisdom’ या प्रकरणांत पहावा.

या विरोधी मतांतहि आहे. पहिल्याच्या पोटींच दुसऱ्या विरोधी मतांचा अंतर्भाव होत असतो. या दुसऱ्या विरोधी मतांच्या अस्तित्वामुळेंच, त्यांपैकीं एका ध्रुवाचें प्रतीक बनलेल्या महात्मा गांधींचें महत्त्व अढळ झालेलें आहे; मग त्यांनीं सुरू केलेल्या चळवळीला अंतीं व्यावहारिक यश कितीहि मिळो.

" साध्यामुळें साधनें पुनीत होत असतात " हे जेसुइटांचें सूत्र जोंपर्यंत मान्य होत आहे, ( रेड इंडियन लोकांच्याशीं व्यवहार करतांना वास्तविक प्युरिटन लोकांनींसुद्धां याच सूत्राचा स्वीकार केला होता ) तोंपर्यंत जगाच्या परिस्थितींत खरी व कायमची सुधारणा होण्याचा संभवच उद्भवत नाहीं. संहाराचीं साधनें वापरलीं म्हणजे त्यांच्या योगानें तत्सदृश विरोधीं साधनें वापरण्यांत येतात व शेवटपर्यंत हें असेंच चालू राहतें. बुद्धानें म्हणून ठेवलें आहे, " द्वेषानें द्वेषाला उत्तर मिळूं लागलें, तर द्वेष संपणार तरी कधीं ? "

आजच्या घटकेला अत्यंत पराक्रमी समजल्या जाणाऱ्या राष्ट्राचें वैशिष्ट्य म्हणून समजला जाणारा व उत्तरोत्तर अधिकाधिक राष्ट्रांचें वैशिष्ट्य बनणारा असा जो आधुनिक आक्रमणशील राज्यविस्तारवाद त्याच्या विरुद्ध ध्रुवाचें केवळ गांधी हेच एकटे जितेंजागतें प्रतीक नव्हत. आत्मरक्षणासाठीं ज्याप्रमाणें शांतवृत्तीचा चीन देश आक्रमणशील बनला आहे, त्याचप्रमाणें अनेक लढाऊ वंश व जमाती असलेल्या हिंदुस्थानांतहि समान स्थित्यंतर घडून येण्याचा पुष्कळ संभव आहे. परंतु वर उल्लेख केलेल्या ध्रुवांपैकीं एकाचें गांधी हे एक संपूर्णतया गोचर, अत्यंत भव्य, अत्यंत अव्यभिचारी व अत्यंत शुद्ध असें प्रतीक होत. तेथील जनतेच्या चळवळीशीं समरस झालेले असे निदान आतांपर्यंत तरी तेच एकटे आहेत. कारण, हिंदूंच्या दृढमूल व म्हणूनच अत्यंत सजीव असणाऱ्या ध्येयाशीं अहिंसा हेंच खरोखर सुसंगत असें ध्येय आहे. आणखी एका कारणास्तव महात्मा गांधी हे एक अत्यंत थोर असे इतिहासप्रसिद्ध पुरुष म्हणून राहातील, असा व्यक्तिशः माझा दृढ विश्वास आहे. अत्यंत विसदृश अशा दोन युगाच्या अगदीं सीमारेषेवर गांधी उभे आहेत, हें तें कारण होय. एका दृष्टीनें हिंदुस्थानांतला साधुपणाचा जो परंपरागत आदर्श त्याची गांधी हे मूर्ति होत; तर दुसऱ्या दृष्टीनें ते अत्यंत आधुनिक असे जननेते आहेत.

या बाबतींत त्यांची ऐतिहासिक भूमिका बॅप्टिस्ट जॉनसारखी आहे. मीं ज्या भविष्यकाळाच्या मानवी राष्ट्राला 'विश्वराष्ट्र'× अशी संज्ञा दिलेली आहे, त्यामध्यें केवळ एकमार्गी प्रवृत्तीच्या संताला पूर्वीच्या काळांतल्या-सारखी कर्तबगारी बहुधा दाखवितां येणार नाहीं.

क्रूस व गरुड* यांचा नवीन समन्वय ही या भविष्यकालीन युगाची वैशिष्ट्यनिदर्शक निशाणी होईल. मानवांचे जे नवीन नमुने निर्माण होतील ते पूर्ण मानवांचे, म्हणजे ज्यांच्या ठायीं आध्यात्मिक व भौतिक शक्ती परस्परांशीं तुल्यबल झाल्या आहेत अशा मानवांचे असतील. परंतु एवंगुणविशिष्ट अशा या मानवाच्या उदयाची पूर्वतयारी इतर कोणत्याहि हयात व्यक्तीपेक्षां उभय कालखंडांच्या सीमारेषेवर उभ्या असलेल्या एका महान् व्यक्तीनें केली असल्याचें पुढें दृष्टोत्पत्तीस येईल; त्या व्यक्तीचें नांव "**गांधी.**"

---

# ख्रिश्चन शांततावाद्यांच्या दृष्टीनें गांधींचें महत्त्व

## लेखक : **स्टीफन् हॉबहाऊस**, एम्. ए. (इंग्लंड)

आपला धर्म अथवा तत्त्वज्ञान कितीहि वस्तुनिष्ठ ( Objective ) असो, आपल्यापैकीं विचारक्षम व आकांक्षाक्षम अशा प्रत्येक माणसाला तो ज्या गूढ व अज्ञात परिस्थितीमध्यें वास करीत असेल, तिनें समोर मांडून

---

× प्रस्तुत लेखकाच्या World in the Making या पुस्तकांतील विशेषेंकरून दुसरें प्रकरण वाचावें.

* येथें क्रूस म्हणजे अहिंसातत्त्व व गरुड म्हणजे विजयेच्छा असा अर्थ अभिप्रेत आहे. क्रूस ही ख्रिश्चनधर्माची व गरुड ही विश्वविजयाची निशाणी होय.

ठेवलेल्या वस्तुजातांतून आपली स्वतःचीच एक सृष्टि निर्माण करावी लागत असते. या आपल्या स्वतःच्या मनोमय जगांत अशा कांहीं वस्तू असतात–त्यांनाच आपण शक्ति, गुण, ध्येयें अथवा व्यक्ती म्हणतों–कीं ज्या आपल्या अवर्णनीय व चैतन्यमय अशा आकर्षणशक्तीनें आपल्या स्वभावाच्या, अंतःकरणाच्या व बुद्धीच्या गाभ्यांत स्फूर्तिलहरी निर्माण करितात; आणि आपलें मन शुद्ध अवस्थेंत असलें म्हणजे त्या वस्तूंची ओळख व्हावी, त्यांच्यावर प्रेम करावें, क्षुद्र आणि अनवश्यक, अशुद्ध व सौंदर्यहीन अशा वस्तुजातापासून मुक्त होण्याचा प्रयत्न करून त्यांच्यांशीं अधिकाधिक प्रमाणांत एकरूप होत जावें, अशी ओढ आपल्या ठिकाणीं निर्माण होऊं लागते.

मानवी कलानिर्मितींमध्यें अथवा शास्त्रीय शोधांतील सूक्ष्म संगतीमध्यें ( Subtle Correspondences of scientific Process ) कांहीं लोकांना वरील प्रकारचें प्रधान आकर्षण आढळून येईल हें संभवनीय आहे. अस्थिमांसयुक्त देहरूप घेऊन अथवा वाङ्मयरूप घेऊन आपल्या सन्मुख उभ्या राहणाऱ्या परम सुंदर स्त्रीपुरुषांच्या द्वारा पूर्ण विकसित जीवनाच्या व्यक्तित्वाचें जें चित्र कल्पिण्यांत येतें, तसल्या प्रकारच्या आश्चर्यमुग्ध करणाऱ्या अनिर्वचनीय सौंदर्याच्या व्यक्तित्वांत, आणि चित्ताला शांति देणारी, आपल्या व निसर्गाच्या मनोभावांची अन्तःसंगति ज्या वेळीं साधलेली असेल त्या वेळीं दृष्टिगोचर होणाऱ्या निसर्गांतून, म्हणजे आकाश, पृथ्वी व चरसृष्टि यांतून निर्माण होणाऱ्या आश्चर्य व सौंदर्य यांच्या अनिर्वचनीय संवेदनांतहि तें प्रधान आकर्षण आढळून येणाऱ्या अनेक लोकांपैकीं, मी एक आहें. उत्कट अनुभवाच्या या दोन स्थानांपासून ज्याला ईश्वर म्हणतात त्याच्यावरील श्रद्धेकडे मी आकृष्ट होतों, म्हणजेच माझ्या अन्तःकरणांत व माझ्या सभोंवतीं चैतन्याचीं व सौंदर्याचीं जीं अनेकविध केन्द्रें मुक्त व व्यक्त होण्यासाठीं यत्नमग्न झालेलीं आहेत त्या सर्वांचें आदिस्थान व अंतिमस्थान असें जें तत्त्व–जें अनत अतिमानुष असूनहि अत्यंत मानुष आहे–त्या तत्त्वाचें आकलन व शोधन करण्याच्या प्रवृत्तीकडे मी अनिवार्यपणें आकर्षिला जातों.

त्याचप्रमाणें जीं आपल्या दुश्चेष्टांनीं सुसंवादी जीवनाच्या विकासाचा घात करतात, अशा कुरूपतेच्या व विसंवादित्वाच्या तिमिरमय व संहारक तत्त्वांच्या अस्तित्वाचीहि दु:खमय जाणीव मला आहे. या शक्ती कांहीं प्रमाणांत बाह्य जगामध्यें अस्तित्वांत असल्याचें दिसून येतें. परंतु बाह्य जगांतील अशा शक्तींचा विरोध मोडून काढून तो निकामी करण्याचें अद्भुत सामर्थ्य धैर्यशाली अशा मानवी अंत:करणांत असतें. पण या दुष्ट शक्ती मानवी अन्त:करणांत व विशेषेंकरून माझ्या अन्त:करणांतच वसत असतील, तर त्या अधिक भयंकर शत्रू ठरतील. एकटा पडलों कीं अनेकदां माझी श्रद्धा डळमळते, आणि या दुष्ट वासनांच्या राक्षसी सामर्थ्यापुढें मी अगतिक होऊन जातों. साहाय्यासाठीं व बंधमुक्त होण्यासाठीं निकट अशा आध्यात्मिक सोबतीकरतां मला कोणत्या तरी मानवी वा दैवी व्यक्तीचा आश्रय करणें भाग पडतें.

यच्चयावत् सद्वृत्त व सुंदर वस्तुजाताच्या अन्त:करणांत वास करणाऱ्या अनंतरूपी विभूतीची सर्वश्रेष्ठ अशी व्यक्त मूर्ति म्हणून येशू ख्रिस्ताला माझ्या सन्मुख उभें करण्याचें कार्य भूतकाळ व वर्तमानकाळ जेथें करीत आहेत, अशा एका समाजांत ईश्वरेच्छेनें मी जन्मास आलों व वाढलों आहे. मननानें, प्रार्थनेनें आणि प्राचीनांच्या ज्ञानानें पवित्र झालेल्या व पूर्वी कधींहि झाली नसेल अशा प्रकारें विसदृश अशा प्रक्षिप्त गोष्टींपासून मुक्त होत चाललेल्या, अद्यापि अत्यंत सामर्थ्यवान् असणाऱ्या परंपरेच्या प्रभावानें माझी अशी खात्री पटली आहे कीं, येशू ख्रिस्ताच्या इतिहासख्यात विभूतीला या विश्वामध्यें व ईश्वराच्या चरणांपाशीं अशी पदवी प्राप्त झालेली आहे कीं, जी दुसऱ्या कोणत्याहि मानवाला अथवा अवतारी पुरुषाला प्राप्त झाली नसेल. तोच भूतात्मा किंचित् कमी तेजानें दुसऱ्याहि मानवी शरीरांत वास करीत असतो. ज्याच्या स्मृती लेखनिविष्ट झालेल्या नाहींत, अशा कित्येक व्यक्तींच्या ठिकाणीं त्याचा नि:संशय वास होता. कांहीं व्यक्ती अशा होऊन गेल्या कीं ज्याची स्मृति ही आम्हां मानवांच्या इतिहासांत तेजोगोलांप्रमाणें तेवत राहिली आहे. त्यांच्या तेजोदेहांवर कांहीं कलंक असेल; तथापि त्या योगानें त्यांची प्रभा फिकी पडत नाहीं. त्यांच्यापैकीं कांहीं जणांनीं येशू ख्रिस्ताला प्रभु आणि ईश्वर मानलें नसलें

अथवा त्यांना तसें करणें शक्य झालें नसलें, तरी ते सगळे अविनाशी अशा खिस्ताचेच संदेशवाहक व तत्त्वप्रणेते होत असें मी मानतों.

तत्त्वदीप पाजळणाऱ्या अशा ज्या ऐतिहासिक व्यक्ती होऊन गेल्या त्यांत माझ्या मतें अहिंसा-सत्याग्रहाचे प्रणेते मोहनदास करमचंद गांधी हे सर्वश्रेष्ठ होत. आपल्या युगांत उदय पावलेल्या व्यक्तींत तर ते अग्रगण्य आहेतच. प्राचीन श्रद्धा व नीतिनियम यांचा ऱ्हास झाला आहे, यंत्रानें जुलूम चालविला आहे, कारखानदार व युद्धवादी शास्त्रीय ज्ञानाचा दुरुपयोग करीत आहेत व त्यांच्या वर्चस्वाला आम्ही साहाय्य करीत आहों अथवा सह्य मानीत आहों. यामुळें अलीकडच्या काळांत सत्याचीं विविध, अभिनव व सौंदर्यपूर्ण अशीं स्वरूपें आविष्कृत झालेलीं असूनहि, इतिहासांत अभूतपूर्व असें संकट जगावर ओढवलें आहे. मानवी वासनांच्या व विकारांच्या अनिर्बंध स्वार्थामुळें उत्पन्न झालेल्या युद्धांतल्या जगद्व्यापी अनावस्थेंत व संहारांत पूर्वी कधींहि पडली नसेल अशा प्रकारें संस्कृतीची —अथवा तो शब्द संदेहोत्पादक आहे म्हणून असें म्हणूं या कीं, आजच्या घटकेला जे भाग्यवंत आहेत त्यांना परिचित असलेल्या सुव्यवस्थित, सौजन्यपूर्ण, व संस्कारवान् अशा मानवी समाजाची—आहुति पडेल असाहि संभव वाटतो.

संभ्रमपूर्ण व अशांतिमय अशा ज्या परिस्थितींत आपण सांपडलों आहों तिच्यांतून मोक्ष व उद्धार साधण्याचीं, स्नेहसिंचन व जीवन यांच्या प्राप्तीचीं, सद्यःकालातील अद्वितीय साधनें म्हणजे गांधीप्रणीत अहिंसा व सत्याग्रह हीं परस्परावलंबी महान् ध्येयेंच होत, हें या निबंधांत सिद्ध करण्याचा मी प्रयत्न करणार आहें. हा प्रयत्न करीत असतांनाच युरोपांतील विचारेतिहासांत झालेल्या त्यांच्या कामगिरीचा आढावा मला घ्यावयास पाहिजे. कारण ख्रिश्चन धर्माग्रणींकडून तिरस्कृत व दुर्लक्षित अशीं तीं ध्येयें सांदीकोपऱ्यांत गल्लयाकुचांत पडून नजरेआड झालेलीं आहेत. ( हिंदुस्थान व चीनमधील अहिंसेच्या इतिहासाविषयीं लिहिण्याचा मला अधिकार पोंचत नाहीं. )

आत्मघात व संहार यांच्या कामीं तलवारीहूनहि महाभयंकर अशीं असंख्य साधनें मोठ्या त्वरेनें बनविण्यांत गुंग झालेल्या युरोपखंडाच्या

विभाग ... ग्रां. वा.
क्रमांक ... ९०५९
नों. दि. ३।९।३।६



उत्स्फूर्त केलें आहे. तें युध्द असें आहे कीं, ज्यांतील सैनिक संहारक शस्त्राच्या स्पर्शापासून सर्वतोपरी अलिप्त राहातात. आत्मबलाच्या, अनपायाच्या, क्रूर शत्रूविषयींसुध्दां दाखवलेल्या सद्वृत्तीच्या, ईश्वरासमोर आचरलेल्या श्रद्धामय विनम्रतेच्या, निष्कलंक शस्त्रांनीं चालवलेलें—मी तर असें म्हणेन कीं, ख्रिस्ताचा कंटकमय मुकुट व क्लेशगामी शूल स्वेच्छया धारण करून, हा मुकुट व शूल पीडक व पीडित या उभयतांना ईश्वरचरणापाशीं नेईल या दृढ श्रद्धेनें चालवलेलें—असें हें युध्द आहे. अहिंसेच्या प्रणेत्याला संवर्धित करणाऱ्या हिंदुधर्माला मनापासून वाखाणतां वाखाणतां मी ख्रिश्चन भक्तिमार्गांतली भाषा सहजपणें बोलूं लागलों, तर हिंदी लोकांनीं मला क्षमा केली पाहिजे.

आधुनिक जगांतील भीतीच्या व निराशेच्या वातावरणांत अहिंसेचा हा मार्ग एकाद्या स्वप्नाप्रमाणें अति सुंदर परंतु अ—वास्तव असा वाटतो. तथापि, आतांपर्यंत अपयश, परस्परविरोधी वर्तन व प्रमाद (नेत्याचे व अनुयायांचेहि) घडत आले असले तरीहि, विश्वासू लोकांच्या साक्षीवर विसंबावयाचें तर हें मान्य केलें पाहिजे कीं, या जीवनदायी सामुदायिक चळवळींतले पहिले प्रयोग पार पडले आहेत. अलीकडच्या कांहीं महिन्यांत खुद्द महात्माजींनींच मागील चुका व निराशा यासंबंधीं स्पष्ट कबुली पुनः एकवार दिली आहे; परंतु त्याचबरोबर भविष्याविषयीं त्यांनीं आपली अढळ श्रद्धाहि व्यक्त केली आहे. ते लिहितात, "हिंदुस्थानच्या अनेक दुःखांवर उपाय म्हणून अहिंसेच्या मार्गाचें दिग्दर्शन करण्याकरतां ईश्वरानें मला आपल्या हातचें साधन बनवलें आहे...माझी अहिंसेवरील श्रद्धा पूर्वीप्रमाणेंच दृढ आहे. आपल्या देशांतील सर्व अडचणींवर तिच्या साहाय्यानें आपणांस तोड काढतां येईल; इतकेंच नव्हे; तर हिंदुस्थानाच्या बाहेर जो रक्तपात चाललेला आहे आणि पाश्चात्य जगाला उध्वस्त करून टाकण्याची धास्ती ज्याच्यामुळें उत्पन्न झाली आहे, तो रक्तपातसुद्धां अहिंसेची उपाययोजना योग्य रीतीनें केल्यास बंद करतां येईल असें माझें ठाम मत आहे."*

---

* हरिजनः ७ जुलै १९३८

परकीयांच्या अंमलाखालीं असलेल्या जनतेंतील चळवळींत मोठ्या आनंदानें व आत्मविश्वासानें, आपल्या थोर नेत्याच्या तोंडावाटे अथवा लेखणीवाटे पुढीलप्रमाणें निघालेल्या विधानांना आचारसिंधुसारखीं मानून हजारों लोक सामील होतांना दिसत असतील, तर त्या लोकप्रिय व अत्यंत देशाभिमानपूर्ण अशा चळवळीविषयीं आपल्या मनांत कोणत्या प्रकारचा ग्रह निर्माण होईल? +

"अहिंसा (अनपाय) याचा अर्थ व्यापक प्रेम. हा परमधर्म आहे. त्यानेंच मानवजातीचा बचाव होईल."

"अहिंसेवर श्रद्धा ठेवणारा माणूस चराचराच्या ठायीं चैतन्यमय ईश्वराचा वास आहे अशी श्रध्दा ठेवतो."

"अहिंसा ही शब्दानें शिकवितां येणार नाहीं. अंतःकरणापासून केलेल्या प्रार्थनेचें उत्तर म्हणून, ईश्वराच्या कृपेनें ती आपल्या अंतःकरणांतच स्फुरूं लागते."

"अत्यंत बलिष्ठ व अत्यंत शूर अशांचेंच अहिंसा हें शस्त्र आहे. खऱ्या ईश्वरभक्ताला तलवार चालविण्याचेंहि बल असतें; तथापि प्रत्येक व्यक्ति ही ईश्वराची मूर्ति आहे अशी जाणीव त्याला असल्यामुळें तो तलवार चालवीत नाहीं."

"रक्त सांडावयाचेंच असेल, तर आपलें स्वतःचें रक्त सांडा. न मारतां मरण्याचें शांतियुक्त धैर्य अंतःकरणांत भिनूं द्या."

"प्रेम दुसऱ्यांना जाळीत नाहीं. मृत्यु आला तरीदेखील आनंदानें क्लेश सहन करीत करीत तें स्वतःलाच जाळून घेईल. विचारानें, उच्चारानें अथवा आचारानें एकाहि इंग्रज माणसाला तें जाणुनबुजून अपाय करणार नाहीं."

"हिंदुस्थाननें आपले जेते समजल्या जाणाऱ्यांना प्रेमानें जिंकलें पाहिजे. देशाभिमान म्हणजेच मानवप्रेम असें आम्हांस वाटतें. हिंदुस्थानाचें हित करण्यासाठीं मी इंग्लंडचें अथवा जर्मनीचें अहित करणार नाहीं."

---

+ अनेक लेखकांच्या वा खुद्द गांधींच्या लेखनांत उपलब्ध होणारीं वचनें मीं कांहीं ठिकाणीं सारांश रूपानें व संकलित करून दिलीं आहेत.

" अहिंसा व सत्य हीं तत्त्वें अविभाज्य असून तीं परस्पराश्रयी आहेत."

" सत्यापरता परमेश्वर नाहीं. शोधण्यासारखी मुख्य गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे सत्य."

" स्वतः ईश्वरच ज्याचें सूत्रचालन करीत आहे, अशा ह्या आपल्या पवित्र युद्धांत कोणतीहि गुप्त गोष्ट नाहीं, कोणत्याहि कारस्थानाला अथवा असत्याला जागा नाहीं. सर्व कांहीं शत्रूच्या डोळ्यांदेखत करावयाचें आहे."

" आत्मशुद्धि व्हावी म्हणून केलेल्या प्रार्थनेनें प्राप्त करून घेतलेल्या, सर्व दैहिक व स्वार्थी वासनांवरील नियमनशक्तीची सत्याग्रहासाठीं ( सत्यबल व आत्मबलासाठीं ) जरुरी आहे.

" सत्याग्रही जें जें धोरण आंखील त्या त्या वेळीं त्याला आपल्या विपक्षीयाच्या अडचणी लक्ष्यांत घेतल्याच पाहिजेत. तो त्याचे अन्याय्य कायदे अथवा हुकूम मानणार नाहीं; पण त्याच्याशीं सत्याग्रहीचें वर्तन सदैव मृदु व सौजन्ययुक्त असेंच राहील."

" न्याय्य मार्गापासून सत्याग्रही कधींहि च्युत होणार नाहीं; परंतु शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून तो सदैव आतुर असेल. दुसऱ्यांबरोबर वागतांना तो उदंड श्रद्धा ठेवील, कमालीचा धीर धरील आणि भरपूर आशा बाळगील."

" मानवी स्वभाव मूलतः एकच आहे. म्हणून प्रेमानें केलेल्या आराधनेशीं शत्रु हटकून ( अखेरीस ) प्रतियोगिता करीलच."

" शांतिपूर्ण, दृढनिश्चयी व पापभीरू लोकांच्या हल्ल्यापुढें पृथ्वीच्या पाठीवरील कोणतीहि शक्ति टिकाव धरूं शकणार नाहीं. जगातल्या सगळ्या शस्त्रांपेक्षां अहिंसा बलवान् आहे."

" ईश्वरभीरु मनुष्याला मृत्यूचें भय नाहीं. रणांगणावर शौर्य गाजविणें आम्हांस शक्य नाहीं; परंतु निर्भयता, देहासंबंधींच्या भीतीचा त्याग, संपत्ति, कुटुंब, मान यांच्या नाशाची भीति त्यागणें आम्हांस अत्यंत आवश्यक आहे. या जगांत आमची अशी एकहि वस्तु नाहीं."

" अहिंसेकरतां स्वतःवर नव्हे, तर एका ईश्वरावरच श्रद्धा ठेवावी लागत असल्यामुळें तिला खऱ्या विनम्र भावाची आवश्यकता असते."

जगांतील संपत्तीचा अन्याय्य असा भाग कोणत्याहि प्रकारची रुखरुख मनाला लावून न घेतां जोंपर्यंत आपल्या हातांत आपण घट्ट धरून ठेवीत आहों अथवा जोंपर्यंत आपल्या बांधवांवर अधिकार गाजविण्यांत व त्यांना पिळण्यांत समाधान मानीत आहों, तोंपर्यंत वर उल्लेख केलेल्या आचार-तत्त्वांविषयीं निष्ठा बाळगण्याची आपणांस साहजिकच भीति वाटत राहणार हें निःसंशय; तथापि, मानव्य, ईश्वर व आध्यात्मिक जगाचें अस्तित्व यांच्या ठायीं निष्ठा ठेवून वागण्याचा प्रयत्न करणारे जे स्त्रीपुरुष आहेत, त्यांना तरी मानवी इतिहासामध्यें आपल्या निशाणावर वरील प्रकारचीं प्राणदायी ब्रीदवाक्यें पहिल्यांदांच लिहिणाऱ्या या चळवळीविषयीं, आनंदच वाटावयास हवा. मग तिच्यांत कांहींहि दोष अथवा प्रमाद घडून आले असोत.

सविनय कायदेभंगाच्या स्वरूपांत सुरू झालेल्या सत्याग्रहसंग्रामामुळें पुरेसे संस्कार न झालेल्या जनतेंत भयावह अशा भावनोद्रेकाचें वातावरण निर्माण होऊन हिंसाचरणाला सुरुवात झाली, असें असतां निदान दोन वेळां तरी या हिंदी पुढाऱ्यानें असामान्य धैर्य दाखवून व आपल्या हातून हिमालयाएवढी चूक झाली अशी मान्यता देऊन, तो संग्राम अजिबात थांबवला आणि आपल्या अनेक अनुयायांचा असंतोष व रागहि सहन केला, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. तसेंच हिंसा व छळ यांच्या प्रतिकाराचा गांधींचा जो कार्यक्रम आहे त्याच्याशीं अविभाज्यरीत्या संबद्ध झालेल्या अशा अनेक कार्यप्रवृत्ती आहेत, कीं ज्यांच्या द्वारा अत्यंत दरिद्री, अत्यंत दलित व सर्वस्वीं बहिष्कृत अशा जनतेशीं, विशेषतः आपल्या उंबरठ्याजवळच राहाणाऱ्या व हिंदुस्थानांतील अस्पृश्याप्रमाणेंच असणाऱ्या जनतेशीं, एकरूप होण्याची सत्याग्रहीची तळमळ व्यक्त होत असते.

गेल्या कांहीं शतकांच्या अवधींत पाश्चात्य समाजांतील सामाजिक मूल्यें व संस्था यांनीं बहुतेक जगाला भारून टाकलें असून येशूचीं सुंदर तत्त्वें त्या समाजांत फारफार तर अंशतः आचरणांत येत आहेत असें म्हणतां येईल. ही गोष्ट खरी आहे कीं, त्यांचा प्रभाव चैतन्यदायी ठरला असून दुर्बलांना, अभाग्यांना व दलितांना कांहीं प्रमाणांत न्याय, दया व साहाय्य

यांची प्राप्ति करून देण्याचें, सत्य व सचोटी यांचा कैवार घेण्याचें आणि वैषयिक जडवादाच्या कर्दमांतून बहुसंख्य लोकांना उद्धरण्याचें कार्य त्यामुळें झालेलें आहे. परंतु या क्षेत्रांतसुद्धां त्यांचें यश अत्यंत मर्यादित ठरलें असून बेकारी, औद्योगिक स्पर्धा व युद्धें यांपासून येणाऱ्या आपदा नष्ट करण्याच्या बाबतींत खिस्तीधर्मांतील ध्येयवाद सर्वतोपरी अपेशी ठरला आहे हें आपणांस ठाऊक आहेच. ह्या अपयशाचें मुख्य कारण असें आहे कीं, अत्यंत भाविक अशा लोकांसकट सर्व खिस्ती जनतेच्या ठिकाणीं स्वास्थ्या-सक्तीची फाजील वाढ झाली असून बाह्य अनाध्यात्मिक वस्तूंवर, धनसंचया-वर तिचा लोभ जडला आहे; आणि आपल्या स्वास्थ्याच्या संरक्षणासाठीं ईश्वरावर व ईश्वरदत्त अशा आंगच्या आत्मबलावर न विसंबतां ते प्राणहारक आयुधांवर विसंबूं लागले आहेत. देव व द्रव्य या उभयतांचीहि आराधना करण्याच्या प्रयत्नांत आम्ही आहों ! अज्ञानी व नाराज अशा मजुरांच्या, आणि मन मारून टाकणाऱ्या यंत्रांच्या साहाय्यानें निर्माण केलेल्या वस्तूंचा कोट आम्हीं आपल्या भोंवतीं रचिला आहे. दुराचरणी व क्षुधाव्यास लोकांपासून आपला बचाव करण्यासाठीं आपल्यांतील तरुणांनीं मारण्याचें, घाव घालण्याचें व विध्वंस करण्याचें शिक्षण घ्यावें, म्हणून आपण त्यांचें मन वळवीत आहों आणि आपल्या लोभामुळें अथवा स्वार्थामुळें पुष्कळदां क्षुधितांना दुराचरणी बनवीत आहों.

या बनावट संस्कृतीच्या निरासाचा उपाय येशूनें आपल्या सुविख्यात प्रवचनाच्या व त्याहीपेक्षां आपल्या जीवनाच्या व मृत्यूच्या द्वारा एकदां निदर्शित करून ठेवला आहे. सदाचारसंपन्न निर्धनता व साधी राहणी यांत (नीतिहीन बनवणाऱ्या दारिद्र्यांत मात्र नव्हे) समाधान मानावें, ईश्वराच्या कृपाळूपणावर व सौजन्यावर अचल निष्ठा ठेवावी, इतर सर्व गोष्टींहून ईश्वराचा, आत्मानंदाचा व मोक्षाचा लाहो धरावा, सर्व मानवांशीं आपलें एकत्व अनुभवावें, अन्यायाचें परिवर्तन करतां येईल अशी श्रद्धा ठेवून हिंसेनें प्रतिकार करण्यापेक्षां मरण पत्करणें हाच दुराचाऱ्यांना सदाचारी बनवण्याचा ईश्वरप्रणीत मार्ग होय, अशा श्रद्धेनें दुराचाऱ्यांशीं अजिंक्य अशा सहिष्णुतेनें व प्रेमानें सामना द्यावा, असा येशूचा आपणांस आदेश आहे.

दुर्दैवानें अगदीं प्रथमपासून फारच थोड्या अनुयायांना दुराचरणाच्या प्रतिकाराच्या या मार्गाचें आकलन झाल्याचें दिसून येतें. नव्या करारांतील ( New Testament ) तद्विषयक सिद्धांतविवेचनावर सुद्धां कांहीं ठिकाणीं पूर्वीच्या दंडनीतीचीं पुटें चढलेलीं दिसतात. यद्यपि ख्रिश्चन व्यक्तीनें दुराचरणाचा प्रतिकार दुराचारानें करूं नये असें असलें, तथापि क्रोधाचा व शासनाचा दंड ईश्वरानें व शासनसंस्थेनें, म्हणजे ख्रिश्चनेतर शासनसंस्थेनें, धारण करणें हें उचित कर्म होय असें त्या पवित्र ग्रंथांतील कांहीं लेखक तरी मानीत होते. हा दृष्टिकोण पुढें चर्चनें स्वीकारला यांत कांहींच अस्वाभाविक नाहीं. त्याचाच वारसा ख्रिश्चन शासनसंस्थांकडे जाऊन महाभयंकर परिणाम घडून आले. ईश्वराचा पुत्र जो येशू त्यानेंच खुद्द अक्षय्य नरकाची कल्पना मांडलेली आहे अशी जी विचारसरणी दृढमूल झाली, तिच्यामुळें ख्रिश्चन धर्मांतील विचारांस जणुं खग्रास ग्रहणच लागलें ! आणि असल्या प्रकारची श्रद्धा उत्पन्न झाल्याकारणानें क्रूसाच्या संपूर्ण अर्थाचें अवगाहन करणें फार अवघड होऊन बसलें.

पूर्ण मानव या नात्यानें येशूविषयींची अति गाढ भक्ति, आणि प्रेमरूपी ईश्वराची गूढ उपासना व तद्रूपता हे गुण अंगीं असूनदेखील मानवसमाजाविषयींच्या ईश्वरी इच्छेचा ख्रिश्चन संतांना उलगडा झाला नाहीं. अनेकांनीं खऱ्या अहिंसेचें आचरण केलें हें निःसंशय. परंतु अहिंसा हाच मानवजातीच्या उध्दाराचा एकमेव मार्ग असल्याची घोषणा ख्रिश्चन धर्माच्या एकाहि थोर वक्त्यानें केली नाहीं. सामाजिक हिंसेंत ख्रिश्चनांनीं भाग घेतां कामा नये ही दृष्टि ज्या अगदीं आधुनिक काळापर्यंत होऊन गेलेल्या प्रबुद्ध " पाखंड्यां "ना झाली, ( उदा० वाल्डेन्सीयान्, 'आध्यात्मिक' फ्रान्सिकन, ॲनाबापूटिस्ट अथवा क्वेकर) त्या व्यक्तींनींहि सामान्यतः असेंच गृहीत धरल्याचें आढळून येतें कीं, ईश्वर क्रोधाविष्ट होणें शक्य आहे व तसा तो होतो; त्याला दंडशासनाची इच्छा होते; जुन्या करारांत वर्णिलेलीं युद्धें त्याच्याच इच्छेनें व सूत्रचालनेनें झालीं; पापीजनांनीं आपल्या अल्पकालीन आयुष्यांत ज्या दुःखांविषयीं अनुताप दर्शविला नाहीं, त्यांबद्दल त्यांना घोर व अखंड अशा प्रायश्चित्ताची शिक्षा देण्याची आज्ञा तोच देतो. म्हणून पीटर चेलझिस्कीसारखा (टॉल्स्टॉयच्या तत्त्वांचा पंधराव्या शतकांतील

पूर्वसूरी ) एकटादुकटा तत्त्ववेत्ता वा गूढवादी, ॲनाबाप्टिस्ट व क्वेकर पंथांतील कांहीं मंडळी, ( बऱ्याच अंशीं ) जॉन बोहमी व त्याचा नैष्ठिक इंग्रज शिष्य विल्यम लॉ यांचें कार्य अरण्यरुदनाप्रमाणें झालें आहे. त्या कार्याकडे दुर्लक्ष झालें असून त्याविषयीं गैरसमज करून देण्यांत येत असतात. अखेरीस मानवजातीपुढें आणिबाणीची वेळ येऊन ठेपली असतां, ज्यानें मला माझ्या तारुण्यांत ज्ञानदृष्टि दिली, त्या लिओ टॉल्स्टॉयनें आपल्या कथालेखनांतील परम सामर्थ्यवान् लेखणीच्या बळानें हजारों लोकांच्या मनांत ओजस्वी अशा शंकांचें बीज रुजवलें; आणि आतां खुद्द येशूच्या शिकवणीमुळें व त्यावरील टॉल्स्टॉयच्या टीकेमुळें, तसेंच हिंदुधर्मांतील पवित्र ग्रंथांच्या आदेशामुळें, प्रेरित झालेल्या महात्मा गांधींनीं अहिंसेचा संदेश हृदयस्थ करून आपल्या जीवनातील अनेकविध व्यापारांना तो लागू केला आहे; आणि तो अशा बुद्धिगम्य व आकर्षक स्वरूपांत मांडला आहे, कीं आत्मशोधन करणाऱ्या हजारों जीवांवर त्याची अनिवार्य, इतकेंच काय, पण शास्त्रशुद्ध अशी मोहिनी पडावी.

ख्रिस्ती गूढवाद्यांना जसा ईश्वर नीतिस्वरूपी व मानवी ( त्याचप्रमाणें अतिमानवीहि ) असा दिसतो, अगदीं तसाच तो आहे असें गांधींनाहि वाटतें. या बाबतींत मला कोठेंच मतभिन्नता दिसून येत नाहीं. पुनर्जन्मावर हिंदुधर्मानुसार त्यांचा जो विश्वास आहे, त्यामुळेंदेखील त्यांच्या व्यावहारिक शिकवणुकींत अशी कोणतीहि गोष्ट उत्पन्न झालेली नाहीं, कीं जिला ख्रिस्तधर्मीयांनीं विरोध दर्शवावा. ईश्वराला व्यक्ति असें मानून त्याच्याशीं क्रोध अथवा दंडनाची इच्छा यांचें साहचर्य जोडण्याचा प्रयत्न केल्याचें उदाहरण मला गांधींच्या लेखनांत कोठेंहि आढळलेलें नाहीं. द्रव्यलोभ, गर्व व स्वार्थ यांच्यामुळें आपणांवर शिक्षा व संहार हीं संकटें कोसळतात. "ईश्वर म्हणजे प्रेम," "ईश्वर म्हणजे मूर्तिमंत सहिष्णुता," "जगाला ज्ञात असणाऱ्या लोकसत्तावाद्यांचा ईश्वर हा अग्रणी आहे," असें गांधीजी म्हणत असतात. पापकृत्यांच्या परिणामाचा आविष्कार म्हणजे कर्म हा जो अर्थ गांधींनीं बसवला आहे त्याचे बोहमी, लॉ व कांहीं आधुनिक तत्त्वज्ञानी यांच्या अपौरुषेय, स्वतंत्र अशा ईश्वरी क्रोधाच्या तत्त्वाशीं बरेंचसें साम्य आहे. शिवाय मानव व ईश्वर यांच्यांत असलेल्या तात्त्विक

एकरूपतेच्या कल्पनेवर गांधींची जी गूढ अशी श्रद्धा आहे, तिच्यामुळें पापाचरणी मनुष्यांचा उद्धार होत जावा, ही गोष्ट अपरिहार्यच ठरतें. "आपणां सर्वांना एकच अंतःकरण आहे...अतएव, अत्यंत पापाचरणी अशा मनुष्यांपासून सुद्धां मला अलग राहतां येणार नाहीं...माझ्या या प्रयोगांत म्हणजे ( सत्याग्रहाच्या चळवळींत ) अखिल मानवजात मला सामील करून घ्यावयास हवी."[१]

उलटपक्षीं, महात्माजींचा संपूर्ण कार्यक्रम म्हणजे उदाहरणार्थ लग्नसंबंधींच्या त्यांच्या कल्पना आणि ज्याला ते स्वदेशी म्हणतात त्या शुद्धीकृत हिंदु राष्ट्रवादाशीं निगडित झालेले कांहीं मुद्दे, माझ्यासारख्या पाश्चात्य देशांतील ख्रिस्त्याला, अहिंसासत्याग्रहाच्या तत्त्वतः ख्रिश्चनधर्मीय व त्याचप्रमाणें हिंदुधर्मीय ध्येयाशीं विसंगत वाटले, तर त्यांत नवल नाहीं. तथापि, आमच्यापैकीं अधिकाधिक लोकांना, व महत्त्वाची गोष्ट म्हणजे हिंदुस्थानांतील ख्रिश्चनचर्चच्या अँग्लो सॅक्सन मिशनऱ्यांना ( त्यांच्याचपैकीं एकाच्या शब्दांत सांगावयाचें तर ) ही गोष्ट स्पष्ट दिसूं लागली कीं, **गांधी व त्यांचे सच्चे अनुयायी सांगतात व आचरतात, तो सत्याग्रहच ख्रिश्चनधर्मांतील मध्यवर्ती तत्त्व आहे.** दुराचरणावर प्रेमानें जय मिळविणें आणि स्वेच्छेनें व सहिष्णुतेनें भोगलेल्या क्लेशांनीं पापवासनांचें पुण्यवासनांत परिवर्तन, हेंच क्रूसाचें अक्षय्य असें तत्त्व आहे.[२]

क्रूसाच्या संदेशाचें, आपल्या प्रभूच्या पापविमोचक व जीवनदायक अशा मृत्यूच्या संदेशाचें मानवसमाजांत जें चिरकालीन महत्त्व आहे, त्याचें प्रगाढ असें आकलन ख्रिस्ताच्या कॅथॉलिक चर्चच्या सदस्यांनीं केलेलें नसून तें एका सनातनी हिंदूनें केलेलें आहे, ही खरोखरीच विलक्षण अशी वस्तुस्थिति पुराणमतवादी ख्रिस्त्यांनीं लक्ष्यांत घ्यावयास हवी. तसेंच, धनतृष्णा, राज्यतृष्णा व युद्धतृष्णा यांच्या मोहाला न जुमानतां हजारों

---

१. १९२४ मध्यें दिल्ली येथें केलेल्या उपवासाच्या प्रसंगींचे गांधींचे शब्द पाहा. 'महात्मा गांधींच्या कल्पना' पृष्ठ ३०६ ( लेखक : सी. एफ्. अँड्र्यूज )

२. 'दि क्रॉस मुव्हज् ईस्ट'—लेखक : जॉन एस्. हॉयलंड

लोकांना या संदेशाच्या उपासनेनें उत्स्फूर्त करण्याची शक्ति असणारा हा एकच पुरुष आहे ही गोष्टसुद्धां त्यांनीं ध्यानांत घ्यावी. महात्माजींच्या ठिकाणीं हिंदुपरंपरेबद्दल जी स्वाभाविक निष्ठा आहे ती नसती, तर येशूच्या केवळ शिकवणुकीचाच नव्हे, तर त्यानें घालून दिलेल्या श्रेष्ठ आदर्शाचा आणि त्यानें रुजवलेल्या स्फूर्तिदायक व अन्तःकरणस्थित अशा भावनेचा उल्लेख, आजच्या 'सत्याग्रहा'च्या तत्त्वज्ञानाचा उगम म्हणून त्यांच्याकडून वारंवार करण्यात आला असता, असें निश्चितपणें वाटतें.

सत्याग्रहाच्या भावनेचा व चळवळीचा मानवी इतिहासावर कोणत्या प्रकारचा परिणाम घडून येण्याचा संभव आहे असा जेव्हां मनाला मी प्रश्न करतों, तेव्हां पुढील गोष्टी मला संभवनीय वाटतात: 'सर्वाधिकारवादी' राष्ट्रांची हिंसा व त्यांचे हिंस्र हेतू दुष्ट आहेत हें तर खरेंच; पण धार्मिक मनोवृत्तीला अत्यंत भयावह वाटणाऱ्या ज्या दोन गोष्टी जागतिक परिस्थितींत दृष्टोत्पत्तीला येत आहेत त्या म्हणजे विचारांच्या बाबतींत अनेक दृष्टींनीं मानवजातीचें नेतृत्व करणारीं जीं प्रबळ नामधारी लोकसत्ताक राष्ट्रें आहेत, तीं आपल्या ताब्यांत पृथ्वीवरचा वस्ती करण्यालायक जो प्रमाणाबाहेर भाग आहे व जीं संपत्तिस्थानें आहेत त्यांची इतर राष्ट्रांबरोबर चोख न्यायबुद्धीनें वांटणी करून घेण्यास तयार नाहींत ही एक; व दुसरी गोष्ट म्हणजे बुभुक्षित अशीं शेजारचीं राष्ट्रें जो वाटा मागत आहेत त्या वाट्यापासून त्यांना दूर ठेवण्यासाठीं असेल नसेल तेवढी शक्ति व संपत्ति खर्च करून कल्पनातीत अशा विध्वंसक व भयानक पद्धतीचें युद्ध सुरू करण्यास आपण सिद्ध आहों असें या प्रबळ राष्ट्रांकडून मोठ्या उच्च स्वरानें घोषित करण्यांत येत आहे. जड संपत्ति व सत्ता यांसाठीं ही जी माथेफिरूपणानें स्पर्धा करण्यांत येत आहे, तिच्या जोडीला वरचष्मा गाजविण्यासाठीं व संहार करण्यासाठीं निसर्गाच्या शक्ती व मानवी संघटना या उभयतांचा उपयोग करून घेण्याच्या बाबतींत मनुष्याच्या बुद्धीचें प्रचंड प्रमाणांत वाढलेलें सामर्थ्य मिळाल्यास थोड्याच कालामध्यें सर्व भूमि कमीजास्त प्रमाणांत क्रूर आणि जडवादी विचार व आचार करणाऱ्या अनेक हुकूमशहांच्या सत्तेखालीं जाईल. मग त्यांचें स्वरूप सोटेशाही शासनसंस्थेसारखें असो,

अथवा अल्पसंख्य शासनसंस्थेसारखें असो. कमजास्त प्रमाणांत लोकसत्तावादी अशा उरलेल्या राष्ट्रांनीं शस्त्रबलानें ह्या हुकूमशहांचा प्रतिकार करण्याचे प्रयत्न केले, तसेंच हुकूमशहांच्या राष्ट्रांत हिंसात्मक क्रांतीचे उठाव झाले, तर त्यायोगें सर्वसामान्यतः दारिद्र्य व छळ, लोभ व भीति यांच्या राजवटीची वाढ मात्र होईल. कारण, आधुनिक युद्धांतील संहारामध्यें लोकसत्ताक राष्ट्रें हीं त्यांच्याहून अधिक कार्यक्षम व नीतिनियमांविषयीं बेपर्वा असणाऱ्या शत्रूंकडून नाश तरी पावतील किंवा लष्करीसंघटनेस्तव आवश्यक झालेल्या आपल्याच सर्वसत्ताधिकारी सरकारांच्या तावडींत आपसुखच सांपडतील.

तदनंतर जगभर साम्राज्यशाही राज्यें निर्माण होतील व तीं अनेक दृष्टींनीं पाखंडवादी व क्रूर अशीं असतील. तथापि, सशस्त्र विरोधाचा धुव्वा उडवल्यानंतर ज्याप्रमाणें रोमन राजवट अधिक हितकारक व निःपक्षपाती बनली, त्याचप्रमाणें अखिल जगावर सत्ता गाजवणाऱ्या हुकूमशाह्या जरी जडवादी व अरेरावी स्वरूपाच्याच राहिल्या, तरी त्या कमी जुलूम, जबरदस्तीच्या–इतकेंच नव्हे, तर अधिक क्षेमकारक अशा होत जातील.

असें झालें तरीसुद्धां हुकूमशाहीच्या हातांतील गुलाम अथवा बाहुलीं बनण्यास हजारों–लाखों स्त्रीपुरुषांकडून नकार देण्यांत येऊं लागेल व त्याचें क्षेत्र अधिकाधिक व्यापकच होत जाईल; आणि दारिद्र्य व क्लेश यांनीं विशुद्ध झालेलें ख्रिश्चनचर्च अथवा त्याचे अनेकविध पंथ व त्याचबरोबर शुद्धीकृत अशीं बुद्धधर्मीय, हिंदुधर्मीय, इस्लामधर्मीय व इतर धर्मीय मंडळें परस्परसहकार्याच्या जीवनाकडे अधिकाधिक आकर्षिलीं जाऊन आलटून पालटून पीडा व सहिष्णुता यांनीं युक्त असें जीवन व्यतीत करूं लागतील. ( ख्रिस्तधर्मीय असल्यामुळें अखेरीस जगावर कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपामध्यें ख्रिस्तधर्माचें अधिराज्य चालेल, अशी श्रद्धा माझ्या ठिकाणीं असणारच; परंतु तो क्षण कित्येक शतकेंपर्यंतहि लांबणीवर पडण्याचा संभव आहे. ) शासनसंस्थेकडून होणारी पीडा व जनतेकडून होणारे हिंसामय हल्ले यापासून आपला बचाव करण्याचीं या भिन्न मतवादी मंडळाचीं साधनें, अधिकाधिक शिस्तबद्ध, शुद्ध व व्यापक अशा अहिंसासत्याग्रहाच्या स्वरूपाचीं होत जातील हें निश्चित. हा अहिंसासत्याग्रह म्हणजे आपल्या

या युगांत महात्मा गांधींनीं जे प्रयोग चालविलेले आहेत त्यांचेंच प्रभावी असें फल होय. म्हणून त्याच्याकडे व त्यांच्या पूर्वींचे जे टॉल्स्टॉय त्यांच्याहिकडे नवीन युगाचे प्रवर्तक म्हणून जनता पाहत जाईल. कांहीं कालपर्यंत जगांतील हुकूमशहा, बाहेर शत्रू न उरल्यामुळें आणि जनतेच्या मनाला व विशेषतः उगवत्या पिढीच्या मनाला अभिप्रेत वळण देण्याचें अत्यंत कावेबाज असें कृष्णतंत्र हातांशीं असल्यामुळें, कायमचे अजिंक्य ठरले असा भास होईल. परंतु मानवातील दैवी स्फुलिंगाला फार काळपर्यंत अशा रीतीनें कोंडून ठेवणें शक्य होणार नाहीं. शिवाय सत्ताधीशांची शक्ति आंतून हळुहळू पोखरली जाईल. प्रथम हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, स्वतःचा नाश करण्याची एक अपरिहार्य व वर्धिष्णु वृत्ति पापांमध्यें असतेच; आणि सदिच्छायुक्त लोकांनीं दिशाभूल होऊन अथवा उतावळेपणानें केलेल्या हिंसेनें त्याचें आसन डळमळलें नाहीं, तर ही वृत्ति अधिकच बळावत जाते. म्हणून सत्ताधिकाऱ्यांच्या परस्परविरोधी गटांमध्यें अन्तःकलह व यादव्या सुरू होतील. आणि सत्याग्रही–असहकाराची भावना प्रसृत झाली असल्याकारणानें या संग्रामामध्यें जसजसा काल लोटत जाईल तसतशीं पृथ्वीच्या पाठीवर पसरलेल्या जनतेंतून मिळणारीं साधनें व साहाय्यक एकसारखे घटत जात आहेत असें युध्यमान राष्ट्रांच्या अनुभवास येऊं लागेल. पुढें असा एक काळ येईल, कीं ज्या वेळीं हिंसा, असत्य व लोभ यांची सक्तीचीं साधनें बनण्यापेक्षां आत्यंतिक क्लेश भोगण्याला लक्षावधि स्त्रिया व पुरुष सिद्ध होतील.

दुसरी गोष्ट अशी कीं, सत्याग्रही–वसाहतींमधून फैलावत जाणारा सदिच्छेचा सूक्ष्म असा प्रभाव क्रमशः सत्ताधारी व त्याचे साहाय्यक यांच्याहि ठिकाणीं प्रवेश करील, अशी आशा बाळगण्यास भरभक्कम जागा आहे. या प्रभावाची निर्मिती केवळ दयावृत्तींतून होणार नसून प्रभु व नेता म्हणून ख्रिस्ताच्या, बुद्धाच्या व कृष्णाच्या रूपानें अवतीर्ण झालेल्या प्रेममय ईश्वराच्या ठिकाणची जी श्रद्धा, तिच्या योगानें तो अखंड उत्स्फूर्त होत राहील. शाश्वत, सत्य स्वरूपी, प्रेम-भावनामय, अंन्तर्बाह्य व्यापून टाकणाऱ्या मोक्षानंदाप्रमाणेंच त्या प्रभावाचें स्वरूप असेल. येणेंप्रमाणें सत्ताधारीसुद्धां हळुहळू सौम्य व सुबुद्ध होत जातील आणि शासनसंस्थेला

सत्याग्रही कसे उपयुक्त आहेत याची खात्री पटून ते सत्याग्रही मंडळींना अधिक क्रियास्वातंत्र्य व अधिक स्वयंशासनाधिकार देऊं लागतील. या स्वातंत्र्यामुळें धार्मिक संस्थांना आर्थिक क्षेत्रांमध्यें निर्वाहक्षम होऊन नीतिहीन बनवणाऱ्या यंत्रशक्तीच्या कचाट्यांतून मुक्त होतां येईल. मानवाच्या संपूर्ण विकासाला व पशूंच्या व इतर नीच कोटींतल्या जीवजाताच्या योगक्षेमाला व सौंदर्याला बाधक ठरणार नाहींत अशींच यंत्रें चालू ठेवण्यांत येतील. सत्याग्रही–वसाहतीकडेच मतपरिवर्तन झालेल्या लोकांचा लोंढा वाहूं लागेल आणि अखेरीस मोठमोठ्या साम्राज्यांतील बहुसंख्य समाजांना क्रमशः सत्याग्रहाची किंमत समजून येऊन शासनसंस्थेच्या व्यवहारांतील एक प्रधानसूत्र म्हणून त्याचा स्वीकार करण्यांत येईल. दुराराध्य व वेडसर लोकांचे लहानसहान गटच तेवढे शिल्लक राहतील. परंतु भावनाविवश होऊन प्रतिकार करण्यास नाकबूल असणाऱ्या व अखंड सहिष्णुतेनें त्यांच्याशीं वागणाऱ्या समाजामध्यें अधिकारमदानें व वैषयिक सुखानें युक्त अशा जीवनांत आनंद मानण्याचा त्यांनाहि कांहीं काळानें वीट येईल; आणि मग, “ विनयसंपन्न लोक ( म्हणजेच सौम्य अथवा अहिंसात्मक लोक ) धन्य होत, कारण तेच जगाचे स्वामी होणार आहेत, ” असें जें द्रष्ट्यानें म्हणून ठेवलें आहे तें सफल ठरेल. येथें कल्पना कुंठित होते. हें एक ध्येयचित्र आहे–पाहिजे तर असें म्हणा कीं, निकट दृष्टीनें पाहिल्यास त्याबद्दल निराशा वाटते, दूरदृष्टीनें पाहिल्यास तें फाजील आशादायी वाटतें. कांहींहि असो; अत्युत्तम व अतिहीन अशा दोन्हीहि गोष्टींकडे निर्भयचित्तानें दृष्टि टाकणें उपयुक्त ठरत असतें. खरोखर ईश्वरेच्छा अशीहि असेल, कीं मध्येंच एकादा कल्पांत उद्भवून त्यांत अवशिष्ट मानवजात सर्व बाजूंनीं गुरफटून जावी. ईश्वरेच्छा अशी नसेल आणि या पृथ्वीच्या पाठीवरच केव्हां ना केव्हां तरी आम्हांला न्यायाचें व शांततेचें राज्य प्रस्थापित करतां यावें अशी भवितव्यता असेल, तरीहि आमच्या मार्गामध्यें अनेक वेळां अडथळे उत्पन्न होत जातील; कारण ईश्वरीयंत्र अत्यंत मंदगतीनें फिरत असतें आणि असंस्कृत असा मानवी स्वभाव अतिशय हटवादी असतो. परंतु जेव्हां कधींकाळीं परमेश्वराचें राज्य अवतीर्ण होईल तेव्हां मानवामानवांतील ( व गांधी त्याला अशी

पुरती जोडतील कीं, मानव व पशुसृष्टि यांच्यामधीलहि ) कलह व युद्धें यांचें बाह्य व्यापारांतून उच्चाटन झाल्याकारणानें जीवन म्हणजे कंटाळवाण्या एकसारखेपणाचें व रंगहीनपणाचें स्मशान बनेल अशी शंका कोणीहि मनांत बाळगूं नये. आत्मानुभवाच्या रोमहर्षण अशा अखंड यात्रेसाठीं ईश्वरी सृष्टींतल्या असंख्य गूढांच्या संशोधनासाठीं, उदयोन्मुख अशा हिंदुस्थानांतील जनतेमध्यें अद्यापि अविकसित व प्रायोगिक अवस्थेमध्यें असणारी जी प्रेममय कार्याची भावना दृष्टोत्पत्तीस येत आहे, तिच्यायोगानें सृष्टींतील अनेक राज्यविस्तार अंकित करून सोडण्याकरतां अपार असें क्षेत्र सदैव मोकळेंच राहील इतकी संपन्नता व सृजनक्षमता या चिरतत्त्वाच्या ठायीं आहे, असा विश्वास आपण बाळगण्यास हरकत नाहीं.

भविष्यकाळ हा क्लेशानें व अंधारानें व्याप्त असण्याचा संभव आहे; तसा तो तेजोमय व आनंदमय असाहि असूं शकेल. सुमारें चाळीस वर्षांपूर्वी लिओ टॉल्स्टॉयच्या स्फूर्तिदायक शब्दांनीं प्रस्तुत लेखकाच्या डोळ्यांवरची झांपड उडाली ही गोष्ट कृतज्ञतापूर्वक नमूद केली पाहिजे; त्यामुळें लेखकानें स्वेच्छेया स्वीकारलेलें दारिद्र्य व युद्धप्रतिकार या बाबतींत लहानसान प्रयत्न केले व त्यांचा परिणाम म्हणून बंदिवासाचा दीर्घ अनुभवहि त्याला घ्यावयास मिळाला. तदनंतरच्या काळांत त्याच्या हातून अधिक सुसंगत व सकस प्रयत्न व्हावयास पाहिजे होते, असेंच त्याला मनापासून वाटतें. कसेंहि असो, त्या थोर रशियन पुरुषाचें पद आज ज्याला प्राप्त झालें आहे, त्या हिंदी द्रष्ट्याला स्तुतिसुमनांजलि वाहण्याची परवानगी त्याला मिळाली याबद्दल तो कृतज्ञच आहे.

An aged man is but a paltry thing
A tattered coat upon a stick, unless
Soul clap its hands and sing, and louder sing
For every tatter in its mortal dress.

आपल्याला नुकत्याच सोडून गेलेल्या एका थोर अध्यात्मवादी कवीनें वरील चरण लिहिले आहेत. आणि ज्याप्रमाणें वृद्ध यीट्सला सार्थपणानें "माझी गानदेवता अद्यापि यौवनसंपन्न आहे," असें म्हणता आलें,

१०

त्याचप्रमाणें श्रमलेल्या व वृद्ध अशा मोहनदास गांधींच्या तोंडून उमटणारा आत्मबलाचा संदेश यौवनसंपन्न आहे, विजयसंपन्न आहे, पंचेचाळीस वर्षांपूर्वी त्यांनीं ज्या वेळीं प्रथम आपले "सत्याचे प्रयोग" सुरू केले, त्या वेळच्यापेक्षांहि तो आतां अधिक यौवनसंपन्न आहे असें म्हणतां येईल. कारण, या काळांत हलकेहलके ईश्वराच्या अक्षय्य यौवनाशीं,दैवी संपत्तींतील विनीतभावाच्या ठिकाणीं असणाऱ्या बलाशीं, मानवांना अधिक समृद्ध जीवन प्राप्त करून देण्यासाठीं स्वतः मृत्यूच्या स्वाधीन होणाऱ्या दैवी जीवनाशीं, ते अधिकाधिक प्रमाणांत सायुज्यता पावत चाललेले नाहींत काय? ख्रिस्तधर्मी म्हणून किंवा सामाजिक तत्त्वज्ञ म्हणून त्यांच्या ध्येयाच्या सुस्पष्टतेला मर्यादा आहेत असें आपणांस वाटणें शक्य आहे. तथापि, गांधींचा आत्मा श्रेष्ठ आहे. आजच्या घटकेचे ते महात्मे आहेत. उद्धारित मानवतेचें, पुनरुज्जीवित समाजाचें, आपलें कर्तव्य पार पाडण्यास आपण तयार असलों तर ज्या नवयुगाच्या प्रसववेदना सध्यां चालू आहेत, पण जें अद्यापि जन्म पावलेलें नाहीं अशा युगाचे वीर्यवान् असे ते द्रष्टे आहेत. येशू ख्रिस्ताच्या कृपाछत्राखालीं असलेले आम्ही त्यांना व सर्व सच्चा सत्याग्रहींना एकाच पंथांतील सोबती म्हणून, ईश्वराच्या अक्षय्य नगरींतील, आमच्या आदर्शभूत नगरींतील नागरिक बांधव म्हणून आदरपूर्वक प्रणाम करीत आहोंत.

---

# गांधींचा सत्याग्रह व क्रूसाचा मार्ग


## लेखक : जॉन एस्. हॉयलंड

(वुडब्रुक सेटलमेंट, सेलिओक, बर्मिंगहॅम)


१९३८ च्या हेमंत ऋतूंत मद्रास येथें, ख्रिस्ताच्या संदेशाच्या अनुरोधानें आधुनिक जगांतील समस्यांविषयीं विचार करण्याकरतां, जगांतल्या

सर्व प्रदेशांतल्या पण विशेषेंकरून आफ्रिकेंतील व पूर्व देशांतील नवप्रस्थापित चर्चमधून आलेल्या, खिश्चनश्रेष्ठींची एक परिषद भरवण्यांत आली होती. मद्रास परिषदेच्या बैठकीपूर्वी एक अद्वितीय प्रसंग घडून आला. या विख्यात खिश्चनश्रेष्ठींपैकीं बरेचजण, लांबच्या प्रवासाची दगदग सोसून एका हिंदु पुढाऱ्याच्या, श्री. गांधींच्या चरणाजवळ बसण्याकरतां गेले. धर्मसंस्थेच्या धनसंपन्न व प्रतिष्ठासंपन्न अशा अनुयायीवर्गांत ज्यांची कीर्ति त्रिखंड झालेली आहे असे ते लोक होते. खिस्ताचें अनुयायित्व अधिक चांगल्या प्रकारें कसें करावें या बाबतींत गांधींचा सल्ला घ्यावा हा त्यांचा उद्योग होता. भूतकाळांत भरत आलेल्या जागतिक खिश्चन-धर्म-मंडळाच्या परिषद्‌मालिकेंत धर्मश्रेष्ठींनीं अशा प्रकारची गोष्ट कदापि केली नसेल असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. याच खेपेला अशी गोष्ट त्यांनीं केली; यावरून खिश्चनधर्म बहुतांशीं आधुनिक यंत्रव्यवसाय व साम्राज्यशाही यांशीं संगनमत केल्याकारणानें गैरमार्गाला लागल्याबद्दलची खात्री किती विस्तृत व गाढ प्रमाणावर झाली आहे तें सिद्ध झालें, ही पहिली गोष्ट. आणि खिस्ताच्या उपदेशाचें इंगित हुडकून काढण्यांत व त्याच्या मार्गाचें आचरण करण्यांत हिंदुस्थानांतला हा महर्षि आपणां स्वत:पेक्षां अधिक पात्र ठरला असल्याचा विश्वास किती दृढ झाला आहे तेंहि प्रत्ययास आलें, ही दुसरी गोष्ट.

या खिश्चनश्रेष्ठींच्या बरोबर श्री. गांधींचीं जीं अत्यंत महत्त्वपूर्ण संभाषणें झालीं त्यांत पैशाचा प्रश्न त्यांनीं प्रथम विचारांत घेतला. आपला सिद्धांत त्यांनीं थोडक्यांत पुढीलप्रमाणें मांडला: “देवाची आणि द्रव्याची उपासना तुम्हांला एकाच वेळीं करतां येणार नाहीं असें मला वाटतें. मला शंका येते ती अशी कीं, हिंदुस्थानची सेवा करण्यासाठीं धन पुढें आलें असून देव मागेंच राहिला आहे. त्याचा परिणाम असा होईल कीं, केव्हां तरी देव याबद्दल बघून घेईल...कोणत्याहि धर्मसंघटनेपाशीं आवश्यकतेपेक्षां अधिक पैसा सांठला, कीं तिची देवावरील श्रद्धा उडून धनावर श्रद्धा बसत जाण्याचा धोका उत्पन्न होतो असें मला सदैव वाटत असतें. पैशावर अवलंबून राहण्याचें अजिबात सोडून दिलें पाहिजे.

" दक्षिण आफ्रिकेंतल्या सत्याग्रहयात्रेला मीं प्रारंभ केला, तेव्हां माझ्या खिशांत तांबडी दमडीदेखील नव्हती. मनाला अगदीं हलकेंफूल वाटत होतें. मला बरोबरच्या दोनहजार लोकांची व्यवस्था ठेवावी लागे. मीं म्हटलें, ' चिंता नाहीं, ईश्वराची इच्छा असेल तर तो सर्व चालवील. ' नंतर हिंदुस्थानांतून पैशांचा पाऊस पडूं लागला. पैसे घेणें मला बंद करावें लागलें. कारण पैसा आला तसा माझ्या यातनांना प्रारंभ झाला ! पूर्वी लोक चतकोर भाकर व चिमूटभर साखर असली कीं समाधान मानीत, ते मग नाहीं नाहीं त्या वस्तू मागू लागले !

" आतां नवीन शैक्षणिक प्रयोगाचें उदाहरण घ्या. मी म्हणे, ' पैशाची मदत मागितल्यावांचून प्रयोग चालू राहिला पाहिजे." नाहीं तर मी मेलों कीं सर्व संघटनेच्याच ठिकऱ्या ठिकऱ्या उडतील. **खरी गोष्ट अशी आहे कीं, आर्थिक सुस्थिति आली रे आली, कीं अध्यात्म लयाला गेलेंच म्हणून समजावें."**

या शेवटच्या वाक्याहून गांधींच्या अध्यात्मवादाचें अधिक वैशिष्ट्य-दर्शक असें दुसरें कांहींहि आढळणार नाहीं. कायमनिधि अथवा हमखास अशी आर्थिक माया असली, कीं जिवंत चळवळींतल्या आध्यात्मिक बलाचा नाश होत जातो असें त्यांनीं वारंवार आग्रहानें प्रतिपादन केलें आहे. सदैव सिद्ध व त्यागी असणारे स्वयंसेवक पैसेखाऊ बनतात, चळवळींतून स्वार्थार्जन करतां यावें म्हणून चळवळींत राहतात. चळवळींमुळें ज्यांना साहाय्य झालें, तिच्यामुळें जे उदात्त बनले ते दळभद्री होतात. ती चळ-वळ आणि तिचा निधि म्हणजे जणुं कांहीं एक पिळून घ्यावयाची गायच. आणि इतरांनीं नव्हे, तर आपणच अधिक खुबीनें व अगदीं निपटून तिची धार काढावयाची असा प्रकार होऊन बसतो. अधोगति आणि लांचलुचपत अपरिहार्य होते. हरएक प्रकारच्या ढोंगीपणाला व खोटेपणाला प्रोत्साहन मिळत जातें.

सांथी, दुष्काळ, व युद्ध यांच्यानंतर संकट-निवारण-निधि वाटण्याचा अनुभव प्रस्तुत लेखकानें देशोदेशीं घेतला असून श्री. गांधींचें म्हणणें सत्य असल्याबद्दल त्याची खात्री झालेली आहे. खरी चैतन्यमय अशी नैतिक चळवळ असेल, तर ती यावच्छक्य निधि जमवण्याचें टाळील व

त्यामुळें ती अत्यंत समर्थ अशी ठरेल. या बाबतींतला श्री. गांधींचा दृष्टिकोण अपरिग्रहाबाबतच्या त्यांच्या सिद्धांतांतून उत्पन्न झालेला आहे. फ्रान्सिस्कनांच्या Proprium चें स्वामित्व भावनेचें दमन करणाऱ्या तत्त्वाशीं या सिद्धांताचें निकट साम्य दाखवतां येईल. श्री. गांधींच्या एका पट्टशिष्यानें त्याचें सार पुढीलप्रमाणें सांगितलें आहे: "ज्या कार्यासाठीं प्राणार्पण करण्यास तुम्ही सिद्ध व्हाल, त्याच्यासाठीं पैका मिळत जाईल. पण पैसा नसला तर तुम्हांला चुकल्यासारखें वाटून उपयोगी नाहीं. कार्य चालू ठेवलेंच पाहिजे. पैसा नसल्यामुळें तें कदाचित् अधिकच चांगल्या प्रकारें चालेल."

श्री. गांधींनीं खिश्चनश्रेष्ठींशीं त्याप्रसंगीं चर्चिलेला आणखी एक निकडीचा प्रश्न म्हणजे "गुंड" राष्ट्रांबरोबर कसें वागावें हा होय. पृथ्वीच्या पाठीवरील अनेक देशींचे लोक आपल्या राष्ट्राचीसुद्धां गुंड राष्ट्रांतच गणना करतात, ही गोष्ट अशा प्रश्नांचा विचार करतांना आपण ब्रिटिश लोकांनीं ध्यानांत धरावी हें बरें. १९१९ सालीं नवीं नऊ संरक्षित राष्ट्रें साम्राज्यास जोडून आपण आपली तुंबडी भरण्याचें कार्य साधलें. तेव्हांपासून आपण बरेच समाधानी व तृप्त झाल्यासारखे वागत असलों, तरी तेवढ्यामुळें आंतरराष्ट्रीय लुटीची उमेद बाळगणाऱ्या होतकरूपेक्षां "गुंड राष्ट्र" ह्या संज्ञेला आम्ही कमी लायक ठरतों, असें ह्या इतर राष्ट्रांना वाटत नाहीं. **या आंतरराष्ट्रीय गुंडगिरीच्या बाबतींत आपली सदसद्विवेकबुद्धि निकोप बनून जसजशी चिंतनशील बनत जाईल, तसतशी या आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत केवळ जर्मनी, इटली व जपानकडून घालण्यांत येणाऱ्या धांगडधिंग्याचीच तेवढी आपण चिंता करीत बसणार नाहीं, अशी अपेक्षा ब्रिटिश साम्राज्याच्या अंकित होण्याची आपत्ति ज्यांच्या वाट्यास आली आहे, ते फार उत्कंठेनें करीत आहेत.**

अहिंसेवर ज्यांचा विश्वास असेल व ज्यांनीं तिचें अल्पस्वल्प आचरण केलेलें असेल, त्यांनीं आधुनिक आंतरराष्ट्रीय गुंडगिरीच्या या अत्यंत तापदायक व भयावह अशा प्रकाराशींदेखील अहिंसेच्या मार्गानेंच सामना करणें आवश्यक आहे, ही गोष्ट ओळखली पाहिजे हें श्री. गांधींनीं बजावून

सांगितलें. ते म्हणाले, " हिंसाशक्ति कितीहि न्याय्य रीतीनें वापरली, तरी हिटलरच्या व मुसोलिनीच्या हिंसाशक्तीप्रमाणेंच तीहि अखेरीस आपणांला नरकांत ढकणार. अहिंसाचरण हें कांहीं काळ गाढवापुढें गीता पठण केल्याप्रमाणें वाटलें तरी गुंडांच्यासुद्धां अंतःकरणाला आपण पाझर फोडूं याविषयीं आपण निराश होतां कामा नये."

दुष्कृत्याचा प्रतिकार करणाऱ्या अहिंसेला पात्र असें जीवन बनवितांना जो निर्णायक ठरण्याचा संभव आहे, अशा शीलविधायी अनुभवासंबंधीं नंतर थोड्या वेळानें चर्चा झाली. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकांतल्या, गांधी दक्षिण आफ्रिकेंत येऊन दाखल झाल्यानंतर सात दिवसांनीं त्यांच्यावर गुदरलेल्या एका प्रसंगाचा अनुभव श्री. गांधींनीं निवेदन केला. *

---

* गांधींच्याच शब्दांत ती हकिकत पुढीलप्रमाणें आहेः—

" दक्षिण आफ्रिकेंत आल्यानंतर सात दिवसांनीं तो प्रसंग माझ्यावर गुदरला. आफ्रिकेंत मी केवळ ऐहिकासाठीं, स्वार्थासाठीं गेलों होतों. इंग्लंडमधून परतलेला मी एक तरणाबांड होतों. थोडाफार पैसा मिळवण्याची इच्छा होती. ज्या अशिलानें मला दक्षिण आफ्रिकेंत नेलें होतें, त्यानें मला एकाएकीं दरबानहून प्रिटोरियाला जाण्यास सांगितलें. प्रवास कांहीं सोयीचा नव्हता. चार्ल्स टाउनपर्यंत रेल्वे व तेथून जोहान्सबर्गपर्यंत गाडी. रेल्वेचें पहिल्या वर्गाचें तिकिट मजपाशीं होतें. पण आंथरुणाचें तिकीट मात्र नव्हतें. मारित्सबर्गला आंथरुणें देण्यांत आलीं, तेव्हां गार्ड आला व त्यानें मला बाहेर काढलें. साध्या डब्यांत जाण्याविषयीं त्यानें मला सांगितलें. मीं नकार दिला आणि मला थंडींत कुडकुडत ठेवून गाडी निघून गेली. शीलविधायी अनुभवाचा प्रसंग हा असा आला. मला जीवाची भीति वाटत होती. अंधाऱ्या वेटिंगरूममध्यें मीं पाऊल टाकलें. खोलींत एक गोरा माणूस होता त्याचीहि मला भीति वाटत होती. या वेळीं माझा धर्म कोणता असा मीं स्वतःलाच प्रश्न केला. हिंदुस्थानाला परत जावें कीं ईश्वराला आधार मानून पुढें पाऊल घालावें आणि जें काय नशिबीं असेल त्याला सामोरें जावें ? राहण्याचा व कष्ट सोसण्याचा मीं निश्चय केला. माझ्या सक्रिय अहिंसेला त्या दिवसापासून सुरवात झाली. "

या प्रसंगामुळें श्री. गांधींच्या कर्तृत्वांतील दोन मूलगामी गुण व्यक्त होतात. पैकीं भीतीवर त्यांनीं मिळविलेला विजय हा पहिला गुण. पाश्चात्य देशांमध्यें सामान्यतः एकरंगी समाजांत रहाणाऱ्यांना सर्वसामान्य हिंदी मनुष्याला गोऱ्या माणसाची किती भीति वाटते— किंवा वाटत होती— त्याची नीटशी कल्पना कदाचित् येत नसेल. निराळ्याच जगांतून आलेला, पंचमहाभूतांवर जवळजवळ अतिमानुषी प्रभुत्व प्राप्त झालेला हा माणूस आहे अशी हिंदी शेतकऱ्यांची भावना होई. जिला कैक वेळीं लाचारीचें स्वरूप येईल अशा आदरयुक्त भीतीनें ज्याच्याकडे पाहावें, ज्याच्यासमोर उभे राहिलें असतां अंगाचा थरकांप उडावा आणि ज्याचा शब्द अक्षरशः पाळण्यांत यावा, असा हा माणूस आहे असें त्यांना वाटे. गोऱ्या माणसासमोर उभें राहिलें कीं उत्पन्न होणारा हा भयाचा गंड नष्ट कसा करावा तें श्री. गांधींनीं आपल्या देशबांधवांना शिकविलें, ही त्यांनीं देशाला दिलेली मोठ्यांत मोठी देणगी असें म्हणतात तें योग्य आहे. ताठ उभें रांहून निर्भय चित्तानें गोऱ्या माणसाच्या डोळयास डोळा कसा भिडवावा आणि त्याचे हुकूम देशाला हानिकारक आहेत असें वाटल्यास ते बुद्धिपुरःसर कसे मोडावेत तें त्यांनीं हिंदी लोकांना, विशेषतः हिंदी शेतकऱ्याला शिकविलें. भीति ही संसर्गजन्य आहे. पण निर्भयताहि तशीच संसर्गजन्य आहे. श्री. गांधींच्या ठिकाणीं निर्भयता असून ती इतरांत पराकाष्ठेनें प्रसृत करण्याचा गुण त्यांच्यापाशीं आहे. जिल्ह्यांतील नोकरशाही स्वतःविरुद्ध कोणतीहि उपाययोजना करो, त्याची पर्वा न करतां अन्याय्य महसूल देण्यास नाकारण्याचें धैर्य त्यांनीं हिंदी शेतकऱ्यांच्या अंगीं बाणवलें आहे. हिंदुस्थानची ज्यांना माहिती आहे, त्यांना ही एकच गोष्ट म्हणजे त्यांच्या अंगीं असलेल्या भयदमनाच्या अनन्यसाधारण शक्तीचा भरपूर पुरावा होय असें वाटेल.

इतरांच्या उद्धारासाठीं आत्मक्लेशाचा विधायक उपयोग करतां येतो ही जी श्रद्धा श्री. गांधींनीं आजन्म बाळगली आहे, ती मारित्सबर्गच्या स्टेशनावर घडलेल्या तारुण्यांतील प्रसंगामुळें स्पष्ट होते. आगगाडींतून हकालपट्टी झाली अथवा गाडीवानानें हल्ला केला या गोष्टी क्षुल्लकशा वाटतील. पण ती अप्रतिष्ठा व तें दुःख एका कातर व भावनाशील तरुणानें इतरांच्यासाठीं धैर्यानें सहन केलें होतें. " क्लेशमय परिस्थितीपासून पळून

दूर जाऊं नको. साहसानें नव्हे, वैतागानें अथवा आत्मबलिदानाच्या बुद्धीनें नव्हे, तर धैर्यानें त्यांत उडी घे. कारण, दुसऱ्यांना साहाय्य करण्याच्या योग्य भावनेनें तूं ते क्लेश सहन केलेस, तर दुष्ट कृत्याच्या निरसनाचें कार्य त्या क्लेशांनीं साधतां येतें, " असा बोध करणारा श्री. गांधींचा जो ध्येयवाद तो या प्रसंगीं जन्मास आला; केवळ सिद्धान्त म्हणून नव्हे, तर आचार म्हणून जन्मास आला. आपल्या देशाला अधिक चांगलें भवितव्य प्राप्त व्हावें म्हणून पुढें तीस वर्षांनंतर दोन लक्ष पन्नास हजार हिंदी लोक आनंदोत्साहानें तुरुंगांत गेले. नाताळमध्यें या तरुणानें ज्या धैर्यानें तो कटु अनुभव सहन केला, तें धैर्य त्याला एक प्रकारें कारणीभूत आहे. असा एकहि क्लेशाचा अथवा मानखंडनेचा अनुभव आढळणार नाहीं, कीं जो योग्य भावनेनें अंगीकारला असतां दुसऱ्यांच्या कल्याणासाठीं उपयुक्त ठरणार नाहीं. कारण, सत्याग्रह म्हणजे स्वदेशी, स्वातंत्र्य व एकजूट प्राप्त करून घेण्याचें अथवा लष्करशाही व युद्धें यांवर मात करण्याचें अथवा दुष्ट अशी सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था सुधारून घेण्याचें केवळ चमत्कृतिमय साधन नव्हे; तो याहून अधिक मूलगामी आहे. सेंट पॉलप्रमाणें 'I fill up the sufferings of Christ' असें म्हणणारें अक्षय्य अशा क्रूसाचें तत्त्व त्याच्या ठायीं आहे. सत्याग्रहाच्या खऱ्या अर्थातला यत्किंचितहि भाग ज्याला समजला तो माणूस इतिहासाच्या प्रदीर्घ मार्गाचें जेव्हां सिंहावलोकन करतो, तेव्हां मानवजातीच्या मंदगतीनें चाललेल्या उत्क्रांतिपथावर सगळीकडे त्याला असें दिसून येतें कीं, या जगांत टिकून राहण्याचें भाग्य ज्या जातीला प्राप्त झालेलें आहे, तिची प्रगति अनेक व्यक्तींच्या त्यागानें व क्लेशानेंच संपादित झालेली आहे. वात्सल्यासारखें किंवा नतरच्या काळांतील सामाजिक सहकारितेसारखें एकादें थोर तत्त्व प्रथम मंद व जुजबी स्वरूपांत, व नंतर मोठ्या निर्णायक स्वरूपांत कार्यप्रवण झालेलें त्याला दिसून येतें. इतरांच्या, मुलाबाळांच्या अथवा तदनंतरच्या काळांत ज्ञातिबांधवांच्या कल्याणासाठीं व्यक्तीनें केलेल्या स्वार्थदमनामुळें, तिनें सोसलेल्या क्लेशांमुळें व केलेल्या बलिदानामुळेंच तें तत्त्व कार्यक्षम झाल्याचें त्यास आढळून येतें. मानवी इतिहासाकडे तो जेव्हां पाहतो तेव्हां शतकानुशतकांच्या ठायीं हेंच तत्त्व अधिकाधिक सुस्पष्ट होत गेल्याचें

त्याला दिसून येतें. इतिहासाचें व प्रगतीचें सगळें इंगित ख्रिस्ताच्या क्रूसामध्यें सांठवलेलें आहे.

इतरांच्या कल्याणासाठीं स्वेच्छेनें व अहिंसेनें क्लेश भोगण्यास जींत तयार व्हावें लागतें अशी चळवळ आपल्या देशबांधवांकडून करवून घेऊन स्वार्थपरायण, सुखासीन व नफेबाज पाश्चात्य संस्कृतीनें जें अक्षरतत्त्व लुप्त-प्राय केलें होतें तें पुन्हां जनतेसमोर मांडण्याची युक्ति श्री. गांधींनीं काढली. यांत्रिक क्रान्तीला धडाक्यानें प्रारंभ झाल्यापासून गेल्या दीडशें वर्षांच्या काळांत ख्रिश्चन धर्मांतल्या पाएटिकपंथानें क्रूसाचें माहात्म्य-वर्णन मोठ्या प्रमाणावर केलेलें आहे. पण सर्वव्यापी अशा स्पर्धायुक्त स्वार्थाच्या घोडदौडीमुळें क्रूस हा वास्तविक रीत्या मागें पडला असून त्याला कर्मठपणाचें वा व्यक्तिगत मोक्षसाधनाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. आपल्या पिढीपुढील कर्तव्य हें आहे कीं,—आणि तें आपण बजावलें नाहीं, तर सुसंस्कृत मानवांची कदाचित् ही शेवटचीच पिढी ठरेल—क्रूसाची कर्मठ पंथ म्हणून नव्हे, तर दुराचार, युद्ध व हिंसा यांचा संहार करणारें चिरंतन तत्त्व म्हणून, आपण पुनः एकवार प्राणप्रतिष्ठा केली पाहिजे. "आपला क्रूस ( शूल ) आपल्या खांदीं घेऊन माझ्या मागोमाग चल" असें अर्थ-गंभीर वाक्य ख्रिस्त उद्गारला तेव्हां त्याला शब्दशः तोच अर्थ अभिप्रेत होता ही गोष्ट आपण पुनः एकदां समजून घेण्याची आवश्यकता आहे. त्याच्याप्रमाणें आपण स्वेच्छेनें दारिद्र्य, क्लेश, इतकेंच काय, मृत्यूसुद्धां स्वीकारावा असा त्याचा आदेश होता हें आपण पुनः एकवार उमजलें पाहिजे. म्हणजे आपण या गोष्टी उद्धाराच्या हेतूनें करावयास हव्या, पाप व दुराचरण यांपासून मानवांचें रक्षण करण्याकरतां करावयास हव्या; छळ वा दुष्कृत्य करणाऱ्यांविषयीं मन द्वेषरहित ठेवून, जशास तसें या न्यायानें न वागतां, अहिंसावृत्तीनें करावयास हव्या. याहिपेक्षां म्हणजे नम्रतापूर्वक, सहिष्णुतापूर्वक, मित्रभावानें व सदिच्छेनें आपण त्या केल्या पाहिजेत.

ख्रिस्ताचें स्वेच्छया शूल खांद्यावर घेणें हें ईश्वरासंबंधीं त्याला प्राप्त झालेल्या अभिनव ज्ञानावर अवलंबून होतें. आपल्या अनुयायांच्या बाब-तींतहि तसेंच घडावें अशी त्याची इच्छा होती. आजच्या श्री. गांधींच्या संदेशांतसुद्धां त्याच सिद्धांताचा नाद उमटत आहे. आपण ईश्वराविषयीं

पुनः एकवार ज्ञान प्राप्त करून घ्यावयास हवें आहे. स्वतः ईश्वर याच मार्गानें, म्हणजे क्रूसाच्या, अहिंसेच्या मार्गानें कार्य करतो. क्रूसाचा मार्ग म्हणजे बोटांवर मोजण्यासारख्या तारवठलेल्या शांततावादी माथेफिरूंची क्लृप्ति नव्हे. सर्व इतिहासावर, दरएक व्यक्तीच्या जीवनावर क्रूसाचें चिन्ह उमटलेलें आहे. मानवजातीच्या रंगभूमीवर क्रियारूप झालेली ती ईश्वरी इच्छा आहे. दुराचारी मुलगा घरीं परतला असतां त्याची निर्भर्त्सना न करतां स्वागत करणाऱ्या बायबलांतील उधळ्या मुलाच्या बापाप्रमाणें, अथवा एका चुकलेल्या मेंढराच्या शोधासाठीं घराचा व सुरक्षिततेचा त्याग करून त्याला वांचवण्यासाठीं अंधारांत, वादळांत, संकटांत व दऱ्याखोऱ्यांत हिंडणाऱ्या मेंढपाळाप्रमाणें ईश्वर हा सर्वातीत आहे. दुराचरणाच्या प्रतिकाराकरतां अशा प्रकारचें आचरण करावें हीच ईश्वराची इच्छा आहे. तोच ईश्वराचा पथ आहे, तोच ईश्वराचा प्रकृति-धर्म आहे. ईश्वराची तीच मूर्ति आहे. अशा प्रकारचें प्रेम म्हणजेच ईश्वर. ईश्वर म्हणजे यत्नशील, रक्षणशील प्रेम. **आतां हा दुःखमग्न मुक्त व्हावा, मग तो व्हावा, असें होतां होतां दुःखपीडित असें सर्व जगच मुक्त होईपर्यंत स्वेच्छेनें स्वतः यातना, संकटें व मरण सोसण्यास तयार असणारी उद्धारेच्छा म्हणजेच ईश्वर.**

अशा ईश्वरावर आपणांस विसंबावयाचें आहे. मानवजातीच्या माथीं युद्धें, दारिद्र्य इत्यादि अनेक शाप आहेत. ते वेळींच पुसून टाकावयाचे असतील, तर अशाच ईश्वरावर आपण भार टाकला पाहिजे. आपण जागे होऊन आपणांस त्याची ओळख करून घेतली पाहिजे.

अडचणीच्या, संमोहाच्या व किंकर्तव्यतेच्या वेळीं कोणत्या गोष्टीमुळें तुम्हांला पराकाष्ठेचें समाधान लाभलें, असा प्रश्न एका सुप्रसिद्ध ख्रिश्चन पुढाऱ्यानें (डॉ. जॉन आर. मॉट) श्री. गांधींना विचारला होता. त्यांनीं उत्तर दिलें, "ईश्वरावरील जीवंत श्रद्धेमुळें." व्यक्तिगत साक्षात्काराच्या द्वारा किंवा खास भेटीच्या द्वारा ईश्वर मनुष्यापुढें आपलें स्वरूप प्रकट करीत नाहीं, तर कार्यांच्या द्वारा तो प्रकट करीत असतो. या संबंधांत गांधींनीं अस्पृश्यतानिवारणासाठीं केलेल्या तीन आठवड्यांच्या उपवासांत त्यांना आलेल्या अनुभवाची हकिकत सांगितली. ईश्वराच्या इच्छेला आपण

स्वतःला अर्पण केलेलें असेल, तर त्याच्या पद्धतीप्रमाणें तो आपणांला आवश्यक तें मार्गदर्शन स्वतःच करीत जाईल. ख्रिस्ताचे एका वेळचे उद्गार असे आहेत कीं, “ईश्वरेच्छेप्रमाणें वर्तन करणाऱ्याला त्याचा खरा आदेश जाणतां येईल.” आणि सुळीं जाण्याच्या जरा अगोदर आपल्या शिष्यांचे पाय धूत असतां त्यानें सेवेचा व श्रमाचा जो (आतां आठवणींत न राहिलेला) महान् दंडक घालून दिला, त्या वेळीं आपल्या शिष्यांना उद्देशून तो म्हणाला, “म्यां तुमच्या गुरूनें तुमच्याशीं जर अशा प्रकारचें आचरण केलेलें आहे, तर तुम्हींसुद्धां इतरांशीं तसेंच आचरण केलें पाहिजे. तुमच्यापुढें ठेवलेला आदर्श तुम्हांला पटला आणि तुम्हीं त्याप्रमाणें वर्तन केलें, तर तुम्ही आनंदमय व्हाल.” ख्रिस्ताप्रमाणें आचरण करण्यांतच आपल्या वैयक्तिक आयुष्याचा हेतु आपल्या हातून फलद्रूप होत असतो व त्यायोगेंच विश्वकर्त्याच्या उद्देशांशीं संवादित्व साधलें जातें.

पापावर विजय मिळविण्याचें कार्य जीवनांत खरोखरी करावयाचें असेल, तर बरेंचसें मौन राखण्याच्या आवश्यकतेवरहि श्री. गांधींनी भर दिला. त्यांचें म्हणणें पुढीलप्रमाणें होतें : “हल्लीं सदासर्वदा माझें मौनच असतें असें म्हणतां येईल. नुकतेंच मीं जवळजवळ दोन महिनेपर्यंत मौन ठेवलें होतें आणि त्या मौनाचा परिणाम अद्यापि नाहींसा झालेला नाहीं... सध्यां दररोज संध्याकाळीं प्रार्थनेच्या वेळीं मी मौन धारण करतों व भेटीस आलेल्यांच्यासाठीं तें दोन वाजतां सोडतों. आज तुम्ही भेटीस आलांत त्या वेळींच मीं तें सोडलें. माझ्या शरीराच्या व आत्म्याच्या दृष्टीनें तें आवश्यक होऊन बसलें आहे. सुरवातीला कामाचा ताण कमी वाटावा म्हणून मौनाला सुरवात केली. नंतर लेखनाला वेळ व्हावा म्हणून केली. परंतु कांहीं काळ मौन धारण केल्यानंतर मला त्याचें आध्यात्मिक मूल्य कळून आलें. माझ्या मनांत एकदम विचार चमकून गेला कीं, मौनाच्या काळांतच मला ईश्वराची उत्कृष्ट उपासना करतां येते. आणि आतां तर मौन हा माझा स्वभावधर्मच आहे असें मला वाटूं लागलें आहे.”

श्री. गांधींच्या ठिकाणीं वास करीत असणाऱ्या सत्कार्यरत सामर्थ्याला आधारभूत असें जें दृढमूल आध्यात्मिक अधिष्ठान आहे, तें वरील शब्दांपेक्षां दुसऱ्या कशानेंहि अधिक स्पष्ट होऊं शकणार नाहीं. ईश्वरोपासनेचा

हा जो निवांत काळ त्या काळांतच, त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या व त्यांचें अनुयायित्व पत्करणाऱ्या मंडळींवर त्यांची जी असामान्य सत्ता चालते, तिला कारणीभूत असलेलें द्रष्टेपण त्यांना प्राप्त होत असतें.

आपणांला पुन्हां एकवार युद्धांत खेंचून तज्जन्य द्वेषाच्या व हिंसेच्या खाईत लोटण्याच्या बेतांत असणाऱ्या राष्ट्रीय अरिष्टांतून मानवजातीची सोडवणूक कशी करावी या प्रश्नाच्या विविध अंगांची चर्चा श्री. गांधींनीं मद्रासच्या परिषदेस हजर राहिलेल्या दुसऱ्या कांहीं ख्रिश्चन पुढाऱ्यां-बरोबर नंतर एका प्रसंगीं केली. मानवजातीच्या मुळाला 'नाकर्ते-पणाच्या लाचारी'ची जी कीड लागली आहे तिच्यापासून संस्कृतीचा बचाव कसा काय करावा? जगाला ख्रिस्तानें संदेश दिल्याला दोन हजार वर्षें लोटलीं, तरी अद्यापि त्या संदेशाची अंमलबजावणी वा पाठपुरवणी पाश्चात्य संस्कृतीकडून कधींहि झाली नाहीं. त्यामुळें आज आपल्या डोळ्यांदेखत ती शतशः विदीर्ण होत आहे. वर्तमानकाळीं चालू असलेल्या व भविष्यकाळीं होऊं घातलेल्या गोष्टींविषयीं पाश्चात्य राष्ट्रांत सर्वत्र तीव्र असंतोष माजलेला आहे. अशा परिस्थितींत ज्या पुरुषानें आपलें जीवनकार्य ख्रिश्चनधर्मांतील मध्यवर्ती तत्त्वाच्या—म्हणजे स्वेच्छेनें, अप्रतिकारानें, उद्धारेच्छेनें स्वीकारलेल्या क्रूसाच्या—पुनरुज्जीवनासाठीं केलेल्या प्रयत्नांवर उघड उघड आधारल्याचें दिसत आहे आणि ज्याच्या प्रयत्नांच्या योगानें अनेक दृष्टींनीं निष्प्राण बनलेली प्राचीन व्यवहारव्यवस्था पुनरपि चेतना घेऊं लागली आहे, त्याच्या-कडेच ख्रिश्चन पुढाऱ्यांनीं जावें हेंच योग्य होय. ख्रिश्चनेतर वातावरणांत या पुरुषाच्या प्रयत्नामुळें क्रूसाचें तत्त्वज्ञान पुनः एकवार सजीव, कार्योद्युक्त व विजयी झाल्याचें आपल्याला पाहावयास सांपडत आहे.

पाश्चात्य देश औद्योगिक क्रान्तीपासून पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या मोकाट नफेबाजीमुळें निर्ढावून गेले असले, तरी तेथेंसुद्धां क्रूसाचा संदेश पुनरुज्जीवित व कार्यक्षम होईल आणि हें पुनरुज्जीवन वेळींच होऊन समोर उभ्या असलेल्या परस्परसंहाराच्या संकटापासून तो आपलें रक्षण करील, अशी कांहीं आशा उरली नाहीं काय?

भेटीला गेलेल्यांच्यापैकीं एकानें श्री. गांधींना विचारलें, कीं हिंदुस्थानाकरतां आपण जें कार्य केलेंत, त्याची मूळ प्रेरणा कोणती? सामाजिक, राजकीय कीं धार्मिक? त्यांच्या कार्यशाखा या तिन्ही क्षेत्रांवर इतक्या दूरवर पसरल्या आहेत आणि हिंदु समाजाच्या मूळ व्यवस्थेवर व हिंदुस्थानाच्या राजकारणांतील स्थानावर त्यांच्या कार्यांचा इतका दूरगामी परिणाम झालेला आहे, कीं वरील प्रकारचा प्रश्न उद्भवणें साहजिक होतें.

त्यावर श्री. गांधींनीं पुढीलप्रमाणें उत्तर दिलें : "माझी मूळ प्रेरणा धार्मिक होती...सर्व मानवजातीशीं एकरूप झाल्याशिवाय धर्मानुसारी जीवन व्यतीत करणें मला शक्य झालें नसतें. आणि राजकारणांत भाग घेतल्यावांचून मानवजातीशीं एकरूप होणें शक्य नव्हतें. सांप्रत मनुष्याच्या कार्यसोपानाचें स्वरूप अविभाज्य झालेलें आहे. सामाजिक, राजकीय व धार्मिक कार्यांना परस्परांपासून विभक्त ठेवणें आपणांला साधणार नाहीं. मानवी व्यापारांव्यतिरिक्त असा धर्म मी जाणीत नाहीं. सर्व व्यापारांना धर्म हा नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देतो. तो नसेल तर जीवन म्हणजे 'निरर्थक आटापीट व बडबड' ठरेल."

या बाबतींत श्री. गांधींना असा सवाल विचारण्यांत आला कीं, आपण केलेली सेवा ही ध्येयप्रीतीसाठीं केली, कीं सेवाविषय असलेल्या जनतेवरील प्रेमासाठीं? "जनतेवरील प्रेमासाठीं," असें त्यांनीं उत्तर खाड्कन् दिलें. जनसेवा न करतां ध्येयसेवा करणें म्हणजे मृतमंडण होय. बालपणींच अस्पृश्यांबद्दल आपणास कशी सहानुभूति वाटूं लागली व त्यांची परिस्थिति सुधारण्याचे आपण काय प्रयत्न केले तें त्यांनीं सांगितलें. त्यांच्या आईनें अस्पृश्य मुलाबरोबर खेळण्यास त्यांना मना केलें होतें. त्यामुळें त्यांच्या मनांत विचार उत्पन्न झाले "व त्या दिवसापासून माझ्या बंडाला प्रारंभ झाला."

अहिंसेसंबंधींचें आपलें म्हणणें अधिक सविस्तर सांगा अशी त्यांना विनंति करण्यांत आली आणि पाश्चात्य देशांत तिचा अंगीकार विस्तृतप्रमाणावर अथवा परिणामकारक तऱ्हेनें होणार नाहीं असें प्रतिपादण्यांत

आलें. तेव्हां ते उद्गारले, "माझ्या मतें अहिंसा म्हणजे कोणत्याहि स्वरूपाची निष्क्रियता नव्हे. माझ्या समजुतीप्रमाणें अहिंसा ही जगांतील अत्यंत कार्योद्युक्त शक्ति आहे...अहिंसा हा परमधर्म आहे. माझ्या पन्नास वर्षांच्या अनुभवांत मला अशी परिस्थिति कधीं प्राप्त झाली नाहीं, कीं ज्या वेळीं मी हताश झालों होतों अथवा अहिंसेच्या दृष्टीनें माझ्यापाशीं उपाय शिल्लक राहिला नव्हता.

"मीं ज्यासंबंधीं लिहिलें आहे तो ज्यू लोकांचा प्रश्न घ्या. अहिंसेच्या मार्गाचा स्वीकार केला तर कोणत्याहि ज्यू माणसाला असहाय वाटण्याचें कारण नाहीं. ज्यू हे हिंसामार्गी आहेत असें गृहीत धरून लिहिल्याबद्दल एका मित्रानें आक्षेप घेणारें एक पत्र मला लिहिलें आहे. व्यक्तिगत आचरणांत ज्यू हे हिंसामार्गी नव्हते हें खरें...पण सक्रिय अहिंसेचें आचरण त्यांच्याकडून झालेलें नाहीं. तसें नसतें, तर हुकुमशहांच्या दुष्कृत्यांना न जुमानतां ते म्हणाले असते, 'त्यांनीं केलेला छळ आम्ही सहन करूं. छळाव्यतिरिक्त दुसरी कांहीं गोष्ट ते जाणीतच नाहींत. पण आम्ही ज्या रीतीनें छळ सोसावा अशी त्यांची मनीषा आहे त्या रीतीनें आम्ही तो सोसणार नाहीं.' केवळ एकाद्या ज्यूनेंहि असें आचरण ठेवलें असतें, तरी त्यानें आपला स्वाभिमान जतन करून एक उदाहरण घालून दिलें असतें; आणि तें उदाहरण जर पसरत गेलें असतें, तर त्यामुळें सर्व ज्यू जात बचावली असती व मानवजातीला एक मूल्यवान् वारसा ठेवल्याप्रमाणें झालें असतें, तें निराळेंच.

"तुम्ही म्हणाल, चीनचें काय? चिनी लोकांनीं इतर राष्ट्रांचा लोभ धरलेला नाहीं. प्रदेश जिंकण्याची त्यांची इच्छा नाहीं. खरें आहे. पण कदाचित् अशा चढाईची चीनची अद्यापि तयारी झालेली नसेल. कदाचित् आपणांस जो चीनचा शांततवाद म्हणून दिसतो, तो त्याच्या अंगचा ऐदीपणाहि असेल. कांहींहि असो. चीनची अहिंसा ही सक्रिय अहिंसा नव्हे. जपानचा त्यांनीं जो हिमतीनें प्रतिकार चालवला आहे त्यावरून चीन बुद्धिपुरःसर कधींहि अहिंसावादी नव्हता ही गोष्ट पूर्णपणें सिद्ध होते. तो बचावासाठीं लढत आहे, हें अहिंसेच्या दृष्टीनें योग्य उत्तर होत नाहीं.

म्हणजे सक्रिय अहिंसेच्या कसोटीची वेळ आली तेव्हां तो कसोटीस उतरला नाहीं. ही चीनवर टीका नव्हे. चीन विजयी व्हावा अशीच माझी इच्छा आहे. जगमान्य नीतिनियमांच्या दृष्टीनें त्याचें वर्तन निर्दोष आहे. पण अहिंसेच्या दृष्टीनें वस्तुस्थितीचें निरीक्षण केलें, तर ४० कोटी लोकसंख्येच्या चीनसारख्या संस्कृत राष्ट्रानें जपानचा प्रतिकार जपानच्याच पद्धतीचें अनुकरण करून करावा हें त्याला शोभत नाहीं, असेंच मला म्हटलें पाहिजे. माझी अहिंसेची जी कल्पना आहे ती चिनी लोक स्वीकारते, तर जपानजवळ असलेलीं अगदीं आधुनिक अशीं संहारसाधनें निरुपयोगी ठरलीं असतीं. जपानला ते म्हणाले असते, 'तुमचीं सगळीं यंत्रें घेऊन या, आम्ही आमच्या निम्म्या लोकांचा बळी तुम्हांला देतों. पण जे वीस कोट लोक उरतील ते तुमच्यापुढें गुडघे टेकणार नाहींत.' चीन असें करील तर जपान चीनचा बंदा होऊन राहील."

अहिंसेवरील आपल्या श्रद्धेच्या बाबतींत श्री. गांधी याहून सडेतोड उत्तर तें काय देणार? दुष्कृति कोणतीहि असो, (मग ती चीनला सांप्रत जिचा ताप सहन करावा लागत आहे, त्या दुष्कृतीप्रमाणें का असेना) ती निवारण करण्याची जी हिंसात्मक पद्धति आहे तिच्यांतला दोष असा आहे कीं, वेताळाला जखिणीचा शह देण्यासारखा तिचा उद्योग ठरतो. जाळपोळ, गोळ्या घालणें, हातपाय तोडणें, छळ करणें वगैरे अन्याय्य आचरण करणाऱ्या लोकांना धडा मिळावा म्हणून त्याच प्रकारच्या गोष्टी या पद्धतीमुळें कराव्या लागतात. ज्या दुर्भावनेमुळें प्रथमचें दुष्कृत्य शक्य झालें, ती भावना या पद्धतीनें नष्ट होणें कधींच शक्य नाहीं. यामुळें ती अधिकच कडवी व भयावह मात्र होत जाईल. वेताळावर जखीण सोडणें, हिंसेला त्याहून भयंकर हिंसेनें मारूं पाहणें, ही मूर्खपणाची व स्वभावतः विफल असणारी पद्धति आहे; दुराचरणाचा निरास करण्याची खरी पद्धति नव्हे. चढाईच्या भावनेला मित्रभावनेचें स्वरूप प्राप्त व्हावें म्हणून स्वेच्छेनें क्लेश सहन करणारी उदारताच दुराचरणाचा निरास करूं शकेल.

श्री. गांधींनीं तदनंतर Mask of Anarchy मधील शेलीचीं महावाक्यें उध्दृत केलीं. हे चरण सध्यां आहेत त्याहून आपणांस अधिक सुपरिचित असावयास हवेत :

Stand ye clam and resolute,
Like forest close and mute,
With folded arms and looks which are
Weapons of unvanquished war.

And if then the tyrants dare,
Let them ride among you there,
Slash, and stab, and maim, and hew—
What they like, that let them do.

With folded arms and steady eyes,
And little fear, and less surprise,
Look upon them as they slay,
Till their rage has died away.

Then they will return with shame
To the place from which they came,
And the blood thus shed will speak
In hot blushes on their cheek.

Rise like lions after slumber
In unvanqishable number—
Shake your chains to earth, like dew
Which in sleep has fallen on you—
Ye are many, they are few.

उपरान्त त्याच विषयाच्या पोटविषयाची चर्चा झाली. श्री. गांधी म्हणाले, " परंतु असा एक आरोप घेण्यांत येत असतो कीं, पीडित व पीडक यांच्यामध्यें साक्षात् संबंध येत असल्याकारणानें ज्यांच्या बाबतींत अहिंसा मार्ग ठीक ठरेल; पण चीनवर जपान चाल करून येत आहे, तो लांब पल्ल्याच्या तोफा व विमानें घेऊन येत आहे. जो माणूस आकाशांतून बाँबचा वर्षाव करतो त्याला कोण मेले आणि किती मेले याचा पत्तासुद्धां लागत नाहीं. तेथें वैयक्तिक संबंधच येत नाहीं; मग हवाई हल्ल्याशीं अहिंसा सामना देणार कशी ?

" यावर उत्तर असें आहे कीं, मृत्युप्रेरक बॉंबच्या मागें बॉंब फेकणारा मानवी हात असतो व त्याच्याहि मागें त्या हाताला प्रेरणा देणारें मानवी हृदय असतें. दहशतवादाच्या धोरणाच्या बुडाशीं असें गृहीतकृत्य असतें कीं, दहशतीचा पुरेशा प्रमाणांत उपयोग केला, कीं इष्ट तो परिणाम घडून येतो, म्हणजे शत्रु झोटिंगशाहीपुढें मान तुकवतो. पण असें समजा, कीं झोटिंगशाहीपुढें कदापि मान तुकवावयाची नाहीं किंवा त्याच्याच पद्धतीनें प्रतिकार करावयाचा नाहीं, असा राष्ट्रानें दृढनिश्चय केला तर दडपशाही चालू ठेवण्यांत कांहीं अर्थ राहिला असें झोटिंगशहाला वाटणार नाहीं. त्याला पुरेसे बळी दिले कीं मग त्याला वीट येण्याचा काळ प्राप्त होईल.

" माझ्या इच्छेनुरूप पत्नीला वांकवण्याचा प्रयत्न मीं केला, तेव्हां तिच्यापासून मीं प्रथम अहिंसेचा धडा घेतला. एकीकडे माझ्या इच्छेला दृढ निश्चयानें केलेला प्रतिकार व दुसरीकडे माझ्या आचरटपणामुळें सोसाव्या लागणाऱ्या यातनांचा निमूटपणें तिच्याकडून होणारा स्वीकार, यामुळें अखेरीस माझी मलाच लाज वाटू लागली व तिच्यावर सत्ता गाजविण्यासाठीं मी जन्माला आलेला आहें ही माझ्या मनांतील मूर्खपणाची कल्पना दूर झाली. तिनें स्वतः अजाणतां जो सत्याग्रहाचा नियम आचरिला त्या नियमाचाच विस्तार मीं दक्षिण आफ्रिकेमध्यें केला इतकेंच. "

सत्याग्रहाच्या बाबतींतलें एक अत्यंत महत्त्वाचें तत्त्व येथें उपलब्ध झालें आहे. सत्याग्रह म्हणजे अशी एक चळवळ आहे, असा एक आचारधर्म आहे, कीं ज्यांत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें भाग घेतां येईल. इतकेंच नव्हे, तर ज्याचें नेतृत्व करण्याच्या कामीं स्त्रिया ह्या विशेषेंकरून योग्य ठरतील अशी ती चळवळ आहे. शांतपणें क्लेश सहन करणें आणि हिंसा व छळ हीं निर्भय चित्तानें पाहणें हेंच स्त्रीजातीचें शेंकडों वर्षांपासूनचें सर्वश्रेष्ठ हत्यार आहे. तीच भावना व तीच पद्धति जगाचें रक्षण करण्याच्या कार्यांतील प्रधान तत्त्व बनावें म्हणून स्त्रियांनीं नेतृत्व स्वीकारण्याची वेळ आतां आलेली आहे.

सत्याग्रहांतल्या चार मूलभूत कल्पनांचें पुनः एकवार स्मरण करूं या.
जगामध्यें दुराचरण मोकाटपणें सुरू आहे ही पहिली कल्पना.

हें दुराचरण नष्ट केलें पाहिजे ही दुसरी कल्पना.

हिंसेनें दुराचरणावर मात करतां यावयाची नाहीं, तिच्यामुळें दुर्वासना अधिकच दृढ व गाढ होऊन तिला कितीहि कठोरपणानें गाडून टाकण्यांत आलें, तरी केव्हां ना केव्हां तरी दसपट उग्रतेनें ती उसळी मारतेच मारते, ही तिसरी कल्पना.

चौथी कल्पना अशी कीं, दुराचाऱ्यानें दिलेल्या यातना आमरण, मित्रभावानें, स्वेच्छेनें व शांतचित्तानें स्वीकारणारा सत्याग्रह दुराचरणावर मात करूं शकतो. त्या सत्याग्रही व्यक्तीला सत्याग्रहासाठीं प्राणार्पण करावें लागलें, तरी सत्याग्रहाची भावना पुनरुज्जीवित होत राहणें हें अपरिहार्य असतें.

या चारहि मूलभूत कल्पनांच्या दृष्टीनें पाहिल्यास स्त्रिया पूर्वापार सत्याग्रहाचें पालन करीत आल्या आहेत हें स्पष्ट होतें. छळ हा स्त्रियांनीं स्वतःच सोसलेला असल्यामुळें दुराचाराचें अस्तित्व त्यांच्या अंतःकरणावर कोरलें गेलेलें आहे. कांहींहि करून हा छळ बंद पाडला पाहिजे या गोष्टीचें ज्ञान व अशा प्रकारचा निश्चय त्यांच्या ठिकाणीं हळूहळू उदित झालेला आहे. हिंसामार्गानें तो छळ थांबविणें स्त्रीला शक्य व्हावयाचें नाहीं. स्त्रीपुरुषांच्या परस्परसंबंधांविषयींचे प्रश्न अशा हिंसात्मक मार्गानें सोडवतां येतील अशी समजूत करून न घेण्याइतपत अक्कलहि तिला आधींच आलेली आहे. स्वतःच्या घरांत असो कीं राष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रांत असो, जुलुमांचा हिंमतीनें प्रतिकार करीत रहावें हा एक निराळाच मार्ग तिनें पत्करला आहे. त्याच्याच जोडीला दुसऱ्यांसाठीं स्वेच्छेनें क्लेश भोगण्याच्या भावनेनें ती कमालीचा छळ सहन करीत आली आहे. ही गोष्ट स्त्रियांच्या चळवळींतल्या केवळ नेत्यांच्याच बाबतींत खरी आहे असें नव्हे; हजारों अप्रसिद्ध स्त्रियांच्या बाबतींतहि ती खरी आहे. त्यांनीं येशू ख्रिस्ताचें अथवा आजच्या घटकेला त्याचें क्रूसाचें तत्त्व पुनः एकवार प्रस्थापित करण्यासाठीं झटत असणाऱ्याचें नांवहि कदाचित् कधीं ऐकलेलें नसेल; पण मुलांच्या जननासारखे व त्यांच्या संवर्धनासारखे जीवशास्त्रांतील जे साधे मानवी व्यापार आहेत, त्यांच्या योगानें स्त्रियांना सत्याग्रहाच्या तत्त्वांची मनांतून ओळख पटत जाते. एवढेंच नव्हे, तर त्यांचें प्रत्यक्ष आचरणहि त्यांच्याकडून घडत जातें. जगांत अवतीर्ण होणारें प्रत्येक

बालक स्वेच्छेनें स्वीकारलेल्या क्लेशामुळें जन्मतें, व इतरांसाठीं सर्व तऱ्हेचे कष्ट सोसण्यास तयार असणाऱ्या प्रेमामुळेंच त्याचें संवर्धन होतें.

ख्रिस्ताच्या क्रूसाचें तत्त्वज्ञान मानवी व्यवहारांच्या शक्य तेवढ्या विस्तृत क्षेत्रांत खरोखर लागू करण्यांत यावें असें जें अवाहन श्री. गांधींच्या मुखानें प्रकट होत आहे, तें वस्तुतः मानवाला क्लेशदायी झालेल्या दारिद्र्य, पीडा व युद्धें या दारुण आपदांचें निराकरण करण्यासाठीं ज्या जगद्व्यापी कल्पनांचा प्रचार करावयाचा आहे, त्याचें नेतृत्व स्त्रियांनीं पुढें होऊन स्वीकारावें, यासाठीं त्यांना दिलेलें आवाहनच होय.

आपणां पुरुषांना इहलोकीं अस्तित्व लाभलें याचाच अर्थ असा कीं, ज्या वेदनांतून आम्ही प्रकटलों त्या वेदनांच्या द्वाराच नव्हे, तर आमच्या बालपणीं घडलेल्या पण आतां विसरून गेलेल्या हजारों प्रसंगांच्या द्वारा आमच्या मातांनीं सत्याग्रहाचें, क्रूसाच्या पंथाचें आचरण केलें होतें. आमच्यावरील प्रेमाखातर स्वेच्छेनें व आनंदानें त्यांनीं खस्ता खाल्ल्या. त्याच आनंदी सहिष्णुतेच्या भावनेनें मानवजातीच्या पालनासाठीं आम्ही सिद्ध व्हावें असा हा आदेश आहे. आमच्याजवळ कांहीं बुद्धि असेल तर या कार्यांत आपणापेक्षां स्त्रिया बऱ्याच पुढें गेलेल्या असल्याकारणानें त्यांनाच आपल्या मार्गदर्शक व स्फूर्तिदात्या होतां येईल याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. त्यांचें नेतृत्व नसेल तर आपण हटकून अपेशी ठरूं.

कोणत्याहि प्रकारच्या नैतिक भावनेला दाद न देणाऱ्या हुकूमशाही राज्यव्यवस्थांच्या बाबत श्री. गांधींना भेटीस आलेल्यापैकीं एकानें प्रश्न विचारला. ज्यांना ते धमक्या देत आहेत त्यांनीं अहिंसेनें या हुकूमशहांना तोंड देण्याचें योजिलें, तर त्यांच्या तावडींतच सांपडल्याप्रमाणें होणार आहे. हुकूमशाह्या ह्या स्वरूपतःच अनैतिक असल्याकारणानें त्यांच्या बाबतींत नैतिक परिवर्तनाचा नियम लागू पडेल अशी अपेक्षा कशी धरतां येईल?

याहि ठिकाणीं श्री. गांधींनीं आपलीं मतें मनावर ठसतील अशा रीतीनें मांडलीं. ते म्हणाले, "हुकूमशहा हे उद्धाराच्या पलीकडे गेलेले लोक आहेत असें तुमच्या प्रतिपादनांत गृहीत धरलेलें आहे; परंतु अहिंसेवरील श्रद्धा ही या गृहीतकृत्यावर आधारलेली आहे, कीं मानवी मन हें तत्त्वतः एक असल्याकारणानें, प्रेमानें केलेल्या आराधनेला त्याच्याकडून हटकून

प्रत्युत्तर मिळतें. आतांपर्यंत त्यांनीं वापरलेल्या हिंसेला तावडतोब प्रत्युत्तर मिळत गेलेलें आहे हें आपण ध्यानांत धरलें पाहिजे. संघटित असा अहिंसात्मक प्रतिकार त्यांच्या पाहण्यांत कधीं आला असलाच, तरी तो निदान पुरेशा प्रमाणात त्यांच्या अनुभवास आलेला नाहीं. म्हणूनच स्वतःच्या सामर्थ्यानुरूप ते जें हिंसाबल उभें करूं शकतात, त्यापेक्षां अहिंसात्मक प्रतिकार हा श्रेष्ठ आहे ही गोष्ट त्यांना पटण्याचा फार मोटा संभव आहे. इतकेंच नव्हे, तर तशी मला खात्री आहे. शिवाय, अहिंसातंत्राचें यश हुकूमशहांच्या कृपेवर अवलंबून नसतें. दुर्लंघ्य वाटणाऱ्या अडचणींतून त्याला निभावून नेणारें अखुट असें जें ईश्वरी साहाय्य त्यावर अहिंसावादी प्रतिकारकाची भिस्त असते. त्यावरील श्रद्धेमुळें तो अजिंक्य ठरतो. ”

ख्रिस्ताच्या क्रूसाच्या तत्त्वाज्ञानाप्रमाणें श्री. गांधींचें सत्याग्रहाचें तत्त्वहि मूलतः धर्माधिष्ठित आहे, हें येथें पुनः एकवार दिसून येईल. जुलूम व छळ यामुळें उत्पन्न होणारे मानवी क्लेश, मग ते कितीहि दारुण असोत, त्यांना आपण जगाचें आदितत्त्व मानतां कामा नये. आपण ईश्वराला जगाचें आदितत्त्व मानलें पाहिजे. ईश्वराची इच्छा काय असावी असें आपणांला वाटतें, आणि त्या ईश्वराचें स्वरूप आपल्या मतें कशा प्रकारचें आहे, या प्रश्नाचें आपण प्रथम उत्तर द्यावयास हवें. मुक्ति व न्याय यांच्यासाठीं उद्युक्त झालेला सदिच्छामय असा तो असून मानवी व्यवहारांत आपली मुक्ति व न्याय यासंबंधींची इच्छा बलवान् ठरावी अशी त्याची मनीषा आहे, असें या प्रश्नाचें आपण उत्तर देणार असूं, तर ‘ एवंगुण विशिष्ठ ’ अशा या पित्यासमान असणाऱ्या देवाचा पदर पकडून वागणें एवढेंच आपलें कार्य ठरतें. आपल्या येशू ख्रिस्ताचा तो पिता आणि परमेश्वर आहे, एवढ्या शब्दांनीं आपणां ख्रिश्चन लोकांना त्याच्या मनोधर्माचें थोडक्यांत वर्णन करतां येईल. आपण अशा रीतीनें त्याचा पदर पकडला ( लौकरच आपल्या ध्यानांत ही गोष्ट येईल कीं, वास्तविक तोच आपल्याला हातीं धरून चालवीत आहे. ) म्हणजे क्रूसाच्या मार्गावर आपलीं पावलें पुढें पडूं लागतील. जुलमी व दुराचारी सत्तेनें सदिच्छेवर म्हणजेच ईश्वरी इच्छेवर जे अत्याचार केले असतील ते,

इतरांची जुलुमांतून व दुराचरणांतून मुक्तता व्हावी म्हणून स्वेच्छेनें व अहिंसेनें स्वीकारणें हाच क्रूसाचा पंथ होय.

परमेश्वर हें आपलें प्रारंभस्थान. आपल्या सर्व चर्चांच्या, सर्व योजनांच्या मुळाशीं हें ईश्वराचें अधिष्ठान असावयास हवें. त्याच्याकडे आपण दुर्लक्ष केलें, तर आपण निश्चित अपेशी ठरूं. तो ईश्वर चैतन्यमय असेल, तर श्री. गांधी म्हणतात त्याप्रमाणें मौन स्वीकारूनच त्याचा शोध घेतला पाहिजे. कारण, आपण त्याला काय निवेदन करतों या गोष्टीला महत्त्व नाहीं; मग तें निवेदन कितीहि उत्कृष्ट शब्दांत रचलेलें का असेना. आपणांस त्यानें आपली इच्छा निवेदन करावी व मार्ग दाखवावा ही गोष्ट महत्त्वाची आहे. हें मार्गदर्शन आणि ईश्वरी इच्छेंत आपली इच्छा विलीन केल्यानें प्राप्त होणारें बल, हीं आपण त्याच्यापुढें मौन स्वीकारून त्याची वाणी ऐकिली तरच आपणांस प्राप्त होतील.

अंतर्मुख बनून आपण ईश्वरासन्निध गेलों व त्याच्या इच्छेचें ज्ञान झाल्यामुळें प्राप्त होणारें बल आपणांस मिळालें, म्हणजे श्री. गांधी म्हणतात त्याप्रमाणें सर्व अडचणी उल्लंघून जाणाऱ्या अजिंक्य श्रद्धेचा आपल्या अंगीं संचार होतो.

परंतु आपलें धोरण व यत्न आपल्या इच्छेनुसार न राहतां त्याच्या इच्छेनुसार असावेत असें वाटत असेल, तर ईश्वरापासून प्रारंभ करून अंतीं आपण त्याच्याच पायांशीं परत आलें पाहिजे.

हुकूमशहांच्या विरुद्ध स्वीकारावयाच्या योग्य मार्गासंबंधींचें विवेचन पुढें चालू ठेवून एका ख्रिश्चन गृहस्थानें श्री. गांधींना प्रश्न केला कीं, " इष्ट तें साध्य करून घेण्यासाठीं प्रत्यक्ष हिंसा करण्याऐवजीं हिंसा करण्याची धमकी देऊन जी चढाई करण्यांत येते, तिच्या बाबतींत कोणतें धोरण स्वीकारावें? " त्यावर श्री. गांधींनीं पुढीलप्रमाणें उत्तर दिलें :

" समजा कीं, झेक लोकांच्या ताब्यांतील खाणी, कारखाने आणि सर्व तऱ्हेची नैसर्गिक संपत्ति त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतली तर पुढीलप्रमाणें परिणाम घडून येणें शक्य आहे :

( १ ) हुकूम मानले नाहींत म्हणून झेक लोकांचा निःपात करण्यांत

येईल. हा झेक लोकांचा महान् असा विजय ठरेल व जर्मनीच्या अधोगतीला तेथून सुरवात होईल.

( २ ) प्रचंड हिंसाबलाच्या सान्निध्यांत झेक लोकांचें नीतिबल खचत जाईल. अशा प्रकारचा परिणाम सामान्यत: सर्वच झगड्यांत दिसून येतो. पण असा अध:पात झालाच तर तो अहिंसेमुळें न होतां अहिंसेच्या अभावामुळें अथवा अपूर्णतेमुळें घडून आलेला असेल.

( ३ ) तिसरा परिणाम असा घडून येणें शक्य आहे कीं, नव्यानें अंकित केलेला हा प्रदेश आपल्या देशांतील अतिरिक्त लोकांना राहण्यासाठीं जर्मनीकडून वापरण्यांत येईल. ही गोष्टदेखील हिंसात्मक प्रतिकार करून टाळतां यावयाची नाहीं; कारण हिंसात्मक प्रतिकार निकामी आहे असें आपण गृहीतच धरलेलें आहे.

" म्हणून अहिंसात्मक प्रतिकार हाच सर्व परिस्थितींत उत्तम मार्ग होय.

" हिटलर आणि मुसोलिनी हे जागतिक मताविषयीं इतके बेफिकीर असतील असें मला वाटत नाहीं. आजच्या घटकेला जागतिक मताला धाब्यावर बसवण्यांत या हुकूमशहांना समाधान वाटत आहे, याचें कारण असें आहे कीं, या नामधारी महान् राष्ट्रांपैकीं एकाचेहि हात निर्मळ नाहींत. या महान् राष्ट्रांनीं भूतकाळांत आपल्या देशावर अन्याय केलेला आहे, असे विचार त्यांच्या मनांत सलत असतात. इंग्लंडच्या पापांतून नाझी जर्मनी पैदा झाला आणि व्हर्सायच्या तहानें हिटलरला निर्माण केलें अशी कबुली नुकतीच एका थोर इंग्रज मित्रानें माझ्याजवळ दिली."

व्हर्सायच्या तहानंतरच्या उपासमारीच्या काळांत, अमेरिकेची मुलांना अन्नपाणी देण्याची योजना पूर्णांशानें लागू होण्यापूर्वीं, व्हिएन्नांतील मुलांच्या रुग्णालयांतल्या खोल्यांमागून खोल्या मीं नजरेखालून घातल्या होत्या. त्यांच्या अगदीं सजीव आठवणी प्रस्तुत लेखकाला आहेत. आम्हीं केलेल्या रसदबंदीला बळी पडलेल्या व तिच्यामुळें जे भयंकर रोग उद्भवले तिचें भक्ष्य बनलेल्या, असंख्य अर्भकांची वेडीवांकडीं व विव्हळणारीं शरीरें त्या रुग्णालयांत डोळ्यांना दिसत. त्या अति घोर अशा आन्तरराष्ट्रीय गुन्ह्यामुळें दहा लक्ष जर्मन व ऑस्ट्रियन बायकामुलें मृत्युमुखीं पडलीं असें म्हणतात. १८७१ सालीं बिस्मार्कनें पॅरीस जिंकलें, त्या वेळीं

संधी सांपडल्याबरोबर त्यानें प्रथम अन्नानें भरलेल्या आगगाड्या त्या भुकेनें व्याप्त झालेल्या शहरांत नेऊन सोडल्या. आम्हीं मात्र युद्धतहकुबी झाल्यानंतर आठ महिनेपर्यंत जाणुनबुजून जर्मनीची व ऑस्ट्रियाची उपासमार केली. हेतु हा कीं, रंजीस आलेल्या शत्रूकडून आम्हांला हवा तसा तहनामा करून घेतां यावा. हवा तसा तहनामा आम्हीं मिळवला. मूलतःच तो दुष्ट होता. आम्हीं ज्या मार्गानें म्हणजे रसदबंदीनें तो तहनामा मिळवला, त्या रसदबंदीच्या मानानें पाहातां खुद्द तहनाम्यांतील अपमान व अन्याय हे देखील ( वसाहतींच्या बाबतींत जर्मनीनें दाखविलेल्या नालायकीसंबंधीचें विधान अथवा युद्धाचें खापर माथीं मारणारें कलम हेंसुद्धां ) तितके गर्ह्य वाटत नाहींत. मीं ज्या वेळीं तीं रोगी मुलें पाहिलीं त्यावेळीं मी मनाशीं म्हणालों होतों कीं, " एक दिवस याची पुरेपूर भरपाई करावी लागणार " त्याचें मला स्मरण आहे. तो दिवस आतां उजाडला आहे. त्या मुलांतून वांचलेलीं मुलें व त्या काळीं त्यांच्याच वयाचीं असलेलीं मुलें, हींच आज नाझी सेनेंतील आघाडीचे वीर बनलीं आहेत. नाझी तत्त्वज्ञानाचे कट्टे भगत त्यांच्यांतूनच पैदा झाले आहेत. युद्धानंतर इटलीशीं आपण विजयी राष्ट्रांनीं जें वर्तन केलें, त्यामुळेंच मुसोलिनी निर्माण झाला. चवदा संरक्षित राष्ट्रांपैकीं ब्रिटननें नऊ घेतलीं आणि इटलीला कांहींच मिळालें नाहीं. रसदबंदीच्या काळांत आपण जर्मनीशीं व ऑस्ट्रियाशीं जें वर्तन ठेवलें, त्यामुळें व व्हर्सायच्या तहामुळें आपणच हिटलरला जन्म दिला. एवढ्या मोठ्या प्रमाणावर सार्वराष्ट्रीय गुन्हे केल्यावर नंतरच्या काळांत घडून येणाऱ्या जबरदस्त प्रतिक्रियेचीं बीजें रुजल्यावांचून राहावयाचीं नाहींत. इतिहासापासून कांहीं बोध घ्यावयाचा असेल, तर तो हाच.

परंतु यातनांच्या व मानखंडनेच्या त्या काळाकडे नाझी नजर टाकतात, त्या वेळीं त्यांच्या मनावर असें बिंबविण्यांत येतें कीं, त्या प्रसंगाला ज्यू लोक जबाबदार आहेत. जर्मन सैन्याचा रणांगणावर पराभव झालेला नव्हता; पण मायदेशांत क्रांति घडवून आणून या ज्यूंनींच जर्मन सैन्यावर मागून वार केला, अशी ही प्रचलित झालेली दंतकथा आहे; म्हणून प्रथम कोणत्या शत्रूचा कांटा काढावयाचा असेल, तर तो ज्यूंचा. येणेंप्रमाणें आजच्या घटकेला जर्मनीमध्यें ज्यूंचा जो छळ होत आहे, तो रसदबंदी व

तह यांच्या स्वरूपांत आपण जीं जगद्व्यापीं पापें केलीं तद्विरुद्ध झालेल्या घोर अशा प्रतिक्रियेचा परिणाम होय. ज्यू लोकांच्या बाबतींत नाझींनीं जी नीति स्वीकारली आहे तिचा निषेध करण्याचा अधिकार आपणांस पोंचत नाहीं; कारण, ती नीति अस्तित्वांत येण्यास आपण जबाबदार झालेले आहोंत. प्रथम आपण स्वत:ला दोष देऊन नंतर छळांत सांपडलेल्या ज्यू लोकांना शक्य ती सर्व मदत करण्याचा प्रयत्न करावयास हवा.

भेटीस आलेल्यांपैकीं एकानें यानंतर प्रश्न विचारला, "सार्वराष्ट्रीय शांति नांदावी म्हणून माझ्यासारख्या ख्रिश्चनधर्मी मनुष्याला काय करतां येईल? सार्वराष्ट्रीय बेबंदशाही मोडून शांति प्रस्थापित करण्याचें कार्य अहिंसला कसें बजावतां येईल?"

हे ख्रिश्चन धर्माचे अग्रणी, जगांतल्या हरएक देशांतून उपस्थित झालेले शांतिसम्राटाचे* हे निवडक प्रतिनिधी, युद्धाचा प्रश्न सोडवण्याच्या बाबतींत ख्रिस्तप्रणीत क्रूसाचें तत्त्वज्ञान लागू करण्याच्या कार्यांत दोन हजार वर्षेंपर्यंत हार खाल्ल्यावर आपल्याच धर्मांतील मूलभूत तत्त्वास कार्यक्षम करण्याची योग्य पद्धति कोणती तें विचारण्यासाठीं स्वत:ला पक्के हिंदु म्हणवून घेण्यांत भूषण मानणाऱ्या श्री. गांधींच्याकडे येतात, हें दृश्य किंचित् कुतूहलजनक झालें असलें पाहिजे.

श्री. गांधींनीं उत्तर दिलें,

"तुम्हांला आपलें सर्वस्व गमवावें लागेल, पण तुम्हांला ख्रिश्चन म्हणून अहिंसाचरणाला परिणामकारक रीतीनें मदत करणें शक्य होईल. हिंमत धरून शस्त्रसंन्यास करण्याचा निश्चय मोठ्या राष्ट्रांनीं केल्यावांचून शांति कधींच नांदणार नाहीं. अलीकडे जे प्रसंग घडून आले आहेत, त्यामुळें ही गोष्ट या मोठ्या राष्ट्रांना पटावयास हवी, असें मला वाटतें.

"माझी अशी दृढ श्रद्धा आहे–अर्धा शतक अहिंसेच्या अखंड अनुभवानंतर आज तर ती श्रद्धा अधिकच प्रज्वलित झालेली आहे–कीं मानव जातीचा उद्धार एका अहिंसेनेंच करतां येईल.

---

* शांतिसम्राट् = येशुख्रिस्त

बायबलचें मला जें कांहीं ज्ञान झालें आहे त्यावरून मला असें वाटतें कीं, बायबलाचाहि परमादेश हाच आहे. "

हें सर्वांचें सार आहे. श्री. गांधी अहिंसेसंबंधीं अथवा सत्याग्रहासंबंधीं बोलतात तेव्हां त्यांच्या मनांत क्रूसाचा मार्गच असतो. म्हणूनच बर्मिंगहॅममधील आमच्या वसाहतीला त्यांनीं दिलेल्या भेटीच्या वेळीं त्यांच्या मतें अविनाशी सत्याचें मर्म व्यक्त करणारें " When I survey the wondrous Cross" (मी जेव्हां त्या उज्ज्वल क्रूसाकडे दृष्टि टाकतों) हें स्तोत्र त्यांनीं प्रवचनासाठीं निवडलें होतें. केवळ क्रूसाचें साहाय्य घेऊनच आणि " आपला शूल खांद्यावर घे व माझ्या मागोमाग चल " या आपल्या प्रभूच्या वाक्याचें शब्दशः पालन करूनच, मानवजातीचा उद्धार करणें शक्य आहे, यातर्फेची श्री. गांधींची ही साक्ष आहे.

आमच्या धर्माचा अर्थ आम्हांला केव्हां समजूं लागणार ? या थोर हिंदी गृहस्थाच्या शब्दांमुळें आणि त्याच्या शब्दांपेक्षांहि ज्या तत्त्वांवर त्याची श्रद्धा आहे त्यांच्याकडून होणाऱ्या आचरणानें ख्रिस्ती राष्ट्रांतील उद्बोधनाचा काळ कदाचित् समीप येईल अशी दृढ आशा करावीशी वाटते. युरोपांतील लोकसंख्येनें सर्वांत मोठ्या असणाऱ्या राष्ट्रांमध्यें चर्चचा—धर्मसंस्थेचा—छळ हल्लीं सुरू आहेच. आणि ख्रिश्चन चर्चविरुद्ध 'कुल्टुर काम्फ'चा (संस्कृतियुद्धाचा) जो प्रचंड हल्ला व्हावयाचा आहे त्यायोगें ओढवणाऱ्या घोरतर छळाच्या दाट बातम्या कानांवर येत आहेत. अखिल ख्रिश्चनधर्माला पुनः चैतन्यमय करण्याची आणि क्रूसाच्या तत्त्वांनुसार आपल्या दुःखांना तोंड देऊन तुरुंगांना राजवाडे मानून, येशू ख्रिस्तासाठीं क्लेश भोगण्याचा मान मिळाला म्हणून आनंदित होऊन कदाचित् यच्चयावत् संस्कृतीचें रक्षण करण्याची सुसंधि प्राप्त झाली आहे, अशा वेळीं जर्मनींतले ख्रिश्चन हिंमत दाखवतील काय ? आणि आपल्यापुढें जे प्रश्न आहेत, विशेषतः युद्ध व दारिद्य यांच्याशीं झगडण्याचा जो प्रश्न आहे, त्यांच्याहि बाबतींत आपण त्याच तत्त्वानुसार वर्तन ठेवणार आहोंत कां ? कारण, जेव्हां छळवादाला जोर चढेल, फक्त त्याच वेळीं क्रूसाचें अनुयायित्व करावयाचें नसतें. भुकेलेलीं व नागडींउघडीं, रोग आणि पीडा यांनीं व्याप्त

असलेलीं, ईश्वराचीं जीं लेकरें सर्वत्र पसरलेलीं आहेत, त्यांच्या गरजा व क्लेश यांच्याशीं स्वत:ला एकरूप करणारें असें तें शाश्वत तत्त्व आहे.

सरहद्द प्रांतांतील लढाऊ व रानटी टोळयांमध्यें अहिंसेच्या भावनेची जी प्रगति त्यांच्या दृष्टीला नुकतीच पडली होती, तिचें श्री. गांधींनीं वर्णन केलें :

"मला ज्या गोष्टी पाहावयास सांपडल्या त्या अपेक्षित नव्हत्या. अहिंसेविषयीं त्यांना अत्यंत आतुरता लागली असून त्यांच्या अंत:करणाचा प्रामाणिकपणा दृढमूल असा आहे. अहिंसेमुळें त्यांना आशा वाटूं लागली आहे...तत्पूर्वी सगळीकडे अंधार दिसत होता. असें एकहि कुटुंब नव्हतें, कीं ज्याचें कोणाशीं तरी हाडवैर नाहीं. गुहेंतल्या वाघांप्रमाणें ते राहत. पठाण आपल्याजवळ सुऱ्या, जंबिये, बंदुका वगैरे हत्यारें नेहमीं बाळगीत असले, तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांजवळ ते अगदीं टरकून वागत; कारण, आपली नोकरी जाईल अशी त्यांना भीति वाटे. हजारों लोकांच्या बाबतींत तो सर्व प्रकार आतां पालटला आहे. खानसाहेबांच्या (अब्दुल गफार-खान) अहिंसात्मक चळवळीची छाप ज्यांच्यावर पडली त्या पठाणांमध्यें कुटुंबांतील हाडवैर ही आतां भूतकालांतील गोष्ट होऊन बसली आहे. जीवनासाठीं हलक्यासलक्या नोकरीवर अवलंबून राहण्याच्या ऐवजीं ते आतां जमिनींची लागवड करूं लागले आहेत; आणि ही त्यांची प्रगति तशीच चालू राहिली तर ते लवकरच व्यापार—उद्योगहि करूं लागतील."

या शेवटच्या वाक्यावरून शारीरिक परिश्रमांवर व विशेषत: शेतजमिनींत केलेल्या शारीरिक परिश्रमांवर श्री. गांधींचा जो विश्वास आहे तो स्पष्ट होतो. १९३१ सालीं इंग्लंडांत असतांना बेकारीवर उपाय म्हणून व ख्रिश्चन संस्कृतीच्या पुनरुद्धाराचा एक मार्ग म्हणून सामुदायिक शेतकरी वसाहती स्थापण्याच्या आवश्यकतेवर त्यांनीं विशेष भर दिला होता. हिंदुस्थानालाहि त्यांनीं तोच आदेश दिलेला आहे, आणि त्याचबरोबर दररोज इतर कष्टाच्या हस्तव्यवसायांत विशेषेंकरून सूत कांतण्याचा व्यवसायांत, बराचसा वेळ खर्ची टाकावा असा त्यांचा आग्रह आहे.

पंधराव्या शतकांत जेव्हां जुनी संस्कृति गडगडली, तेव्हां एका काळीं सस्यश्यामल असणाऱ्या, पण आतां ओसाड पडलेल्या प्रदेशांत जाऊन

छोट्या छोट्या गटांनीं ख्रिस्ताच्या नांवानें लहानग्या सामुदायिक शेतकरी वसाहती स्थापन केल्या आणि धीमेपणानें व प्रयत्नपूर्वक त्या गतवैभव संस्कृतीची पुनर्रचना केली, याचें आपणांस स्मरण असणें हिताचें होईल. शास्त्रशुद्ध शेतीवरून व तदनंतर शिक्षण, धर्म, संस्कार यांची प्रस्थापना करणारे हे प्रारंभीचे मठाधिपति ' नांगरगड्डे ' ( Digging Men ) होते. स्वतःच्या फायद्यासाठीं नव्हे, तर संघासाठीं, धर्मासाठीं, रानट्यांच्या चढाईला बळी पडलेल्या क्लेशमग्न लोकांसाठीं नांगर हाकून या शूर धाडसी मंडळींनीं, आपल्या या संस्कृतीपेक्षां अनेक पटीनें सृजनशील व अनेक दृष्टींनीं अधिक ख्रिस्तानुसारी अशी ती मध्ययुगांतील महान् संस्कृति उभारली होती.

एक नवीन महायुद्ध होऊन, लष्करशाही व औद्योगिक स्पर्धा यांनीं युक्त अशी आपली ही संस्कृति कोलमडून पडण्याचा संभव तरी निदान आहेच. असें घडलें, तर नांगर हाकून स्वतःच्या स्वार्थासाठीं नव्हे, तर ख्रिस्तासाठीं, संघासाठीं, युद्धबळी बनलेल्यांच्यासाठीं, आपल्या प्रभुदेवासाठीं, कष्ट करणाऱ्या नांगरगड्ड्यांची ( Digging Men ) पुन्हां तीव्रतेनें जरुरी भासूं लागेल.

पण असें घडून यावयाचें तर आपण आतांपासूनच तयारीला लागलें पाहिजे. या दृष्टीनें अलीकडच्या कांहीं वर्षांत इंग्लंड आणि वेल्समध्यें बेकार लोकांच्यासाठीं शेतजमिनी देणाऱ्या मंडळयांची जी सर्वत्र वाढ झालेली दिसून येते तिला महत्त्व आलें आहे. अधिक भाग्यवान् असलेल्या वर्गांतील अधिकाधिक लोकांनीं या मंडळयांच्या कार्यांत सहभागी होण्याकरितां बाहेर पडावें याचीहि याच दृष्टीनें आवश्यकता आहे. अशा प्रकारचें कार्य करण्याचा श्रमशिबिरांतील ( Work Camp ) पथकांचा गेल्या कित्येक वर्षांचा रिवाज आहे.

श्री. गांधी व ख्रिश्चन धर्माचे पुढारी यांच्यांतील चर्चेचा ओघ नंतर फिरून धर्माच्या विषयाकडे वळला. आपली उपासनापद्धति कोणती, असा प्रश्न त्यांस विचारण्यांत आला. ते म्हणाले, " पहांटे ४–२० ला व संध्याकाळीं ७ वाजतां आम्ही सामुदायिक प्रार्थना करतों. ती गेलीं कित्येक वर्षें चालू आहे. गीतेंतील व इतर सर्वमान्य धर्मांतील श्लोक, त्याचप्रमाणें

विभाग वा.वां. 9059 क्रमांक 3169

संतांचें श्लोक मंत्र आम्ही पठन करतों. बरोबर संगीताची साथ असते किंवा नसते. व्यक्तिगत प्रार्थना असते, ती शब्दांनीं वर्णन करून सांगतां येणार नाहीं. ती अखंड व अजाणतांहि चालूच असते. ज्याच्या दृष्टींतून कांहींहि सुटणार नाहीं, ज्याच्याशीं एकतान होण्याचा माझा प्रयत्न चालू असतो, असा साक्षी जवळ उभा असल्याचा भास मला होत नाहीं असा एकहि क्षण नसेल. खिश्चन मित्र करतात तशा प्रकारची प्रार्थना मी करीत नाहीं."

(श्री. गांधींचें हें म्हणणें बहुधा सार्वजनिक प्रार्थनेला उद्देशून असावें);

"प्रार्थनेचा तो प्रकार सदोष आहे असें मला वाटतें म्हणून नव्हे, पण मला शब्दच सुचेनासे होतात म्हणून. मला वाटतें हा संवयीचा परिणाम असेल...आपल्या गरजा ईश्वराला समजत असतात व त्यांची तरतूद तो आधींच करीत असतो. देवाला माझ्या विनवणीची आवश्यकता नाहीं. परंतु मी अतिशय अपूर्ण असा मानवप्राणी असल्याकारणानें मुलाला बापाचें छत्र लागतें, त्याप्रमाणें मला त्याचें कृपाछत्र लागतें. त्यानें कधीं अळंटळं केल्याचें माझ्या आढळांत नाहीं. तुरुंगामध्यें भोगाव्या लागलेल्या दिव्यांच्या वेळीं जेव्हां माझा मार्ग निष्कंटक नसे, त्यावेळीं आकाश काळेंकुट्ट झालेलें दिसत असतां तो माझ्या पाठीशीं उभा असल्याचें मला आढळून आलेलें आहे.

"माझ्या आयुष्यांत मला असा एकहि क्षण आठवत नाहीं, कीं ज्या वेळीं ईश्वरानें माझ्याकडे पाठ फिरवल्यासारखें मला वाटलें."

श्री. गांधींच्या मुलाखतीला आलेल्या या खिस्ती पुढाऱ्यांपैकीं कांहीं-जणांचें पूर्वीच्या काळचें वर्तन आमच्यापैकीं ज्या कोणाला आठवत असेल, त्यांना वर दिलेला संभाषणाचा हा सारांश अत्यंत मनोरंजक वाटेल. प्रस्तुत लेखक विद्यार्थी असतांना यांच्यापैकीं एक अत्यंत सुविख्यात पुढारी केंब्रिजला आले व त्यांनीं, या पिढींत जग खिस्तानुयायी बनेल, असें मोठ्या धीरगंभीर व स्फूर्तिदायक वाणीनें सांगितलें. त्यांनीं दिलेल्या त्या असामान्य व्याख्यानांत विश्वास व निश्चय हे गुण प्रामुख्यानें दिसून येत होते. आम्हां पाश्चिमात्य प्रॉटेस्टंट खिश्चनांना ( आणि विशेषेंकरून प्रेस्बिटेरियन् मताच्या अनुयायांना ) तत्त्वबोध झालेला आहेच. तेव्हां तत्त्वबोधाच्या अभावामुळें पौर्वात्य राष्ट्रांवर जीं संकटें कोसळणार आहेत,

तीं टाळण्याकरितां तो तत्त्वबोध उरलेल्या जगाला कसा करून द्यावयाचा एवढा एकच प्रश्न आतां बाकी राहिला होता !

यानंतर महायुद्धाला सुरवात झाली आणि आतां तर परिस्थितींत केवढें तरी महदंतर घडून आलें आहे ! जो स्वतःला अभिमानानें हिंदु म्हणवून घेतो, तो पुरुष ख्रिस्ततत्त्वाच्या, क्रूसाच्या तत्त्वाच्या, आमच्याहून कितीतरी अधिक सन्निध पोंचलेला आहे असें आम्हांस आढळून आलें आहे. आमचे हे पुढारी—तेच जुन्या काळचे पुढारी—त्या पुरुषाच्या चरणांशीं जाऊन ख्रिश्चनधर्म म्हणजे काय याचे पाठ घेत आहेत, हें शहाणपणाचेंच द्योतक होय. कारण परमार्थानें पाहूं गेल्यास ख्रिश्चन धर्म म्हणजे ख्रिस्तांनीं उपदेशिलेला क्रूसाचा म्हणजे आत्मक्लेशाचाच धर्म होय.

Ex Oriente Lux ¶

---

¶ प्रकाश पूर्वदिशेकडून येतो.

राजा ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ९८९९८
विभाग का.वा.
क्रमांक ७०९९
नों. दि. ३१/३/५

# आमचें प्रकाशन

* १, २ सत्याचे प्रयोग (खंड १ तृतीयावृत्ति; खंड २ द्वितीयावृत्ति) :
  लेखक : म. गांधी — २–८–०
* ३ खादी–मीमांसा ( सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति ) :
  लेखक : वाळुभाई मेहता — २–०–०
* ४ स्वराज्य–शिष्टाई : म. गांधी ( शिल्लक नाहीं ) — ०–६–०
* ५ संयम कीं स्वैराचार ? ( द्वितीयावृत्ति ) : म. गांधी — १–८–०
* ६ हिंडलग्याचा प्रसाद :
  लेखक : काका कालेलकर ( शिल्लक नाहीं ) — ०–९–०
* ※ ७ हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें व पुनर्घटना :
  लेखक : एस्. राधाकृष्णन् — १–४–०
* ※ ८ उपनिषदांतील दहा गोष्टी ( तृतीयावृत्ति ) :
  लेखक : शंकरराव देव — ०-१२-०
* ※ ९ विद्यार्थी–जीवन ( द्वितीयावृत्ति ) :
  लेखक : श्री. स. महाजन — ०–८–०
* ※ १० फिलिफाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास :
  लेखक : त्र्यं. र. देवगिरीकर — १–४–०
* ११ कॉंग्रेसचा इतिहास ( द्वितीयावृत्ति ) :
  लेखक : डॉ. पट्टाभि सीतारामय्या — २–८–०
* १२ समाजवादच कां ? ( द्वितीयावृत्ति ) :
  लेखक : जयप्रकाश नारायण — २–०–०
* १३ खानबंधूंचा अल्प परिचय :
  लेखक : महादेवभाई देसाई — ०–९–०
* १४ जवाहरलाल नेहरू ( आत्मचरित्र ) :
  अनुवादक : ना. ग. गोरे ( शिल्लक नाहीं ) — ५–०–०
* ※ १५ विश्राम ( तृतीयावृत्ति ) : साने गुरुजी — १–०–०
* ※ १६ भारतीय संस्कृति ( तृतीयावृत्ति ) : साने गुरुजी — ३–०–०
* १७ प्रसाद-दीक्षा : म. गांधी — १–०–०

१८ भिल्ल साधु गुलामहाराज :
लेखक : शं. वि. ठकार ( शिल्लक नाहीं ) ०–६–०
* १९ आधुनिक भारत : शं. द. जावडेकर ५–०–०
* २० हिमालयांतील प्रवास ( द्वितीयावृत्ति ) :
लेखक : काका कालेलकर १-१२-०
२१ गांधीजींचें विविध दर्शन ( द्वितीयावृत्ति ) :
संकलनकार : एस्. राधाकृष्णन् २–८–०
* २२ जिवंत व्रतोत्सव : काका कालेलकर १-१२-०
२३ गांधी-विचार-दोहन : किशोरलाल मश्रूवाला १–४–०
२४ सत्याग्रही महाराष्ट्र : प्रेमा कंटक ३–०–०
* २५ अर्थशास्त्र कीं अनर्थशास्त्र ? ( द्वितीयावृत्ति ) :
लेखक : जॉन रस्किन; अनुवादक : शं.द.जावडेकर २–०–०
* २६ जीवन-दर्शन ( द्वितीयावृत्ति ) : महाकवि खलिल जिब्रान
अनुवादक : र. ग. जोशी २–०–०
२७ ग्रामोद्योगाचें अर्थशास्त्र : जगदीशचंद्र कुमारअप्पा
अनुवादक : बाळुभाई मेहता १–४–०
२८ बापू : घनश्यामदास बिडला १–८–०
२९ संस्कृतीचें भवितव्य : एस्. राधाकृष्णन्
अनुवादक : साने गुरुजी १–०–०
३० महात्मा गौतम बुद्ध : एस्. राधाकृष्णन्
अनुवादक : साने गुरुजी १–०–०
३१ जीवन आणि साहित्य : आचार्य स. ज. भागवत २–८–०
३२ प्राचीन साहित्य : कविसम्राट् रवीन्द्रनाथ ठाकुर
अनुवादक : प्रो. रा. ब. आठवले १–८–०

---

* हीं पुस्तकें मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील सरकारी विद्याखात्यांनीं शाळांतील वाचनालयांकरितां व बक्षिसांकरितां मंजूर केलीं आहेत.

**सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला,**
१२ टिळक रोड, पुणें २

# आमच्याकडे एजन्सीनें असलेलीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| राजनीतिशास्त्र-परिचय : | आचार्य जावडेकर | ३-०-० |
| हिंदी राजकारणाचें स्वरूप : | ” ” | ०-८-० |
| आधुनिक राज्यमीमांसा : (भाग १ व २) | ” ” | २-८-० |
| पुरोगामी साहित्य : | ” ” | २-०-० |
| शास्त्रीय समाजवाद : | ” ” | ०-८-० |
| गीता-हृदय : | साने गुरुजी | ०-८-० |
| विनोबाजी भावे : | ” ” | १-०-० |
| देशबंधु दास : | ” ” | ०-१४-० |
| स्वराज्यसंस्थापक श्रीशिवराय : | ” | ०-४-० |
| रामाचा शेला : | ” ” | ३-०-० |
| जीवन-प्रकाशन : | ” ” | ०-३-० |
| दरबार गोपाळदास : | ह. मो. जोशी | ०-२-० |
| हिंदी चष्म्यांतून दिसणारा रशिया : | मसाणी | ०-६-० |
| लोकमाता : | आचार्य कालेलकर | ०-१२-० |
| काम आणि कामिनी : | प्रेमा कंटक | २-८-० |
| जीवनयोग : | ना. ग. जोशी | ०-१२-० |
| पाकिस्तान : | ॲड्. ग. वा. जोशी | १-०-० |

सर्व प्रकारच्या राष्ट्रीय पुस्तकांकरितां प्रथम आमचेकडे चौकशी करा.

---

**सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : १२ टिळकरोड, पुणें २**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ...१९९० नों दि ..............
वि. ... ग्रा/वी.
IRBK-0101990
IRBK-0101990